# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

सत्र–५ : Major-VIII

# मध्ययुगीन भारताचा इतिहास

(Medieval Indian History- 1206 to 1526 A.D.)

सत्र–६ : Major-IX

# मध्ययुगीन भारताचा इतिहास

(Medieval Indian History - 1526 to 1707 A.D.)

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासून

**बी. ए. भाग–३ : इतिहास**

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

**प्रथमावृत्ती :** २०२४

**सुधारित द्वितीय आवृत्ती** : २०२६

बी. ए. भाग - ३ करिता

सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :**

■

**प्रकाशक :**

**डॉ. व्ही. एन. शिंदे**

कुलसचिव,

शिवाजी विद्यापीठ,

कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**

**श्री. बी. पी. पाटील**

अधीक्षक,

शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,

कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN-

☞ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.

शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

■ **सल्लागार समिती** ■


**प्रा. (डॉ.) सुरेश गोसावी**
प्रभारी कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ज्योती जाधव**
प्रभारी प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) व्ही. व्ही. मैंदरगी**
प्र. अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
प्र. अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) आर. व्ही. गुरव**
प्र. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. बी. साळी**
प्र. अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. के. बी. पाटील** (सदस्य सचिव)
प्र. संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**■ अभ्यासमंडळ : इतिहास ■**

अध्यक्ष – **प्रोफेसर (डॉ.) चंद्रवदन मोहनराव नाईक**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर

- **डॉ. अवनिश आर. पाटील**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. अभयकुमार जगन्नाथ पाटील**
  सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड,
  ता. कराड, जि. सातारा
- **डॉ. श्रीमती आरती बळवंत नाडगौडा**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती कविता अशोक गगराणी**
  द न्यू कॉलेज, कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती उर्मिला एन. क्षिरसागर**
  मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली
- **डॉ. जयपाल चंद्रकांत सावंत**
  शंकरराव जगताप आर्टस कॉलेज, वाघोली, ता. सातारा
- **डॉ. संभाजी आनंदा मोरे**
  एम. एच. शिंदे महाविद्यालय, तिसंगी, ता. गगनबावडा,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. प्रमोदकुमार अंकुश ओलेकर**
  आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा, ता. वाळवा,
  जि. सांगली
- **प्रोफेसर (डॉ.) चंद्रकांत संदिपान चव्हाण**
  इतिहास अधिविभाग, वालचंद कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड
  सायन्स, अशोक चौक, सोलापूर
- **डॉ. तेजस मदन गर्गे**
  डायरेक्टोरेट ऑफ आर्किओलॉजी ॲण्ड म्युझियम, संत
  गोर्गे फोर्ट, संत गोर्गे हॉस्पिटल प्रिमाईसेस, फोर्ट, मुंबई
- **डॉ. नंदा पारेकर**
  एव्हरग्रीन होम, टॉवर डी, फेज ४, फ्टॅट नं. २०८,
  राजहंस प्रिंटींग प्रेस समोर, प्रभू हॉस्पिटल रोड,
  नागाळापार्क, कोल्हापूर
- **प्रोफेसर (डॉ.) निरंजन कुलकर्णी**
  इतिहास अधिविभाग, मा. श्री. आण्णासाहेब डांगे, आर्टस,
  कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, हातकणंगले, जि. कोल्हापूर
- **श्री. सदानंद कदम**
  शिवराज, १०८२, दक्षिण वसंत नगर, छत्रपती शिवाजीराजे
  मार्ग, सांगली.

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–५ घटक क्रमांक | सत्र–६ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **डॉ. रणजित पापा माने**<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, पेठवडगांव | १ | २ |
| **डॉ. मधुकर जाधव**<br>यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी, ता. चंदगड | २ | – |
| **डॉ. हाजी नदाफ**<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, पेठवडगांव<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | ३ | – |
| **डॉ. तानाजी हवलदार**<br>विश्वासराव नाईक आर्टस, कॉमर्स अ‍ॅण्ड<br>बाबा नाईक सायन्स महाविद्यालय, शिराळा, जि. सांगली | ४ | १ |
| **डॉ. मुफिद मुजावर**<br>हंगामी सहाय्यक प्राध्यापक, दूरशिक्षण व ऑनलाई शिक्षण केंद्र,<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | – | ३ |
| **डॉ. प्रमोद ओलेकर**<br>आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा, ता. वाळवा, जि. सांगली | – | ४ |

■ **संपादक** ■

**डॉ. तानाजी हवलदार**
विश्वासराव नाईक आर्टस, कॉमर्स अ‍ॅण्ड
बाबा नाईक सायन्स महाविद्यालय,
शिराळा, जि. सांगली

**प्रा. (डॉ.) सी. एम. नाईक**
देवचंद कॉलेज अर्जुननगर
ता. कागल, जि. कोल्हापूर

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून व्यक्तीगत आणि भौतिक परिस्थितीने दूर गेलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात येण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूर शिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

हे पुस्तक बी. ए. भाग तीन च्या इतिहास विषयाच्या पेपर क्रमांक ८, सत्र पाच साठी 'मध्ययुगीन भारताचा इतिहास' (१२०६ ते १५२६) आणि पेपर क्रमांक ११, सत्र सहा साठी 'मध्ययुगीन भारताचा इतिहास' (१५२६ ते १७०७) हे विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

सत्र ५ साठी पेपर क्रमांक ८ 'मध्ययुगीन भारताचा इतिहास' (१२०६ ते १५२६) यामध्ये प्रमुख राजकर्ते, दक्षिण भारतातील प्रमुख राज्यकर्ते, प्रशासन आणि अर्थव्यवस्था (दिल्ली सुलतानशाही व विजयनगर), धर्म आणि वास्तूकला तर सत्र ६ साठी पेपर क्रमांक ११ 'मध्ययुगीन भारताचा इतिहास' (१५२६ ते १७०७) यामध्ये उत्तर भारतातील प्रमुख सत्ताधिश, प्रमुख राज्यकर्ते, प्रशासन आणि अर्थव्यवस्था, धर्म, कला आणि स्थापत्य या घटकांचा विस्ताराने अभ्यास करणार आहोत.

या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये कांही उणिवा राहिल्यास प्राध्यापक व विद्यार्थी यांनी त्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी होईल. हे पुस्तक पदवी, पदव्युत्तर व विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना महत्त्वाचे ठरेल असा आम्हाला विश्वास वाटतो. तसेच सदरच्या पुस्तकाच्या लेखनाची जबाबदारी संबंधीत घटक लेखकांवर आहे.

शिवाजी विद्यापीठ, दूर शिक्षण केंद्राच्या अंतर्गत स्वयं अध्ययन निर्मिती करण्यासाठी मा. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रोत्साहन आणि मार्गदर्शन मोलाचे ठरले. दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. के. बी. पाटील, इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. सी. एस. नाईक, शिवाजी विद्यापीठ, इतिहास विभाग प्रमुख डॉ. अवनिश पाटील यांचे सहकार्य लाभले. दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

■ **संपादक** ■

**डॉ. तानाजी हवलदार**
विश्वासराव नाईक आर्टस, कॉमर्स अॅण्ड
बाबा नाईक सायन्स महाविद्यालय,
शिराळा, जि. सांगली

**प्रा. (डॉ.) सी. एम. नाईक**
देवचंद कॉलेज अर्जुननगर
ता. कागल, जि. कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–५ : पेपर–८** | |
| | **मध्ययुगीन भारताचा इतिहास (१२०६ ते १५२६)** | |
| १. | उत्तर भारतातील प्रमुख राज्यकर्ते | १ |
| २. | दक्षिण भारतातील प्रमुख राज्यकर्ते | २१ |
| ३. | प्रशासन आणि अर्थव्यवस्था (दिल्ली सुलतानशाही व विजयनगर) | ४२ |
| ४. | धर्म आणि वास्तूकला | ९३ |
| | **सेमिस्टर–६ : पेपर–११** | |
| | **मध्ययुगीन भारताचा इतिहास (१५२६ ते १७०७)** | |
| १. | उत्तर भारतातील प्रमुख सत्ताधिश | १२० |
| २. | दक्षिण भारतातील प्रमुख राज्यकर्ते | १४३ |
| ३. | प्रशासन आणि अर्थव्यवस्था | १६५ |
| ४. | धर्म, कला आणि स्थापत्य | १९८ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२४-२५ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

## घटक १

# उत्तर भारतातील प्रमुख राज्यकर्ते

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

  १.२.१ अल्लाउद्दीन खिलजी : दक्षिण मोहीम आणि अंतर्गत धोरण

  १.२.२ मुहंम्मद-बिन-तुघलक : प्रतीकात्मक चलनाचा प्रयोग

१.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.४ सारांश

१.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१.६ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## १.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला खालील माहिती स्पष्ट करता येईल.

१. अल्लाउद्दीन खिलजीची दक्षिण मोहीम आणि अंतर्गत धोरण समजून घेता येईल.

२. मुहंम्मद-बिन-तुघलकच्या विविध प्रशाकीय प्रयोगाची माहिती समजून घेता येईल.

## १.१ प्रास्ताविक :

मोहम्मद-बीन-कासिमने इ.स. ७१२ मध्ये भारतावर स्वारी केली. २० जून ७१२ मध्ये सिंध राजा दाहीर यांच्या बरोबर झालेल्या युध्दात दाहीरचा पराभव झाला. या मोहिमेमध्ये कासिमने भारतातून मोठी संपत्ती मिळविली. त्याच्यानंतर महंम्मद गझनीने इ.स. १००० ते १०२७ या कालखंडामध्ये भारतावर एकूण १७ स्वाऱ्या केल्या. यातून त्याला प्रचंड संपती मिळाली. महंम्मद गझनी नंतर भारतात येणारा तिसरा मुस्लिम आक्रमक म्हणजे मोहम्मद घोरी हा होय. यावेळी उत्तर भारतात पृथ्वीराज चव्हाण यांची सत्ता होती. पृथ्वीराज चव्हाण व महंम्मद घोरी यांच्या मध्ये इ.स. ११९१ मध्ये पहिले तराईनचे युध्द झाले. या युध्दात महंम्मद घोरीचा पराभव झाला. पण इ.स. ११९२ मध्ये मोठ्याा प्रमाणात युध्दसामुग्रीनीशी पृथ्वीराज चव्हाण

बरोबर पुन्हा युद्ध झाले यामध्ये महमंद घोरीने पृथ्वीराज चौहाणचा पराभव करून, भारतात राजकीय सत्ता स्थापन केली.

महमंद घोरीने भारतातील प्रतिनिधी म्हणून कुतुबुद्दीन ऐबक याच्या हाती सत्ता दिली. याच कुतुबुद्दीन ऐबकने १२०६ मध्ये महमंद घोरी मरण पावल्यानतंर गुलाम वंशाची स्थापना केली. अल्तमश, बल्बन यांनी पुढे आपल्या घराण्याची सत्ता स्थापन केली. हे सर्वजण सत्तेवर येण्यापूवी गुलाम होते. म्हणून त्यांच्या कार्यकाळाला 'गुलाम कालखंड' म्हणतात. इ.स. १२०६ ते १२९० या कालखंडामध्ये गुलाम सत्ताधीशांनी दिल्लीवर राज्य केले. १२९० ते १३२० या कालखंडामध्ये खिलजी घराण्याने, इ.स. १३२० ते १४१३ या कालखंडात तुघलक घराण्याने, इ.स. १४१४ ते १४५१ या कालखंडात सय्यद घराणे आणि १४५१ ते १५२६ या कालखंडामध्ये लोदी घराण्यातील सत्ताधीशांनी दिल्लीवर राज्य केले. अल्लाउद्दीन खिलजीने उत्तरेबरोबरच दक्षिण भारतात सत्ता स्थापना केली. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात अल्लाउद्दीन खिलजीची दक्षिण मोहीम आणि अंतर्गत धोरण तसेच मुहंम्मद-बिन-तुघलकच्या विविध प्रशाकीय प्रयोगाची माहिती समजून घेणार आहोत.

## १.२ विषय विवेचन :

### १.२.१ अल्लाउद्दीन खिलजी : दक्षिण मोहीम आणि अंतर्गत धोरण

अफगाणिस्तानातील 'खल्ज' हे खिलजी वंशीय लोकांचे वस्तीस्थान आहे. मुहमद घोरीचा सरदार बिहार-बंगाल विजेता मुहमद इब्न बखत्यार खिलजी हा खिलजी लोकांचा मूळ नेता होय. मामलूक सुलतानांच्या पडत्या काळात खिलजी लोक बलवान झाले. सुलतान कैकुबादचा सैन्यमंत्री असलेल्या सरदार जलालुद्दीन खिलजीने कैकुबादचा शेवट केला व त्याच्या अल्पवयीन मुलास आपल्या ताब्यात घेवून त्याच्या वतीने राज्यकारभारास सुरवात केली. भारतामध्ये आपल्या घराण्यची सत्ता स्थापन केल्यानंतर त्याने स्वतःस जलालुद्दीन ही पदवी धारण केली. या घराण्यात तीस वर्षांच्या काळात एकूण सहा राज्यकर्ते होऊन गेले.

१२९० मध्ये जलालुद्दीन खिलजी याने कैकुबाद याला ठार मारून गुलाम घराण्याचा शेवट केला. आणि खिलजी घराण्याची दिल्लीवर सत्ता स्थापन केली. जलालुद्दीन खिलजी याने लवकरच त्यासही बाजूला करून १२ जून १२९० रोजी जलालुद्दीन फिरोज खिलजी या नावाने दिल्लीच्या गादीवर बसला. जलालुद्दीन फिरोज हा खिलजी घराण्याचा संस्थापक मानला जातो.

इ.स. १२९६ ते १३१६ या काळात दिल्लीची सत्ता अल्लाउद्दिन खिलजीच्या ताब्यात होती. अल्लाउद्दीन खिलजी हा संपूर्ण दिल्ली सुलतानशाहीच्या इतिहासातील बलशाली शासक होता. त्याने अनेक धाडसी निर्णय घेतले तसेच प्रशासनामध्ये मोठ्या प्रमाणात बदल घडवून आणले. त्याने प्रशासकीय बदलाच्या अनुषंगाने घेतलेल्या निर्णयामुळेच त्याची दिल्लीवर सत्ता बळकट झाली.

**अल्लाउद्दीन खिलजीचा परिचय :**

अल्लाउद्दीन खिलजीचा जन्म १२६६ मध्ये झाला. अल्लाउद्दीनचे मूळ नाव अली गर्शप असे होते. लहाणपणीच त्याचा पिता शिहाबुद्दीन निधन पावल्यामुळे त्याचे चुलते जलालुद्दीन खिलजी यानेच त्याचे पालनपोषण केले. तसेच जलालुद्दीन खिलजी याने स्वत:च्या कन्येचा विवाह त्याच्याबरोबर करून, त्याला जावई बनवले. अल्लाउद्दीन खिलजी याला जलालुद्दीन खिलजी यांचे मवाळवादी धोरण पसंत नव्हते. आक्रमक विचारसरणीचा असल्याने तरूण वर्ग त्याच्याकडे आकर्षित झाला. दिल्लीची सत्ता मिळवावी ही त्याची महत्वकांक्षा होती. अल्लाउद्दीन खिलजी निरक्षर होता परंतु युध्दकलेचे त्यास उत्तम ज्ञान होत. १२९२ मध्ये माळव्यातील भेलसा हे संपन्न ठिकाण लुटल्यानंतर जलालुद्दीन खिलजी याने अल्लाउद्दीन खिलजीचा पराक्रम पाहून त्याला उच्चपदे व पदव्या दिल्या आणि कारा (अलाहाबाद) व आयोध्या प्रांताचा राज्यपाल नेमले. शिवाय त्याच्या पराक्रमावर खुश होऊन त्यास सेनापती म्हणून नेमले. भेलसा स्वारी दरम्यान अल्लाउद्दिनने दक्षिणेतील देवगिरीच्या वैभवसंपन्न यादव घराण्याची कीर्ती ऐकली होती. २६ फेब्रुवारी १२९६ रोजी आपल्या सैन्यानिशी काराहून देवगिरीकडे कूच केली. अल्लाउद्दिन अचानकपणे देवगिरी राज्याच्या सीमेवर पोहचला. यावेळी देवगिरीचा राजा रामचंद्रदेव पूर्ण गाफील होता. यावेळी त्याचे सैन्य राजपुत्र सिंघनदेवाच्या नेतृत्वाखाली दक्षिणेत गुंतले असल्याने तो भांबावला व देवगिरीच्या किल्यात दडून बसला. त्यामुळे अल्लाउद्दिनने देवगिरीची प्रचंड लुट केली. या स्वारीमध्ये प्रचंड संपती मिळवली. देवगिरी लुटून अल्लाउद्दीन ३ जून १२९६ रोजी कारा येथे आला. अल्लाउद्दीनच्या पराक्रमावर खुश होऊन त्याला भेटण्यासाठी जल्लालुद्दीन पोहचला पण अल्लाउद्दिनची राक्षसी महत्वाकांक्षा जागृत झाली असल्याने त्याने भेटीसाठी आलेल्या आपल्या काकाचा विश्वासघाताने खून केला. नंतर त्याने स्वतःचा राज्याभिषेक केला. या घटनेमुळे अनेक सरदारांनी अल्लाउद्दीन खिलजीच्या धोरणास विरोध केला. परंतु त्याने विरोधकाना पैसा वाटून त्याना आपल्या बाजूस वळवून त्यांचा विरोध कमी केला.

**दक्षिण मोहीम :**

अल्लाउद्दीन खिलजी याने सत्तेची सूत्रे आपल्या हाती घेतल्यानंतर प्रथम उत्तर भारतावर आपले लक्ष केंद्रित केले. साम्राज्यवादी अल्लाउद्दिनची दृष्टी दक्षिण भारताकडे वळली, यावेळी दक्षिणेत देवगिरी (यादव), तेलंगणा (काकतीय), द्वारसमुद्र (होयसळ) आणि मदुरा (पांड्य) ही चार प्रमुख राज्ये होती. अल्लाउद्दीन खिलजी याने दक्षिण मोहीम आखण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

**दक्षिण भारतावरील स्वारीची कारणे :**

**१. दक्षिणेतील सत्तामधील असणारे वैमनस्य :** देवगिरी (यादव), तेलंगणा (काकतीय), द्वारसमुद्र (होयसळ) आणि मदुरा (पांड्य) या दक्षिणेतील सत्तांमध्ये आपआपसामध्ये वैमनस्य होते, त्यामुळे सतत त्यांच्यामध्ये संघर्ष चालू होता. परिणामी ही चारीही राज्ये कमकुवत झाली होती. त्याचा फायदा घेण्यासाठी मोहिमेची आखणी केली होती.

**२. सैन्यास कामात गुंतवून ठेवणे :** दिल्लीवर आपले नियंत्रण प्राप्त झाल्यानंतर साम्राज्यात शांतता प्रस्थापित करणे आणि बंडखोरांचा बंदोबस्त करणे यासाठी प्रचंड मोठ्या प्रमाणात सैन्य निर्माण केले होते. परंतु बंडखोरांचा बंदोबस्त होऊन शांतता प्रस्थापित झाली असल्याने सैन्यास आता कोणतेही काम नव्हते. अशा रिकाम्या सैन्यास कोणत्या तरी कामात गुंतवून ठेवणे आवश्यक होते त्यासाठी अल्लाउद्दिनने दक्षिण मोहिमीची आखणी केली होती.

**३. संपत्ती मिळविणे :** दक्षिणेतील चारीही सत्ता बलाढ्य स्वरूपाच्या होत्या. सर्व राज्ये आर्थिकदृष्ट्या संपन्न होती. पण त्यांच्यामध्ये असलेल्या सततच्या संघर्षामुळे लष्करीदृष्ट्या ती कमकुवत बनलेली होती. यामुळे प्रबळ असा प्रतिकार होणार नव्हता आणि प्रचंड संपती मिळणार होती. याचबरोबर त्याने केलेल्या सुधारणा राबविण्यासाठी तसेच विशाल फौजेचा नियमित पगाराच्या सोयीसाठी दक्षिणेतील संपती आवश्यक होती.

**४. लष्करी मनोबल वाढले होते :** अल्लाउद्दिन खिलजीने दक्षिणेतील वैभवसंपन्न अशा देवगिरीवर आक्रमण करून देवगिरीची प्रचंड लुट केली होती आणि प्रचंड संपत्ती मिळवली होती. शिवाय देवगिरीच्या यादवांचा दारूण पराभव घडवून आणला होता. त्यामुळे त्याच्या मनामध्ये लष्करी आत्मविश्वास वाढलेला होता.

**५. एकछत्री अंमल प्रस्थापित करणे :** दक्षिण भारतातील हिंदू राज्यांना आपले मंडलिक बनवून संपूर्ण भारतावर आपला एकछत्री अंमल प्रस्थापित करण्याचे ध्येय अल्लाउद्दिन याचे होते.

**६. यादवांचा सूड घेणे :** अल्लाउद्दिनने गुजारतवर स्वारी केली होती व ते जिंकून घेतले होते. गुजरातचा पराभूत राजा कर्णदेव वाघेला हा पळून देवगिरीच्या आश्रयास गेला होता. त्यास रामचंद्रराव यादवाने आश्रय दिल्याने देवगिरीच्या यादवांचा सूड घेण्याच्या उद्देश्याने दक्षिण मोहीम आखली होती.

**७. खंडणी प्राप्त करणे :** १२९६ मध्ये स्वारी करून अल्लाउद्दीनने रामचंद्र देव याचा पराभव केला होता व दरवर्षी खंडणी देण्याचे निश्चित केले होते. पण देवगिरीचा राजा रामदेवराय याने देवगिरीची सूत्रे हाती घेतल्यानंतर प्रत्येकवर्षी देण्यात येणारी खंडणी बंद केली होती. त्यामुळेच दक्षिण भारतावर स्वारी करण्याचे अल्लाउद्दिनने नियोजन केले होते.

अशा वेगवेगळ्या कारणांमुळे अल्लाउद्दिनने मलिक काफुरच्या नेतृत्वाखाली दक्षिण मोहीम आखली.

**दक्षिण मोहीम :**

**१. देवगिरीवर स्वारी (इ.स. १३०७)**

देवगिरीचा राजा रामदेवराय याने देवागिरीची सूत्रे हाती घेतल्यानंतर प्रत्येकवर्षी देण्यात येणारी खंडणी देणे थांबविले शिवाय गुजरातचा पराभूत राजा कर्णदेव वाघेला यास राजाश्रय दिला होता. रामचंद्रदेवाने कर्णदेवाच्या मुलीशी, देवलदेवीशी युवराज सिंघनदेव याचा विवाह लावून देण्याचा प्रत्यन सुरू केला होता.

देवगिरीच्या या प्रयत्नामुळे संतप्त झालेल्या अल्लाउद्दिनने दक्षिणेवर आपली पकड पुन्हा मजबूत करण्यासाठी मलिक काफुर याला १३०७ मध्ये मोहिमेवर पाठविले. देवगीरीजवळ मलिक काफुरच्या सैन्याने यादव सैन्याचा धुव्वा उडविला आणि देवगिरीवर आपला ताबा मिळविला. रामचंद्रराव याचा पराभव करून त्याच्या राण्या व मुलाबाळांना दिल्लीला पाठविले. अल्लाउद्दिनने रामचंद्रदेवाला अत्यंत सन्मानपूर्वक वागणूक दिली. रामचंद्रदेव सहा महिने दिल्लीला होता. त्याच्या एका मुलीचा विवाह अल्लाउद्दिनशी करून देण्यात आला. अल्लाउद्दिनने त्याला 'रायरायन' हा किताब व १ लक्ष सुवर्णमुद्रा दिल्या.

### २. वारंगळवर स्वारी (इ. स. १३०९)

देवगिरीच्या विजयामुळे अल्लाउद्दिनने मलिक काफुरला नायब मलिक हे सुलतानानंतरचे सर्वोच्च पद दिले व १३०९ रोजी वारंगळवर पाठविले. देवगीरीवरून वरंगळकडे जाताना तेलंगणाच्या आजूबाजूचा प्रदेश लुटून जाळून उध्वस्त केला व प्रजेत दहशत निर्माण केली. वारंगळचा राजा प्रतापरुद्रदेव द्वितीय याने वारंगळच्या किल्यातून प्रतिकार करण्याचे ठरविल्याने मलिक काफुरने किल्यास वेढा दिला. प्रतापरुद्रदेव द्वितीयने मलिक बरोबर तह केला. प्रचंड संपती दिली व दरवर्षी खंडणी देण्याचे मान्य केले. याच तहामध्ये जगप्रसिद्ध कोहिनूर हिरा मलिक काफुरला मिळाला.

### ३. द्वारसमुद्र मोहीम (इ.स. १३११)

वारंगळच्या यशामुळे अल्लाउद्दिनने द्वारसमुद्रची मोहीम आखली व मोहिमेचे नेतृत्व मलिक काफुरकडे सोपविले. यावेळी होयसाळ घराण्यातील वीर बल्लाळ दुसरा राजा होता. मलिक काफुरने होयसळ राज्यावर स्वारी केली व द्वारसमुद्र जिंकून राजधानीची लुट केली. वीर बल्लाळ दुसराने काफूरला विरोध केला. परंतु त्याचा पराभव झाला व त्याने मांडलिकत्व स्वीकारले.

### ४. मदुरेवर स्वारी

वारंगळ जिंकल्यानंतर मलिक काफुरने दक्षिणेकडील पांड्य राज्यावर स्वारी केली. मदुरेच्या पांड्य राज्यात सुंदर पांड्य आणि वीर पांड्य या दोन राजपुत्रात गादीसाठी संघर्ष सुरु होता. या वादात सुंदर पांड्य याने अल्लाउद्दिन याची मदत मागितली. अल्लाउद्दिन यांच्या सूचनेप्रमाणे मलिक काफुरने मदुरेवर आक्रमण केले. मलिक काफुर मदुरेत येण्यापुर्वीच वीर पांड्य मदुरेतून पळून गेला. या स्वारीमध्ये प्रचंड संपती मिळाली.

### ५. देवगिरीवर स्वारी (इ.स. १३१२)

इ. स. १३१२ मध्ये रामचंद्रदेव यादव मृत्यू पावला व त्याचा मुलगा सिंघणदेव देवगिरीच्या गादीवर बसला. पण सिंघणदेव याने सुलतानास वार्षिक खंडणी देणे बंद केले. त्यामुळे अल्लाउद्दीन याने मलिक काफुरला देवगिरीवर आक्रमणास पाठविले. झालेल्या युद्धात सिंघणदेव पराभूत होवून मारला जाऊन त्याच्या जागी हरपालदेव याची नियुक्ती करून मलिक काफुर दिल्लीला परतला.

**अल्लाउद्दीन खिलजी दक्षिण स्वारीचे परिणाम :**

**१) अल्लाउद्दीन खिलजीच्या प्रतिष्ठेत भर पडली :** मध्ययगुीन कालखंडामध्ये दक्षिण भारतावर आक्रमण करणारा पहिला सलुतान अल्लाउद्दीन खिलजीच आहे. दक्षिण भारतावर त्याला मिळालेल्या अभूतपूर्व यशामुळे त्याची प्रतिष्ठा वाढली. उत्तर भारत व दक्षिण भारत अल्लाउद्दिनच्या नियंत्रणाखाली आला.

**२) राजकीय शहाणपणाची भूमिका :** दद्दिण भारतातील राज्ये दिल्लीपासून अतिशय दूर होते. साम्राज्याला जोडणे चुकीचे होईल, म्हणून त्यांना मांडलिक बनवले. त्यांच्याकडून दर वर्षी खंडणी गोळा केली. त्यांना राजकीय स्वतंत्र दिले. त्याची हि भूमिका राजकीय शहाणपणाची असल्याचे दिसून येते.

**३) उदार धोरण :** अल्लाउद्दीन खिलजीने दक्षिण दिग्विजय जरी मिळविला असला तरी दक्षिणेतील राजांना व जनतेला सन्मानाने वागविले. देवगिरीचा राजा रामदेवराय, द्वारसमद्राचा राजा वीर बल्लाळ तिसरा यांचे दिल्लीमध्ये भव्य स्वागत करून सन्मानपूर्वक वागणूक दिली. या उदार धोरणामुळे अल्लाउद्दीनची प्रतिष्ठा वाढली.

**४) प्रचंड संपत्तीची प्राप्ती :** अल्लाउद्दीन खिलजीचे दद्दिणेवर आक्रमण करण्याचे मुख्य कारण संपती मिळविणे हे होते. या दक्षिण दिग्विजयाने त्याचा या मोहिमेच्या मागे जो हेतू होता तो साध्य झाल्याचे दिसून येते.

**५) दक्षिण भारतात इस्लामाचा प्रसार :** दद्दिण भारतात हिंदूंचेच राज्य होते. पण अल्लाउद्दीन खिलजीचे दक्षिणेवरील झालेल्या आक्रमणामुळे हिंदूंची मंदिरे फोडली व अनेक लोकांची कत्तल केली. याचबरोबर इस्लाम धर्माचा प्रचार आणि प्रसार केला.

**६) जनतेची आर्थिक लुट झाली :** या स्वरीमध्ये मलिक काफुरने प्रचंड लुट केली. दक्षिणेतील राज्याकडून जबरदस्तीने मोठ्या प्रमाणात खंडणी वसूल केली. साहजिकपणे हि खंडणी देण्यासाठी तेथील राजांना जनतेवर प्रचंड कर लादले. त्यामुळे जनतेची मोठ्या प्रमाणावर आर्थिक लुट झाली.

वरील वेगवेगळे परिणाम अल्लाउद्दीन खिलजीच्या दक्षिण स्वारीचे झाल्याचे दिसून येतात.

**अल्लाउद्दिन खिलजीचे अंतर्गत धोरण :**

अल्लाउद्दीन हा कार्यक्षम प्रशासक असल्याने त्याने प्रशासनाची एक दिशा निश्चित करून त्याची काटेकोर अंमलबजावणी केली. कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांना पारितोषिक आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांना पदच्युत केले. अल्लाउद्दीन खिलजीने साम्राज्य विस्ताराबरोबरच प्रशासकीय सुधारणेकडे ही तेवढेच लक्ष दिले. अल्लाउद्दीन खिलजीचे अंतर्गत धोरण पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**१. प्रशासन व्यवस्था :**

अल्लाउद्दीन खिलजीने प्रशासनाच्या सोयीसाठी विविध विभाग निर्माण केले. या विभागावर विविध अधिकाऱ्यांच्या नेमणूका केल्या. मध्यवर्ती प्रशासनातील सर्व अधिकार सुलतानाकडे ठेवले. विविध मंत्र्यांच्या नेमणूका केल्यामुळे प्रशासनामध्ये एकवाक्यता आली. त्यामध्ये पुढील मंत्र्यांच्या नेमणुका केलेल्या होत्या.

१) दिवाण–इ–वझारत : दिवाण–इ–वझारत हा मुख्यमंत्री होता. साम्राज्यातील जमीन महसुलाचे अधिकार याच्याकडे दिलेले होते.

२) दिवाण–इ–इन्शा : या मंत्र्याकडे राज्यातील सरकारी पत्रव्यवहार सांभाळण्याचे काम होते.

३) दिवाण–इ–रियासत : या मंत्र्याकडे आर्थिक धोरण ठरविण्याचे काम असे. यातून राज्याची आर्थिक बाजू भक्कम करणे हे त्याचे उद्दिष्ठ असे.

४) दिवाण–इ–आरिझ : याच्याकडे सैन्यप्रमुखाचे काम होते. सैन्यभरती करणे सैन्याचे संघटन करणे व सैन्याचा पगार देणे इत्यादी कामे त्याला करावी लागत असत.

५) दिवाण–इ–रसालत : हा मंत्री परराष्ट्र खाते साभाळत असे. परराज्याबाबतचे धोरण तो आखत असे. परराज्यातून आलेल्या मान्यवरांचे तो स्वागत करून त्यांची काळजी घेत असे.

## २. **महसूल सुधारणा :**

अल्लाउद्दीन खिलजीने सर्वप्रथम जहागीरीची प्रथा समाप्त केली. वक्फ, इनाम, पेन्शन व धार्मिक संस्था यांना देण्यात आलेल्या सर्व जमिनी खालसा करून त्या सरकार जमा केल्या. मुकादम, चौधरी आणि खोत या हिंदू महसूल अधिकाऱ्यांना ज्या विशेष सवलती मिळत होत्या त्याही संपुष्टात आणल्या. आपल्या राज्यातील सर्व जमिनीची मोजणी केली. जमिनी मोजणी करणारा हा पहिला सुलतान होता. जमीन मोजणी करून त्याची कागदपत्रे राजस्व विभागात सुरक्षित ठेवली. पिक कोणते आहे यानुसार महसूल आकारण्यात येऊ लागला.

कनकूत, बटाई आणि लोंक बटाई असे महसूल आकारणीचे तीन प्रकार अमंलात आणले. उत्पन्नाच्या निम्मा शेतसारा निश्चित करण्यात आला होता. कर वसुली अतिशय कडक स्वरुपाची होती. अल्लाउद्दिनच्या आर्थिक धोरणामुळे राज्याचे महसुली उत्पन्न वाढले. राजस्व खात्यातील भ्रष्टाचार कमी झाल्याने राज्यात धान्याची कमतरता भासली नाही. पण अल्लाउद्दिनच्या आर्थिक धोरणाचा हिंदू जनतेवर विपरीत परिणाम घडून आला. त्यामुळे हिंदू प्रजेचे दारिद्र्य वाढत गेले.

## ३. **सैन्य सुधारणा :**

अल्लाउद्दीनने तत्कालीन सैन्यव्यवस्थेत अमुलाग्र बदल घडवून आणले. सैन्यव्यवस्थेसाठी 'दिवाण–ए–आरीज' हा स्वतंत्र विभाग निर्माण करण्यात आला. अल्लाउद्दिन हा पहिला सुलतान होता ज्याने आपल्या राज्यात राजधानीच्या ठिकाणी सुसज्ज सैन्याची व्यवस्था केली. सर्व सैनिकांना व सेनाधिकाऱ्यांना सरकारी खजिन्यातून रोख वेतन देण्याची व्यवस्था केली. सर्वसाधारण सैनिकांच्या दर्जानुसार तीन श्रेणी तयार केल्या होत्या व त्यानुसार पगार निश्चित केला होता. सैनिकांची मोजदाद ठेवण्यासाठी चेहरा रजिस्टर पद्धत अवलंबली होती.

सैनिकाचे नाव, रंग, चेहरा किंवा शरीरावरील विशिष्ठ खाणाखुण याची लेखी माहिती नोंदवली जाई. सैनिकाची रोज हजेरी नोंदवली जाई. घोड्यांना डाग देण्याची पद्धत सुरू केली. सैनिकास घोडे आणि शस्त्र सरकारकडून दिले जाई. सैन्याची रोज परेड घेण्यात येऊ लागली. त्यामुळे सैन्याची कार्यक्षमता वाढू लागली.

सीमेवरील किल्यांची डागडुजी करण्यात आली शिवाय काही नवीन किल्ले बांधण्यात आले. या व्यवस्थेमुळे मंगोल आक्रमणापासून साम्राज्याचे संरक्षण होऊ शकले.

**४. न्यायव्यवस्था :**

अल्लाउद्दिनने न्यायालयीन व्यवस्थेमध्येही बदल घडवून आणले. न्यायदानासाठी काझीची नेमणूक केली व नवीन दंडविधान निर्माण केले. न्यायदानाच्या क्षेत्रात मुस्लिम कायदा पद्धती प्रचलित असल्यामुळे हिंदू प्रजेला न्याय मिळणे कठिण असे. पोलीस व गुप्तहेरांच्या माध्यमातुन गुन्हेगाराची चौकशी करून काझी मुसलमान कायद्याप्रमाणे न्याय देत असे.

**५. सामाजिक सुधारणा :**

अल्लाउद्दीन खिलजीने समाजाच्या व राज्यकारभाराच्या दृष्टीने अनेक सुधारणा घडवून आणल्या. सामाजिक सुधारणा करीत असताना कोणाचाही सल्ला घेतला नाही. अल्लाउद्दीन खिलजीने केलेल्या सामाजिक सुधारणा खालीलप्रमाणे आहेत.

**अ) मद्यपान व जुगारावर बंदी :**

अल्लाउद्दिनने राजधानी व आजूबाजूच्या प्रदेशात मद्यपान व जुगारावर बंदी आणून हे व्यवसाय करणाऱ्यांना राजधानी बाहेर पाठविले. सुलतानाने साम्राज्यात मद्य घेण्यास पूर्णपणे बंदी घातली. हा कायदा आमलात आणण्यासाठी स्वतः मद्य सोडले. या कायद्याचे पालन जे करणार नाहीत त्यांना कडक शिक्षा करण्यात आल्या.

**ब) सामुदायिक कार्यक्रम व संम्मेलनावर बंदी :**

सामुदायिक कार्यक्रम व संम्मेलने अशा कार्यक्रमातून सुलतानाविरूद्ध कट कारस्थाने रचली जात असत. त्यामुळे असे कोणतेही सामुदायिक कार्यक्रम भरवावयाचे नाहीत असा कायदा केला.

**क) सरदार वर्गाची अतिरिक्त मालमत्ता जप्त**

सरदार वर्गाकडे असलेली मालमत्ता व पैसा हेच सुलतानाविरूध्द कट करण्याचे मुख्य कारण होय. म्हणून सुलतानाने सरदार वर्गाकडील अतिरिक्त मालमत्ता जप्त केली. अनेक धार्मिक कारणांवरून सरदारांच्या जमीनी जप्त केल्या.

**ड) हिंदू विषयक कडक धोरण :**

अल्लाउद्दीन खिलजीने हिंदूवर कडक निर्बध लादले. त्यांच्याकडून उत्पन्नाचा निम्मा हिस्सा शेतसारा म्हणून घेतला. हिंदूवर जाचक असा 'जिझिया' कर लादला. कुरण, घरे, जनावरे यावरही त्याने कर लादले. घोड्यावर बसणे, शस्त्रास्त्रे, उत्तम वस्त्रे वापरणे, धार्मिक उत्सव साजरे करणे इ. गोष्टींची हिंदुना मनाई होती. त्याच्या या निष्ठूर व जुलमी धोरणांमुळे हिंदू प्रजा अत्यंत त्रस्त झाली होती.

## ६. वस्तूंचे भाव नियंत्रण :

अल्लाउद्दीन खिलजीचे बाजार भाव नियंत्रण ही त्या काळातील एक नाविन्यपूर्ण सुधारणा होती. अल्लाउद्दीन खिलजीने जीवनोपयोगी वस्तूंचे भावनियंत्रण करून त्या अल्प किंमतीत सर्वसामान्य लोकांना मिळतील अशी व्यवस्था केली. अल्लाउद्दिनने वस्तूचे जे भाव नियंत्रण घडवून आणले, ते केवळ जनकल्याणाच्या दृष्टीने घडवून आणले असे मत सुफी संत शेख नासिरुद्दीन याने व्यक्त केलेले आहे. अल्लाउद्दिनने बाजारात येणाऱ्या आवश्यक वस्तूंचे भाव निश्चित करून दिले ते पुढीलप्रमाणे

वस्तूंचे भाव व बाजार नियंत्रण कायद्याची काटेकोर अमंलबजावणी व्हावी म्हणून 'दिवाण-ए-रियासत' या अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली होती. त्याच्या मदतीला शहना-ए-मंडी, बरीद, मूनहियान इ. अधिकारी असत. हे सर्व अधिकारी प्रामाणिकपणे काम करीत असल्याने खोटे माप देणे, जास्त भावाने माल विकणे या गोष्टी सहसा होत नसत. काळाबाजार आणि भ्रष्टाचार नष्ट करण्यासाठी अल्लाउद्दिनने अतिशय कडक कायदे तयार केले.

अल्लाउद्दीनची ही योजना तात्त्विकदृष्ट्या कितीही चांगली असली तरी व्यवहार्य नव्हती. या व्यवस्थेमुळे शेतकरी, दलाल, व्यापारी यापैकी कुणाचाच फायदा झाला नाही. शिक्षेच्या भीतीमुळे अनेक व्यापारी व दलाल यांनी आपआपले व्यवसाय बंद केले. त्यामुळे व्यापार ठप्प होऊन साम्राज्याचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले. अल्लाउद्दिनच्या मृत्यूनंतर भाव नियंत्रण योजना कोलमडून पडली.

### अल्लाउद्दीनचा मृत्यू :

अतिशय श्रमामुळे अल्लाउद्दीन आजारी पडला. त्या काळात त्याच्या कुटुंबीयांनी त्याची काळजी घेतली नाही. १३१२ पर्यंत जवळजवळ सर्व भारत त्याच्या ताब्यात होता. पण इ.स. १३१३ पासून अल्लाउद्दिन शारीरिक व मानसिकदृष्ट्या खचू लागला. मलिक काफूरवरील असलेल्या विश्वासामुळे सर्व सत्ता त्याच्याकडे सोपवून अल्लाउद्दिन निर्धास्त राहू लागला. त्याच्या शेवटच्या काळात ठीक ठिकाणी बंडाळ्या होऊ लागल्या. गुजरात, चितोड, दक्षिणेतील हिंदू राजे यांनी शाही फौजांचा जागोजागी पराभव करण्यास सुरवात केली. त्यामुळे आजारी अल्लाउद्दिन अधिकच खचला व निराश आवस्थेत ६ जानेवारी १३१६ रोजी त्याचा मृत्यू झाला.

### अल्लाउद्दीनची योग्यता :

अल्लाउद्दीन खिलजीच्या योग्यतेबददल इतिहासकारांमध्ये मतभेद आहेत. स्मिथ म्हणतो अल्लाउददीन खिलजी एक जुलमी व रानटी राजा होता. त्यास न्यायनीतीची चाड नव्हती, तर लेनपूल म्हणतो जरी तो रक्तपिपासू व निर्दय शासक होता तरी तो एक शक्तिशाली व योग्य शासक होता हे कोणीही नाकबूल करणार नाही. अशा अल्लाउददीन खिलजीची योग्यता पुढील प्रमाणे सांगता येईल.

**अ) गुण :**

**१. सर्वश्रेष्ठ सुलतान :**

अल्लाउद्दीन खिलजी हा सुलतानशाहीतील सर्वश्रेष्ठ सुलतान मानला जातो. सुलतानशाहीतील दुसऱ्या कोणत्याही सुलतानाला त्याच्या एवढा साम्राज्यविस्तार करता आला नाही. तो साहसी, असामान्य योद्धा व कुशल सेनापती होता.

**२. प्रतिभाशाली प्रशासन :**

अल्लाउद्दीन खिलजी हा उत्तम प्रशासक होता. परंपरागत प्रशासन व्यवस्थेमध्ये बदल करून नवीन प्रशासनाची स्थापना करणारा हा पहिला प्रशासक होय. त्याच्या कुशल प्रशासन व्यवस्थेमुळे बाहय आक्रमण व अंतर्गत बंडाचा बंदोबस्त होऊन राज्यात शांतता स्थापन झाली.

**३. विशाल राज्य निर्माण केले :**

सुलतानशाहीचे मोठे राज्य निर्माण करणारा, उत्तम प्रशासन निर्माण करणारा, दक्षिण भारतावर स्वारी करणारा अल्लाउद्दीन खिलजी हा मध्ययुगीन भारताचा अग्रगण्य शासक समजला जातो. तो सुलतानशाहीतील यशस्वी सुलतान म्हणून त्याचे स्थान श्रेष्ठ आहे.

**४. उत्तम योद्धा :**

अल्लाउद्दीन खिलजी उत्तम योध्दा व उत्तम तलवार बहाद्दर होता. त्याच्या प्रामाणिक व पराक्रमी सेनापतीमुळे त्याला अनेक विजय मिळाले.

**५. शांतता व सुव्यवस्था :**

अल्लाउद्दीन खिलजीने संपूर्ण राज्यामध्ये शांतता व सुव्यवस्था निर्माण केली. त्याने भरीव सुधारणा करून प्रशासन उत्तम केले. राज्यात भरीव सुधारणा करणारा तो पहिला सुलतान ठरला.

**ब) दोष :**

**१. क्रूर व निर्दयी :**

अल्लाउद्दीन भयंकर क्रूर व रक्तपिपासू होता. त्याने अनेकांच्या कत्तली केल्या. सत्तेसाठी जलालुद्दीनने आपल्या काकाला कपटाने ठार केले. मंगोलाकडून जफरखान ठार झाल्यावर त्याला आनंद झाला. अल्लाउद्दीनने स्वतःची मुले व बेगमेसही कैदत टाकले. युध्द आणि रक्तपात हेच त्याचे जीवन होते

**२. कडवा मुसलमान :**

अल्लाउद्दीन कट्टर मुसलमान होता. राज्यकारभारात इस्लाम धर्माला महत्व दिले नसले तरी तो स्वतः सच्चा मुसलमान समजत असे. त्याने इतर धर्मियांचा अनन्वित छळ केला.

### ३. हिंदूंचा छळ :

अल्लाउद्दीन खिलजीने अनेक हिंदु धर्मियांचा छळ केला. अनेक हिंदुंना मुस्लिम धर्म स्विकारायला लावला. हिंदुवर जाचक जिझिया कर लादला. तो कट्टर सुन्नी पंथीय असल्यामुळे त्याने नेहमी मुस्लिम धर्माचा पुरस्कार केला.

### ४. नैतिक अधिष्ठानचा अभाव :

निती-अनीतीची चाड न बळगता कोणतेही कृत्य करावयास तो मागे पुढे पाहत नसे. अल्लाउद्दीन खिलजीच्या राज्याला नैतिकतेचे अधिष्ठान नव्हते. त्याच्या राज्याला सामान्य जनतेचा पाठिंबा नव्हता.

### सारांश :

अल्लाउद्दीन खिलजीमध्ये चांगल्या आणि वाईट अशा दोन्ही प्रकारच्या गुणांचा त्याच्या व्यक्तिमत्वात समावेश होता. मध्ययुगीन भारताच्या राज्यकर्त्यात अल्लाउद्दीन खिलजीला उच्च व मानाचे स्थान दिले जाते.

### स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :

अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.

१. मोहम्मद-बीन-कासिमने इ.सन. ................मध्ये भारतावर स्वारी केली.

अ) ७१२ ब) ७२० क) ७०० ड) ८१२

२. अल्लाउद्दीन खिलजीचे मूळ नाव .......... होते.

अ) मुहंम्मद ब) अली खुली क) अली गर्शप ड) सय्यद

३. अफगाणिस्तानातील ......................हे खिलजी वंशीय लोकांचे वसतीस्थान आहे.

अ) 'खल्ज' ब) 'बल्ख' क) 'काबुल' ड) 'कंधार'

४. अल्लाउद्दीन खिलजीने स्वतःला सुलतान म्हणून .......... मध्ये घोषित केले.

अ) १२९६ ब) १२९७ क) १२९८ ड) १२९९

५. सैन्यव्यवस्थेसाठी ......................हा स्वतंत्र विभाग निर्माण करण्यात आला

अ) दिवाण-ए-आरीज ब) दिवाण-इ-इन्शा

क) दिवाण-इ-वझारत ड) यापैकी नाही

ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. अल्लाउद्दीन खिलजीच्या स्वारीच्या वेळी देवगिरीवर कोणाची सत्ता होती?

२. अल्लाउद्दीन खिलजीने जमीन महसुलाचे अधिकार कोणत्या मंत्र्याकडे दिले होते?

३. कोणत्या सुलतानाने दक्षिणेवर पहिली स्वारी केली?

४. घोड्यांना डाग देण्याची पध्दत कोणत्या सुलतानाने सुरू केली?

५. अल्लाउद्दीन खिलजीने कोणते नवीन नगर वसवले?

### १.२.२ महंमद–बिन–तुघलक : शासन व्यवस्थेतील अभिनव प्रयोग

तुघलक हे ''कुतलघ'' (गाझी मलिकचा पिता) या नावाचा अपभ्रंश आहे. गाझी मलिक या पंजाबच्या राज्यपालाने इ.स. १३२० मध्ये शेवटचा खिलजी सुलतान खुस्रोशहाचा वध केला व गियासुद्दीन तुघलकशहा हे नांव धारण करून तो दिल्लीच्या गादीवर बसला. त्याच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा महंमद जौना हा महंमद तुघलकशहा हे नांव धारण करून दिल्लीच्या गादीवर बसला. मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील विविध प्रयोग करणारा सुलतान म्हणून मुहंम्मद–बिन–तुघलकाला ओळखले जाते.

**पूर्वचरित्र :**

गाझी मलिकच्या ५ मुलांपैकी फकरुद्दीन महंमद जौना उर्फ महमंद तुघलक हा सर्वात जेष्ठ व कर्तबगार होता. पर्शियन व अरेबिक साहित्याचा तो चांगला जाणकार होता. खगोलशास्त्र, वैद्यकशास्त्र, गणित, तत्त्वज्ञान या विषयांचाही त्याचा अभ्यास होता. गियासुद्दीन तुघलकाच्या मृत्युनंतर त्याचा मोठा मुलगा फकरूद्दीन जुनाखान उर्फ उलुघखान हा मुहंम्मद–बिन–तुघलक या नावाने इ.सन १३२५ मध्ये गादीवर आला. मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील महंमद तुघलक हे अत्यंत विलक्षण आणि वादग्रस्त व्यक्तिमत्व आहे. काश्मीर, राजपुताना आणि समुद्रकिनारपट्टीचा काही प्रदेश सोडला तर जवळजवळ संपूर्ण भारत त्याच्या साम्राज्याचा भाग होता.

- **महंमद–बिन–तुघलकाचे कार्य प्रशासनव्यवस्थेतील अभिनव प्रयोग :**

**१. जमीन महसूल विषयक सुधारणा :**

मुहंम्मद–बिन–तुघलकाने सुलतान पदाची सुत्रे हाती घेतल्यानंतर सर्व राज्यात महसुलाचा दर एकच असावा अशी इच्छा व्यक्त केली. यासाठी प्रत्येक प्रांतात महसूल खर्च व उत्पन्नाचे एक रजिस्टर ठेवावे व त्याची एक प्रत दिल्ली दरबारी पाठवावी असा वटहुकूम त्याने काढला. सुलतानाच्या या निणर्यामुळे प्रशासनात एकवाक्यता आली.

**२. गंगा–यमुना नदीच्या खोऱ्यातील कर वाढ :**

महमंद तुघलक याने सत्ता हाती घेतल्यानंतर शेती सुधारणा, जमा खर्च, महसुल वाढ इ. सुधारणा करण्याच्या उद्देशाने सर्व प्रांतीय सुभेदारांना महसूल व्यवस्थेचे दप्तर तपासणीसाठी दिल्लीला आणण्याचे आदेश दिले. गंगा यमुनेच्या दुआबातील सुपीकता लक्षात घेवून महमदाने तेथील शेतसारा वाढविण्याचा निश्चय केला शेतसाऱ्याव्यतिरिक्त घरे, पशु व कुरणांवरही कर आकारण्यात आले. मुहंम्मद–बिन–तुघलकाने कर वाढ योग्यरीतीने आमलात अणण्याकरीता 'दिवाण–ए– मुस्तखरिज' नावाचे एक स्वतंत्र खाते निर्माण केले. कर वसुली होते की नाही याची माहिती प्रांतानुसार वेळोवेळी या खात्याच्या माध्यामातून मिळणार होती. परंतु

दुर्दैवाने याचवेळी दुआबात भयंकर दुष्काळ पडला. नैसर्गिक आपत्ती व सरकारी अधिकाऱ्यांचे कठोर वर्तन यामुळे जनता भडकली व जनतेने महंमद बिन तुघलकाविरुद्ध बंड पुकारले. यावेळी दुष्काळग्रस्त प्रजेला जास्तीत जास्त मदत पाठवली. परंतु ही मदत पाठविण्यास खूप उशीर झाला होता. भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांनी ही मदत सुध्दा शेतकऱ्यांपर्यंत नीट पोहोचू दिली नाही. अशा प्रकारे सुलतानाची कर वाढीची योजना अपयशी ठरली.

**३ आदर्श कृषी योजना :**

मुहंम्मद-बिन-तुघलकाने शेतीच्या प्रगतीसाठी 'दिवाण-ए-कोही' हा एक नवीन विभाग निर्माण केलेला होता. या विभागाचे उद्दिष्ठ म्हणजे शेतकऱ्यांना सरकारी साह्य देऊन जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली आणणे हा होता. सुलतानाने तीन लक्ष बिघे ओसाड जमीन निवडून त्यात विविध पिके काढण्याची व्यवस्था केली. या अभिनव प्रयोगासाठी तीन वर्षात सत्तर लक्ष टंका खर्च करण्यात आला. ही जमीन गरजू शेतकऱ्यांना देण्यात आली. परंतु हा प्रयोग पूर्णपणे फसला. कारण या योजनेसाठी निवडलेली संपूर्ण जमीन नापीक होती. अधिकारी वर्ग भ्रष्टाचारी निघाला. वास्तविक सुलतानाचा हा प्रयोग प्रशंसनीय होता. परंतु तीन वर्षाचा कालावधी अपुरा होता.

**४. राजधानी बदलण्याचा प्रयोग :**

मुहंम्मद-बिन-तुघलकाने राजधानी स्थलातंर करण्याचा निर्णय घेतला तो म्हणजे दिल्ली वरून देवगिरीला राजधानी हलविण्यात आली. त्याची कारणे पुढील प्रमाणे-

**राजधानी स्थलांतराची कारणे :**

१) देवगिरी हे ठिकाण साम्राज्याच्या मध्यावरती होते. त्यामुळे सर्व साम्राज्यावर नियंत्रण ठेवता येईल या अपेक्षेतून राजधानी बदलली.

२) सीमा प्रदेशातून सतत मोगलांचे आक्रमण होत होते. राजधानी सुरक्षित ठेवावी या उद्देशाने राजधानी बदलण्याचा निर्णय घेतला

३) दिल्लीमधील लोक सुलतानाची प्रचंड निंदा करत होते. त्यामुळे त्याचा स्वाभिमान दुखावलेला होता. दिल्लीतील लोकांना शिक्षा करावी या उद्देशाने राजधानी बदलण्याचा निर्णय घेतला.

४) सतत दोन वेळा दिल्ली परिसरात प्रचंड दुष्काळ पडलेला होता. लोकांचे हाल होत होते. त्यामुळे राजधानी बदलण्याचा निर्णय घेतला.

५) गंगा-यमुना नदीच्या खोऱ्यात दुष्काळ पडलेला असताना करवाढ केली. त्यामुळे या खोऱ्यातील लोकांनी बंड केले. त्यामुळे राजधानी बदलण्याचा निर्णय घेतला.

६) खिलजीच्या कालखंडात दक्षिण भारतात मुस्लिम सत्तेची स्थापना झालेली होती. तेथे आपले वर्चस्व कायमचे रहावे ही इच्छा होती. परंतु दिल्लीपासून हा प्रदेश दूर होता. दळण-वळणाच्या साधनांचा

अभाव होता. त्यामुळे जर दक्षिणेत बंड किंवा उठाव झाल्यास त्यावर नियंत्रण ठेवणे अशक्य आहे. यासाठीच राजधानी दिल्लीहून देवगिरीला बदलण्याचा निर्णय घेतला.

७) मोगलांनी पंजाब ताब्यात घेतले तर राजधानी दिल्लीवर अक्रमणाचा धोका होता. तसेच दिल्लीचे महत्त्व ही कमी होऊ लागले होते त्यामुळे राजधानी बदलण्याचा निर्णय घेतला.

दिल्ली शहरातील सर्व लोकांनी एका आठवड्याच्या आत दौलताबादला जावे असा सुलतानाने आदेश काढला. या आदेशाची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात आली. या प्रवासामध्ये हजारो लोक मरण पावले. दौलताबादला गेलेल्या लोकात मोठा असंतोष निर्माण झाला. त्याच बरोबर दौलताबादहून उत्तर प्रांतावर नीट लक्ष ठेवता येत नाही हे लक्षात आल्यानंतर सुलतानाने दिल्लीला पुन्हा राजधानी आणण्यास अनुमती दिली. राजधानी पुन्हा दिल्लीला आली. सुलतानाच्या राजधानी बदलण्याच्या प्रयोगामुळे मुहंम्मद-बिन-तुघलकाच्या प्रतिष्ठेला फार मोठा धक्का बसला.

**५. सोन्या ऐवजी तांब्याची नाणी चलनामध्ये आणली :**

सुलतानाने आकर्षक अशी सोन्या-चांदीची वेगवेगळ्या किंमतीची नवीन नाणी प्रचारात आणली. त्याने 'दोकानी' नावाचे नवी नाणे सुरू केले. त्या काळी सर्व जगात चांदीचा भयंकर तुटवडा निर्माण झाला होता. चांदीच्या नाण्यांच्या अभावी दैनंदिन व्यवहारात प्रजेचे फार हाल होत. ही समस्या सोडवण्यासाठी सुलतानाने इराण व चीनच्या धर्तीवर साम्राज्यात तांब्याचे चलन सुरु केले. सुलतानाच्या प्रयोगशील स्वभावाचा हा अभिनव प्रयोग पूर्णपणे फसला. याचे कारण लोकांनी आपल्या घरी अशा तऱ्हेची बनावट नाणी काढून व त्यांचा प्रचार करून सुलतानाची सर्व अर्थव्यवस्था कोलमडून पडली. सोने, चांदी बाजारातून लुप्त झाले आणि तांब्याच्या नाण्यांचा सुळसुळाट झाला. तांब्याची नाणी स्विकारण्यास परदेशी लोकांनी सुध्दा नाकारले. यातून राजमुद्रेचे अवमूल्यन झाले. जवळ-जवळ १०० तांब्याच्या नाण्याची किंमत सोन्याचा एक टका झाली. त्याचा परिणाम आवश्यक वस्तूंच्या किंमतीवर घडून आला. सर्वसामान्य जनतेने सोने-चांदी लपवून राज्याचा कर देण्याकरीता याच नाण्यांचा उपयोग केला. सर्वसामान्य जनतेला या योजनेचा खुप त्रास सहन करावा लागला. सर्व राज्यात अराजकता व अव्यवस्था निर्माण झाली. त्यामुळे मुहंम्मद-बिन-तुघलकाने आपाली ही योजना मागे घेतली.

**नाणी बदलाचा आदेश :**

मुहंम्मद-बिन-तुघलकाने नवा वटहुकूम काढला व असे जाहीर केले की लोकांनी आपल्या जवळच्या तांब्याच्या नाण्याच्या मोबदल्यात सोन्याची नाणी घेऊन जावीत या आदेशामुळे मोठा गोंधळ निर्माण झाला. हजारो लोक नाणी बदलण्यासाठी पुढे आले. तांब्यांची नाणी सरकारी खजिन्यात जमा करून ढीगच्या ढीग कोषगारात जमा झाले. त्यामुळे कोषागारातील सर्व सोने लोकांमध्ये वाटले गेले. अशा प्रकारे मुहंम्मद-बिन-तुघलकाचा प्रतिकात्मक मुद्रा प्रचलनाचा प्रयोग फसला गेला.

**महंमद–बिन–तुघलकाच्या योजनांच्या अपयशाची कारणे :**

**१) सुलतान स्वतःच जबाबदार :**

सुलतानाच्या योजना अतिशय चागंल्या होत्या, परंतु सुलतान अतिशय उतावळ्या स्वभावाचा होता. योजनेवर कधीही गंभीरपणे विचार केला नाही. निर्णय घेतला की, तात्काळ अंमलबजावणी करत असे. महमंदबिन–तुघलक हेकेखोर, रागीट होता. त्याच्या या स्वभावाचा परिणाम योजनेवर झाला.

**२) स्वकीयांचा विरोध :**

महंमद–बिन–तुघलक हा उदारमतवादी विचाराचा होता. त्यामुळे राजकारण व धर्मातील उलेमांचे वर्चस्व नष्ट केले. अनेक उलेमांना कठोर शिक्षा केल्या. त्यामुळे हा वर्ग सुलतानाच्या विरोधात गेला. या उलेमांनी सामान्य जनतेच्या मनामध्ये सुलाताना विरोधी वातावरण तयार केले. त्यामुळे सामान्य जनतेने त्यास विरोध करण्यास सुरवात केली.

**३) काळाच्या पुढच्या योजना :**

सुलतानाच्या योजना अत्यंत चांगल्या होत्या पण त्या काळाच्या पुढच्या होत्या. प्रजेला त्या समजल्या नसल्याने प्रजेचे सहकार्य मिळू शकले नाही. तांब्याच्या नाण्याचा प्रयोग न समजल्याने लोकांनी त्याला सहकार्य केले नाही. त्यामुळे सुलतानाला कठोर निर्णय घ्यावे लागले. परिणामी लोक अधिक चिडले.

**४) भ्रष्ट अधिकारी :**

सरकारी योजना कार्यक्षमपणे राबविण्यासाठी प्रामाणिक व चांगल्या अधिकाऱ्यांची गरज असते. महंमद–बिन–तुघलक हा प्रचंड क्रूर असूनही त्याच्या काळात प्रशासन आणि लष्कर यत्रंणेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचारी आणि अप्रामाणिक अधिकारी वर्ग होता. त्यामुळे सुलतानाने अवलंबलेल्या प्रशासकीय योजनेस अपयश आले.

**५) नैसर्गिक आपत्ती :**

सुलतानाने ज्या योजना अंमलात आणल्या, त्याला निसर्गाने साथ दिली नाही. गंगा–यमुनेच्या खोऱ्यामध्ये कर वाढ केली त्याचवेळी दुष्काळ पडला. या नैसर्गिक आपत्तीमुळे योजना अपयशी ठरली.

**६) साम्राज्य विस्तार :**

सुलतानाच्या काळात प्रचंड साम्राज्य विस्तार झाला होता. दळणवळणाच्या साधनांचा आभाव असल्याने सर्व साम्राज्यावर नियंत्रण ठेवणे अशक्य होते. त्यामुळे योजना अपयशी ठरली.

**७) परदेशी मुसलमान :**

इराक, इराण, अरबस्थान, तुर्कस्तान येथून अनेक मुसलमान स्वतःचे नशीब आजमाविण्यासाठी भारतात आले. त्यांच्यावर विश्वास ठेवून सुलतानाने अनेक महत्वाची दरबारातील पदे त्यांना दिली. परंतु याच लोकांनी सुलतानाविरुद्ध बंडखोरी केली.

अशा विविध कारणांमुळे मुहंम्मद-बिन-तुघलकाला या योजनेत अपयश आले.

**मुहम्मद बिन तुघलकचे मूल्यमापन**

**प्रयोगशील व सुधारणावादी :** प्रशासकीय सुधारणा, प्रयोगशील व सुधारणावादी शासक म्हणून मोहम्मद बिन तुगलकाचे कार्य हे काळाच्या पुढे होते. ज्या काळामध्ये चीनमध्ये चलनी नोटांचा प्रयोग सुरू झाला अशा काळात मोहम्मद बिन तुगलक याने आपल्या राज्यामध्ये चलनी नाण्यांचा प्रयोग केला. मात्र त्याची अंमलबजावणी योग्य रितीने न झाल्यामुळे हा प्रयोग अपयशी ठरला. मात्र त्याचा हा प्रयोग काळाच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाचा होता वास्तविक तो दूरदृष्टी असलेला शासक होता तो वास्तववादी होता स्वप्नाळू मुळीच नव्हता मात्र त्याच्या प्रयोगाची अंमलबजावणी योग्य रीतीने न झाल्यामुळे व शासकीय अधिकाऱ्यांचा त्याला पुरेसा पाठिंबा न मिळाल्यामुळे त्याचे काही प्रयोग अपयशी ठरले आणि त्यामुळेच त्याला दोष दिला जातो

**बुद्धिप्रामाण्यवादी :** मुहंमद तुघलक स्वतःच्या जीवनात नमाज, रोजे यांचा श्रद्धापूर्वक पालनकर्ता होता, तसेच तो इतरांनी पाळावा इतका आग्रही सुद्धा होता. एक सुशिक्षित व विद्वान शासक म्हणून त्याची ख्याती आहे. तो तत्त्वज्ञान, गणित, औषधीशास्त्र तसेच धर्म यासारख्या विद्वत्शाखांचा माहीतगार होता. त्याच्या उतावीळपणामुळे त्याचे अनेक निर्णय फसले पण तो एक महत्त्वाकांक्षी शासक होता. त्याचे ग्रंथवाचन अफाट होते. इतिहासकार बर्नीने त्याच्यावर केलेल्या टिकेनुसार कळून येते की, तो आत्यंतिक बुद्धिप्रामाण्यवादी होता. बर्नीच्या मते, तर्काच्या व बुद्धीच्या कसोटीवर परीक्षा घेतल्याशिवाय तो कोणत्याही इस्लामी कायद्याचा स्वीकार करीत नसे. यामुळे त्याला बुद्धिप्रामाण्यवादी शासक म्हटले तरी वावगे ठरणार नाही. बुद्धिप्रामाण्यवादी म्हणून मोहम्मद तुगलक याची अनेक उदाहरणे इतिहासामध्ये प्रसिद्ध आहेत. त्याने अंध अनुकरणाने धर्म स्वीकारला नाही व त्याचं आचरण देखील त्या पद्धतीने केलं नाही. सारासार विचार करूनच व बुद्धिप्रामाण्यवाद स्वीकारून त्याने धर्माचा स्वीकार केला वेळप्रसंगी त्याने धर्ममार्तंड प्राबल्य झुगारून दिलं.

**उदार विचारी राज्यकर्ता :** मुहंमद हा मोकळ्या तसेच उदार मनाचा होता हे त्याच्या प्रवृत्तीवरून कळून येते. तो हिंदू धर्मियांच्या होळीसारख्या काही सणांमध्ये सहभागी होत असल्याबाबतची माहिती आपल्याला अनेक इतिहासकारांच्या लेखनातून दिसून येते. तसेच तो कट्टर सिद्धान्तवादी नव्हता, ही बाब अनेक योग्यांसमवेत आणि राजशेखर तथा जिनप्रभा सुरीसारख्या जैन संतांशी त्याचे जे सहचर्य होते, यावरून स्पष्ट होते. त्याने गुजरातमध्ये असताना अनेक जैन मंदिरांना भेटी देऊन त्यांना अनुदान दिले होते, असे सतीशचंद्र यांच्या लेखनात नमूद केले आहे. यावरून आपण समजू शकतो की तो एक उदार विचारी राज्यकर्ता होता.

**प्रयोग व सुधारणा :** मुहंमद यास नावीन्यपूर्वक प्रयोग तसेच प्रशासनात सुधारणा करणे आवडत असे. प्रशासनात उत्साह आणि राज्यकारभारामध्ये एकसूत्रता आणण्याची त्याची इच्छा होती. यासाठी त्याने अनेक योजना आखल्या, पण त्यांपैकी काहींचाच परिणाम प्रशासन सुधारण्यासाठी झाला असे म्हणता येईल. मोहम्मद बिन तुगलक याने केलेले प्रयोग आणि सुधारणा ह्या व्यावहारिक आणि काळाची पावले ओळखणाऱ्या होत्या. परंतु योग्य नियोजनाचा अभाव आणि त्या योजना राबवताना घ्यावयाची खबरदारी या गोष्टींकडे दुर्लक्ष झाल्यामुळे त्या प्रत्यक्षात यशस्वी होऊ शकल्या नाहीत.

**प्रशासकीय सुधारणा :** राजधानी दिल्ली वरून देवगिरीला नेणे. हा त्याच्या जीवनातील प्रभावी तसेच बहुचर्चित असा निर्णय होता. आजपर्यंत त्याच्या या निर्णयासाठी त्याला वेड्यात काढले जाते. पण आपल्याला त्याचे या निर्णयामागे कोणते उद्देश होते व त्याची कोणती महत्त्वाकांक्षा होती ते आधी समजून घ्यायला पाहिजे. तसेच हे निर्णय अनियोजित किंवा बिनपूर्वतयारीनिशी केलेले नव्हते, असे काही पुराव्यांवरून म्हणता येते. मोहम्मद तुगलक याने आपल्या कारकिर्दीमध्ये अनेक चांगले प्रशासकीय निर्णय घेतले परंतु त्याची योग्य अंमलबजावणी आणि कार्यवाही न केल्यामुळे त्याचे हे प्रशासकीय सुधारणांचे निर्णय फसले.

- **आर्थिक व कृषी सुधारणा :**

**सांकेतिक चलन :** मोहंमदने देवगिरीला प्रयाण केल्यानंतर नाणेव्यवस्था सुधारण्यासाठी सांकेतिक चलनाचा दुसरा प्रयोग केला. मध्ययुगीन काळात सांकेतिक चलन ही पूर्णत: नाविन्यपूर्ण सुधारणा होती. या काळात चीनमध्येसुद्धा सांकेतिक चलन म्हणून कागदी चलन प्रचलित होते. मंगोल सम्राट कुबलाई खानाने 'चान' नावाचे कागदी चलन सुरू केले होते व त्याच्या मृत्यूपर्यंत योग्यरित्या चालू होते. पुढे असाच प्रयोग कातू या इराणी राजाने 'चान' चलन लागू करण्याचा प्रयत्न केला पण तो फसला. पण असो त्याच्या या नाणे बदलाच्या धाडसामुळे त्याला वेडा ठरवण्यात आले. पण एक की आपल्याला त्याच्यात दूरदृष्टी नक्की दिसून येते.

**कृषीविषयक धोरण :** मुहंमदाचे कृषिविषयक धोरण हे त्याच्या वडिलांपेक्षा कठोर होते. त्याचे वडील गियासुद्दीन तुघलकानी अल्लाउद्दीनने सुरू केलेली शेतजमिनीच्या मोजणीनुसार आकारण्यात येणारी सारापद्धत मोडीत काढून त्या जागी 'प्रत्येक वेळी हातात आलेल्या पिकांची मोजणी करून त्यापैकी ठरावीक भाग शेतसारा म्हणून सुरू केला. खर तर गियासुउद्दीन तुघलकचे धोरण शेतकऱ्यांसाठी फायदेशीर होते.

मुहंमदने आपल्या शासन काळात कर वसुलीत सक्ती केल्याने तसेच करांचा दर बराच वाढवल्यामुळे शेतकऱ्यांना खुप हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. दुष्काळ पडला तरी तो सक्ती ने 'चराई' तसेच 'घराई' कर वसूल करायचा. त्यामुळे शेतकरी वाढीव करांविरोधात बंड करत. मुहंमद हे बंड मोडण्यासाठी कठोर कारवाई करायचा. पण जेव्हा सतत ७ वर्षे दुष्काळ पडला तेव्हा महम्मदने अनेक कृषीविषयक धोरण आखले. 'दिवाण-ए-अमीर-कोई' नावाचा विभाग सुरू केला.

बर्नीनुसार पडीक व नापीक जमीन पिकाखाली आणण्यासाठी सुलतानाने योजना आखली होती. त्या मध्ये शेतीत सुधारणा, शेतीच्या पद्धतीमध्ये बदल जसे बार्लीच्या जागी गहू, गव्हाच्या जागी ऊस, तर उसाच्या जागी द्राक्षे. अश्या योजनांमुळे नक्कीच महसुलात वाढ होणे अपेक्षित होते. बर्नीनुसार मुहंमदाने दुष्काळावर मात करण्यासाठी दिल्लीत मंदतकेंद्रे उघडली, तसेच विहिरी खोदणे, शेती अवजारे-बी बियाणे खरेदी करणे यासाठी कर्ज वाटप केले. त्याच्या योजनांमधील काही गोष्टी नक्कीच परिणामकारक होत्या. असे म्हणणे दुमत ठरणार नाही.

## १.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ :

खुष्कीचा मार्ग : जमिनीवरील मार्ग.

काझी : न्यायखात्याचा प्रमुख.

अष्ट दिग्गज : प्रसिध्द आठ कवी.

बोम्मलाट : छायानाट्याचा प्रकार.

वीरगळ : वीरमरण प्राप्त करणाऱ्याचे स्मारक.

शस्त्रभांडार : युध्द साहित्य ठेवण्याचे ठिकाण

## १.४ सारांश :

मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील ''ॲरिस्टॉटल'' म्हणून संबोधला जाणारा मंहमद तुघलक हा धाडसी व पराक्रमी होता. त्याच्या दातृत्व व न्यायप्रियेतेची कीर्ती परदेशातही पसरली होती. यशस्वी होण्यासाठी आवश्यक ते सर्व गुण त्याच्याजवळ असूनही तो अयशस्वी ठरला याचे प्रमुख कारण म्हणजे अस्थिर स्वभाव आणि दुराग्रह. त्यामुळे त्याचे व्यक्तिमत्व परस्परविरोधी, गुणांचा समुच्चय होता असे म्हटले जाते. त्याच्या सुधारणा अत्यंत क्रांतिकारक होत्या परंतु फसल्याने त्याच्यावर अपयशाचा शिक्का बसला. मुहंम्मद-बिन-तुघलकाचा नवीन चलनाचा प्रयोग साम्राज्याच्या आर्थिक परिस्थितीवर गंभीर परिणाम करणारा ठरला. व्यापार, उद्योग, व्यवसाय यांची जबर हानी झाली. बाजारातून सोने व चांदी नष्ट झाले. परकीय व्यापारी आर्थिक देवाणघेवाणीमध्ये तांब्याची नाणी नाकारू लागली. या संदर्भात इतिहासकार जियाउद्दीन बरनी लिहितो 'प्रत्येक हिंदूचे घर एक टाकसाळ झाले. सर्व प्रजेने सोने, चांदी लपवून राज्य कर देण्याकरिता याच नाण्याचा उपयोग केला. राजमुद्रेचे अवमूल्यन झाले. शंभर तांब्याच्या नाण्यांबरोबर सोन्याच्या एका टंकाची किंमत झाली. राज्यामध्ये अस्थिरता व गोंधळ निर्माण झाला'. यामुळे मुहंम्मद-बिन-तुघलकाने ही योजना बंद केली व साम्राज्यातील लोकांना कळविण्यात आले की त्यांच्याजवळ असलेली तांब्याची नाणी सरकारी खजिन्यात जमा करून त्या मोबदल्यात सोन्याची नाणी घेऊन जावीत, तुघलकाबादमध्ये हजारो लोकांनी

आणलेल्या नाण्यांचे ढीगच्या ढीग लागले. परिणामी मुहंम्मद-बिन-तुघलकाच्या आदर्श योजनेला अपयश आले. आदर्श व दूरदृष्टीची योजना असूनही अंमलबजावणी योग्यरितीने न झाल्याने हा प्रयोग अयशस्वी झाला.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :**

**अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. मुहंम्मद-बिन-तुघलक .......... साली गादीवर आला.

अ) १३२० ब) १३२५ क) १३५० ड) १३५५

२. मुहंम्मद-बिन-तुघलकाने शेतीच्या प्रगतीसाठी .......... हा एक नवीन विभाग निर्माण केलेला होता.

अ) दिवाण-ए- कोही ब) दिवाण-इ-वझारत

क) दिवाण-इ-इन्शा ड) दिवाण-इ-रियासत

३. मुहंम्मद-बिन-तुघलकाने ............... नावाचे नवे नाणे सुरु केले.

अ) दोकानी ब) शाहरुखी क) मोहूर ड) आफताबी

४. मुहंम्मद-बीन-तुघलकाने आपली राजधानी बदलून .......... येथे हालविण्याचा प्रयत्न केला.

अ) गुलबर्गा ब) बिदर क) देवगिरी ड) होस्पेट

५. मुहंम्मद-बिन-तुघलकाने राबविलेल्या चलनाच्या प्रयोगामध्ये तांब्याची नाणी .......... प्रकारची होती.

अ) १० ब) १२ क) १४ ड) १६

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. मुहंम्मद-बिन-तुघलकाने शेतीच्या प्रगतीसाठी कोणता नवीन विभाग निर्माण केलेला होता?

२. 'प्रत्येक हिंदूचे घर एक टांकसाळ झाले ' असे कोणत्या इतिहासकाराने म्हटले आहे?

३. मुहंम्मद-बिन-तुघलकाची मिश्र नाणी किती प्रकारची होती?

४. मुहंम्मद-बिन-तुघलकाने कोणत्या प्रांतात कर वाढ केली?

५. मुहंम्मद-बिन-तुघलकाने आदर्श कृषी योजना राबविण्यासाठी दिलेला वेळ किती वर्षे होता?

## १.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१. अल्लाउद्दिन खिलजीच्या दक्षिण मोहिमेची माहिती द्या.

२.  अल्लाउद्दीन खिलजीच्या अंतर्गत सुधारणा स्पष्ट करा.

३.  मुहंम्मद-बीन-तुघलकच्या मुद्रा चलनाच्या प्रयोगाची सविस्तर माहिती सांगा

४.  महंमद-बिन-तुघलकाच्या योजनांच्या अपयशाची कारणे सांगा

## १.६ स्वयं अध्ययन प्रश्न १ ची उत्तरे

अ) १) ७१२   २) अली गर्शप   ३) खल्ज   ४) १२९६
   ५) दिवाण-ए-आरीज'

ब) १) रामचंद्रदेव यादव   २) दिवाण-इ-वझारत   ३) अल्लाउद्दीन खिलजी
   ४) अल्लाउद्दीन खिलजी   ५) सिरी

**स्वयं अध्ययन प्रश्न २ ची उत्तरे**

अ) १) १३२५   २) दिवाण-ए- कोही   ३) दोकानी
   ४) देवगिरी   ५) १२

ब) १) दिवाण-ए- कोही   २) जियाउद्दीन बरनी   ३) २५
   ४) दुआबात   ५) तीन

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

१.  भिडे, नलवडे, नाईकनवरे - मध्ययुगीन भारत (सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक) फडके प्रकाशन, कोल्हापूर

२.  डॉ. धनंजय आचार्य - मध्ययुगीन भारत (१००० ते १७०७) श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

३.  डॉ. श. गो. कोलारकर - मध्ययुगीन भारत (१२०६ ते १७०७) श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

४.  मोडक बा. प्र., दक्षिणेतील मुसलमानी राज्याचा इतिहास चित्रशाळा छापखाना, पुणे

❑❑❑

## घटक २
# दक्षिण भारतातील प्रमुख राज्यकर्ते

**अनुक्रमणिका**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

  २.२.१ कृष्णदेवराय : लष्करी विजय व सांस्कृतिक कार्य

  २.२.२ महंमद गवान: बहामनी राज्यातील कामगिरी

२.३ सारांश

२.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

२.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

## २.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला पुढील उद्दिष्टे सांगता येतील.

१. कृष्णदेवरायाचे लष्करी विजय सांगता येतील.

२. कृष्णदेवरायाचे सांस्कृतिक कार्य स्पष्ट होईल.

३. महंमद गवानची बहामनी राज्यातील कामगिरी समजुन घेता येईल.

## २.१ प्रास्ताविक :

एक समृध्द व वैभवशाली देश म्हणून जगात भारताची ओळख आहे. आपल्या भारत देशातील संस्कृतीची गणणा जगातील पुढारलेल्या व सुधारलेल्या संस्कृतीत केली जाते. उदारता, सहिष्णुता व विशालता ही भारतीय संस्कृतीची वैशिष्टये आहेत. प्राचीन काळापासुन भारतावर ग्रीक, कुशाण, शक, हुण, इराणी, प्रर्शियन इत्यादी परकीय जातीजमातीच्या लोकांनी आक्रमणे करून आपली मोठमोठी साम्राज्ये स्थापन केली. महान भारतीय संस्कृतीने त्यांना आपल्यात समाविष्ठ करून घेतले. महमंद पैगंबराने अरबस्थानात इस्लाम धर्माची स्थापना केली व इस्लाम धर्माच्या प्रचाराचे कार्य हाती घेतले. अरबांमधील मोहमदबीन-कासिमने इ.सन ७१२ मध्ये भारतावर स्वारी केली. २० जुन ७१२ मध्ये सिंध राजा दाहीर यांच्या बरोबर

झालेल्या युध्दात दाहीरचा पराभव झाला. कासिमने भारतातुन मोठी संपत्ती मिळविली. महमद गझनीने इ.सन.१००० ते १००६ या कालखंडामध्ये भारतावर एकूण १७ स्वाऱ्या केल्या. महमंद गझनी नंतर भारतात येणारा तिसरा मुसलमान म्हणजे मोहम्मद घोरी होय. हिंदु सम्राट पृथ्वीराज चव्हाण व महमंद घोरी यांच्यामध्ये इ.स. ११९१ मध्ये पहिले तराईनचे युध्द झाले. या युध्दात मोहम्मद घोरीचा पराभव झाला. इ.स. ११९२ मध्ये मोठया प्रमाणात युध्द सामुग्रीनीशी पृथ्वीराज चव्हाण बरोबर युध्द केले.यामध्ये पृथ्वीराज चव्हाणचा पराभव झाला. या विजयानंतर उत्तर भारतावर महमंद घोरीचे वर्चस्व निर्माण झाले. त्याने भारतातील प्रतिनिधी म्हणून कुतुबुददीन ऐबक यांच्या हाती सत्ता दिली. कुतुबुददीन ऐबकने इ.स.१२०६ मध्ये गुलाम वंशाची स्थापना केली. इ.स. १२०६ ते १२९० या कालखंडामध्ये गुलाम सत्ताधीशांनी राज्य केले. इ.स. १२९० ते १३२० या कालखंडामध्ये खिलजी शासकानी भारतावर आपले शासन निर्माण केले. तर इ.स. १३२० ते १४१३ या काळात तुघलक सत्ताधीशांनी आपली सत्ता निर्माण कली. इ.स. १४१४ ते १४५१ या कालखंडात सय्यद घराण्याने आपली सत्ता निर्माण केली. तर इ.स. १४५१ ते १५२६ या प्रदीर्घ कालखंडामध्ये लोदी घराण्यातील सत्ताधीशांनी आपली सत्ता निर्माण केली. तर याच कालखंडामध्ये दक्षिण भारतात विजयनगर व बहामनी ही घराणी सत्तेवर होती. विजयनगर घराण्यातील कृष्णदेवराय, बहामनी राज्यातील सत्ताधीश महमंद गवान या प्रमुख सत्ताधीशांचा अभ्यास आपल्याला या प्रकरणात करावयाचा आहे.

**कृष्णदेवराय : लष्करी विजय व सांस्कृतिक कार्य**

महमंद-बीन-तुघलकाच्या कारकिर्दीत दक्षिण भारतात अराजकता व गोंधळ निर्माण झाला. त्याचा फायदा घेऊन हरीहर व बुक्क या बंधुनी इ.स. १३३६ मध्ये विजयनगर सम्राज्याची स्थापना केली. या बंधुनी तुंगभद्रा नदीच्या काठी विजयनगर येथे आपली राजधानी स्थापन केली. विजयनगरच्या सर्व सत्ताधीशांमध्ये कृष्णदेवरायाची किर्ती फार मोठी होती. कृष्णदेवराय विजयनगरच्या सर्व घराण्यातील सर्वश्रेष्ठ राजा होय. कृष्णदेवरायाचा जन्म १६ फेब्रुवारी १४७१ मध्ये झाला. तो इ.स. १५०९ मध्ये विजयनगरच्या सत्तेवर आला. तो शूरवीर व लढवय्या सेनापती होता. अखंड विजयी म्हणून त्यांचा नावलौकीक होता. कृष्णदेवरायाची कारकिर्द विजयनगरला सर्वश्रेष्ठ बनविणारी ठरली. वीर नरसिंह तुलुव याच्यानंतर त्याचा भाऊ कृष्णदेवराय (१५०९-१५३०) सत्तेवर आला. तो सत्तेवर आला तेव्हा त्याला चोहोबाजुनी विरोध झाला. बहामनी, ओरिसा, उम्मतूर, आदिलशाह व लहाण-मोठे राजे कृष्णदेवरायाच्या विरूध्द उभा राहिले. प्रथमतः त्याने अंतर्गत बंडाळया मोडून सर्वावर बुध्दी चार्तुयाने व कुशलतेने मात केली. कृष्णदेवराय लढवय्या सेनापती होता. त्याचे सर्व आयुष्य लढण्यात व्यतीत झाले होते. कृष्णदेवरायाने हिंदूस्थानच्या इतिहासामध्ये एका बलाढय साम्राज्याची निर्मिती केली. बलाढ्य शत्रूवर मात करून विस्तीर्ण साम्राज्य स्थापन केले. त्याने तिरूमल नामक अज्ञान मुलास गादीवर बसविले. चाळीस वर्षे राज्यकारभार केल्या नंतर तो आजारी पडला. दरबारामध्ये अंतर्गत कलहाला सुरूवात झाली यातच विजापूरचा आदिलशहा विजयनगरवर चालून आला. त्याला तोंड देण्याच्या तयारीत असताना व मोहिमेची तयारी करीत असताना इ.स. १५३० मध्ये कृष्णदेवरायाचा मृत्यु झाला.

**महंमद गवान : बहामनी राज्यातील कामगिरी**

दक्षिण भारतातील थोर व आदर्श सत्ताधीशांमध्ये महंमद गवानची गणना करण्यात येते. महंमद गवानचा जन्म इ.स.१४०३ मध्ये झाला. तो इराणचा रहिवाशी होता. इराण मध्ये त्याचे पूर्वज वजिराचे काम करत असत. परंतु अंतर्गत संघर्षामुळे त्याला इराण सोडावे लागले. व्यापाऱ्याच्या निमित्ताने तो बाहेर पडला व वाणिज्य-व्यापारात कार्य करू लागला. त्याने अनेक देशाचा प्रवास केला. शेवटी इ.स. १४४६ साली वयाच्या ४३ व्या वर्षी तो समुद्रमार्गे भारतात पोहचला. तो बिदर या बहमनी राज्याच्या राजधानीत आला. इ.स. १३४७ मध्ये हसन गंगू बहामनी याने बहामनी राज्याची स्थापना केलेली होती. अल्लाउद्दीन शहा नावाने त्याने राज्यकारभार केला. महंमद गवान ज्यावेळेस भारतात आला. त्यावेळी तेथे अल्लाउद्दीन शहाची सत्ता होती. महंमद गवान मधील गुण ओळखुन बहामनी राजाने त्याला सरदारकी दिली. येथुनच खऱ्या अर्थाने त्याच्या कामगिरीला सुरूवात झाली. सुलतानाने त्याला 'मलिकउलतुज्जार' हे बिरूद दिले. पुढे तो पेशवा म्हणजे मुख्य प्रधान उर्फ वजीर बनला. इ.स.१४५७ मध्ये गवानने बाहमनी साम्राज्याचा मुख्य वजीर म्हणून सुत्रे हाती घेतली. जवळजवळ वीस वर्षे बहामनी राज्याच्या प्रशासनावर महंमद गवानचे वर्चस्व राहिले. माळवा, कोकण, गोवा, ओढा, तेलगंणा, कांची अशा एका मागोमाग एक मोहिमा राबवुन महंमद गवानने बहामनी राज्याचा साम्राज्य विस्तार मोठ्या प्रमाणात केला. प्रशासन, लष्कर, कृषी या क्षेत्रामध्ये त्याने महत्वपूर्ण सुधारणा केल्या.विद्या व कलेला उत्तेजन दिले. बहामनी दरबारात अमिरांमध्ये दोन गट पडले. तो दक्षिणी मुसलमानांच्या कारस्थानाचा बळी ठरला. तिसऱ्या महंमदाने कोणताही विचार नकरता इ.स.१४८२ मध्ये महमंद गवानला मृत्युदंडाची शिक्षा दिली.

## २.२ विषय विवेचन :

### २.२.१ कृष्णदेवराय लष्करी विजय व सांस्कृतिक कार्य

**प्रास्ताविक:**

डॉ. इश्वरीप्रसाद म्हणतात ''कृष्णदेवरायाच्या कारकीर्दीने विजयनगरच्या इतिहासात नवयुगाचा आरंभ झाला''. दक्षिण भारताच्या इतिहासामध्ये विजयनगरचे साम्राज्य वैभवशाली व विस्तारित साम्राज्य म्हणुन ओळखले जाते. विजयनगरच्या साम्राज्यामध्ये चार घराण्यांनी राज्यकारभार केला.

१. सगम वंश (१३३६ ते १४८६)

२. शालुव वंश (१४८६ ते १५०५)

३. तुलुव वंश (१५०५ ते १५७०)

४. अरविंद वंश (१५७० ते १६१४)

या वंशांनी मिळून विजयनगरवर जवळ-जवळ पावणे तीनशे वर्षे राज्य केले. यामध्ये संगम वंशातील १२ राजांनी, शालुव वशातील २ राजांनी, तुलुव वंशातील ५ राजांनी व अरविंद वंशातील ७ राजांनी

राज्यकारभार साभाळला. त्यामध्ये कृष्णदेवराय हा विजयनगरचा सर्वश्रेष्ठ राजा होय. तुलुव घराण्यातील वीर नरसिंह याच्यानंतर कृष्णदेवराय विजयनगरचा सत्ताधीश झाला. कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीमध्ये विजयनगर राज्याने प्रगतीचे शिखर गाढले होते. कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीमध्ये विजयनगरचे साम्राज्य अति उच्च शिखरावर पोहचले होते. विजनगरच्या दृष्टीने कृष्णदेवरायची कारकिर्द वैभवशाली व भरभराटीची ठरली. अखंड विजयी राजा म्हणून कृष्णदेवरायाचे स्थान श्रेष्ठ असेच आहे. कृष्णदेवराय उत्कृष्ट शासक होताच त्याच बरोबर कलेचा भोक्ता होता. कृष्णदेवराय विजयनगरच्या राजांमध्ये सर्वश्रेष्ठ राजा होता. त्यांच्या काळामध्ये विजयनगर राज्याचा सर्वांगिण विकास झाला. कृष्णदेवराय लढवय्या राजा, उत्कृष्ठ प्रशासक व महान सेनानायक होता. कृष्णदेवरायाचे लष्करी विजय पुढीलप्रमाणे सांगता येतील.

- **लष्करी विजय :**

| |
|---|
| लष्करी विजय ➢ बहामनी व आदिलशाह बरोबर संघर्ष ➢ गंगराजाचा पराभव ➢ ओरिसावरील मोहिम ● उदयगिरीचा पाडाव ● कोंडाविडू व कोंडपल्ली ● पोटटनुरू व सिंहाद्री ठिकाणे काबीज ➢ रायचूर मोहिम किंवा विजापूर संघर्ष ➢ सागर, केंभावी व गुलबर्गा ताब्यात ➢ पोर्तुगिजांशी मैत्री |

**१) बहामनी व आदिलशाह बरोबर संघर्ष :** कृष्णदेवरायाने राज्यारोहन केल्यानंतर लगेच बहामनी बरोबर संघर्ष करून त्याचा पराभव केला. दक्षिणेत इ.स. १३४७ मध्ये बहामनी राज्याची स्थापना झाली. विजयनगर व बहामनी यांच्यामध्ये नेहमीच संघर्ष सुरू होता. कृष्णदेवराय सत्तेवर आल्यानंतर त्यांच्याशी संघर्ष करावा लागला. गोवळकोंड्याच्या दक्षिणेस ७० कि.मी. अंतरावर कोविलकोंडा येथे मोठे युध्द झाले. विजयनगर सैन्यानी विजय मिळविला. बिदर व विजापूरच्या रोखाने शत्रू सैन्य पळून गेले. कृष्णदेवरायाने पळणाऱ्या सैन्याचा पराभव केला. गोवळकोंडयाचा किल्ला जिंकून घेतला. कृष्णदेवरायाच्या नेतृत्वाखाली विजयनगरला जवळजवळ १२५ वर्षानंतर विजय मिळाला. या युध्दामध्ये विजापूरचा युसूफ आदिलशहा व बिदरचा महमूदशहा हे दोन्ही सुलतान हजर होते. महमूदशहा जखमी झाला व युसूफ आदिलशहा याच वर्षी मरण पावला. या विजयामुळे कृष्णदेवरायाची सर्वत्र वाहवा झाली. इ.स. १५०९ मध्ये कृष्णदेवरायाने मिळविलेल्या या विजयाला महत्वाचे स्थान आहे. या विजयामुळे कृष्णदेवरायाची सर्वत्र प्रशंसा झाली.

**२) गंगराजाचा पराभव :** विजयनगरच्या दक्षिणेस आसलेल्या उम्मतूर येथील वोडेयार राजाने प्रभुत्व झुगारून देऊन स्वतंत्रपणे स्वतःचे राज्य वाढविले. देवण्णाच्या मुत्यूनंतर त्याचा मुलगा गंगराज राजा झाला. त्याने विजयनगरवर मोहिम करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे कृष्णदेवरायाने त्याच्याविरोधी मोहिम हाती घेतली. इ.स. १५१२ साली कृष्णदेवरायाने उम्मतूरवर स्वारी केली तेव्हा गंगराजा शिवसमुद्रमच्या किल्ल्यावर जाऊन बसला. कृष्णदेवरायाने सर्व सैन्याच्या तयारीनिशी किल्ल्यावर हल्ला केला. तुंबळ युध्द झाले.

अनेकजण कापले काही पळाले. स्वतः गंगराजा पळून जात असताना कावेरी नदीत बुडाल्याने त्याचा मृत्यु झाला. यात कृष्णदेवरायाला मोठा विजय मिळाला.

**३) ओरिसावरील मोहिम :** ओरिसावरील मोहिम इ.स. १५१२ ते १५१६ अशी चार वर्षे चालली. कृष्णदेवरायाने केलेल्या ओरिसा बरोबरच्या संघर्षाची माहिती खालील प्रमाणे सांगता येईल.

**अ) उदयगिरीचा पाडाव :** (१५१३-१५१४) गजपती राजघराणे ओरिसात सत्ता चालवित होते. उदयगिरीच्या गजपती प्रतापरूद्रने विजयनगरची महत्वाची स्थळे ताब्यात घेतली होती. त्यामुळे विजयनगरला धोका निर्माण झाला होता. कृष्णदेवरायाने इ.स. १५१३ च्या सुरूवातीला ओरिसावरील स्वारीला प्रारंभ केला. प्रथमतः दुर्गम अशा विजदुर्गच्या किल्ल्यावर हल्ला केला. प्रतापरूद्रचा चुलता तिरूमलने शरणांगती पत्करली व तो प्रांत कृष्णदेवरायाने आपल्या ताब्यात घेतला.

**ब) कोंडाविडू व कोंडपल्ली :** (१५१५) इ.स. १५१५ मध्ये ओरिसाच्या विजयानंतर कृष्णदेवरायाने सर्व तयारीनिशी कोंडविडू वर हल्ला केला. प्रथमतः किल्ल्याला वेढा दिला. किल्ल्यावरील संपूर्ण रसद तोडण्यात आली. किल्ल्यावरील अमलदार कृष्णदेवरापुढे शरण आला. कृष्णदेवरायाने प्रतापरूद्रचा पुत्र वीरभद्रला कैद केले. कोंडाविडूच्या पराभवानंतर प्रतापरूद्राने कोंडपल्ली येथे आपला तळ ठोकला. या किल्ल्याला विजयनगर सैन्यानी वेढा दिला. विजयनगरच्या सैन्याला गजपती व कुतुबखान यांनी संयुक्तपणे विरोध केला. त्यामुळे कृष्णदेवरायाला दोघांबरोबर लढावे लागले. अगदी सर्व तयारीनीशी व आत्मविश्वासाने कृष्णदेवरायाने संयुक्त फौजांवर हल्ला केला. विजयी पराक्रम करून कृष्णदेवरायाने कोंडपल्लीवर विजय मिळविला व तो किल्ला सर केला. अशा प्रकारे कोंडविडू व कौंडपल्ली कृष्णदेवरायाने आपल्या वर्चस्वाखाली आणले.

**क) पोटटनुरू व सिंहाद्री ठिकाणे काबीज :** कृष्णदेवराने पोटटनुरूवर हल्ला करण्याच्या आगोदर साळुव तिमाच्या सैन्याला कृष्णदेवरायाचे सैन्य मिळाले. विशाखापटटणम जवळच्या पोटटनुरू या शहराजवळ येऊन हे संयुक्त सैन्य पोहचले. हे शहर म्हणजे प्रतापरूद्राच्या राज्याची राजधानी होती. प्रतापरूद्रानेही या युध्दाची मोठी तयारी केली. त्याने आपल्या अंकीत असलेल्या महापात्राना बोलावून घेऊन लढाण्याचे आव्हान केले होते. हे महापात्र म्हणजे स्वतंत्रपणे राज्यकारभार करणारे परंतु गजपतीचे मांडलिक असत. ही वार्ता कृष्णदेवरायाना समजताच त्याने यातुन मार्ग काढण्यासाठी साळुव तिम्मा याच्या बरोबर चर्चा केली. त्याने कृष्णदेवरायाला फोडाफोडीचे राजकारण करण्याचा सल्ला दिला. सोन्या व हिऱ्यानी भरलेल्या थैल्या प्रत्येक महापात्राकडे पाठविण्यात आल्या. त्यातील एक दोन थैल्या प्रतापरूद्राच्या हाती पडाव्यात अशी व्यवस्था करण्यात आली. महापात्राकडे पाठविलेल्या एक दोन थैल्या नेमक्या प्रतापरूद्राच्या हातात पडल्या. महापात्रापैकी बरेचजण फित्तुर झाल्याचे त्याची खात्री झाली. आता आपला टिकाव लागणार नाही म्हणून त्याने रणांगणातून पळ काढला. राजा पळतो आहे म्हटल्यावर महापात्राही पळू लागले. शिल्लक राहिलेल्या सैन्यावर कृष्णदेवरायाच्या सैन्यानी हल्ला केला व त्यांचा पराभव केला. अशा प्रकारे कृष्णदेवरायाने पोटटनूरूवर ताबा मिळविला. कृष्णदेवराया तेथे जवळ-जवळ सहा महिने थांबला. त्यानंतर कृष्णदेवराय सिंहाद्री येथे आला व ते ठिकाण ही त्याने ताब्यात घेतले. प्रतापरूद्र पराभुत झाल्यामुळे हातबल झाला.

कृष्णदेवराय व प्रतापरूद्र यांच्यामध्ये सिंहाद्री येथे तह झाला त्यामध्ये जिंकलेल्या प्रदेशापैकी कृष्णेच्या दक्षिणेकडील सर्व प्रदेश विजयनगरच्या साम्राज्यात समाविष्ठ व्हावा. उत्तरेकडील सर्व प्रदेश प्रतापरूद्राला परत द्यावा. या बरोबरच प्रतापरूद्राने अपली कन्या जगन्मोहिनी कृष्णदेवरायाला द्यावी असे ठरले.

### ४. रायचूर मोहिम किंवा विजापूर संघर्ष–१५२०

रायचूर हे प्रसिध्द शहर तुंगभद्रा व कृष्णा यांच्या दुआबात होते. ते अनेक वर्षे विजयनगरच्या ताब्यात होते. परंतु गेली ४०-४५ वर्षे ते मुस्लिम सत्तेच्या ताब्यात होते. कृष्णदेवरायाने हे नगर जिंकून घैन्याचे ठरवून सर्व मंत्र्यांची बैठक भरविली. रायचूर मोहिमेच्या तयारीला सुरूवात केली. आपला खास अधिकारी सिददी यास मोठी रक्कम देऊन घोडे विकत आणण्यासाठी गोव्याला पोर्तुगिजांकडे पाठविले. परंतु तो गोव्याला घोडी आणण्यासाठी न जाता विजापूरला रवाना झाला. इस्माईल आदिलशाहाला त्याने हे सांगताच त्याने त्याच्याकडील मोठी रक्कम काढून घेतली व त्याबद्दल्यात त्याला दाभोळची सुभेदारी दिली. कृष्णदेवरायाने सिद्दीला आमच्या ताब्यात दयावे असे सांगितले. मात्र ईस्माईलने त्याकडे दुर्लक्ष केले. यातुनच कृष्णदेवरायाने ईस्माईल व सिद्दी यांच्या विरोधात मोहिम हाती घेताली. लष्कराची प्रचंड तयारी करून कृष्णदेवरायाने या मोहिमेसाठी ७ लाख पायदळ, २५ हजार घोडदळ, सहाशे हत्ती अशा बलाढय फौजेनीशी रायचूरच्या आसपास छावण्या टाकल्या.कृष्णा नदीच्या उत्तरेला इस्माईलचे सैन्य होते. त्याने नदी ओलांडून कृष्णरायाच्या सैन्यावर हल्ला करण्याचा धाडसी निर्णय सैन्याचा विरोध असतानाही घेतला. कृष्णदेवराय स्वतः युध्द मोहिमेवर युध्दाचे नेतृत्व करीत होता. विजयनगरच्या सैन्यानी रायचूर किल्ल्याला वेढा टाकला. विजयनगरच्या सैन्यामध्ये असणाऱ्या पोर्तुगिज सैन्याने महत्वपूर्ण कामगिरी करून रायचूरच्या किल्ल्यावरील तटाच्या वेशीच्या संरक्षकांना तोफेच्या साहयाने ठार केले. त्यामुळे विजयनगर सैन्याला रायचूर जिंकणे शक्य झाले. इ.स.१५२० मध्ये कृष्णदेवरायाने रायचूर पूर्ण जिंकून घेतले. रायचूर बरोबरच कृष्णदेवरायाने सागर, सोलापूर, गुलबर्गा, विजापूर या युध्द मोहिमावर आदिलशहाचा पराभव केला. या विजायानंतर कृष्णदेवरायाने या शहरामध्ये शांतता व सुव्यवस्था निर्माण करून शहाराचा कारभार सुरळीत चालू केला.

### ५. सागर, केंभावी व गुलबर्गा ताब्यात

विजापूर व विजयनगर या सैन्याचा इ.स. १५२१ ते १५२४ या काळात संघर्ष होतच राहिला. त्यातुनच रायचूरच्या नैऋतेस असणाऱ्या सागर व केंभावी या ठिकाणी मोठे युध्द झाले. आदिलशाही सैन्याचा विजयनगरच्या सैन्यानी पराभव केला. स्वतः कृष्णदेवराया या मोहिमेमध्ये जातीने हजर होता. या विजयानंतर विजयनगरचे सैन्य गुलबर्गा-बिदर कडे वळले. मोठा संघर्ष होऊन गुलबर्गा-बिदर ही शहरे कृष्णदेवरायाने आपल्या ताब्यात घेतली. अल्लाउद्दीन यास बहामनी सुलतान म्हणुन जाहीर केले. त्याला तख्त्यावर बसविण्यात यशस्वी झाल्यामुळे कृष्णदेवरायाने स्वतःस 'यवनराज्यस्थोनाचार्य' ही पदवी धारण केली. पुढे १५२८ ते १५२९ दरम्यान कुतुबशहा व आदिलशहा यांच्यावर हल्ले करून कृष्णदेवरायाने आपला दबदबा कायम राखत त्याना सळो की पळो करून सोडले. पुन्हा त्यानी कृष्णदेवराचाच्या कारकिर्दीमध्ये कधीही डोके वर काढले नाही.

### ६. पोर्तुगिजांशी मैत्री

कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीतील महत्वाचे वैशिष्ट म्हणजे त्याने पोर्तुगिजांबरोबर जोडलेले सलोख्याचे संबंध. पोर्तुगिजांकडून त्यांने उत्तम घोडे व इतर युध्दोपयोगी वस्तू मिळविल्या. पोर्तुगिजांनी भातकल येथे किल्ला बांधण्यासाठी कृष्णदेवरायाची परवाणगी मिळविली. दोघांनी ही एकमेकांबरोबर मैत्री संपादन करून चांगले संबंध निर्माण केले.

### ७. शासन व्यवस्था

विजयनगरची पायदळ, घोडदळ, हत्तीदल व तोफखाना अशी खडी लष्करी सेना होती. कृष्णदेवरायाने आपल्या शासनयंत्रणेचे मुलकी व लष्करी त्याचबरोबर मध्यवर्ती, प्रांतिय आणि स्थानिक असे भाग केले होते. साम्राज्याचे मुख्य शासन राजाच्या हाती होते. **साळुवतिम्मा** हा कृष्णदेवरायाचा मुख्यमंत्री होता. कृष्णदेवरायाने विविध मंत्र्यांच्या साहयाने शासन व्यवस्था चालविली. **सर्वशिर प्रधान** हा मुख्य प्रधान म्हणून कार्य करत असे. **भणडागारिका** वर कोश सांभाळण्याची जबाबदारी होती. **रायसस्वामी** हा महसूल विभागाचा मुख्य सचिव होता. **धर्मासत्ताधिकारी** हा धार्मिक कार्य पाहत असे. सम्राटाच्या नेतृत्वाखाली विजयनगरची शासनव्यवस्था चालत असे. राज्याचे नाडू, सीमा, स्थळ व ग्राम असे प्रादेशिक विभाग होते. गावांचा कारभार अमरनायक स्वतंत्रपणे पाहत असे.

**सारांश–** कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीत विजयनगरचे साम्राज्य उत्कृर्षाच्या परमोच्च शिखरावर पोहोचले होते. कृष्णदेवराय विजयनगरचा पराक्रमी राजा होय. कृष्णदेवरायाच्या अफाट शौर्यामुळे विजयनगर साम्राज्याचा विस्तार मोठया प्रमाणात झाला. कृष्णदेवरायाने आपले साम्राज्य हिंदी महासागरातील काही बेटासह उत्तरेकडे रायचूर–दुआब व कृष्णा नदीपासुन दक्षिणेकडे हिंदी महासागरापर्यंत आणि पूर्वेकडे विशाखापट्टफ्मपासून पश्चिमेकडे दक्षिण कोकण पर्यंत वाढविले.

- **सांस्कृतिक कार्य –**

प्रास्ताविक– कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीत विजयनगरची ख्याती सर्व दूर पसरली होती.विजयनगरचे वैभव परकिय प्रवाशांना आकृष्ट करणारे होते. नुनीझ, पेस, बार्बोसा, फेरीस्ता, निकापलो कोंटी, अब्दुल रज्जाक यांनी भेटी दिल्या होत्या. त्यांनी आपल्या प्रवसातील वर्णनामध्ये विजयनगर शहराच्या कलावैभवाचे वर्णन केलेले असुन स्थापत्यशास्त्राच्या दृष्टीकोणातुन मंदिरे, गोपुरे, राजवाडे, महाल, तटबंदी, जलाशय, सभागृहे यांच्या वर्णनाची महिती येते. यातुन आपणास विजयनगर संदर्भाची महिती मिळते. कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीमध्ये साहित्य, नृत्य, नाटय व संगीत इत्यादी क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात प्रगती झाली. तो स्वतः विद्वाण असल्यामुळे त्याने अनेक विद्वान व कलाकारांना राजधाश्रय दिला.

**सांस्कृतिक कार्य** ➢ ग्रंथरचना /साहित्य ➢ स्थापत्य कलेतील प्रगती ● होस्पेट ● जलाशय ● राजनगरी ➢ नाटय कला ➢ संगीत व नृत्य ➢ चित्रकला ➢ वीरगळ ➢ सतीशिळा

- **ग्रंथरचना /साहित्य:**

कृष्णदेवराय उत्तम वक्ता व संभाषणपटू होता. त्याच्या पदरी आठ नामांकित कवी होते. त्यांना अष्ट दिग्गज असे म्हटले जात असे. त्याने तेलगू भाषेला नेहमीच उत्तेजन दिले. इ.स. १५११ मध्ये कृष्णदेवरायाने स्वतः तेलगू भाषेमध्ये '**अमूक्त्यमल्यदा**' हे दिर्घ काव्य लिहिले. ते '**लृविष्णुचित्तीयमु**' या नावानेही ओळखले जाते. कृष्णदेवरायाचे '**जांबुवंतीकल्यांणम**' हे नाटक उपलब्ध आहे. कृष्णदेवरायाच्या राज्यघराण्यातील स्त्रियाही संस्कृतमधून कविता व नाटके लिहिण्यात रस घेत असत. कृष्णदेवराय स्वतः कन्नड भाषीक असुनही त्याचे तेलगू व संस्कृत भाषेवर प्रभुत्व होते. तेलगू भाषीकात आजही कृष्णदेवरायाला मानाचे स्थान आहे.

कृष्णदेवरायाच्या दरबारात तेलगू कवीचे वर्चस्व होते. राजदरबारात तेलगू भाषेला वरचे स्थान होते. त्याच्या कार्यकिर्दीत तेलगू वाङ्मय बहरास आले. कृष्णदेवराय कवी संमेलने भरवीत असे. दरबारातील राण्यासुध्दा या सोहळयाला हजर असत.

तेलगुबरोबरच कृष्णदेवरायाच्या दरबारात कन्नड व तमिळ भाषेत ग्रंथ निर्मिती झालेली होती. कुमार सरस्वती व ज्ञानप्रकाश हे दोघे राजदरबारात राजकवी होते. कुमार सरस्वती याने कृष्णदेवरायाच्या लग्न सोहळयावर काव्य लिहिले आहे. कृणदेवरायची थोरवी ज्ञानप्रकाश या कवीने गायली आहे.

**स्थापत्य कलेतील प्रगती:** विजयनगर हे शहरच स्थापत्यकलेचा आदर्श व उत्कृष्ट नमुना आहे. अनेक वास्तू या शहारामध्ये निर्माण केलेल्या आहेत. त्या अतिशय देखण्या व सुंदर अशा आहेत. विजयनगरचे साम्राज्य स्थापत्य व कलेचे सुवर्णयुगच होते. कृष्णदेवरायाने मंदिरे, कालवे, जलाशय, नविन नगरे यातुन मोठया प्रमाणात स्थापत्यशैलीत प्रगती केली. विजयनगर राजधानी जवळ मातोश्री नागलादेवी हिच्या स्मृतिप्रीत्यार्थ नागलपूर शहराची निर्मिती केली. त्याने विजयनगर येथे कृष्णस्वामी मंदिर व रामस्वामी मंदिर बांधले. विविध गोपूरे, मंदिरे स्थापत्यकलेतील बांधकामाची साक्ष पटवितात. त्याने इ.स.१५२८ मध्ये विष्णूचा नरसिंह आवतार दर्शविणारा भव्य दगडी पुतळा बसविला. विजयनगरमध्ये अनेक बांधकामे करून शहर स्थापत्यकलेच्या दृष्टीने सुंदर बनविले.

कृष्णदेवरायाच्या कारकिंदीमध्ये विजयनगरचे साम्राज्य अतिउच्च शिखरावर पोहचले होते. विजनगरच्या दृष्टीने कृष्णदेवरायची कारकिर्द वैभवशाली व भरभराटीची ठरली. कृष्णदेवराय उत्कृष्ट शासक होताच त्याच बरोबर कलेचा भोक्ता होता. कृष्ण देवरायाच्या कारकिर्दीमध्ये निर्माण झालेले स्थापत्य भारताच्या इतिहासामध्ये श्रेष्ठत्व प्राप्त करून जाते. विजयनगर शहरामध्ये त्यांनी अनेक वास्तू निर्माण केल्या. कृष्णदेवरायाने नागलादेवी मातेच्या स्मरणार्थ नागलापूर हे नगर वसविले. हजारस्वामी व कृष्णस्वामी ही दक्षिण भारतामध्ये प्रसिध्द अशी मंदिरे बांधली. विजयनगर राजधानीमध्ये एक विशाल तलाव बांधला.कृष्णस्वामीच्या मंदिराजवळ नृसिंहाचा २५ फूट उंच व १६-१७ फूट रूंदीचा प्रचंड दगडी पुतळा कोरला आहे.

वियनगरकालीन मंदिर बांधकामशैलीची दोन वैशिष्टे जाणवतात एक म्हणजे पदर सुटणाऱ्या दगडाचा वापर तर दुसरे वैशिष्ट्य म्हणजे ग्रेनाईट दगड याचा वापर होय. विजयनगमधील बांधकामासाठी जास्तीत जास्त

ग्रेनाइट दगडाचा वापर केल्याचे दिसून येते. विजयनगर मधील वास्तुकला ही स्वतंत्र विजयनगर शैली म्हणून प्रसिध्दीस आली. मंदिराची सजावट, आकार, धार्मिक आचार व विचार यातुन मंदिर परिसरातील वास्तूंची संख्या अनेक पटीने वाढली. हजार स्तंभानी युक्त असे मंडप बांधलेले असत. हे स्तंभ बांधकामाला व वरच्या तुलांना आणि छपराला मजबुत आधार देत. देवतेचे मंदिर मध्यभागी व आकाराने विस्तृत असे. ईशान्य बाजूला देवाच्या देवतेचे म्हणजेच पत्नीचे मंदिर छोटे लहाण असे. मुख्य सभा मंडपाचा वापर उत्सव–नृत्य व प्रार्थनेसाठी केला जात असे. विजयनगरकालीन मंदिराच्या स्तंभावर मोठ्या प्रमाणात शिल्पे कोरलेली आढळतात.

हाजाररामा मंदिर व विरूपाक्ष मंदिर ही दोन मंदिरे विजयनगर शैलीची उत्कृष्ट उदाहरणे आहेत. ही मंदिरे आजही चांगल्या अवस्थेत आहेत. आजही ती कला–आविष्कार म्हणून आभ्यासनीय आहेत. ही मंदिरे विजयनगर राजवाडयाच्या जवळ असल्यामुळे त्यांना विशेष महत्व आहे. या वास्तू मध्ये मुख्य मंदिर, अम्मा मंदिर व भव्य सभा मंडप आहे. मंदिराच्या मंडप गाभाऱ्यात वर उंच शिखर आहे. हे शिखर द्रविड शौलीचे आहे. मंदिराच्या बाहेरील भिंतीवर रामायणातील शिल्पे कोरलेली आहेत. मंडपाचे स्तंभ तुला व कर्णावर विपुल नक्षीकाम केलेले आहे. पूर्वेकडे गोपूर बांधलेले आहे.

कृष्णदेवरायाने विविध वास्तू, अनेक शिल्पे, जलाशये, मोठ–मोठे कालवे आदि. वास्तू बांधल्यामुळे विजयनगरच्या वास्तु शैलीला कळसास पोहचविले. वास्तुशिल्पामध्ये कृष्णदेवरायाने मौलिक कामगिरी केली. कृष्ण देवरायाच्या कारकिर्दीमधील वास्तुशिल्पे पुढील प्रमाणे सांगता येतील.

**होस्पेट –** कृष्ण देवरायाच्या सर्वश्रेष्ठ कार्याचे फलीत म्हणजे होस्पेट शहर होय. नागलपूर या नावाने ते ओळखले जात असे. हे शहर विजयनगरच्या कृष्णदेवरायाने निर्माण केले. इ.सन १५१६ मध्ये या नगराच्या बांधकामास सुरूवात झाली. पुढे इ.सन १५२० मध्ये ते पूर्ण झाले म्हणजे जवळ–जवळ चार वर्षे या बांधकामासाठी लागली. हे नगर कृष्णदेवरायाच्या आवडीचे होते. तो तेथे अनेक दिवस मुक्कामास असे. हे शहर सर्वच बाबतीमध्ये वैभवशाली होते. शहरातील रस्ते अतिशय सुंदर होते. रस्त्याच्या दोन्ही बाजूला बाजार भरत असे. रस्त्याच्या दुतर्फा हिरवी गार झाडी होती.

**अनंतशयनगुडी** – कृष्णदेवरायाने इ.सन १५२४ मध्ये ही उपनगरी स्थापन केली. आपल्या पुत्राच्या जन्मवर्षी त्याच्या नावाने ही नगरी वसविली आहे. या नगरीमध्ये कृष्ण देवरायाने अनंतशयन हे मंदिर उभारले. हे देवालय १४७ X ८५ मीटर एवढे विस्तीर्ण असे आहे. हे मंदिर ४७ मीटर लांब व २५ मीटर रूंद आहे. या मंदिरातील सभा मंडपाची उंची २७ मीटरहून अधिक लांब आहे व त्याची रूंदी २३ मीटर आहे. गाभाऱ्यातील घुमटाची उंची १० मीटर आहे. या घुमटाचा आकार अतिशय मनोवेधक आहे. मंदिराच्या सभोवतालच्या भिंतीची उंची जवळ–जवळ २४ मीटर आहे. सध्या या मंदिराचा काही भाग उधवस्त झालेला दिसतो.

**जलाशय** – कृष्णदेवरायाने इ.स. १५२० साली प्रचंड जलाशयाचे काम केले. या कामासाठी कृष्णदेवरायाने पोर्तुगिज अभियांत्याची मदत घेतल्याचे दिसुन येते. हा जलाशय मोठे दोन पहाड जोडुन निर्माण

केला आहे. या बांधकामासाठी मोठ मोठे शिलाखंड वापरून मजबूतीसाठी चुन्याचा वापर केला आहे. हा प्रचंड जलाशय नागलपूरच्या जवळ आहे.

**राजनगरी -** कृष्णदेवरायाची राजनगरी म्हणजे सौंदर्याचा उत्कृष्ट नमुना होय. या वैभवशाली राजनगरीमध्ये विविध वास्तू होत्या. राजप्रसाद, शासकीय इमारती, सेनापती, प्रधान व इतर अधिकाऱ्यांची निवासस्थाने तेथे होती. या नगरीमध्ये विविध उपविभाग होते. या नगरीत विश्रामगृहे, सभागृहे, खलबतखाने आणि मौल्यवान वस्तू किंवा शस्त्रास्त्रे ठेवण्यासाठी तळघरे होती. अशा विविध इमारतीनी राजनगरीची शोभा वढविली होती.

इ.स. १५१३ मध्ये कृष्णदेवरायाने दसरा डब्बा किंवा भमहानवमी डिब्बा ही वास्तू उभी केली. या बांधकामांना विजय मंदिर आणि भुवनविजय अशी नावे देण्यात आली. याच नावाने या वास्तू पुढे प्रसिध्दीस आल्या. कृष्णदेवरायाने इ.सन १५१३ मध्ये हजारा राम नावाचे मंदिर उभारले. काही ठिकाणी मोठ-मोठे तलाव बांधले. संपर्ण रामायण उठावाच्या शिल्पात कोरलेले आहे. या मंदिरातील सभोवतालची शिल्पे कलाविष्काराचे दर्शन घडवितात. कृष्णदेवरायाच्या कार्यकिर्दीमध्ये वैष्णव मंदिर, कृष्ण स्वामी मंदिर विजयनगर मधील सर्वात उंच ५२ मीटर उंचीचे गोपूर आहे. भव्य असे विजयविठ्ठल मंदिर तेवढेच सुंदर ही आहे.

कृष्णदेवरायाने बांधलेले श्रीकृष्णाचे भव्य मंदिर आजही अप्रतिम स्थापत्यकलेचा उत्कृष्ठ नमुना आहे. उंच गोपूरे व हजार खांबांचे मंडप ही त्याने निर्माण केलेल्या वास्तू कलेचे उत्तम नमुने आहेत. कृष्णदेवरायाने एकशे आठ स्तंभाचा शतस्तंभी म्हणून ओळखला जाणारा भव्य मंडप बांधला. नरसिंह पुतळा, विरूपाक्ष मंदिराची रचना व गोपूरे, विठ्ठलस्वामी मंदिर इत्यादी त्यांनी केलेली बांधकामे उत्कृष्ठ अशीच आहेत. कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीमध्ये विजयनगर राज्याने प्रगतीचे शिखर गाढले होते. इतिहासकार डॉ.इश्वरी प्रसाद म्हणतात 'दक्षिण भारताच्या इतिहासात त्याची बरोबरी करणारा कोणीही हिंदू किंवा मुस्लिम शासक झालेला नाही'.

**नाट्य कला -** कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीमध्ये नाट्यकला बहरास आली होती. गायक, वादक, नर्तक, अभिनेते त्याला साथ देणारे नट हे एकत्र मिळून जो संच तयार होई त्याला 'मेळा' असे म्हटले जाई. हे मेळे गावोगावी फिरून आपली कला सादर करीत. उघड्या मैदानावर तंबू ठोकून मंच तयार केला जात असे. प्रेषक उघड्या मैदानावर बसुन ती नाटके पाहत असत. प्राचीन कथा घेऊन हे कलाकार नाटक सादर करून मंनोरंजन करीत. अशा कलाकारांना खूप लोकप्रियता मिळत असे. त्यातून त्यांना चांगली बक्षिसेही मिळत असत. अशी नाटयकला सादर करण्यासाठी काही ठिकाणी नाट्यगृहे ही बांधल्याचा उल्लेख आहे. या नाट्य प्रकारामध्ये स्त्री पात्रे ही असत ती पात्रे स्वतः स्त्रीया करीत असत. तसे उल्लेख शिलालेखात आले आहेत. उभेउभ भासतील असे सजिव व नैसर्गिक देखावे रंगमचावरील पडद्यावर साकारले जात असत. नद्या, पर्वत, ओढे, नाले, अरण्ये, पशुपक्षी, विविध प्राणी आदि. देखावे रंगमंचावर उभे केले जात असत. जी पात्रे काम करणार आहेत. अशा कलावंतांना केलेल्या केशभूषा व वेशभूषा उभेउभ वाटत. कृष्णदेवरायाच्या कालखंडामध्ये 'बोग्मलाट' हा छायानाट्याचा प्रकार खुप लोकप्रिय होता.

**संगीत व नृत्य** - कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीमध्ये संगीत व नृत्यकला भरभराटीला आलेली होती. विजयनगरच्या शिल्पामधून स्त्री–पुरूषांनी तंतुवाद्ये व चर्मवाद्ये हातात घेतल्याची जतेच्या जते दिसतात. विजयनगरच्या विविध वास्तुवर या छटा कमी जास्त प्रमाणात दिसुन येतात. कृष्णदेवराय स्वतः आपल्या कृष्णा या गुरूकडे वीणावादक शिकला होता. एवढेच नव्हेतर कृष्ण देवरायाने राजस्त्रियांना गायन व वादन शिकविण्यासाठी उत्तम अशा संगीत शिक्षकाची नेमणूक केली होती.

**चित्रकला -** दशावतार, वालीवध, रावणवध, रावणाच्या दरबारात हनुमान, राम रावण युध्द, कालिमर्दन, कृष्णाच्या विविध लिळा, रामायण, महाभारत या प्राचीन प्रसंगाचे चित्रकलांचे चित्रीकरण मोठ्या प्रमाणात विजयनगर साम्राज्यात झाले होते. हिरवा, लाल, राखाडी या रंगाचा वापर विजयनगरकालीन चित्रकलेमध्ये दिसुन येतो. अंडाकृती चेहरा व अनुकुचीदार नाक हे या चित्रकलेचे वैशिष्ट होते. विविध प्राण्यांचे डोळे माणसांच्या डोळया प्रमाणे होते. हे डोळे, पापण्या व भुवयासह काढण्याची पध्दत होती. विजयनगर दरबारातील चित्रकला कळसास पोहचली होती. विजयनगरच्या दरबारामध्ये परकीय चित्रकार होते. त्यामध्ये इंग्रजी, पोर्तुगिज या चित्रकारांचा उल्लेख करावा लागेल. विविध चित्रावरून विजयनगर कला व सौदर्याची प्रचिती येते. इंग्रजी चित्रकार अलेक्झांडर फ्रेम याने काढलेली विजयनगर दरबारातील चित्रे सौंदर्यपूर्ण आहेत.

**वीरगळ** – वरिगती प्राप्त करणाऱ्या वीरांच्या प्रती कृतज्ञातेच्या भावनेतून मरणोत्तर आदर व्यक्त करणे किंवा एखादे महान कार्य करीत असताना धारातिर्थी पडणाऱ्याचे कायम स्वरूपी स्मरण करण्याच्या हेतूने वीरगळ निर्माण करण्याची प्रथा विजयनगर संस्कृतीमध्ये होती. वरिमरण देणाऱ्याच्या प्रती समाजामध्ये श्रेष्ठ स्थान राहते. गावाचे रक्षण करत असताना वीरमरण प्राप्त करणाऱ्यांची स्मारके ही विजयनगर मध्ये उभारल्याचे दिसुन येतात. त्यांच्याबद्दल समाजामध्ये आदर असे.

**सतीशिळा** – पतीच्या मृत्युनंतर पत्नीने त्या शवासोबत जिवंत दहन करणे किंवा पतीच्या शवाबरोबर पत्नीला जिवंत पुरणे, पती निधनानंतर पत्नीने स्वतःला जाळून घेणे किंवा पुरून घेणे प्रतिष्ठेचे मानले जात असे. अशा अनेक सतीशिळा विजयनगरमध्ये आढळून येतात. विठ्ठल मंदिरामध्ये आढळलेल्या सती शिळा विजयनगरकाळाचे वैशिष्ट्य दर्शवितात.

**सारांश** – विजयनगरच्या इतिहासात कृष्णदेवरायाची कारकिर्द म्हणजे सुर्वण युग होते. आजही विजयनगर शहराचे कलावैभव अतिशय सुंदर असे आहे. तेथील कलाकुसर पाहताना पाहणाराचे डोळे दिपून जातात. स्थापत्यशास्त्राच्या दृष्टीकोणातून विजयनगरची मंदिरे, गोपुरे, राजवाडे, महाल, तटबंदी, जलाशय, सभागृहे सौंदर्यकलेचा अविष्कारच आहेत, मंडप हे विजयनगर मंदिराचे वैशिष्ट होय. मंदिरामध्ये वास्तू व शिल्प यांचा सुंदर मिलाफ आढळतो. विजयनगरची मंदिरे म्हणजे शिल्पकलेचा व स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना होय. ही विजयनगरकालीन स्थापत्य व वास्तूकला म्हणजे वैज्ञानिक प्रगतीचे द्योतक म्हणावे लागेल.

- **कृष्णदेवरायाची योग्यता–**

| |
|---|
| योग्यता ➢ प्रभावी व्यक्तिमत्त्व ➢ महान विजेता व शक्तिशाली राजा ➢ सुसंस्कृत विव्दान व विव्दांनाचा आश्रयदाता ➢ विस्तीर्ण व वैभवशाली साम्राज्याचा निर्मिता ➢ सहिष्णु, क्षमाशील व दिलदार राजा ➢ उत्तम प्रशासक |

**१. प्रभावी व्यक्तिमत्त्व** – कृष्णदेवरायाचे व्यक्तिमत्त्व रूबाबदार, भारदस्त व आकर्षक असे होते. इतरावर त्याच्या व्यक्तिमत्त्वाची लगेच छाप पडत असे. म्हणून पेज या पोर्तुगिज प्रवाशाने लिहिले आहे 'हा राजा मध्यम उंचीचा गौरकाय रेखीव आणि धट्टाकट्टा होता. त्याच्या चेहऱ्यावर देवीचे व्रण होते. परंतु तो आकर्षक वाटे तो आनंदी व उत्साही स्वभावाचा होता. परदेशी प्रवाशांचा मान–सन्मान करणारा तो एक सामर्थ्यशाली थोर सम्राट होता. तो नियमित व्यायाम करून आपले शरीर सदृढ व कार्यक्षम ठेवीत असे. पराक्रमी व शक्तिशाली राजा म्हणून कृष्ण देवरायाचे वर्णन करावे लागेल.

**२. महान विजेता व शक्तिशाली राजा -** प्रत्येक युध्दामध्ये कृष्णदेवराय विजयी झाला होता. विजापूर ओरिसावरील विजय यातुन त्याची विरता दिसुन येते. कृष्णदेवरायाचे वर्णन एक बलाढ्य व शक्तिशाली राजा म्हणून करता येईल. मुस्लिम सत्तधिशांकडून नेहमी पराभूत होणारी सेना कृष्णदेवरायाच्या कारर्किदीमध्ये विजयी सेना झाली. बहामनी, गजपती, उम्मतूर, ओरिसा वरील आक्रमणे त्याच्या प्राक्रमाची व शौर्याची साक्ष देतात. जिद्द-आत्मविश्वासातून तो नेहमी विजयी ठरला.

**३. सुसंस्कृत विद्वान व विद्वांनाचा आश्रयदाता -** कृष्णदेवरायाने 'अमूक्त्यमल्यदा' हे दीर्घ काव्य लिहिले. ते तेलगू भाषेत आहे. त्यामध्ये राजनीती व राज्यकारभाराची माहिती मिळते. तो उत्तम वक्ता होता. त्याच्या दरबारामध्ये प्रसिध्द आठ कवी होते. त्यांना अष्ट दिग्गज असे म्हणत. तेलगू व संस्कृतला त्यांनी उत्तेजन दिले. परदेशी विद्वानांचा त्यांनी आदर–सत्कार केला.

**४. विस्तीर्ण व वैभवशाली साम्राज्याचा निर्मिती -** कृष्णेच्या दक्षिणेकडील सर्व दक्षिण भारत त्याच्या ताब्यात होता. बिदर–गुलबर्गा या मुस्लिम सत्ताधिशांच्या राजधान्या जिंकणारा तो एकमेव विजयनगरचा राजा होय. बंकापूर, भटकल, गिरसप्पा इत्यादी राजे त्याचे मांडलिक होते. त्याने अनेक लढाय्या करून बलाढ्य साम्राज्य निर्माण केले. विजयनगरचे वैभव पाहून परकीयांचे डोळे दिपून जात असत.

**५. सहिष्णु, क्षमाशील व दिलदार राजा -** कृष्णदेवरायाने आपल्या प्रजेला धार्मिक स्वातंत्र्य दिले. तो जरी स्वतः वैष्णव पंथाचा असला तरी त्याने सर्व धर्मियांना न्यायाने वागविले. ओरिसातील शत्रूंना कैद केल्यानंतर त्याच्याशी क्रुर न वागता त्यांना क्षमा करून सन्मानाने वागविले. त्याने शत्रूच्या निरापराध सैन्याची कधीही कत्तल केली नाही.

**६. उत्तम प्रशासक -** तो फक्त विजेताच होता असे नव्हे तर उत्तम प्रशासक होता. सामान्य रयतेचे व शेतकऱ्यांचे-कष्टकऱ्यांचे कल्याण हे त्याच्या राज्यकारभाराचे मुख्य ध्येय होते. सामान्य रयतेवर जुलूम-अन्याय होणार नाही. याकडे लक्ष दिले व अधिकाऱ्यांना आदेश दिले. गुंड, चोर व लुटारू यांना कडक शिक्षा दिल्या. त्यामुळे अंतर्गत शांतता व सुव्यवस्था निर्माण झाली. सर्व जाती धर्मातील व परकीय देशातील जनतेला त्याच्या राज्यामध्ये फिरता येत होते. त्यांने आपल्या साम्राज्यामध्ये धरणे व जलाशय बांधून शेतीला मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध करून दिले. तांदूळ, ऊस, विविध फळे यांची मोठ्या प्रमाणात निर्मिती केली. पाटबंधारे, कालवे, तलाव या कामांकडे विशेष लक्ष दिले. जंगल व्याप्त जमीन कमी करून ती लागवडी खाली आणली. तुंगभद्रा नदीला धरण बांधून त्याचा वापर पिण्यासाठी व शेतीसाठी केला. नागलपूर शहर वसविल्यानंतर त्या शहराला पाणीपुरवठा होण्यासाठी त्याने एक मोठा जलाशय बांधला.

**सारांश :** दक्षिण भारताच्या इतिहासात कृष्णदेवरायाची कारकीर्द अत्यंत वैभवशाली व समृध्दीची होती. कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीत तर हे वैभव कळसास पोहचले होते. त्यांनी केलेली बांधकामे उत्कृष्ठ अशीच आहेत. कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीत विजयनगर साम्राज्याने वैभवाचे शिखर गाठलेले होते. डॉ. ईश्वरीप्रसाद, डॉ. आर.सी.मुजूमदार, डॉ. श्रीवस्तव या इतिहासकारांनी 'कृष्णदेवराय हा विजयनगरचा सर्वश्रेष्ठ सम्राट असून भारताच्या इतिहासातील थोर सम्राटांपैकी एक होय' असे गौरव उदगार काढले. सर्वच इतिहासकारांनी कृष्णदेवरायावरती स्तुतीसुमनांचा वर्षाव केलेला आहे. एकंदरीत कृष्णदेवरायाची कारकीर्द म्हणजे मध्ययुगीन कालखंडातील दक्षिण भारताच्या इतिहासातील सुवर्ण पान होय.

❑ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :**

**योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. विजयनगर राज्याची स्थापना ........ साली झाली.

अ. १३३६ ब. १३४७ क. १३५० ड. १३६०

२. रायचूर हे प्रसिध्द शहर ........ यांच्या दुआबात होते.

अ. तुंगभद्रा व कृष्णा ब. गंगा व कृष्णा

क. गोदावरी व कावेरी ड. नर्मदा व गंगा

३. 'अमूक्त्यमल्यदा' हे काव्य .........यांनी लिहिले.

अ. रामराया ब. तिरूमल क. व्यकटराय ड. कृष्णदेवराय

४. कृष्णदेवरायाच्या कालखंडामध्ये.......... हा छायानाट्याचा प्रकार खुप लोकप्रिय होता.

अ. बोग्मलाट ब. सोमलाट

क. कृष्णलाट ड. गोमलाट

५. विजयनगर संस्कृतीमध्ये ...........निर्माण करण्याची प्रथा होती.

अ. पुतळे ब. समध्या क. स्मारके ड. वीरगळ

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. नागलपूर शहराची निर्मिती कोणत्या राजाने केली.

२. विजयनगरमध्ये दसरा डब्बा ही वास्तू कोणत्या राजाने निर्माण केली.

३. कृष्णदेवरायाने इ.स. १५२४ मध्ये कोणती उपनगरी स्थापन केली.

४. कृष्णदेवरायाने स्वतःस कोणती पदवी धारण केली.

५. कृष्णदेवरायाने कोणत्या साली हजारा राम नावाचे मंदिर उभारले.

## २.२.२ महंमद गवान : बहामनी राज्यातील कामगिरी

**प्रास्ताविक :**

डॉ. ईश्वरीप्रसाद म्हणतात 'मध्ययुगीन इतिहासातील थोर राजनीतीज्ञांमध्ये महंमद गवानला उच्च स्थान देता येईल'. बहामनी राज्यामध्ये महंमद गवानचे व्यक्तिमत्त्व अतिशय वैशिष्ट्यपूर्ण समजले जाते. एक उत्तम राज्यकर्ता म्हणून त्याच्याकडे पाहिले जाते. बहामनी राज्याची संपूर्ण सत्ता त्याच्या हाती एकवटली असताना सुद्धा त्याने कधीही सत्तेचा दुरूपयोग केला नाही. बहामनी राज्याशी एकनिष्ठ राहून महंमद गवानने राज्य चालविले. महंमद गवानचे स्थान राजा म्हणून नव्हेतर राज्यकर्ता म्हणून महत्त्वपूर्ण आहे. तो आपल्या कर्तबगारीमुळे भारताच्या इतिहासात प्रसिद्धीस आला. महंमद गवानने आपल्या कारकिर्दीमध्ये बहामनी राज्याची संपूर्ण प्रगती केली. बहामनी सत्ताधीश म्हणून महंमद गवान सत्तेवर बसला नसला तरीही बहामनीचा मुख्य प्रधान व वजीर म्हणून त्याची कारकिर्द अतिशय महत्त्वाची आहे.

सामाज्यविस्तार ➢ माळवा राजाचा पराभव ➢ कोकण स्वारी ➢ गोवा जिंकला ➢ ओढ्यावर स्वारी ➢ तेलंगणावर विजय ➢ कांची विरूद्ध स्वारी

- **सामाज्यविस्तार** – महंमद गवानने बहामनी राज्याचा प्रधानमंत्री म्हणून प्रामाणिकपणे इमाने, इतबारे सेवा केली. बहामनी राज्याचा मोठ्या प्रमाणात साम्राज्यविस्तार केला. साम्राज्याचे वैभव व विस्तार वाढविला. एवढेच नव्हेतर विजयनगरवर स्वारी करून भरपूर संपत्ती लुटली. ओरिसावर स्वारी करून मोठी लुट मिळविली. त्याने जो सामाज्यविस्तार केला तो खालील प्रमाणे सांगता येईल.

**माळवा राजाचा पराभव** – बहामनी राज्यावर माळवा सुलतानाने इ.स.१४६७ मध्ये स्वारी केली परंतु त्याचा पराभव झाला व बहामनी सत्तेचा विजय झाला. माळवा सुलतानाला तह करावा लागला. येथुनच खऱ्या अर्थाने बहामनी सत्तेच्या सम्राज्यविस्ताराला सुरुवात झाली व महंमद गवानच्या नेतृत्वाखाली बहामनीने मोठ-मोठे विजय संपादन केले.

**कोकण स्वारी -** ही स्वारी महमंद गवानच्या नेतृत्वाखाली इ.स.१४६९ ला केली. कोकण किणारपट्टीवरील राज्यांचा पराभव करून त्याच्या ताब्यातील बरेच किल्ले जिंकुन घेतले. संगमेश्वर राजाचा पराभव करून विशाळगड किल्ला जिंकुन घेतला. त्यात सोने, रत्ने, हत्ती, गुलाम वगैरे मोठ्या प्रमाणात लुट मिळाली. या स्वारीमध्ये महंमद गवानने मोठे यश मिळविले. त्यांने समुद्रापर्यंत बहामनी साम्राज्याचा विस्तार केला.

**गोवा जिंकला** – महंमद गवानने विजयनगरच्या ताब्यातील गोवा जिंकून घेतले. कोन्दवीरी, राजकुन्द्री हे किल्ले जिंकून घेतले. इ.स. १४७३ साली गोव्यावर स्वारीकरून गोवा जिंकून घेतले. विजयनगर सैन्यानी कढवा विरोध केला परंतु महमंद गवानच्या सैन्यासमोर त्यांना पराभव पत्करावा लागला.

**ओढ्यावर स्वारी –** ओढ्यातील भावा भावाच्या संघर्षाचा फायदा घेण्याचे ठरवून महंमद गवानने ओढ्यावर स्वारी केली. ओढ्याचा राजा अंबरराव हा होता. त्याला त्याचा भाऊ मंगळराव त्रास देत होता. महंमद गवानने अंबररायला मदत केली. त्या बदल्यात महंमद गवानला राजमहेंद्री व कंडामिली ही ठाणी मिळाली. महमंद गवानने पुन्हा सहा वर्षानंतर या प्रदेशावर आक्रमण केले व भिमराजचा पराभव केला.

**तेलंगणावर विजय** – महंमद गवानने तेलगंणावर आक्रमण केले तेव्हा तेथे नरसिंहराय हा हिंदू राजा राज्य करीत होता. हे राज्य बहामनी राज्या शेजारीच होते. महमंद गवानने या स्वारीत मोठा प्रदेश काबीज केला. बहामनी सुलतान महंमद गवानच्या या विजयावर खूश झाला होता.

**कांचीविरूद्ध स्वारी किंवा कांजीवरमची स्वारी** – विजयनगर विरूद्धच्या या स्वारीला एक वेगळे महत्त्व आहे. कांचीच्या सैनिकांनी बहामनी सैन्याला प्रतिकार केला परंतु त्यांचा बहामनी सैन्यासमोर टिकाव लागला नाही. या स्वारीमध्ये मोठी लुट मिळाली. माणके, सोने, हिरे मोठ्या प्रमाणात मिळाले.

अशाप्रकारे एका मागोमाग एक मोहिमा राबवून महंमद गवानने बहामनी राज्याचा साम्राज्य विस्तार मोठ्या प्रमाणात केला. या मोहिमांमधुन बहामनी साम्राज्याला मोठा आर्थिक लाभ झाला. या स्वाऱ्या व मोहिमातून महंमद गवानच्या लष्करी शक्तीची प्रचिती आली.

### महमंद गवानच्या सुधारणा

महंमद गवानला राज्यकारभाराचे उत्कृष्ट ज्ञान होते. शासन व्यवस्थेत तो अतिशय निपुण होता. महमूद गवानने अनेक सुधारणा घडवून अणल्या. महंमद गवानने बहामनी साम्राज्याला वैभव प्राप्त करून दिले. त्याने प्रशासकीय सुधारणा करून बहामनी राज्याची भरभराट घडवून आणली. त्याने ज्या प्रशासकीय सुधारणा केल्या त्याचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

**सुधारणा** ➢ प्रशासकीय सुधारणा ➢ सैन्य सुधारणा ➢ न्याय व्यवस्थेत सुधारणा ➢ जमीन सुधारणा ➢ केंद्रशक्तीत वाढ ➢ विद्या व कलेला उत्तेजन

• **प्रशासकीय सुधारणा** – महंमद गवानाने प्रशासनात मोठा बदल केला. महंमद गवानने बहामनी साम्राज्याचे आठ प्रांतात विभाजन केले. त्यामध्ये दौलताबाद, बिदर, गुलबर्गा, विदर्भ हे चार विभाग होते. पुन्हा त्या प्रत्येकाचे दोन प्रांत पाडल्यामुळे बहामनी साम्राज्याचे एकूण आठ प्रांतात विभागणी झाली.

**सैन्य सुधारणा** – महंमद गवानने लष्करामध्ये सुधारणा केल्या. महंमद गवानने बहामनी लष्कराचे उत्तम प्रकारे संघटन केले. सैनिकांना रोख वेतन दिले. सैनिकांचे पगार वाढविले. सैन्यात शिस्त निर्माण केली. उत्तम घोडदळ निर्माण केले. सैनिकांना युध्दकलेचे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली. त्यामुळे सैनिकांची कार्यक्षमता वाढली.

**न्याय व्यवस्थेत सुधारणा** – महंमद गवान अप्रतिम न्यायबुध्दीचा होता. महंमद गवानने जनतेला निःपक्षपातीपणे व चोख न्याय मिळावा अशा सूचना अधिकारी वर्गाला दिल्या. गुन्हेगारांना उचित शिक्षा केल्या. त्यामुळे गुन्हेगारीला आळा बसला. संपूर्ण बहामनी साम्राज्यामध्ये शांतता व सुव्यवस्था निर्माण झाली.

**जमीन सुधारणा** – महंमद गवानने जमिनीची मोजणी करून शेतसारा निश्चित केला. शेतसारा वसुलीचे कडक नियम केले. शेतकऱ्यांना अनेक सवलती दिल्या. शेतसारा धान्य किंवा रोख पैशाच्या स्वरूपात भरण्याची व्यवस्था केली. शेतीतील भ्रष्टाचार बंद करून शेतकऱ्यांना अनेक सवलती दिल्या. त्याने केलेल्या महासूलविषयक सुधारणा काळाच्या पुढे होत्या.

**केंद्रशक्तीत वाढ** – महंमद गवानने कडक नियम करून साम्राज्यातील सुभेदारांचे हक्क व अधिकार कमी केले. प्रांतांचे विभाजन करून सुभेदारांची शक्ती कमी केली. अशा सुभेदारांचे अधिकार कमी केल्यामुळे साम्राज्याची केंद्रशक्ती आपोआप वाढली. त्याचे हे धोरण बहामनी सम्राज्यविस्ताराला व प्रशासकीय प्रगतीला महत्वपूर्ण ठरले.

**किल्ल्यावर नियंत्रण** – महंमद गवानने सुभेदारांचे नियंत्रण कमी केले. प्रशासन केंद्रस्थानी केले. साम्राज्यातील किल्ल्यांवरील सुभेदारांचे नियंत्रण कमी करून त्यावर केंद्राचे नियंत्रण ठेवले. त्यामुळे किल्ले प्रशासनाला बहामनी प्रशासनामध्ये महत्वपूर्ण स्थान प्राप्त झाले.

**विद्या व कलेला उत्तेजन** – महंमद गवान विद्या व कलेचा भोक्ता होता. तो स्वतः उत्तम कवी व गणितज्ञ होता. त्याला साहित्याची फार आवड होती. बिदर येथील त्याच्या ग्रंथालयात विविध विषयांवरील ग्रंथ होते. त्याने राजधानीच्या ठिकाणी म्हाणजेच बिदर या ठिकाणी एक भव्य मदरसा म्हणजेच महाविद्यालय बांधले. ही इमारत तीन मजली होती. या सुंदर इमारतीला फरशांनी सुशोभित केलेले होते. या महाविद्यालयामध्ये एक हजार शिक्षक आणि विद्यार्थ्यांची व्यवस्था केलेली होती. विशेष म्हणजे येथे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना निःशुल्क कपडे आणि जेवण दिले जात असे. तेथे इराण व इराक येथील विद्वान महंमद गवानच्या आग्रहावरून शिकविण्यासाठी आले होते.

**महमंद गवानचा मृत्यु** – बहामनी राज्यामधील सर्वात मोठी समस्या बनली ती म्हणजे अमीरांमधील अंतर्गत संघर्ष होय. बहामनी दरबारामध्ये अमिरांमध्ये दोन गट पडले. एक गट पूर्वी आलेल्या अमिरांचा

होता. तर दुसरा गट हा नंतर आलेल्या अमिरांचा होता. त्यांना दख्खनी आणि अफाकी या नावाने ओळखले जात असे. महंमद गवान हा नंतर आलेला असल्यामुळे त्याला पूर्वीच्या अमिरांचा म्हणजेच दख्खनी अमिरांचा विश्वास संपादन करणे कष्टाचे बनले. यामध्ये त्याला खूप त्रास झाला. या दोन गटामध्ये महंमद गवानने समझोता करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यात त्याला यश आले नाही हा संघर्ष असाच चालु राहिला. महंमद गवानच्या शत्रूनी महंमद गवानच्या विरूद्ध सुलतानाचे कान भरले. महंमद गवान हा गुप्तपणे विजयनगरला सामील आहे असे खोटेच सांगून त्यासाठी पुरावा म्हणुन महमंद गवानचा शिक्का असलेले आणि ओरिसाच्या राजास लिहिलेले एक पत्र सादर केले. सुलतानाने महमंद गवान यास ताबडतोब बोलावले व त्यास हे पत्र दाखविले. महमंद गवानने शिक्का आपला असल्याचे कबुल केले. परंतु पत्रातील मजकूर आपला नसल्याचे सांगितले. दारूच्या सेवनाने मद्यधुंद झालेल्या सुलतानाने कोणताही विचार नकरता इ.स.१४८२ मध्ये महंमद गवानला मृत्युदंडाची शिक्षा दिली. महंमद गवानने ३७ वर्ष बहामनी राज्याची प्रामाणिकपणे सेवा केली. परंतु दुर्दैवाने तो दक्षिणी मुसलमानांच्या कारस्थानाचा बळी ठरला. सुलतानास ज्या वेळेस खरी वस्तुस्थिती समजली त्यावेळेस त्याला अतिशय पश्चात्ताप झाला. पश्चातापदग्ध मनस्थितीत सुलतानाचा १२ जानेवारी १४८२ रोजी मृत्यु झाला.

- **महमूद गवानची योग्यता :**

| |
|---|
| **योग्यता** ➢ उत्तम सुधारक ➢ निस्थार्थी व स्वामिनिष्ठ ➢ साधी राहणी ➢ विव्दान ➢ दानशूर ➢ निष्ठावंत |

**उत्तम सुधारक** – महंमद गवानने सत्तेवर आल्यानंतर विविध सुधारणा केल्या. प्रशासन, लष्कर, कृषी या क्षेत्रामध्ये सुधारणा केल्यामुळे तो उत्तम सुधारक होता असे म्हटले जाते. त्याने बहामनी सत्तेच्या प्रशासकीय रचनेत आमुलाग्रह असा बदल करून साम्राज्यामध्ये शांतता व सुव्यवस्था निर्माण केली. प्रशासकीय सुधारणा करून बहामनी सत्तेला भक्कम बनविले.

**निस्थार्थी व स्वामिनिष्ठ** – महंमद गवान निस्थार्थी होता. त्याने सत्तेचा वापर कधीही स्वतःच्या स्वार्थासाठी केला नाही. सर्वाचे हित पाहून त्यांने प्रत्येक धोरण राबविले. बहामनी राज्याची सर्व सत्ता सूत्रे त्याच्या ताब्यात असताना सुद्धा तो बहामनी राज्य व सुलतान याच्याशी कायमच एकनिष्ठ राहिला. त्याने आयुष्यभर स्वामिनिष्ठा जोपासली.

**साधी राहणी** – महंमद गवान अतिशय साध्या स्वभावाचा होता. महंमद गवानने शेवट पर्यत अतिशय साध्या पद्धतीने आपले जीवन व्यथित केले. तो स्वतः साध्या सतरंजीवर झोपत असे. स्वयंपाकासाठी मातीची मडकी वापरीत असे. सेवा या एका शब्दातच महंमद गवानचे सर्व कार्य सांगता येईल.

**विद्वान** – महंमद गवान स्वतः विद्वान होता. प्रशासनात तो अतिशय कुशल होता. बिदरमध्ये त्याचे सुसज्ज असे ग्रंथालय होते. त्या ग्रंथालयामध्ये अनेक ग्रंथ होते. गणित, वाङ्मय या क्षेत्रात त्याचे प्रवीण्य होते. वैद्यकीय क्षेत्रातील त्यास चांगले ज्ञान होते.

**दानशूर** – महंमद गवान दानशूर होता. त्याने सर्व संपत्ती दान करून टाकली. दर शुक्रवारी वेषांतर करून तो लोकास दान–धर्म करीत असे. हे दान राजाने दिले आहे असे तो सर्वांना सांगत असे. स्वतः कधीही तो चैनी विलासामध्ये राहिला नाही. आयुष्यभर तो साध्या पद्धतीने जिवन जगला.

**निष्ठावंत** – निष्ठा या एकाच शब्दात त्याच्या आयुष्याचे सर्व सार आहे. त्याची ही निष्ठा प्रत्येक गोष्टीबद्दल होती. ती निष्ठा सुलतानाबद्दल होती, राज्याबद्दल होती, कारभाराबद्दल होती. एवढेच नव्हेतर त्याने हातात घेतलेल्या प्रत्येक कामाबद्दल होती. बहामनी साम्राज्याच्या इतिहासातील सर्वश्रेष्ठ पुरूषात त्याची गणना केली जाते.

**महंमद गवानच्या पाडावाची कारणे** – महमूद गवानच्या निस्वार्थी नेतृत्वाचा वध झाला ही घटना इतिहासामध्ये अतिशय दुःखद घटना मानली जाते. स्वामीनिष्ठ महमंद गवानचा पाडाव झाला त्याची कारणे पुढील प्रमाणे सांगता येतील.

१. महंमद गवान साधूवृत्तीचा होता. परंतु राजकारणात साधीवृत्ती चालत नाही. त्यामुळे महंमद गवानचा पाडाव झाला.

२. बहामनी सम्राज्यात दक्षिणी विरूद्ध परकीय असे गट निर्माण झाले. त्याच्यावर महंमद गवानला नियंत्रण ठेवता आले नाही.

३. बहामनी राज्याचा शासक व्यसनी व हलक्या कानाचा होता. ही वस्तुस्थिती महंमद गवानने समजून घ्यावयास हवी होती. त्याने खबरदारीचे कोणतेही उपाय योजना केली नाही. त्यामुळे त्याचा पाडाव घडून आला.

४. बहामनी राज्यातील हिंदूची साहनुभुती गवानला मिळाली नाही कारण त्याने विजयनगरवर सतत स्वाऱ्या करून तेथील लुटालुट करण्यात धन्यता मानली. त्यामुळे हिंदूंची मने दुखावली. त्यातुनच त्याचा पाडाव झाला.

**सारांश:** निष्ठा व सेवा या दोन शब्दातच महंमद गवानच्या कार्याचे मुल्यमापन करता येईल. जवळ जवळ ३७ वर्षे महंमद गवानने बहामनी राज्याची प्रामाणिकपणे सेवा केली. शेवटी तो दक्षिणी मुसलमांच्या कारस्थानाचा बळी ठरला. महंमद गवान सरळ स्वभावी होता. दानशूर, विव्दान, उत्तम प्रशासक, शूर योध्दा, निस्वार्थी, स्वाभिमानी या शब्दामध्ये त्याच्या कामगिरीचे मुल्यमापन करावे लागेल. आयुष्यभर तो बहामनी सत्तेच्या वैभव्यासाठी कष्टत राहिला म्हणुन त्याचे नाव बहामनीच्या इतिहासात श्रेष्ठ असेच राहिले.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न:**

अ. योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.

१. महंमद गवान ......... साली भारतात आला.

अ. १४४६ ब. १४६४ क. १४७० ड. १४८६

२. ......... राज्यकर्त्याचे बिदर येथे ग्रंथालय होते.

अ. अल्तमश ब. बल्बन ड. कृष्णदेवराय ड. महंमद गवान

३. इ.स.१४७३ साली महंमद गवानने ......... प्रांतावर स्वारी केली.

अ. गोवा ब. विदर्भ क. कोकण ड. बिदर

४. महंमद गवानने बहामनी साम्राज्याचे ......... प्रांतात विभाजन केले.

अ. सात ब. आठ क. दहा ड. बारा

५. महंमद गवानने कोकण स्वारी ......... साली केली.

अ. १४५० ब. १४५९ क. १४६९ ड. १४७९

ब. एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. महंमद गवान कोणत्या देशाचा रहिवाशी होता.

२. कोणत्या वर्षी महंमद गवानाने बहामनी साम्राज्याचा मुख्य वजीर म्हणुन सुत्रे हाती घेतली.

३. बहामनी राज्यावर माळवा सुलतानाने कोणत्या साली स्वारी केली.

४. नरसिंहराय हा कोणत्या प्रांताचा राजा होता.

५. कोणत्या दिवशी वेषांतर करून महंमद गवान लोकास दान धर्म करीत असे.

**परिभाषिक शब्द**

- अष्ट दिग्गज - प्रसिध्द आठ कवी
- बोग्मलाट - छायानाट्याचा प्रकार
- स्तंभ - खांब
- वीरगळ - वीरमरण प्राप्त करणाऱ्याचे स्मारक
- शस्त्रभांडार - युध्द साहित्य ठेवण्याचे ठिकाण

## २.३ सारांश –

मध्ययुगीन भारताच्या इतिहासात विजयनगरचे साम्राज्य बलाढय व वैभवशाली साम्राज्य म्हणून ओळखले जाते. कृष्णदेवराय विजयनगरचा सर्वश्रेष्ठ राजा होय. कृष्णदेवरायाच्या कारर्किदीमध्ये विजयनगरचे साम्राज्य अति उच्च शिखरावर पोहचले होते. विजनगरच्या दृष्टीने कृष्णदेवरायाची कारर्किद वैभवशाली व भरभराटीची ठरली. कृष्णदेवरायाच्या वैभवसंपन्न राजवटीचे सर्वांनाच आकर्षण होते. विजयनगरची मंदिरे, गोपुरे, राजवाडे, महाल, तटबंदी, जलाशय, सभागृहे सौंदर्यकलेचा अविष्कारच आहेत. मंडप हे विजयनगर मंदिराचे वैशिष्ट होय. मंदिरामध्ये वास्तू व शिल्प यांचा सुंदर मिलाफ आढळतो. विजयनगरची मंदिरे म्हणजे

शिल्पकलेचा व स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना होय. एकंदरीत कृष्णदेवरायाचे सम्राज्य सर्वच आघाडीवर श्रेष्ठ ठरते. बहामनी राज्यामध्ये महंमद गवानचे व्यक्तिमत्व अतिशय वैशिष्टयपूर्ण समजले जाते.एक उत्तम शासनकर्ता म्हणून त्याच्याकडे पाहिले जाते. बहामनी राज्याची संपूर्ण सत्ता त्याच्या हाती एकवटली असताना सुद्धा त्याने कधीही सत्तेचा दुरूपयोग केला नाही. बहामनी राज्याशी एकनिष्ठ राहुन महंमद गवानने राज्य चालविले. महंमद गवानचे स्थान राजा म्हणून नव्हेतर शासनकर्ता म्हणून महत्त्वपूर्ण आहे.

## २.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्नः

**१. दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. कृष्णदेवरायाच्या लष्करी मोहिमांचे सविस्तव वर्णन करा.

२. कृष्णदेवरायाच्या सांस्कृतिक कामगिरीचे वर्णन करा.

३. महंमद गवानचा साम्राज्यविस्तार स्पष्ट करा.

४. महंमद गवानच्या कामगिरीचे मुल्यमापन करा.

**२. टिपा लिहा.**

१. अमूक्त्यमल्यदा

२. कष्णदेवरायाची स्थापत्य कलेतील प्रगती

३. महमंद गवानच्या सुधारणा

## २.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र.१ ची उत्तरे**

अ. १. १३३६ २. तुंगभद्रा व कृष्णा ३. कृष्णदेवराय ४. बोग्मलाट ५. वीरगळ

ब. १. कृष्णदेवराय २. कृष्णदेवराय ३. अनंतशयनगुडी ४. यवनराज्यस्थोनाचार्य ५. १५१३

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र.२ ची उत्तरे**

अ. १. १४४६ २. महंमद गवान ३. गोवा ४. आठ ५. १४६९

ब. १. इराण २. १४५७ ३. १४६७ ४. तेलगणा ५. शुक्रवारी

## २.६ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

१. मोडक बा.प्र, दक्षिणेंतील मुसलमानी राज्याचा इतिहास, पुणे, १८९१.

२. चिटणीस कृ.ना, मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था, पुणे, १९८२.

३. सरदेसाई गो.स, मुसलमानी रियासत, पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई, १९९३.

४. कोलारकर श.गो, मध्ययुगीन भारताचा इतिहास, नागपूर, १९९४.

५. आठवले सदाशिव, विजयनगरचा सम्राट कृष्णदेवराय, पुणे, १९९९.

६. बेंद्रे वा.सी, विजापूरची आदिलशाही, मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई, १९६८.

७. खरे गणेश, महाराष्ट्राचा इतिहास, मध्ययुगीन कालखंड भाग १, मुंबई, २००१.

८. बारगळ बा.सा व ढवळे प्र.कृ, मध्यकालीन भारत, विद्या प्रकाशन, नागपूर, १९६४.

9. Patil M. P, Court Life under theVijayanager Rulers, R. B, Publication, Delhi, 1999.

10. Stein Burton, Vijayanagar, Cambridge, 1989.

12. Shastri K.N, History of South India, Madras, 1966.

13. Heras H.D, Begining of Vijyanagar History, New Delhi, 1980.

❑❑❑

# घटक ३
# प्रशासन आणि अर्थव्यवस्था (दिल्ली सुलतानशाही व विजयनगर)

**अनुक्रमणिका**


३.० उद्दिष्टे

३.२ प्रास्ताविक

३.३ विषय विवेचन

३.३.१ प्रशासन: केंद्रीय आणि प्रांतीक

३.३.२ शेती आणि जमीन महसूल व्यवस्था

३.३.३ उद्योग आणि व्यापार

३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सारांश

३.७ सरावासाठी स्वाध्याय

३.८ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


## ३.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला पुढील गोष्टी स्पष्ट करता येतील –

१. सुलतानशाही व विजयनगरकालीन केंद्रीय आणि प्रांतीय प्रशासन व्यवस्था समजून घेता येईल.

२. सुलतानशाहीकालीन शेती, शेती उत्पादने, जमिनीची प्रतवारी आणि शेतीसाठी केलेल्या उपाययोजना आणि जमीन महसूल व्यवस्था लक्षात येईल.

३. विजयनगरकालीन शेती, शेती उत्पादने, जमिनीची प्रतवारी आणि शेतीसाठी केलेल्या उपाययोजना आणि जमीन महसूल व्यवस्था सांगता येईल.

४. सुलतानशाहीकालीन उद्योग व व्यापार कशा स्वरूपाचा होता हे समजण्यास मदत होईल.

५. विजयनगरकालीन उद्योग व व्यापार कशा स्वरूपाचा होता हे समजून घेता येईल.

## ३.१ प्रास्ताविक :

इ.स. १२०६ ते १५२६ हा कालखंड सुलतानशाहीचा कालखंड मानला जातो. या काळात दिल्लीच्या दिल्लीच्या सिंहासनावर गुलाम, खिलजी, तुघलक, सय्यद, लोदी इत्यादी घराण्यातील सत्ताधीशांचे वर्चस्व होते. त्यांचे प्रशासन अतिशय उत्तम होते. या सुलतानशाहीच्या प्रशासन व्यवस्थेची माहिती विविध साधनातून

मिळते. ही साधने फारसी, अरबी भाषेत लिहिलेली आहे. हसन निझामीचा ताजुल-मासीर, मिनहाज-उस सिराजचा तबकात-ए-नासिरी, झियाउद्दीन बरनीचा तारीख-ए-फिरोजशाही, अमीर खुस्रोचा खजायम-युल-फतुह, शम्स-ए-सिराज अफिफचा तारीख-ए-फिरोजशाही, मोरोक्को प्रवासी इब्नबतुताचा किताब-उल-रेहला, याहा-बिन-अहमदचा तारीख ए- मुबारकशाही या ग्रंथाचा साधन म्हणून उपयोग होतो. त्याचप्रमाणे शासकीय पत्रव्यवहार, मांडलिक व सुभेदार यांचा पत्रव्यवहार व आदेश यांच्याआधारे प्रशासन व्यवस्थेची माहिती मिळते.

१२ व्या शतकाच्या शेवटी उत्तर भारतात तुर्कांनी स्थापन केलेली राज्ये हळूहळू एक शक्तिशाली आणि केंद्रीय स्वरुपात पुढे आले. दक्षिणेतील मदुराई पर्यंत त्यांनी आपल्या राज्याचा विस्तार करून त्यावर आपले नियंत्रण प्रस्थापित केले. सुलतानशाही सत्तेचा ऱ्हास १५ व्या शतकाच्या सुरुवातीला झाला. दिल्ली सुलतानशाहीने येथील राजपूत प्रशासनातील बरेच घटक बदल न करता त्यांनी आपल्या प्रशासनात घेवून त्यांना भारतातील तुर्की प्रशासनाचा भाग बनविले. दिल्ली सुलतानशाही शासन प्रणालीचा प्रभाव १६ व्या शतकात उदयास आलेल्या प्रशासन पद्धतीवर दिसतो. या काळात जमिनीची मोजणी करून तिची प्रतवारी ठरवण्यात आली. त्यामध्ये प्रामुख्याने अल्लाउद्दीन खिलजीचे नाव प्रथम घ्यावे लागते. त्याने आपल्या प्रशासनात आमूलाग्र बदल घडवून आणले. जमीन महसुलाच्या बाबतीतही अनेक बदल केले व राज्याचा महसूल वाढविला.

देशाच्या आर्थिक क्षेत्रात जमीन महसूल, व्यापार व उद्योगधंद्याचे स्थान महत्त्वाचे आहे. मध्ययुगीन भारताची अर्थव्यवस्था मुख्यत्वे करून स्वयंपूर्ण होती. सर्वसाधारण लोकांच्या गरजा कमी होत्या. मुघल काळाच्या तुलनेने सुलतानशाही काळामध्ये विविध प्रकारच्या तयार मालाला कमी मागणी होती. निरनिराळे उद्योगधंदे मध्यम दर्जाचे आणि साध्या प्रकारचे असल्याने कच्च्या मालालाही विशेष मागणी नव्हती. त्यामुळे आपल्याला असे दिसून येते की, या काळात मोठे कारखाने सुरु झाले नाहीत आणि मोठ्या प्रमाणावर उद्योगधंद्याची उभारणी झाली नाही. परंतु या काळात उद्योगधंदे होते. प्रस्तुत प्रकरणात आपण सुलतानशाही व विजयनगर कालीन प्रशासन व अर्थव्यवस्थेचा प्रामुख्याने अभ्यास करणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन :

प्रस्तुत प्रकरणात सुलतानशाही आणि विजयनगर प्रशासन व्यवस्था, शेती व महसूल व्यवस्था कशी होती यावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. याचबरोबर येथील असणारा उद्योग व व्यापार कोणत्या स्थितीत होता याचीही माहिती दिलेली आहे. तत्कालीन प्रशासकीय कार्यक्षमता राबविण्यात आलेली धोरणे कोणत्या स्वरूपात होती. आर्थिक दृष्टिकोनातून राज्याची अवस्था काय होती, याची माहिती समजण्यास मदत होईल. याकाळातील प्रत्येक राज्यकर्त्याने आपापल्या परीने यामध्ये योगदान देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. राज्याची प्रशासकीय आणि अर्थव्यवस्था कार्यक्षम तथा चांगली असेल तर राज्यकर्ते आपली सत्ता जास्त कालपर्यंत टिकवू शकतात.

### ३.२.१ प्रशासन : केंद्रीय आणि प्रांतिक :

**अ) सुलतानशाहीकालीन केंद्रीय व प्रांतिक प्रशासन :**

**१) केंद्रीय प्रशासन :**

सुलतानशाही काळात केंद्रीय प्रशासनाचा प्रमुख सुलतान होता. त्याच्या हातात अनियंत्रित सत्ता होती, म्हणून त्यास लष्करी हुकुमशहा समजण्यात येई. मुस्लिम धर्माचे संरक्षण करणे, त्याचा प्रसार करणे आणि मुस्लिम प्रजेचे कल्याण ही त्याची कर्तव्ये असत. सुलतान हा सर्वोच्च सेनापती आणि न्यायाधीश असे. त्याची इच्छा म्हणजेच कायदा समजण्यात येत असे. या सुलतानाला राज्यकारभारात मदत करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी मंत्रीमंडळ स्थापन करण्यात आले होते. परंतु मंत्र्याच्या सल्ल्याने काम करावे असे बंधन सुलतानावर नव्हते. मंत्र्याची नेमणूक करणे अथवा काढून टाकणे हे सर्वस्वी अधिकार सुलतानाचे होते. सुलतान हा आपल्या सोयीनुसार मंत्रिमंडळाची संख्या वाढवू शकत असे अथवा कमी करू शकत असे. प्रारंभी मंत्रिमंडळात चारच अधिकारी होते परंतु पुढे आवश्यकतेनुसार मंत्र्यांच्या संख्येत वाढ करण्यात आली होती. सुलतानकालीन प्रशासकीय विकास हा प्रामुख्याने १३ व्या शतकाच्या शेवटी झाला. सुलतानकालीन प्रशासनातील मंत्रालये / खाती व प्रशासनाच्या सोयीकरिता राज्याचे केलेले विभाग पुढीलप्रमाणे होते.

**२) सुलतान आणि त्याची कार्ये :**

भारतात राज्य स्थापन करण्यापूर्वी मुस्लिम राज्यकर्त्यांनी सुलतान ही पदवी धरण केली होती. सुलतानाचा अनेक अर्थाने उल्लेख केला जातो. कुरणामध्ये सुलतानचा उल्लेख भाववाचक स्वरुपात केलेला आहे. खालीपाचे विभाजन झाल्यावर अनेक प्रांतात स्वातंत्र्य घोषित केले. तेथील प्रांत प्रमुखांनी सुलतान ही उपाधी धारण केली. सुलतान हा स्वतःच्या प्रदेशात प्रमुख, सर्वोच्च, सेन्नाध्यक्ष, विधीनिर्माता, मुख्य न्यायाधीश समजत होता. राज्याची सर्व शक्ती त्याच्या हातात होती. त्यामुळे तो अनियंत्रित सत्ताधारी होता. भारतातील सुलतानांनी स्वतःला सच्चा मुसलमान व बगदादच्या अब्बासी खालीफाचा प्रतिनिधी म्हणून घोषित केले होते. तसेच त्यांनी खुतबामध्ये बगदादच्या अब्बासी खालीफाच्या नावाचा समावेश केला. परंतु याचा अर्थ असा नाही की खलिफा हा भारतातील प्रशासनाचा प्रमुख होता. सुलतान हे खालीफाचे प्रतिनिधी म्हणून स्वतःला इस्लामी जगताचे आपण एक अंग आहोत हे दाखविण्याचा प्रयत्न करीत असत.

मुस्लिम शासकामध्ये वारसाचा कोणताही असा स्पष्ट नियम विकसित झालेला नव्हता. इस्लामी कायद्यामध्ये राज्याचा शासक निवडण्याची प्रथा होती. परंतु व्यावहारिकदृष्ट्या जो शासक यशस्वी असेल, त्याच्याच मुलाला उत्तराधिकारी म्हणून नेमले जात असे. पण सुलतानशाही मध्ये उत्तराधिकारी म्हणून मोठ्या मुलालाच बसविले जात होते असे नाही तर कोणत्याही मुलाला गादीवर बसविले जाई. उदा. अल्तमशने आपला उत्तराधिकारी म्हणून आपल्या मुलाला न बसविता मुलीला गादीवर बसविले. आपला वारस आपणच नेमण्याची पध्दत रूढ होती. सुलतान बद्दल कुराणात कल्पना अशी आहे की, मुस्लिमांचा राजा एकच असतो

आणि तो म्हणजे ईश्वर. सुलतान हा ईश्वराचा प्रतिनिधी ह्या नात्याने तो पृथ्वीतलावर राज्य करीत असे. त्यामुळे अनेक सुलतानांनी ईश्वराचा प्रतिनिधी म्हणून राज्य केले. त्यामुळे त्यांना अनियंत्रित सत्ता प्राप्त झाली.

सुलतानशाही मध्ये सुलतानाचे स्थान हे महत्वपूर्ण मानले जात होते. तो राज्यव्यवस्था, कायदाव्यवस्था आणि सैन्यव्यवस्थेचा प्रमुख असे. तो निरंकुश शासक असल्याने राज्याची संपूर्ण शक्ती त्याच्या हातात केंद्रित झाली होती. कायदा आणि न्यायदान करणे हे त्याचे उत्तरदायित्व होते. न्याय व्यवस्थेमध्ये न्यायाधीशांची नेमणूक तो करत असे. न्यायदान क्षेत्रातील सर्वोच्च अधिकारी होता. त्यांना काझीची मदत घ्यावी लागत असे. बलबन हा पहिला सुलतान होता कि, ज्याने न्यायदानाकडे प्रथम लक्ष दिले. इब्न बतुताच्या मते महमद तुघलक आठवड्यातून दोन दिवस दिवाण-ए-खास मध्ये न्यायालय भरवत असे. सुलतान काळात राज्यातील कोणत्याही अधिकाऱ्यांच्या अन्यायाच्या विरोधात सरळ अपील सुलतानाकडे करता येत असे. सुलतान हा मुस्लिम उलेमा, मौलाना यांचा आदर करत असे. सैन्याची मदत मिळावी या हेतूने 'शरा' चे पालन करत असे. राज्यातील व्यावहारिक प्रश्न मजलिस-ए-आम किंवा मजलिस-ए- खलबतच्या समोर ठेवत असे. या दोन्ही सभा म्हणजे सुलतानला माहिती व सल्ला देणाऱ्या लोकांच्या सभा होत्या. मुस्लिम कायदा शास्त्रानुसार सुलतानाचे कार्य पुढीलप्रमाणे होते. १. इस्लामाचे रक्षण करणे २. लोकांचे वाद मिटविणे ३. प्रदेशाचे संरक्षण करणे ४. राज्याचे बाह्य आक्रमणापासून संरक्षण करणे ५. फौजदारी कायदे लागू करणे ६. सर्व कर एकत्र करणे ७. सार्वजनिक कोषातून लोकांना भत्ता देणे ८. न्याय व सार्वजनिक कार्य करण्यास मदत करणारा अधिकारी नेमणूक करणे.

**४) केंद्रीय प्रशासनाची रचना :**

**अ) मंत्रिमंडळ :**

सुलतानाला राज्यकारभारात मदत करण्यासाठी मंत्रिमंडळ असे. गुलाम घराण्याच्या काळात वजीर, आरीज-ए-मामलिक, दिवाण-ए-इन्शा, दिवाण-ए-रिसालत हे चारच मंत्री होते. कालांतराने या मंत्र्यांच्या संख्येत वाढ झाली. बलबनने मंत्र्यांमध्ये कार्याचे विभाजन केले.

**१. वजीर किंवा दिवाण-ए-वजारत :**

सुलतान काळात वजीराचे पद स्थायी स्वरूपाचे होतो. तो राज्याचा प्रधानमंत्री व अर्थखात्याचा प्रमुख होता. त्याच्या कार्यालयास दिवाण-ए-वजारत असे म्हणत. राज्याच्या इतर विभागावर नियंत्रण ठेवणे, कर एकत्र करणे, अधिकारी व कर्मचार्यांची नेमणूक करणे, कारख्यान्यातील वस्तूंची नोंद ठेवणे, अधिकार्यांचा पगार देणे, सार्वजनिक प्रश्नांसंदर्भात निर्णय घेणे, व्यापार व्यवस्थित करणे इत्यादी जबाबदारी त्याच्याकडे होती. सुलतानाच्या गैरहजेरीत राज्याचा सर्व पत्रव्यवहार पाहणे, इतर खात्यावर नियंत्रण ठेवणे इ. कामे सुद्धा त्याला करावी लागत असत. सुलतान आणि प्रजा यांना जोडणारा दुवा असे. सुलतान प्रजेच्या भावना, त्यांच्या आकांक्षा वजीरा मार्फतच समजत असत. राज्याच्या जमाखर्चावर लक्ष ठेवत असे. याच्या मदतीला नायब वझीर असे तो राज्याच्या जमाखर्च ठेवण्यात वजीराला मदत करीत असे. नायब वजीराच्या मदतीला मुशरीफ-ए-मुमालिक (महालेखाकार) व मुस्तौफी-ए-मुमालिक (महालेखा परीक्षक) हे दोन अधिकारी

असत. मुशरीफ–ए–मुमालिक (महालेखाकार) हा प्रांत आणि इतर विभागातील प्राप्त हिशोबाचा लेखाजोखा ठेवत असे तर मुस्तौफी–ए–मुमालिक (महालेखा परीक्षक) हा या हिशोबाची तपासणी करत असे.

**२. दिवाण–ए–अरिज (सैन्य मंत्रालय) :**

राज्याच्या सैन्य विभागाला दिवाण–ए–अरिज असे म्हणतात. दिवाण–ए–वजारत नंतर महत्वाचे खाते म्हणजे दिवाण–ए–अरिज होय. याचा प्रमुख अरिझ–ए–मुमालिक असे. हा सैन्य भरती करणे, सैनिकांची हजेरी ठेवणे, सैन्याच्या परेड घडवून आणणे, सैन्याची शिस्त सांभाळणे, त्यांचा पगार देणे, अन्न पुरवठा करणे इ. कामे करावी लागत असत.

**३. दिवाण–ए–इन्शा (पत्रव्यवहार खाते) :**

सुलतान काळात दिवाण–ए–इन्शा हा राज्याचा पत्र विभाग होता. त्याच्या प्रमुखास दरबारे खास/ हुबीर असे म्हणतात. या खात्याला राजप्रमुखाचा पत्रव्यवहार पहावा लागत असे. या कार्यालयात अनेक सचिव असे त्यांना डबीर म्हणतात. या कामामध्ये त्यास पत्रलेखनात प्राविण्य असलेले अनेक लेखक मदत करीत असत. परराज्याचा पत्रव्यवहार, सरकारी आज्ञापत्रे आणि इतर पत्रव्यवहार या खात्यास पहावा लागत असे.

**४. दिवाण–ए–रसालत (परराष्ट्र मंत्रालय) :**

या विभागाबाबत इतिहासकारांच्यात मतभेद आहेत. प्रो. हबीबुल्लाच्या मते, परदेशी बाबींच्या संदर्भात हा विभाग होता. परदेशी पत्रव्यवहार, राजदूत पाठवणे व आलेल्या राजदूतांचे स्वागत करणे हे काम होते. या खात्यामार्फत परदेशात वकील पाठविणे किंवा आलेल्या वकिलांचे स्वागत करणे त्याच बरोबर परदेशी वकिलांबरोबर पत्रव्यवहार ठेवणे इत्यादी कामे या खात्यास करावी लागत असे. थोडक्यात हे मंत्रालय म्हणजे आधुनिक काळातील परराष्ट्र खाते होय.

**५. सद्र–उस–सदुर (धर्मादाय खाते) :**

सुलतान काळात सद्र–उस–सदुर हा धार्मिक विभाग असून त्याचा प्रमुख काझी होता. या मंत्रालयाकडे धार्मिक संस्था, शाळा, गोरगरीब, विद्वान पंडित यांना आर्थिक सहाय्य करणे हे काम या खात्यास करावे लागत असे.

**६. दिवाण–ए–काझा (न्याय मंत्रालय) :**

सुलतान काळात न्यायदान करण्यासाठी स्वतंत्र विभाग असे त्याला दिवाण–ए–काझा असे म्हणत, त्याचा प्रमुख काझी असे. न्यायव्यवस्थेचे तो निरीक्षण करत असे. तो न्यायालय भरवत असे. न्यायदानाचे काम तो अतिशय चोखपणे बजावीत असे. मात्र न्यायदानाचा अंतिम निर्णय सुलतान हाच घेत असे.

**५) इतर खाती :**

**१. दिवाण–ए–अमिर कोही (कृषी मंत्रालय)**

हे खाते सुलतान मुहंम्मद तुघलक याच्या काळात निर्माण झाले. त्याने आपल्या कारकीर्दीत शेतीला उपयुक्त असेच निर्णय घेतले होते. या खात्यावर प्रशासनातील मुख्य वजीर हा नियंत्रण ठेवत असे. मुहंम्मद तुघलकाने आपल्या राज्यातील शेतीयोग्य नसलेली जमीन ओलीताखाली आणण्याचा प्रयत्न केला. शेती

करिता अनेक प्रकारची अनुदाने देण्यात आली होती. त्याकरिता मुहंम्मद तुघलकाने शेतकऱ्यांना बी बियाणे, अवजारे, कर्ज पुरवठा इत्यादी गोष्टी देऊ केल्या होत्या. त्यातून शेतकऱ्यांचा विकास साधण्याचा प्रयत्न त्याने केला होता. त्यामुळे हा विभाग शेतीचा विकास करण्याच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा मानला जात होता.

**२. दिवाण–ए–बरिद (गुप्तहेर खाते) :**

या खात्याचा प्रमुख बरिद–ए–मुमालिक हा होता. सुलतान हा आपल्या मर्जीतील आणि विश्वासातील व्यक्तीची नेमणूक या खात्यावरती प्रमुख म्हणून करीत असे. गुप्तहेर खाते हे राज्यातील आणि राज्याबाहेरील गुप्त बातम्या सुलताना पर्यंत पोहोचवण्याचे काम करीत होता. यामुळे सुलतानाला बाह्य आक्रमणापासून आणि अंतर्गत बंडाळी पासून सावध होता येत असे. यादृष्टीने हे खाते महत्त्वाचे मानले जात होते.

**३. मजलीस–ए–खलबत (सल्लागार मंडळ) :**

सुलतान काळात हे खाते राजाला अनेक महत्वाच्या निर्णयांमध्ये सल्ला देण्याचे काम करीत होते. या सल्लागार मंडळात प्रशासनातील महत्त्वाच्या व्यक्तींचाच समावेश केला जात होता. यामध्ये अनेक विद्वान मंडळी असत. राज्याच्या हिताच्या दृष्टिकोनातून ही विद्वान मंडळी राजाला सल्ला देण्याचे काम करीत असत. सुलतान हा अनियंत्रित सत्ताधीश असल्याने त्यांचा सल्ला मान्य करण्याचे बंधन त्याच्यावर नसे.

**६. शाही प्रबंधक :**

हा सुलतानाच्या गृह विभागाचा प्रमुख असे. त्याच्या नियंत्रणाखाली वकील–ए–दर, अमीर–ए–हजीउब, नाकीब, सरंजामदार, बरिद–ए–मुमालिक, दिवाण–ए–बंदगाह इ. अधिकारी असत. त्याचे कार्य पुढीलप्रमाणे होते.

**१. वकील–ए–दर (राजशिष्टाचार विभाग) :**

सुलतान काळात हा विभाग शाही महल आणि सुलतान यांच्या व्यक्तिगत सेवा करत होता. या विभागांमध्ये अत्यंत विश्वससनीय अशा व्यक्तीचीच नेमणूक करण्यात येत असे. या विभागाच्या माध्यमातून राजदरबारशी संबंधित आदेश प्रसारित करणे आणि कार्यान्वित करणे ही महत्त्वाची जबाबदारी या विभागाला पार पाडावी लागत होती. या विभागाच्या बरोबरीचा विभाग म्हणजे आमिर–ए–हाजीब हा अधिकारी दरबारी शिष्टाचार विषयक नियम लागू करत असे. हा अधिकारी सुलतान आणि निम्न श्रेणीचे पदाधिकारी अथवा जनता यांच्यामध्ये मध्यस्थी करण्याचे काम तो करत होता. त्यामुळे हा अधिकारी कधीकधी वजीरा पेक्षाही वरचढ ठरत असे.

**२. अमीर–ए–हाजिब :**

अमीर–ए–हाजिब हा वकील–ए–दरच्या नंतरचा दुसरा अधिकारी होय. त्यालाच अमीर–ए–हाजीब–ए–बारबक असे म्हणतात. हा दरबारातील विधिनायक होता. दरबारातील उत्सवांची प्रतिष्ठा राखण्याची

जबादारी याच्याकडे असे. सुलतान अनुपस्थित असेल तेंव्हा नायब बारबक हा राजधानीमध्ये नायब म्हणून काम करत असे.

### ३. नकीब :

दरबारी समारंभामध्ये नकीब हा अधिकारी असे. तो राजकीय शोभायात्रेच्या पुढे-पुढे चालत असे. त्यांच्या प्रमुखाला नकीब-उल-नकबा म्हणत. तो दरबारच्या मुख्य दरवाज्याच्या उंच चबुतरेवर बसलेला असे.

### ४. सरजांदार :

हा सुलतानाच्या अंगरक्षकांचा प्रमुख असे. डाव्या बाजूच्या अंगरक्षकाला सरजांदार-ए-मेमन तर उजव्या बाजूला असलेल्या अंगरक्षकाला सरजांदार-ए-मेसर म्हणत. बलबनने सिस्तानी सैनिकांची या पदावर नियुक्ती केले होती.

### ५. दिवाण-ए-बंदगाह :

फिरोजशहा तुघलकच्या काळात गुलामांची व्यवस्था करण्याच्या हेतूने हा विभाग सुरु केला. त्याचा प्रमुख अशहब ए-दिवाण-ए-ए बंदगान होय. याच्याकडे गुलामाची व्यवस्था करणे ही प्रमुख जबाबदारी होती.

### ६. इतर विभाग :

सुलतानकाळात वरील विभाग, मंत्री यांच्याव्यतिरिक्त केंद्रीय प्रशासनामध्ये वेगवेगळे विभाग कार्यरत होते. त्यामध्ये आमीर-ए-आखुर (घोड्यांचा विभाग), शहाना-ए-पील (हत्ती विभाग), आमिर-ए-मजलीस (सल्लागार मंडळ विभाग), दिवाण-ए-मुस्तखारीज (करवसुली खाते), अमिर-ए-ए आखुर (पागा प्रमुख), मीर-ए-इमारत (मुख्य इंजिनीनियर), हाजीब (तहप्रबंधक), वकील-ए-दार (किल्ल्या बाळगणारा), शेख-अल-इस्लाम (मुख्यधर्मधिश) यासारख्या मंत्री व विभागाच्या माध्यमातून केंद्रीय प्रशासनाचा कारभार पाहिला जात होता.

### ५) प्रांतीय प्रशासन :

सुलतानाची प्रारंभीची वर्षे हे साम्राज्य विस्तार व सुरक्षा या प्रश्नांची सोडवणूक करण्यात गेली. त्यामुळे संपूर्ण राज्याचे त्यांनी विभाजन इक्तामध्ये केले. गुलाम वंशाच्या काळात प्रांतीय शासन व्यवस्थेचा साचा साधा सुधा बनवला त्याचा प्रमुख अधिकारी सैनिकी होता. अल्लाउद्दिन खिलजीच्या काळात इक्ता बंद करून त्या ऐवजी सुबा तयार करण्यात आला. प्रारंभीच्या काळात इक्ता म्हणजे नंतरच्या काळातील सुभा किंवा प्रांत होय. खिलजीच्या काळात ११ तर महंमद तुघलकाच्या काळात २३ प्रांताची संख्या होती. या इक्तादारांचे तीन प्रकार केले होते.

**१. इमारत–ए–खास :**

या प्रांतांना अमर्यादित अधिकार होते. त्यांना राज्यापालाचा दर्जा होता. या इक्तादाराचे कार्य म्हणजे सैनिकी कामकाज पाहणे. मक्का यात्रेची तयारी करणे. शुक्रवार व ईदच्या सार्वजनिक नमाजचे नेतृत्व करणे. लढाईतून मिळालेल्या संपत्तीची वाटणी सैनिक व सरकारी कोषात १/५ इतकी करणे. सार्वजनिक सुरक्षा राखणे. कर बसवणे व कर गोळा करणे इ. अधिकार होते.

**२. इमारत–ए–आम :**

या वर्गातील इक्तादारांना मर्यादित अधिकार होते. केवळ सैनिकांची देखरेख करणे, बंडवाले व गुन्हेगारांना शिक्षा करणे. गृहसुरक्षा ठेवणे, न्यायदान, नमाजाचे नेतृत्व, महसूल अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याचे अधिकार होता.

**३. इमारत–ए–इस्तिला :**

वरील दोन इक्तदार शिवाय विधीशास्त्रांचा तिसरा इक्तदार होता. एक प्रकारे इस्लामचा अध्यात्मिक नेता असे. खालीपाच्या सम्मान व वैभवाची सुरक्षितता राखणे, सार्वजनिक स्वरुपात खालीपाच्या प्रती समर्पण प्रदर्शन करणे. काझी व इमामचा सन्मान राखणे.

प्रांतीय प्रशासनाच्या प्रमुखास 'वली' अथवा 'मुक्ती' असे म्हणत. तो प्रांतातील शांतता, सुव्यवस्था राखणे तसेच सैन्यांचा बंदोबस्त करणे, कराची वसुली करणे आणि न्याय व्यवस्था सांभाळणे हे त्याच्या अधिकारक्षेत्रात येत होते. तो प्रांतीय शासक या नात्याने विस्तृत अधिकाराचा उपयोग करून घेत होता. आर्थिक बाबतीमध्ये म्हणजेच महसूल अथवा कर वसूल करण्यासाठी साहिब–ए–दिवाण अथवा ख्वाजा या अधिकाऱ्यांची मदत घेत असे. ख्वाजा या अधिकाऱ्यांस मदत करण्यासाठी मुतसरीफ आणि कारकून या दोन अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. या व्यतिरिक्त प्रांतीय प्रशासनामध्ये प्रांतीय वजीर आणि प्रांतीय अरिज व काझी हे होते.

**सुलतान काळात प्रांताचे वर्गीकरण :**

सुलतान काळात राज्यविस्तार प्रक्रियेत प्रांताचे वर्गीकरण वेगवेगळ्या कालखंडामध्ये वेगवेगळ्या स्वरुपात झाले. बलबन, अल्लाउद्दिन खिलजी यांनी राज्यविस्तार करून नवे प्रांत निर्माण केले. मुबारकशहा खिलजीने दक्षिण राज्यावर प्रभाव टाकण्यासाठी मुस्लिम गव्हर्नरची नेमणूक करण्यास सुरुवात केली. सुलतान काळात प्रशासन व्यवस्थेसाठी तीन प्रकारचे प्रदेश होते. या तीन प्रकारच्या प्रदेशातून तीन प्रांताचा जन्म झाला.

**१. मुलतान, पूर्व पंजाब किंवा दोआब प्रदेश :**

हा प्रांत लहान असून सुलतानाचे नियंत्रण अधिक होते. या प्रांताच्या गव्हर्नरला वली किंवा मुक्ती म्हणत असे. हे इमारत–ए–आमचे अधिकार उपभोगत असे.

२. **गुजरात, माळवा, बिहार व बंगाल प्रदेश :**

हा प्रांत केंद्रापासून दूर सुलतानच्या व्यक्तिगत नियंत्रणापासून मुक्त होता. या प्रांताच्या गव्हर्नरला नायब म्हणत असे. हे इमारत–इ–खासचे अधिकार उपभोगत असे.

३. **करद राज्य :**

हा प्रांत नाममात्र सुलतानाच्या नियंत्रणाखाली होता. हे स्वायत्तराज्य असून सुलतानाला कर देत असे.

③ **प्रांतीय अधिकारी :**

१. **गव्हर्नर/मुफ्ती/राज्यपाल :**

सुलतान काळात प्रांताचा प्रमुख गव्हर्नर मुक्ती असे. त्याची नेमणूक केंद्र सरकारकडून होत असे. प्रांताचे लोक त्याच्या विरुद्ध सुलतानाकडे तक्रार करत असे. गव्हर्नरवर सर्व नियंत्रण सुलतानाचे असे. हा प्रांताच्या राजधानीमध्ये रहात असे. त्याच्या अनुपस्थितीत नायब काम पाहत होता. गव्हर्नरचे वेतन एकूण उत्पादनाच्या १/२० भाग कमिशन म्हणून दिले जाई. आपल्या प्रांतात शांतता व सुव्यवस्था राखणे, सुलतानाला लष्कर पुरवणे, युद्धाच्यावेळी सैन्य पाठवणे, प्रजेकडून कर वसूल करणे इ. जबादारी पार पडत असे. बलबन व अल्लाउद्दिन खिलजी यांनी गव्हर्नरवर पूर्ण नियंत्रण ठेवेले होते. पण महंमद तुघलक व फिरोजशहा तुघलकाच्या काळात गव्हर्नर स्वतंत्रपणे वागत असे.

२. **साहिम–ए–दिवाण :**

हा प्रांताचा वित्त विभागाचा अधिकारी होता. सुलतान, वजिराच्या शिफारशीनुसार त्याची नेमणूक होत असे. त्याच्या मदतीसाठी मुस्तरिफ, कारकून होते. अर्थव्यवस्था पाहणे, जमा–खर्च तयार करणे व केंद्राला पाठवणे इ. कामे करावी लागत असे.

३. **ख्वाजा :**

याची नियुक्ती वजिराच्या शिफारशीनुसार इक्तामध्ये केली जात असे. जो प्रदेश इक्ता मध्ये गणला जात नसे त्या प्रदेशात ख्वाजाची नियुक्ती केली जात. इक्तामध्ये त्याची नियुक्ती म्हणजे गव्हर्नरच्या अधिकारावर एक प्रकारे नियंत्रण होते. या प्रदेशातील कराचा हिशोब ठेवणे, कर केंद्रीय कोषागारात जमा करणे इ. कार्ये करावी लागत होती.

६) **स्थानिक प्रशासन :**

सुलतानशाही काळात राज्यकारभाराच्या सोयीच्या दृष्टीने प्रांताची निरनिराळ्या जिल्ह्यात विभागणी करण्यात आली होती. त्यास 'शिक' या नावाने संबोधले जात होते. याचा प्रमुख 'शिकदार' हा असे. तर जिल्ह्याचे विभाजन' परगणा' म्हणजेच तालुक्यामध्ये करण्यात आले होते. या परगण्यामध्ये 'मुनसिफ' आणि 'चौधरी' हे अधिकारी होते. जे तालुक्याचा कारभार सांभाळत होते. तालुक्याचे विभाजन 'ग्राम' अथवा 'खेडे' यामध्ये करण्यात आले होते या ग्रामाचा प्रमुख मुकादम हा होता तो संपूर्ण ग्रामाचा कारभार पहात

असे. मोठ्या शहरास ‘नगर’ म्हणत असत. नगराचा कारभार पाहण्यासाठी कोतवाल नावाचा अधिकारी असे. त्याच्या मदतीसाठी प्रशासकीय नोकरवर्ग असे. नगराचे प्रशासन, सुव्यवस्था इ. कामे करावी लागत असे. अशाप्रकारे सुलतानशाही काळातील केंद्रीय प्रशासनाचे स्वरूप दिसून येते. या दिल्ली सुलतानशाही काळातील प्रशासनाचा प्रभाव पुढील काळात आलेल्या मोगल साम्राज्यावर पडल्याचे दिसून येते. यावरून हे प्रशासन किती प्रभावशाली होते हे स्पष्ट होते.

**ब) विजयनगर कालीन केंद्रीय व प्रांतिक प्रशासन :**

दक्षिण भारतातील हिंदू साम्राज्याचे वैभव म्हणून विजयनगर साम्राज्याकडे पाहिले जाते. दक्षिण भारतातील हिंदु राज्यांचा पाडाव करून तेथे मुस्लिम सत्ता स्थापन करणारा अल्लाउद्दीन खिलजी हा पहिला मुस्लिम होय. तुघलक सुलतानांच्या कारकिर्दीत ही अशा प्रकारचे प्रयत्न होवून दक्षिणेतील वारंगळ, द्वारसमुद्र आणि मदुराई ही हिंदू राज्ये खालसा करून सुलतानशाहीमध्ये समाविष्ट करण्यात आली. मुहंम्मद तुघलकाच्या काळात साम्राज्याचे विघटन सुरू झाले. या राजकीय अस्थिरतेचा फायदा घेऊन दक्षिणेत हरिहर व बुक्क यांनी इ.स. १३३६ मध्ये विजयनगरच्या राज्याची स्थापना केली. विजयनगरच्या स्थापनेविषयी अनेक मतप्रवाह प्रचलित असले तरी रॉबर्ट सेवेल याने Forgotten Empire या ग्रंथात सात प्रकारच्या पारंपारिक ऐतिहासिक पुराव्यांचा आधार देवून विजयनगर साम्राज्याच्या उदयाची माहिती दिली आहे. पुढील काळात विजयनगरच्या सत्ताधीशांनी दिलेल्या योगदानामुळे राज्याची भरभराट होत गेली. आणि या राज्याचा विस्तार कन्याकुमारीपासून बेळगाव पर्यंत झाला.

इटालियन प्रवासी निकोलो कोंटी याने १४२० मध्ये विजयनगरला भेट दिली होती. त्याने केलेल्या वर्णनावरून विजयनगरचे साम्राज्य हे बलाढ्य व ऐश्वर्यसंपन्न हिंदू साम्राज्य होते. विजयनगर येथे संगम वंश, शाल्व वंश, तुल्व वंश आणि अरविदु वंश या चार वंशांनी साधारणपणे पावणे तीनशे वर्ष राज्य केले. अनेक कर्तबगार व पराक्रमी राजे या सत्तेवर येऊन गेले. त्यामुळे विजयनगरची भरभराट झाली. दक्षिणेत हिंदू धर्म आणि संस्कृती यांचे पुनरुज्जीवन व संवर्धन करण्याचे महत्त्वाचे कार्य या साम्राज्याने केले. येथील राज्यकर्त्यांनी लष्करी सामर्थ्या बरोबरच आदर्श शासनव्यवस्था निर्माण करण्याचे प्रयत्न केले. येथील शासन व्यवस्था लोकाभिमुख व कल्याणकारी होती.

मध्ययुगीन भारतातील शासन व्यवस्थेचा अभ्यास करताना सुलतान कालखंडातील प्रशासन व्यवस्थेबरोबरच विजयनगरच्या प्रशासन व्यवस्थेचा आपणास विचार करावा लागेल. विजयनगर साम्राज्यात विविध सत्ताधिशाच्या कारकिर्दीत लिहिलेले ग्रंथ, शिलालेख व नाणी तसेच हंपी येथील उत्खननातून मिळालेले अवशेष व भारतात आलेला इटालियन प्रवासी निकोलो कोंटी, इराणच्या शहाचा वकील अब्दुल रजाक, डोमिंगो पेस हा पोर्तुगीज प्रवासी, याशिवाय बार्बोसा, पियट्रो डेल्ला व्हेल्ले या प्रवाशांचे वृत्तांत इत्यादी विविध साधनांमधील माहितीवरून विजयनगरच्या प्रशासन व्यवस्थेची माहिती मिळविणे शक्य होते.

**अ) केंद्रीय प्रशासन :**

विजयनगर साम्राज्य हे मुलत:च मुस्लिम प्रभावापासून दक्षिणेतील संस्कृती, धर्म, राजकीय प्रणाली सुरक्षित ठेवण्याच्या उद्देशाने निर्माण झाले होते. सन १३३६ ते १५६५ या काळात दक्षिण भारतात विजयनगर

हे भारतीय संस्कृतीचे एक प्रमुख केंद्र बनले होते. विजयनगर येथील सत्ताधीशांनी प्रजेच्या कल्याणकारी कार्याकडे व राज्यकारभाराकडे विशेष लक्ष दिले. हिंदू धर्म व परंपरांचे व्यवस्थितपणे पालन करून ते राज्यकारभार करीत होते. या राज्यकारभारात राजाला मदत करण्यासाठी मंत्रीपरिषद होती. या मंत्रीपरिषदेत निरनिराळ्या जाती व जमातीचे प्रतिनिधी घेतलेले होते. प्रधान सेनापती व कोषाध्यक्ष यांना मंत्री परिषदेत व राज्यकारभारात महत्त्वाचे स्थान होते. राजाला सल्ला देण्यासाठी विद्वान ब्राह्मण, साहित्यिक, कवी व सेनापती यांची एक समिती असे. राजा हा या समितीच्या सल्ल्यानेच महत्त्वाचे निर्णय घेत असे.त्यांच्या दरबारात त्यांनी धर्म, संस्कृती, साहित्य, कला, स्थापत्य इत्यादींना आश्रय दिला होता. त्यादृष्टीने आपणास विजयनगरच्या प्रशासन व्यवस्थेचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

**१. शासन स्वरूप :**

विजयनगरच्या प्रशासनाचे स्वरूप हे प्रामुख्याने मुस्लिम सत्तेच्या प्रभावापासून विजयनगरचे संरक्षण करण्यास शक्तिशाली लष्करी व्यवस्था निर्माण करणे हे होते. विजयानगरचे राज्य हे धर्मनिष्ठ होते आणि पुरोहित वर्गाच्या सल्ल्यानुसार राजकीय निर्णय घेतले जात असत. त्यांनी आपल्या प्राशासनात स्थिर राज्यव्यवस्था, शांती, कायदा सुव्यवस्था निर्माण केली.

**२. राजपद :**

राजपद किंवा राजपदाच्या सिद्धांताबद्दल विजयनगरच्या राज्यकर्त्यांच्या कल्पना फारच वरच्या दर्जाच्या होत्या. कृष्णदेवराय याने राज्यव्यवस्थेवर लिहिलेल्या एका पुस्तकात राजाला असा सल्ला दिला आहे कि, 'तुम्हाला जे आढळून येईल किंवा तुमच्या जे ऐकण्यात येईल, त्याकडे दुर्लक्ष न करता अतिशय काळजीपूर्वक आणि तुमच्या शक्तीनुसार तुम्ही सज्जनांच्या रक्षणाचे आणि दुर्जनांच्याही रक्षणाचे काम पार पाडले पाहिजे.' त्याचबरोबर कृष्णदेवरायाने राजाला कर वसुलीबाबत असाही सल्ला दिला की, 'प्रजेकडून वसूल केल्या जाणाऱ्या कराचे प्रमाण उचित असावे आणि ते जाचक नसावे.' यावरुन विजयनगरकालीन राजपद सिद्धांत स्पष्ट होतो.

**३. राजा :**

राजा हा सर्व प्रशासनाचा प्रमुख असून केंद्रीय प्रशासनव्यवस्था ही सरंजामशाही संघटनेवर अवलंबून होती. राजा साम्राज्यातील सर्वश्रेष्ठ अधिपती होता. या राजाला 'राया' अथवा 'नरेश' या नावाने संबोधले जाई. राजा हा राज्य आणि प्रशासन यामधील केंद्रबिंदू होता. प्राचीन भारतीय परंपरेनुसार राज्य 'सप्तांग विचारधारेवर' आधारलेले होते. राजा हा प्राचीन राज्याभिषेक पद्धतीचा अवलंब करीत होता. राजाची निवड करण्यामध्ये मंत्री आणि नायक याची महत्त्वपूर्ण भूमिका असे. तसेच राज्यकारभाराची सर्व सूत्रे राजाच्या हाती होती. कायदा, कार्यकारी व न्याय या प्रशासनाच्या तिन्ही शाखांचा तो प्रमुख सत्ताधीश होता. राजा हा प्रमुख सत्ताधीश असला तरी धर्माची बंधने पाळून त्याला आपला राज्यकारभार करावा लागत असे. विजयनगर मधील राजानी अनियंत्रित स्वरुपाची राजेशाही निर्माण होऊ दिली नाही. म्हणजेच तो जुलमी हुकूमशहा बनला नाही. राज्य संवर्धन करणे, अंतर्गत शांतता व सुव्यवस्था राखणे इत्यादी कर्तव्य राजाला पार पाडावी लागत

होती. कृष्णदेवराय यांनी लिहिलेल्या 'अमुक्तमाल्यादा' या ग्रंथामध्ये राजाची कर्तव्ये, स्वराज्य कारभाराविषयीचे आपले विचार सांगितले आहेत. उत्तराधिकारी हे ज्येष्ठ मुलाला केले जात असे. परंतु क्वचित प्रसंगी जर राजाला (पुत्र) नसेल तर एखाद्या योग्य व्यक्तीस युवराज पदावर बसविले जात असे. त्यामुळे गादीसाठी संघर्ष झाल्याचे विजयनगर साम्राज्यात दिसून येत नाही.

**४. राज–परिषद :**

राजाच्या सत्तेला नियंत्रित करण्यामध्ये महत्वाची भूमिका बजावत असे. राजा हा महत्वपूर्ण घडामोडीबद्दल राज – परिषदेचा सल्ला घेत असे. हीच परिषद राजाचा अभिषेक करत असे आणि देशाचे प्रशासनही करीत असे.

**५. राजदरबार :**

विजयनगरच्या राजांनी आपला भव्य राजदरबार निर्माण केला होता आणि त्याच्या व्यवस्थेसाठी अमाप पैसा खर्च केला जात होता. राज्याच्या वैभवशाली व भरभराटीचे प्रतिक म्हणजे राजाचा दरबार असे. राजदरबारामध्ये सरदार, विद्वान, पुरोहित, ज्योतिष, संगीतकार व इतर कलाकारांना प्रवेश असे. राजदरबाराद्वारे मोठ्या थाटा–माटात व उधळ पट्टीत अनेक प्रकारचे सण उत्सव साजरे केले जात असत. राजदरबाराद्वारे वर्षामध्ये नूतन वर्ष, दीपावली, महानवमी आणि होळी हे प्रमुख चार प्रकारचे सण–उत्सव साजरे करत असत.

**६. अन्य परिषद :**

या परिषदे व्यतिरिक्त राजाला सल्ला देण्यासाठी इतर परिषद अस्तित्वात होती. या परिषदेमध्ये प्रांतीय सुभेदार, मोठ–मोठे नायक, सामंत–शासक, व्यापारी प्रतिनिधी असत. ही परिषद आकराने मोठी होती.

**७. मंत्री परिषद :**

विजयनगर साम्राज्यात राजा नंतर प्रशासनातील प्रमुख अधिकारी महत्वाची भूमिका बजावत असत. केंद्रीय प्रशासनामध्ये मंत्रिपरिषद महत्त्वाचा घटक मानला जात असे. मंत्री परिषदेचा प्रमुख अधिकारी प्रधानी अथवा महाप्रधान (प्रधानमंत्री) हा होता. मंत्री परिषदेमध्ये प्रधानमंत्री, मंत्री, उपमंत्री, वेगवेगळ्या विभागाचे अध्यक्ष आणि राजाच्या जवळचे संबंधित असणारे लोक त्यामध्ये असत. ही मंत्री परिषद साधारणपणे २० सदस्यांची असे. या मंत्रिपरिषदेच्या अध्यक्षास 'सभा नायक' या नावाने संबोधले जात. तसेच प्रधानमंत्री अथवा प्रधानी हा सुद्धा या परिषदेचा अध्यक्ष होऊ शकत असे. या मंत्री परिषदेमध्ये विद्वान, राजकारणामध्ये निपुण असणारे व ज्यांचे वय पन्नास ते सत्तर वर्ष असेल अशाच निरोगी व्यक्तीस या मंत्री परिषदेचा सदस्य बनविले जात होते. ही मंत्री परिषद केंद्रीय प्रशासनामध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जात होती. राजा हा आपल्या कारभारामध्ये या मंत्री परिषदेचा सल्ला घेत असे. परंतु त्यांचा सल्ला राजावर बंधनकारक नसे.

## ८. दंड नायक :

केंद्रीय प्रशासनामध्ये अधिकाऱ्यांच्या व्यतिरिक्त दंड नायक हे उच्च अधिकारी होते. 'दंड नायक' हे पद असून वेगवेगळ्या अधिकाऱ्यांची विशिष्ट श्रेणी होती. या विशिष्ट श्रेणीलाच दंड नायक या नावाने ओळखले जात होते. या दंड नायकांना प्रशासनामध्ये सेनापती, न्यायाधीश, प्रांतपती असे अधिकारी म्हणून नेमले जात होते. केंद्रीय प्रशासनामध्ये राजा आणि युवराज यांच्यानंतर प्रधानमंत्री अथवा प्रधानी हा महत्वाचा अधिकारी राज्यकारभार पाहत असे. मराठाकालीन पेशवा हे जसे पद होते तसेच विजयनगर साम्राज्यात प्रधानी हे पद होते.

## ९. केंद्रीय सचिवालय :

विजयनगरकालीन केंद्रीय प्रशासनामध्ये सचिवालयाची स्थापना करण्यात आली होती. हे सचिवालय वेगवेगळ्या विभागांमध्ये विभागले होते. यामध्ये 'रायसम' अथवा सचिव, कर्निकम म्हणजेच अकाउंटंट असे अधिकारी असत. या विभागातील प्रमुखांना वेगवेगळ्या नावाने ओळखले जात होते. जसे की 'मानेय प्रधान', 'गृहमंत्री', 'मुद्राकर्ता' हा अधिकारी शाही दरबारातील मुद्रा ठेवण्याचे काम करत असे. अशाप्रकारे वेगवेगळ्या अधिकाऱ्यांच्या माध्यमातून विजयनगर साम्राज्यातील केंद्रीय सचिवालय करण्यात आले होते.

## ब) प्रांतीय प्रादेशिक प्रशासन :

राज्यकारभाराच्या सोयीसाठी विजयनगर साम्राज्य साधारणपणे ०६ प्रांतांमध्ये विभागले गेले होते. या प्रांतांना राज्य अथवा मंडल असे म्हणत. विजयनगर साम्राज्यात या प्रांतांची संख्या सातत्याने बदलत गेलेली दिसून येते. इ.स. १४ वे ते १६ वे शतक यादरम्यान प्रांतांचा विस्तार होत गेल्याचे दिसून येते. कृष्णदेवरायांच्या काळामध्ये प्रांतांची संख्या सगळ्यात जास्त होती. या प्रांतांना मंडलमध्ये विभाजीत केले होते. या मंडला विषयी काही इतिहासकारांची मते वेगळी असल्याचे दिसून येते. त्यांच्या मते मंडल हा प्रांताचा मोठा विभाग होय. प्रत्येक प्रांतावर राज्यपाल किंवा प्रांताधिकारी नेमण्यात येत असे. त्यास 'नायक' असे म्हणतात. ही पदे राज घराण्यातील कर्तबगार राजपुत्र किंवा पराक्रमी सरदार यांना देण्यात येत असत. प्रांताधिकाऱ्यांना नेमण्याचा अगर काढून टाकण्याचा अधिकार राजाला होता. प्रांताधिकारी हा प्रांताचा सर्वश्रेष्ठ असून तो स्वतःची स्वतंत्र फौज बाळगत असे. त्याच्या मदतीसाठी मुलकी व लष्करी अधिकारी असत. या नायकांना (प्रांताधिकारी) राज्याच्या जमाखर्चाचा हिशोब राजाकडे सादर करावा लागे. प्रांताच्या एकूण उत्पन्नापैकी एक तृतीयांश उत्पन्न केंद्र सरकारकडे पाठवावे लागे, व राहिलेले दोन-तृतीयांश उत्पन्न प्रांताच्या खर्चासाठी वापरले जात असे. याकामी दुर्लक्ष केल्यास तो गुन्हा समजून नायकास कडक शासन होत असे. प्रांताची व्यवस्था केंद्राप्रमाणेच होती. केंद्रातील राजे सामर्थ्यवान असल्यामुळे नायक त्यांच्या नियंत्रणात राहत असत. पण राजा कमकुवत असल्यास नायक स्वतंत्ररीत्या वागत असे.

## क) नायकार व्यवस्था :

विजयनगरकालीन प्रांतीय प्रशासनामध्ये नायकर व्यवस्थेचा उल्लेख मिळतो. विजयनगरच्या प्रांतीय प्रशासनव्यवस्थेतील नायंकार व्यवस्था ही बहुधा विशिष्ट परिस्थितीत व तत्कालीन आवश्यकतेनुसार

अस्तित्वात आली असावी. या व्यवस्थेबद्दल अनेक इतिहासकारांमध्ये मतभेद असल्याचे दिसून येते. काही इतिहासकारांच्या मते विजयनगर साम्राज्यात सेनानायकालाच 'नायक' म्हणत असत. तर काही इतिहासकारांच्या मते हे नायक वस्तूतः सरंजामदार होते. ज्यांना राजा वेतनाच्या मोबदल्यात काही जमीन देत. या दिलेल्या जमिनीला 'अमर' या नावाने संबोधले जात असे. जो या दिलेल्या जमिनीचा उपभोग करतो त्यास 'अमर नायक' असे म्हणत. सोळाव्या शतकाच्या मध्यावधीमध्ये या नायकांची संख्या जवळ जवळ दोनशे एवढी होती. हे नायक तामिळनाडू या प्रदेशात मोठ्या प्रमाणात नियुक्त करण्यात आले होते. नायकर व्यवस्थेचा उल्लेख प्रांतीय प्रशासनाच्या संदर्भात केला आहे. परंतु नायकाची स्थिती प्रांतीय गव्हर्नरच्या तुलनेत वेगळी होती हे खालील गोष्टीवरून दिसून येईल.

१. प्रांतीय गव्हर्नर हा प्रांतांमध्ये राजाचा प्रतिनिधी म्हणून काम पाहत असे तर नायक हा एक सैनिक सामंत होता. तो फक्त राजाला महसूल पाठवून देणे आणि सैनिकी मदत करणे एवढेच काम करत असे या कामाकरिता त्याला काही जिल्ह्यांचा प्रदेश देऊ करण्यात आला होता.

२. प्रांताच्या गव्हर्नरच्या तुलनेत या नायकांना आपल्या प्रदेशात अधिक स्वातंत्र्य होते. राजा हा नायकर यांच्या प्रदेशांमध्ये एखादी घटना घडली असेल तर त्यामध्ये हस्तक्षेप करत नसे. एखाद्या नायकाने अक्षम्य गुन्हा केला असेल तरच राजा त्यामध्ये हस्तक्षेप करून त्याला त्या पदावरून दूर करत असे.

३. गव्हर्नरच्या तुलनेत नायक हे आपल्या प्रदेशात कृषी योग्य जमिनीचा विस्तार करणे, शेती अथवा सामान्य जनतेचे रक्षण करणे, जंगल साफ करणे इत्यादी आपले उत्तरदायित्व मानत असत. या नायकर व्यवस्थेचा चिकित्सक दृष्टीने अभ्यास केल्यास ही व्यवस्था मध्यकालीन युरोपमधील सामंतवादाची आठवण करून देते. या व्यवस्थेमध्ये सामंतवादी लक्षणे आपणास दिसून येतात. हीच 'नायंगार' व्यवस्था विजयनगर साम्राज्याच्या विनाशास कारणीभूत ठरली.

**ड) स्थानिक प्रशासन :**

विजयनगर साम्रज्यात प्रांताचे विभाजन अनेक जिल्ह्यात करण्यात आले होते, या जिल्ह्यांना 'कोट्टम' अथवा 'वलनाडू' म्हणत असत. या कोट्टमचे विभाजन 'नाडू' मध्ये करण्यात आले होते. ज्याला आज परगणा अथवा तालुका या नावाने संबोधले जाते. नाडूचे विभाजन मेलाग्राम मध्ये करण्यात आले होते. या 'मेलाग्राम' मध्ये किमान ५० गावांचा समावेश होता. प्रशासनातील सर्वात छोटा विभाग म्हणजे 'उर' किंवा 'ग्राम' हा होय. काही ग्रामाच्या समूहाला 'स्थळ' आणि 'सीमा' असे म्हटले जाई. या ग्रामाचा कारभार पाहण्यासाठी 'ग्राममंडळ' असे त्याच्या प्रमुखाला 'अय्यंगार' असे म्हणत. हा अधिकारी ग्रामरक्षण, गावात शांतता राखणे, गावातील न्यायनिवाडा करणे इत्यादी कार्य त्यास करावे लागत असे. हा अधिकारी वंशपरंपरागत असे. त्याशिवाय खेड्यात 'सेनातेव्वा' (हिशोबनीस), 'तलरा' (कोतवाल), 'बिगार' व इतर अधिकारी होते. ग्रामपंचायतीच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी 'महानायकाचार्य' हा अधिकारी असे. त्यांच्यामार्फत राजा खेड्यातील कारभारावर लक्ष ठेवत असे. तो ग्राम व राजा यांच्यामधील दुवा होता. स्थानिक प्रशासनात ग्राम अधिकाऱ्यांना पैसे, धान्य अथवा जमीन या स्वरूपात वेतन मिळत असे. अशा

प्रकारे विजयनगर साम्राज्याचा राज्यकारभार काही विशिष्ट तत्त्वावर आधारलेला होता. त्यामुळे तो कार्यक्षम झालेला होता.

**इ) न्यायव्यवस्था :**

राजा हा न्यायव्यवस्थेचा प्रमुख आणि अंतिम न्यायाधीश होता. तसे ठराविक व्यवस्थापन अस्तित्वात नसले तरीही ताबडतोब तो उपलब्ध माहिती व पुराव्यांच्या आधारावर न्यायदान करत असे. विशेषतः हिंदू कायद्याप्रमाणे व परंपरेप्रमाणे न्यायदान केले जात बसे. तसेच हिंदू चालीरीती रिवाजांचे उल्लंघन केल्यास कडक शिक्षा केली जाई. नागरी कायद्याचे उल्लंघन केल्यास दंड आकारला जाई. सत्य उघड करण्यासाठी शारीरिक व मानसिक छळ केला जाई आणि कडक शिक्षा दिली जात होती. चोरी, व्यभिचार आणि देशद्रोह यांना मृत्युदंड किंवा हातपाय कापण्याची शिक्षा होती. ब्राह्मणांना मृत्युदंड माफ होता. स्थानिक पातळीवर 'नायक' आणि गौडा यांना न्यायदान करण्याचा अधिकार दिला गेला होता.

**ई) सैन्य व्यवस्था :**

विजयनगरचे लष्करी व्यवस्थापन सरंजामदारी स्वरुपाचेच होते. राजाचे स्वतःचे खडे सैन्य असे आणि युद्धाच्यावेळी प्रांतिय गव्हर्नर राजाला सैन्याचा पुरवठा करीत असत. डोमिन्गो पेस याच्या मते, इ.स. १५३० च्या युद्धामध्ये कृष्णदेवरायाच्या सैन्यात ७,०३,६०० पायदळ, ३२,६०० घोडदळ, ५५१ हत्तीदळ यांचा समावेश होता. त्याचबरोबर छावणी दार, स्वयंपाकी, मदतनीस ही बरोबर हजारोंच्या संख्येने होते.

लष्कराप्रमाणेच कार्यक्षम पोलीस प्रशासन आणि गुप्तहेर विभाग कार्यरत होता. राजाला नेहमीच राज्यामधील व शेजारील प्रदेशांतील बातम्यांची खबर दिली जात असे. त्यामुळे गुप्त कारस्थाने, आपापसातील भांडणे, गव्हर्नरांचे बंड इ. विषयी योग्य माहिती गुप्तहेर विभागाकडून दिली जाई. रात्रीची गस्तपथके पाठवली जात असत. रस्ते सुरक्षित असत. त्यामुळे अब्दुल रज्जाकसारख्या इतिहासकारांने विजयनगरच्या कायदा- सुव्यवस्थेची स्तुती केली आहे.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-१**

**अ) रिकाम्या जागा भरा**

१) सुलतानशाही काळात सैन्य मंत्रालयाला ............... या नावाने संबोधले जात असे.

अ) दिवाण-ए-कोही　　ब) दिवाण-ए-बरीद

क) दिवाण-ए-अरिझ　　ड) दिवाण-ए-वझीर

२) ............. हा प्रांतीय प्रशासनाचा प्रमुख असे.

अ) सिपाहसालर　　ब) दिवाण

क) अरिझ　　ड) मुक्ती

३) दिवाण-ए-अमीरकोही हा विभाग .............. या सुलतानाने सुरू केला.

अ) बल्बन | ब) अल्लाउद्दीन खिलजी

क) फिरोजशहा तुघलक | ड) मुहंम्मद तुघलक

४) ग्रामाच्या प्रमुखास .............. या नावाने ओळखले जाते.

अ) पाटील | ब) मुकादम | क) ग्रामसेवक | ड) चौधरी

५) सुलतानशाहीकालीन गुप्तहेर खाते .............. या नावाने ओळखले जात होते.

अ) मजलीस-ए-खबलत | ब) दिवाण-ए-बरिद

क) दिवाण-ए-अमिर कोही | ड) वकील-ए-दर

६) .............. हा ईश्वराचा प्रतिनिधी ह्या नात्याने तो पृथ्वीतलावर राज्य करीत असे.

अ) सुलतान | ब) खलिफा | क) दिवाण | ड) काझी

७) सुलतानशाही कालीन घोड्याच्या विभागाला .............. म्हणून ओळखले जाई.

अ) शहाना-ए-पील | ब) अमिर-ए-मजलीस

क) अमीर-ए-आखुर | ड) आमिर-ए-हाजीब

८) दक्षिण भारतातील हिंदूचे राज्य विध्वंस करून तेथे मुसलमानी सत्ता स्थापन करणारा .............. हा पहिला मुसलमान होय.

अ) मुहंम्मद तुघलक | ब) फिरोजशहा तुघलक

क) अल्लाउद्दीन खिलजी | ड) बल्बन

९) .............. साली विजयनगर साम्राज्याची करण्यात आली.

अ) १३३६ | ब) १३३७ | क) १३३८ | ड) १३३९

१०) .............. साली बहामनी राज्याची स्थापना झाली.

अ) १३४७ | ब) १३४८ | क) १३४९ | ड) १३५०

११) विजयनगर येथे या .............. वंशांनी साधारणपणे पावणे तीन वर्षे राज्य केले.

अ) ३ | ब) ४ | क) ५ | ड) ६

१२) निकोलो कोंटी हा .............. या देशाचा प्रवाशी होता.

अ) जपान | ब) अमेरिका | क) इटली | ड) इंग्लंड

१३) .............. या राज्यातील राजाला 'राय नरेश' या नावाने संबोधले जाई.

अ) बहामनी | ब) विजयनगर

क) सुलतानशाही | ड) मुघल

१४) मंत्रीपरिषदेच्या अध्यक्षास ............. या नावाने संबोधले जात होते.

अ) प्रदानी　　ब) सभा नायक　　क) राजा　　ड) युवराज

१५) मंत्री परिषदेमध्ये साधारणपणे ............. होते.

अ) २०　　ब) २१　　क) २२　　ड) २३

१६) विजयनगर साम्राज्यात जिल्ह्याला ............. संबोधले जाई.

अ) सरकार　　ब) कोट्टम　　क) उर　　ड) मेलग्राम

१७) विजयनगर साम्राज्यात ग्रामाच्या प्रमुखाला ............. असे म्हणत.

अ) अय्यंगार　　ब) नायक　　क) तलरा　　ड) सेवातेव्वा

## ३.२.२ शेती आणि जमीन महसूल व्यवस्था

### अ) सुलतानशाही कालखंड

सुलतानशाही काळातील आर्थिक जीवनाचा विचार करता, कृषी उत्पादने, उद्योग धंदे, व्यापार, चलन व्यवस्था, पेढी व्यवसाय यांचा प्रामुख्याने विचार करावा लागतो. १२०६ ते १५२६ याकाळात अनेक सुलतानांनी आर्थिक जीवन विकसित करण्याचा प्रयत्न केला. मुहंमद हबीब यांच्या मते तुर्की राजवटीच्या स्थापनेमुळे उत्तर भारतामधील आर्थिक जीवनामध्ये अत्यंत दूरगामी बदल झाले. त्यांनी पूर्वीच्या आर्थिक व्यवस्थेपेक्षा कितीतरी प्रगत अशी अर्थव्यवस्था निर्माण केली. या नव्या राजवटीमुळे कृषी व भूमिसंबंधात अत्यंत महत्वपूर्ण असे बदल घडून आले.

सुलतानशाही कालखंडामध्ये शेतीविषयक विविध घटकाकडे लक्ष दिले जात होते. या काळातील कोणत्याही सत्तेच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन म्हणजे महसूल हेच होते. या काळातील सर्वसाधारणपणे ७५ टक्के लोक खेड्यात राहत असून ते प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून राहत होते. त्यामुळे शेतीविषयक आर्थिक धोरणाला या काळातही विशेष महत्त्व मिळाल्याचे दिसते. मध्ययुगीन कालखंडात शेती हा एकूण समाजाच्या आर्थिक जीवनाचा महत्त्वपूर्ण घटक असल्याने शासनकर्त्यांनी या घटकाच्या प्रगतीकडे विशेष लक्ष दिलेले दिसते. शेतीतील उत्पन्न व त्यावरील महसूल हेच राज्याचे प्रमुख उत्पन्नाचे साधन होते. अल्लाउद्दीन खिलजीच्या काळात यामध्ये महत्वपूर्ण बदल झाल्याचे दिसून येते. त्याने आपल्या कालखंडात उत्पन्नाच्या अर्धा हिस्सा महसूल म्हणून ठरविला. सुलतानशाही काळात सुलतान अल्लाउद्दिन खिलजी, मुहंम्मद तुघलक, फिरोजशहा तुघलक या राज्यकर्त्यांनी शेती व्यवसायाच्या दृष्टीकोनातून विशेष कार्य केल्याचे दिसून येते. त्यांच्या या प्रयत्नांमुळे तत्कालीन राज्याचा महसूल वाढण्यास मदत झाली.

### १) शेती उत्पादने :

मध्ययुगीन काळात शेती व्यवसाय, पिके व जलसिंचन यांची माहिती समकालीन अनेक ग्रंथातून मिळते. उत्तर आफ्रिकेतील प्रवाशी इब्नबतुता यांने भारताला चौदाव्या शतकात भेट दिली होती आणि मुहंमद

तुघलकाच्या दरबारात तो आठ वर्षे राहिला होता. त्याने भारतभर प्रवास केला आणि देशातील विविध उत्पादनांचे त्याने फार सुरेख वर्णन लिहून ठेवले आहे. त्यात फळे, फुले, वनस्पती इत्यांदीच्या समावेश आहे. त्याशिवाय रस्त्यांची स्थिती आणि लीकांचे जीवन यांबद्दलही त्यांने लिहिले आहे. सुलतानशाही काळात खरीप आणि रब्बी अशा दोन्ही हंगामात पिके घेतली जात होती. आजही तीच पद्धत अनुसरलेली दिसून येते. सुलतानशाही काळात एकूण २५ प्रकारची पिके घेतली जात होती. उदाहरणार्थ ज्वारी, बाजरी, भात, कडधान्य इत्यादी. याशिवाय या काळात पैसे मिळवून देणारी पिके म्हणजेच नगदी पिकेसुद्धा घेतली जात होती. उदाहरणार्थ ऊस, नीळ इत्यादी त्याचबरोबर आंबा, टरबूज या सारख्या फळांचे उत्पादन घेतले जात होते. उदाहरणार्थ फिरोजशहा तुघलक याने दिल्लीच्या आसपास १२०० फळबागा तयार केल्या होत्या. त्याच बरोबर मका, तंबाखू या सारखी पिके जे बाहेरून आलेली होती. त्यांचे उत्पादन येथे घेतले जात होते. या व्यतिरिक्त बंगाल, काश्मीर इत्यादी प्रदेशात रेशमी उत्पादन घेतले जात होते. अशा वेगवेगळ्या उत्पादनाची शेती सुलतानशाही काळात केली जात होती. या शेतीच्या माध्यमातून आपला चरितार्थ चालवला जात असे. त्याच बरोबर राज्याचा महसूल वाढविण्यामध्ये या शेतीचा महत्वाचा वाटा मानला जात होता.

**२) कृषी अवजारे :**

सुलतानशाही काळात शेतीकरिता वापरल्या जाणाऱ्या अवजारे वा उपकरणांसंबंधी मात्र अत्यंत जुजबी उल्लेख आढळून येतात. जनावरांच्या मलमूत्रापासून तयार होणारी खते मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे जमिनीची उत्पादकताही बहुदा चांगली असावी. चराई हा महत्त्वाचा कृषिविषयक कर जनावरांच्या संख्येनुसार आकारला जाई, हे त्याचे गमक मानता येईल. शेतीसाठी व मालाची ने-आण करण्यासाठी बैलगाडीचा वापर केला जात असे. शेतीसाठी हजारो बैलांचा वापर केला जाई. तसेच काही ठिकाणी उंट, रेडा, घोडा यांचा सुद्धा शेतीच्या कामासाठी वापरत करत असत. शेती अवजारामध्ये बहुतांशी लोखंड व लाकडाचा वापर मोठ्याप्रमाणात केला जात असे.

**३) जलसिंचन :**

सुलतानशाही काळात अल्लाउद्दीन खिलजी, मुहंम्मद तुघलक, फिरोजशहा तुघलक या सुलतानांनी शेतीच्या विकासासाठी व तिच्या प्रगतीसाठी जाणीवपूर्वक लक्ष दिले होते. या सुलतानांनी आपल्या कारकीर्दीत अतिशय उल्लेखनीय अशी कामगिरी केली होती. या सुलतानांनी अनेक विहिरी, तलाव, बंधारे, कालवे खोदले होते. अल्लाउद्दीन खिलजी याने 'हज-ए-ईलाही' हा तलाव बांधला. या काळात जवळजवळ पाच कालवे खोदण्यात आले होते. सुलतानांनी अनेक नद्यांवर कालवे खोदले होते. या माध्यमातून शेतीला पाणीपुरवठा केला जात होता. पाण्याची मुबलकता निर्माण केल्यामुळे शेतकरी वेगवेगळ्या प्रकारची पिके घेऊ लागला होता. यातून राज्याच्या महसूलात वाढ झाली होती. मुहंम्मद तुघलकाने शेतीच्या विकासासाठी 'अमीर-ए-कोही' नावाचा विभाग सुरु केला. फिरोजशहा तुघलकाने आपल्या कारकीर्दीत 'हज-ए-शमी' नावाचा तलाव बांधला. फेरिस्ताने आपल्या प्रवास वृतांतात येथे पन्नास धरणे बांधल्याचा उल्लेख केला आहे. शासनाच्या माध्यमातून अनेक कालवे व धरणे बांधल्यामुळे त्याचा मोठ्या प्रमाणात फायदा शेतकऱ्यांना

झाला. अशाप्रकारे या सुलतानांनी शेतीचे महत्व ओळखून जलसिंचनासाठी महत्त्वाची भूमिका बजावली होती.

## ४) सुलतान कालीन जमीनधारणा पद्धती :

सुलतानशाही सत्तेच्या स्थापनेबरोबरच जमीन महसूल याचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा बनला होता. कारण महसूल हे राज्याच्या कराचे महत्त्वाचे साधन मानले जात होते. यामुळे महसूल गोळा करण्यासाठी जमीनधारणा पद्धत अवलंबणे गरजेचे होते. या काळातील जमीनधारणा पद्धतीबद्दल मुस्लिम विचारधारा आणि प्रचलित देशी विचारधारा यांचे संमिश्र होते. त्यांनी आपापल्या पद्धतीने आपापल्या ताब्यातील जमिनीचे महसूल ठरवून दिले होते. त्यामुळे वेगवेगळ्या जमीनधारणा पद्धती अस्तित्वात आल्या होत्या. या जमीन महसूल विषयाच्या नोंदी तत्कालीन काळातील समकालीन इतिहासकार बरनी व इब्न बतूता यांनी आपल्या प्रवास वृत्तांतात दिल्या आहेत. या काळातील महसूल व्यवस्थेच्या दृष्टीने विचार करता जमीनधारणा पद्धती चार प्रकारांमध्ये विभागलेले होती.

**१. इक्ता पद्धती :** ही पद्धती प्रशासन आणि महसूल वसूली या उद्देशाने राबविली जात होती. इक्तेदार किंवा मुक्ती हा महसूल गोळा करत असे. ठरवून दिलेला महसूल तो शासनाकडे जमा करत असे.

**२. खालसा जमीन :** ही जमीन शासनाची होती. याच्यावर पूर्ण शासनाचे नियंत्रण असे. सुलतानाच्या व दरबाराच्या खर्चासाठी या जमीनीचा उपयोग केला जात होता. सरकार हे चौधरी, मुकादम आणि स्थानिक अधिकारी यांच्या माध्यमातून कर वसूल करत असे. या व्यतिरिक्त आमिल हा अधिकारी सर्व कर गोळा करून केंद्राकडे जमा करत असे.

**३. इनाम जमीन :** यामध्ये 'मद्द-ए-माश', 'सुयुरघल', 'वक्फ इनाम' जमीन यासारख्या इनाम जमीनीचा समावेश होता. ही जमीन धार्मिक संस्थांना इनाम म्हणून देण्यात आली होती. या जमीनीवर कोणत्याही प्रकारचा कर लावला जात नसे अशी जमीन की, जी हिंदू राजाच्या अधिपत्याखाली असे.

## ५) सुलतानशाही कालीन कराच्या पद्धती :

सुलतानशाही काळात वेगवेगळ्या प्रकारचे कर आकारले जात होते. सर्वसाधारणपणे या कराची विभागणी दोन वर्गामध्ये करण्यात आली होती. १. धार्मिक कर, २. धर्मनिरपेक्ष कर.

### १. धार्मिक कर :

**जकात :**

जकात हा एक धार्मिक कर होता. जे हनिफी सिद्धांतावर विश्वास ठेवणारे या कराकडे धार्मिक कर या रूपामध्ये बघतात. हा कर मुस्लिम जनतेचे कर्तव्य म्हणून स्वेच्छेने दिला जात असे. या करांच्या माध्यमातून समाजातील असहाय्य लोकांना मदत करण्याच्या उद्देशाने आपल्या संपत्तीतील काही हिस्सा जकात म्हणून दिला जात असे. जकात हा कर बळजबरीने वसूल केला जात नसे. ते धर्माविरुद्ध मानले जात होते.

जकातच्या अंतर्गत संपत्ती ही दोन भागांमध्ये विभागले जात असे. १. प्रत्यक्ष कर २. अप्रत्यक्ष कर १. प्रत्यक्ष करांमध्ये जनावरे अथवा शेती यातून मिळणारे उत्पन्न २. अप्रत्यक्ष करामध्ये सोने-चांदी आणि व्यापारी वस्तू इत्यादीचा समावेश असे.

**जिझिया :**

हा कर गैर मुस्लीम समाजावर लावला जात होता. हा कर या समाजाच्या संपत्तीची आणि त्यांची रक्षा करण्यासाठी घेतला जात असे. हा कर गैर मुसलमानांना आपल्या उत्पन्नाच्या प्रमाणात द्यावा लागत होता. जिझिया कर देणायांचे तीन विभागात वर्गीकरण करण्यात आले होते. १. श्रीमंत वर्ग २. मध्यम वर्ग ३. सामान्य वर्ग यामध्ये श्रीमंत वर्गाला ४० टंका, मध्यम वर्गाला २० टंका तर सामान्य वर्गाला १० टंका प्रतिवर्षी जिझिया कर द्यावा लागे. यामध्ये स्त्रिया, लहान मुले, साधू, भिक्षूक हे या करापासून मुक्त होते. तसेच ब्राह्मण व पुरोहित यांच्याकडूनही हा कर घेतला जात नव्हता.

**२. धर्मनिरपेक्ष कर :**

**खराज :**

हा कर राज्यातील सर्वात महत्त्वाचे उत्पन्नाचे साधन होते. हा मूळ कर मुसलमान नसलेल्या शेतकऱ्यांकडून घेतला जात असे म्हणजेच गैर मुस्लीम व्यक्तीकडून घेतला जाणारा भुमी कर होय. परंतु एखाद्या मुसलमान व्यक्तीने खराज जमीन कसली तर त्याच्याकडूनही हा कर घेतला जात असे. खराज हा कर उत्पन्नाच्या १/३ पेक्षा कमी व १/२ पेक्षा जास्त घेतला जात नसे.

**खम्स :**

युद्धातील लुटीतून मिळालेली संपत्ती ही खम्स म्हणून ओळखली जात असे. लुटीत मिळालेल्या संपत्तीची वाटणी करण्यात येत असे. ४/५ भाग सैनिकामध्ये वाटला जात असे. तर १/५ भाग हा राजकोशात जमा केला जात असे. सुलतानशाही काळात अल्लाउद्दीन खिलजी व मुहंम्मद तुघलक यांनी लुटीत मिळालेल्या संपत्तीचे या पद्धतीने वाटणी केल्याचे दिसून येते.

**३. इतर कर :**

वरील कराशिवाय काही इतरही धर्मनिरपेक्ष कर अस्तित्वात होते. उदा. सिंचन कर (शर्ब), गुरे चरण्यासाठी कर, उत्पादन शुल्क कर, आयात- निर्यात कर, घरपट्टी कर, रणपट्टी, व्यापार कर, इ. कर सुलतानशाही काळात घेतले जात होते.

**६) सुलतानशाही कालीन जमीन महसूल व्यवस्था :**

दिल्ली सुलतानांनी एकसारखी जमीन महसूल व्यवस्था सर्वत्र राबविलेली दिसत नाही. राज्याचा आर्थिक स्त्रोत देखील त्यामानाने कमी होता कारण दिल्लीच्या सुलतानांचे राज्य उत्तर व पूर्व भारतातील मर्यादित भागांवरच होते. प्रत्येक सुलतानाच्या काळात वेगवेगळ्या समस्या होत्या. शेतसारा म्हणजे शेतीवरील कर हा

राज्याच्या महसुलाचा मुख्य स्त्रोत होता कारण राज्यातील बहुतांशी लोक शेतीवर काम करत असत. परंतु शेतकऱ्याने आपल्या उत्पादनातील किती हिस्सा राज्याला द्यावा हे निश्चित नव्हते. प्रत्येक सुलतान आपल्या मर्जीप्रमाणे शेतसाऱ्याचे प्रमाण ठरवीत असे व हा हिस्सा साधारणत१ः/१० ते १/२ प्रमाणे असे. अल्लाउद्दीन खिलजीला महसूल प्रशासन कार्यक्षम करून महसुलाचे प्रमाण वाढविण्यासाठी त्यात आमुलाग्र बदल करायचे होते. त्यामुळेच त्यांनी सर्व जमीनी आपल्या ताब्यात घेतल्या आणि ५० टक्के महसूल आकारणी केली. सर्व शेतजमिनींचे मोजमाप करून शेतसारा ठरवला. अल्लाउद्दिन खिलजीने शेतकऱ्याने जे पिक घेतले आहे त्याचाच काही भाग शेतसारा म्हणून गोळा करण्यास पसंती दिली.

घियासुद्दिन तुघलकाला राज्याचा महसुलातील असलेला पन्नास टक्के हिस्सा जास्त वाटला त्यामुळे त्याने तो शेतीतील एकूण उत्पादनाच्या १/१० एवढा ठरवला. त्यानंतर मुहम्मद बिन तुघलक याने देखील महसूल प्रशासनात महत्वाच्या सुधारणा घडवून आणल्या. महसूल प्रशासनात एकसूत्रता आणण्यासाठी व राज्यातील कुठल्याही गावाकडून महसूल गोळा करण्याची खबरदारी घेण्यात आली. महसूल वसूल करण्यासाठी दिवाण–ए–मुस्तखराज खात्याची स्थापना करण्यात आली. या खात्यामार्फत अनेक बदल केले. मुहम्मद तुघलाकाच्या बदलत्या कृषिविषयक धोरणामुळे अर्थव्यवस्था गोंधळाच्या अवस्थेत होती. मुहम्मद बिन तुघलकाच्या काळातील महसूल व्यवस्थेतील गोंधळ दूर करण्यासाठी फिरोज तुघलकाने शेतकऱ्यांना सवलत दिली.

**१) घल्ला बक्ष पद्धत :**

जमीन महसूल ठरविण्याची सर्वात साधी व सोपी पद्धत म्हणजे 'घल्ला' अथवा 'गल्ला' बक्ष पध्दत ही होती. या पद्धतीत कोणतीही गुंतागुंत नव्हती. ती कमी खर्चाची होती. या घल्ला–बक्ष पद्धतीलाच 'बटाई पद्धत' म्हणूनही ओळखले जाते. या पद्धतीत तीन प्रकार होते.

**राशी बटाई :**

यामध्ये कापणी झाल्यानंतर खळ्यामध्ये जेव्हा धान्य व भुसा वेगळा केला जातो. तेव्हाच अन्नधान्याची वाटणी केली जात असे.

**खेत बटाई :** यामध्ये पीक उभे असतानाच पण कापणी पूर्वी सरकारचा हिस्सा निश्चित केला जात असे.

**लंका बटाई :**

या पद्धतीमध्ये सरकारचा हिस्सा खळ्यावरच ठरविण्यात येत असे. पण तो धान्य व भुसा वेगळा करण्यापूर्वी ठरविण्यात येत असे. लंक याचा अर्थ 'कापणीला तयार झालेले पिक' असा होतो. तर घल्ला म्हणजे धान्याचा किंवा पिकाचा सरकारी हिस्सा होय. इतिहासकार इरफान हबीब यांच्या मते गल्ला बक्षी पद्धत ही खरोखर जमीन महसूल ठरविण्याची पद्धत नसून महसूल ठरवावा लागण्याची गरज भासू नये, अशा प्रकारे तो गोळा करण्याची पद्धत आहे.

**२) हस्त–ओ–बूद :**

हस्त–ओ–बूद या संज्ञेचा शब्दश अर्थ 'उभे पीक' असा आहे. म्हणून उभ्या पिकाच्या आधारावर जमीन महसूल निश्चित केला जातो. या पद्धतीमध्ये लागवडी योग्य सर्व जमिनीवर महसूल आकारला जात

होता. ही पद्धत सामान्य शेतकऱ्यांना पसंत पडते. कारण या पद्धतीमध्ये पिकांची समक्ष पाहणी करून प्रत्यक्ष उत्पन्नावर जमीन महसूल ठरविला जात असे. जमीनीचे मोजमाप करावयाची गरज नसल्याने महसूल ठरवण्याचे काम सरकारी महसूल अधिकाऱ्यांच्या दृष्टीने सोपे व कमी खर्चाचे होत असे. त्यामुळे सरकारी खर्चात बचत होत असे. महसूल ठरविणाऱ्या अधिकाऱ्यांवरील कामाचा बोजा कमी होत असे. तसेच भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांपासून शेतकऱ्यांची सुटका होत असे. उभे पीक पाहून उत्पन्नाचा अंदाज ठरविण्याकरिता प्रत्येक शेतावर आपला अधिकारी पाठविणे सरकारला शक्य नव्हते. त्यामुळे काही बाबतीत ही पद्धत फायद्याची होती तर काही बाबतीत ती तोट्याची होती असे दिसून येते.

### ३) कानकूट :

या पद्धतीत सरकारच्या अडचणी काही प्रमाणात कमी होत व आकारणी काही शास्त्रीय तत्त्वावर निश्चित करण्याचा प्रयत्न केला जात असे. प्रथम जमिनीच्या मोजणीचे काम हाती घेतले जात असे. जमीनीचे प्रत्यक्ष मोजमाप केल्याशिवाय कोणतीही महसूल पद्धत शास्त्रीय होत नसे. निवडक शेतामधील उत्पन्नाचा अंदाज घेतला जाई म्हणजे जमीनीच्या तुकड्याच्या 'पिकाचा दर' निश्चित केला जाई. तो दर त्या सर्व क्षेत्राला लागू केला जाई. सर्व उत्पन्न सरकार व शेतकरी अशा दोन्ही हिश्यात विभागले जाई. एकंदर उत्पन्नातून शेतकऱ्यांचा हिस्सा वजा केला म्हणजे उरलेल्या सरकारी विषयाचा रोख रकमेत रुपांतर केले जाई. फक्त पिकाखालील जमीनीचाच महसूल धरला जाई. लागवडीयोग्य सर्व जमीनीवर महसूल लादला जात नसे म्हणून फक्त पिकाखालील जमीन मोजली जात असे. आमीन हा अधिकारी जमीनीचा एक तुकडा निवडत असे तर शेतकरी हा जमीनीचा दुसरा तुकडा निवडत असे. या दोन तुकड्यातील पिकाची तोडणी करण्यात येई व नंतर मोजलेल्या जमीनीचे एकूण उत्पन्नाचा अंदाज घेतला जाई. सरकारी हिस्सा धान्याच्या स्वरूपात निश्चित केला जाई. व त्याचे रूपांतर प्रचलित भावाने पैशात करण्यात येई. या पद्धतीमुळे पिकाला जर नुकसान झाल्यास शेतकऱ्यांचा जो तोटा होत असे त्यात सरकार भागीदार होत असे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनातून ही पद्धती बरी होती असे दिसून येते.

### ४) नसक पद्धती :

'नसक' म्हणजे पिकाची अंदाजाने केलेली किंमत होय. मागील गेल्या दहा किंवा बारा वर्षात प्रत्यक्ष दिलेल्या जमीन महसुलाची सरासरी काढून त्याच्या पायावर सरकारचा जमीनीच्या उत्पन्नातील हिस्सा या पद्धतीत ठरविला जात असे. जमीन महसूल हा रोख रकमेत निश्चित केला जात असे. या पद्धतीविषयी अनेक इतिहासकारांनी आपली वेगवेगळी मते मांडली आहेत. इतिहासकार निजाफ अलीखान यांच्या मते 'नसक' या शब्दाने फक्त महसुली शेती एवढाच अर्थ व्यक्त होतो. महसूल ठरविण्याची पद्धत असा अर्थ होत नाही. ब्लौचमन यांच्या मते या जमीन महसूल अधिकारी व शेतकरी मिळून सरकारचा हिस्सा ठरवण्याची पद्धत असा अर्थ व्यक्त होतो.

इरफान हबीब यांच्या मते, नसक म्हणजे पूर्वी निश्चित केलेली कुठलीतरी आकारणी स्विकारून प्रत्यक्ष मोजमाप करण्याची टाळाटाळ होय. अशा प्रकारे राज्याचा महसुल वाढविण्याच्या दृष्टिकोनातून या

सुलतानांनी शेतीमध्ये वेगवेगळे प्रयोग करून शेतीचा विकास करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. सर्वात महत्त्वाचे म्हणजे अल्लाउद्दीन खिलजी हा पहिला सुलतान की ज्याने आपल्या काळात जमीनीची मोजणी करून त्यावर शेतसारा आकारणी सुरू केली. या सुलतानांचा विचार पुढील काळात मोगल बादशहाने राबविला. त्यामध्ये शेरशाह या अफगाण पठाणाने आपल्या कारकीर्दीत जमीन महसूल व्यवस्था शास्त्रीय पद्धतीने कशी राबवता येईल. याचा विचार केला व त्यातून राज्याचा महसूल वाढवून आर्थिक पाया भक्कम करण्याचा प्रयत्न केला.

**ब) विजयनगर कालीन शेती व जमीन महसूल व्यवस्था :**

विजयनगरचे साम्राज्य आर्थिकदृष्ट्या भरभराटीस आलेले होते. विजयनगर साम्राज्यात शेती हाच लोकांचा प्रमुख व्यवसाय होता. त्यामुळे महसूल व्यवस्थेला बरेच महत्त्व प्राप्त होते. जमीन विषयक अनेक व्यवहाराचा अभ्यास केल्यास दक्षिणेत जमिनीच्या खाजगी मालकीची सर्वमान्य संस्था अस्तित्वात होती. खाजगी व्यक्ती कडून राजाने जमीन विकत घेणे, जमीनीच्या गहाणाबाबत व्यवहार, त्याबरोबर प्रत्यक्ष केलेले महसूलबाबतचे ठराव, या सर्व गोष्टी जमीनीवर लोकांचा हक्क मालकीच्या स्वरूपाचा होता. राजाला स्वतःच्या खाजगी जमीनी होत्या. पडीक किंवा लागवडीखालील न आणलेल्या जमीनीची मालकी राजाकडे असे. या काळातील कृषी अर्थव्यवस्थेमध्ये मंदिरांना अनन्यसाधारण महत्त्व होते. या काळात कृषी योग्य जमिनीचा मोठ्या प्रमाणात विस्तार झाला. संपूर्ण विजयनगर साम्राज्यात बंजर आणि जंगलानी युक्त अशी जमीन कृषी योग्य बनविली. या काळात जमीन धारणा पद्धती, जलसिंचन व शेती तसेच जमीन महसूल व्यवस्था हे घटक अत्यंत महत्त्वाचे मानली जात होते. यामध्ये विजयनगर साम्राज्यातील राजांचे मोठ्याप्रमाणात योगदान दिसून येते.

**१) शेती :**

शेती हा विजयनगर राज्याच्या काळातील लोकांचा प्रमुख व्यवसाय होता. सामान्यतः जमिनीचे दोन भागात वर्गीकरण करण्यात आले होते. १) बागायत जमीन (जलसिंचन सुविधा युक्त जमीन) २) जिरायत जमीन (जलसिंचन सुविधा विरहित जमीन) असे दोन भागांमध्ये जमीनीचे वर्गीकरण करण्यात आलेले होते. पहिल्या श्रेणीतील जमीनीमध्ये दोन किंवा तीन उत्पादने घेतली जात होती. धान्य उत्पादनामध्ये भात, हरभरा डाळ, जव आणि तीळ उत्पादन घेतले जात होते. तसेच नीळ, कापूस यांची शेती केली जात होती. पश्चिम किनारपट्टीच्या भागांमध्ये मसाल्याची शेती केली जात होती. तसेच याच भागात काळी मिरची आणि आले यांचेही उत्पादन घेतले जात होते. जे जगामध्ये वेगवेगळ्या भागात निर्यात केले जात होते. कर्नाटकच्या भागांमध्ये इलायची याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जात होते. तसेच नारळाचे उत्पादन किनारपट्टीच्या भागात घेतले जात होते. ही सर्व उत्पादने पाण्याची मुबलकता असल्यामुळे घेतली जात होती. यावरून हे स्पष्ट होते की या काळात शेतीचा विकास मोठ्या प्रमाणात झाला होता.

**२) जलसिंचन :**

विजयनगर प्रशासनामध्ये व्यक्तिगत प्रयत्नांद्वारे या जलसिंचनाच्या साधनांचा विकास केला जात होता. याविषयीचे उल्लेख अनेक शिलालेखाच्या माध्यमातून आपणास मिळतात. जलसिंचन साधने विकसित आणि

विस्तारित करण्यामध्ये मंदिर, मठ, व्यक्ती आणि संस्था यांचे समान योगदान दिसून येते. या काळात जलसिंचनाच्या साधनांचा विस्तार करणे हे पुण्यकर्म मानले जात होते. जे कोणी या साधनांचा विस्तार करेल अशा राज्यांना करमुक्त जमीन दान दिली जात असे. विजयनगर साम्राज्यात बंधारे, तलाव, पाट याद्वारे शेतीसाठी पाणीपुरवठा केला जात होता. नदीवर अनेक बंधारे बांधून शेतीला पाटाच्या साह्याने पाणी दिले जात होते. या काळात वेगवेगळ्या भागात मोठमोठे तलाव निर्माण करण्यात आले होते.

जलसिंचनाच्या साधनाचे रक्षण करणे अथवा त्याची व्यवस्था लावणे ही सामुदायिक जबाबदारी मानण्यात आली होती. या साधनांचा उपयोग घेणारे राज्याला नियमित कर भरत होते. कधीकधी जलसिंचनाच्या साधनाचे पुनर्निर्माण करण्यासाठी राज्य स्थानिक कर माफ करत असे. तसेच गावामध्ये पाणी वापरण्यावरून एखादा वाद निर्माण झाला तर तो ग्रामसभेतील स्थानिक अधिकाऱ्यांच्या माध्यमातून सोडविला जात होता.

**३) जमीन धारणा पद्धती :**

विजयनगर राज्याच्या काळात दक्षिण भारतात १. देणग्या दिलेल्या जमिनी, २. सेवेचा मोबदला म्हणून दिलेल्या जमिनी ह्या दोन प्रकारच्या जमीन धारणा पद्धती होत्या. पहिल्या प्रकारात कर माफ किंवा नाममात्र कराने देवळे किंवा धार्मिक संस्थांना दिलेल्या जमिनीचा समावेश असे. उदाहरणार्थ मठ, जैन बस्ती किंवा मशिदी यांचा समावेश असे. देशातील धार्मिक विद्या तेवत ठेवण्याची ज्याच्याकडून अपेक्षा असे अशा ब्राह्मणांनाही जमीनी दिल्या जात असत. दुसऱ्यात प्रकारात सरकारी नोकरांना ते बजावत असलेल्या सेवेच्या मोबदल्यात दिलेल्या जमिनीचा समावेश होतो. कारण अशा सेवेचा मोबदला जमिनीच्या स्वरूपात देण्याची पद्धत होती. जर अशा प्रकारच्या जमीनी सैन्य उभारणी व राखण्यासाठी दिल्या जात असतील तर ज्यांना अशा जमीनी दिल्या जात त्यांना कर्नाटकात 'नायक' व महाराष्ट्रात 'वतनदार' ही संज्ञा होती. देणगी म्हणून दिलेल्या जमीनीचे 'ब्रह्मदाय', 'देवदाय' व 'मठपुरा' असे तीन प्रकार असत.

१) ब्राह्मणांना वैयक्तिकरित्या किंवा सामुदायिकरीत्या दिलेल्या जमिनींना ब्रह्मदाय असे म्हणत असत. पुष्कळ वेळा ब्राह्मणांच्या एखाद्या विशिष्ट गटाला संबंध खेडी इनाम दिलेली असत. या प्रकारात इनाम दिलेल्या खेड्याला 'अग्रहार' असे म्हणत. या गटातील प्रत्येक व्यक्तीच्या हिश्याला 'वृत्ती' असे म्हणत असत.

२) देवदाय या प्रकारात देवळास दिलेल्या इनाम जमिनीचा समावेश होतो. देवाची दैनंदिन व प्रासंगिक सेवा करणे पंचामृत अभिषेक चार्तुमास पूजा नंदादीप किंवा दिवा सतत तेवत ठेवणे व इतर अनेक प्रकारच्या सेवेचा त्यात समावेश असे.

३) शेवटी मठपुरा या जमीन देणगी प्रकारात मठांना दिलेल्या देणग्यांचा व इनाम जमीन यांचा समावेश होतो. तेथे प्रचलित असलेल्या धार्मिक परंपरा चालू ठेवण्याकरिता या देणग्या दिलेल्या असत. अशा प्रकारच्या देणग्या फक्त सरकारकडूनच मिळत असत असे नसून सामान्य व्यक्तीकडूनही या देणग्या

दिल्या जात असत. आपल्या स्वतःच्या जमीनी इनाम म्हणून देवळे किंवा मठ यांची स्थापना सामान्य व्यक्तीने केल्याची अनेक उदाहरणे आढळून येतात.

४) सेवेबद्दल दिलेल्या इनामामुळे नायकांचा एक अधिकारी वर्ग निर्माण झाला होता. त्याच्या सेवेचे स्वरूप लष्करी व मुलकी अशा दोन्ही प्रकारचे असे. विजयनगर साम्राज्यात या नायकांना विभाग वाटून दिलेली असत. आपापल्या भागात शांतता व सुव्यवस्था राखण्याचे काम त्यांच्यावर सोपविलेले असे. हे विभाग किंवा जमीनी सामान्यपणे वंशपरंपरेने जमीन म्हणून ओळखली जात असे. विजयनगर साम्राज्यात 'नायकार व्यवस्था' ही महत्त्वपूर्ण मानली जात होती.

विजयनगरच्या म्हैसूर विभागात जमीन धारणेच्या चार पद्धती अस्तित्वात होत्या. त्या कंदाय, वारूम, श्रय व जुडी या होत. नायकार व्यवस्थेच्या अंतर्गत त्यांच्या विशेष सेवेच्या बदल्यात त्यांना विशिष्ट भूप्रदेश दिला जात होता. अशा जमीनीला 'अमरम' या नावाने संबोधले जात असे. याच्या प्रमुखास 'अमर नायक' असे म्हणत असत. सुरूवातीला कर व्यवस्था काही अटी-शर्ती वरती सुरू करण्यात आली होती. कालांतराने ती वंशपरंपरागत झाली. गावांमध्ये काही विशिष्ट सेवा दिल्या बद्दल त्यांना करमुक्त जमीन दिली जात असे. अशा साधारण पद्धतीस 'उंबली' या नावाने संबोधले जात होते. या काळातील मोठे जमीनदार आणि सरकारी अधिकारी रयतेचे मोठ्या प्रमाणात शोषण करीत होते. याकाळात शेतमजूर याविषयी काही उल्लेख आपणास मिळतात. या शेतमजूरास 'कुदी' असे म्हणतात. जमीनीच्या देवाण-घेवाण बरोबरच हे शेतमजुरही हस्तांतरीत होत असत. त्यांना सेवामुक्त केले जात नसे. अशा प्रकारे विजयनगर साम्राज्यात जमीन धारणा पद्धती अवलंबिण्यात आली होती.

**४) जमीन महसूल व्यवस्था :**

विजयनगर कालीन जमीन महसूल व्यवस्था एक व्यापक विषय आहे. याविषयी तत्कालीन काळातील शिलालेख व अन्य साधने यातून मोठ्या प्रमाणात माहिती उपलब्ध होते. विजयनगरकालीन राज्याच्या उत्पन्नाचे वेगवेगळे स्रोत होते. उदाहरणार्थ जमीन महसूल, संपत्ती कर, व्यापारी कर, व्यावसायिक कर, उद्योग कर, सामाजिक आणि सामुदायिक कर इत्यादी परंतु राज्याचा महत्त्वाचा उत्पन्नाचा स्रोत म्हणजे जमीन महसूल हाच होता.

**१) जमीनीचे प्रकार :**

विजयनगर व त्याच्या मांडलिक राज्यांमध्ये जमीनीचे वेगवेगळ्या तत्त्वाप्रमाणे वर्गीकरण केलेले होते. त्यामुळे अनेक प्रकारची वर्गीकरणे झाली होती. पाणीपुरवठ्याच्या सोयीप्रमाणे जमीनीचे वर्गीकरण करण्यात आले होते. उदाहरणार्थ 'गद्दे' म्हणजे ओली जमीन व 'बेद्दलू' म्हणजे कोरडी जमीन, ओल्या जमीनी या सामान्यपणे खालच्या जमीनी असून त्यांना पाणी पुरवठा भरपूर होत असे. तर कोरड्या जमीनी या उंचावरच्या जमीनी असून त्यांना पाणीपुरवठा कमी मिळत असे. ओल्या जमीनीची पुनर्विभागणी काही वेळा तांदळाची जमीन व बागांची जमीन यात केली जात असे. तर दुसया प्रकारच्या जमीनीत सुपारी, मिरी या प्रकारची पिके

घेत असत. दुसरे एक वर्गीकरण जमीनीच्या प्रकारावर केले होते. 'इक्केरी' मध्ये ओल्या जमीनीचे पाच प्रकार केले होते.

१) उत्तम– काळी जमीन व काळी वाळूमिश्रित जमीन २) मध्यम– उंच आणि मोकळी तांबडी किंवा संयुक्त जमीन ३) कनिष्ठ – गडद किंवा दसकी, वाळू व झरे असलेली जमीन ४) अधम – कठीण, उंच व कोरडी जमीन ५) अधमाधम – उष्ण कोरडी व पाण्याच्या पातळीच्या वर असलेली जमीन ओल्या जमीनीचे जसे प्रकार सांगितले आहेत तसेच कोरड्या जमिनीचे सहा प्रकार सांगितले आहेत. ते पुढीलप्रमाणे १) येरी – काळी माती २) करी मसब – गडद चिकन माती वाळू सह ३) केम्मण – तांबडी जमीन ४) मळल – वालुकामय जमीन ५) इम्मण – मिश्र जमीन ६) गोणीकल – रेती मिश्रित जमीन अशाप्रकारे विजयनगर साम्राज्यात वेगवेगळ्या प्रदेशात जमीनीचे प्रकार सांगण्यात आले आहेत. यावरुन जमीन कोणकोणत्या प्रकारची होती हे स्पष्ट होते.

**२) महसूल आकारण्याच्या पद्धती :**

जमिनीचे स्वरूप, तिच्यावरील पिकांचे स्वरुप, पाणीपुरवठ्याची उपलब्धता या प्रकारचे अनेक घटक महसुलाची आकारणी करताना विचारात घेतले जात असत. पिकांचे प्रकार, शेतीची विशिष्ट वसाहतीतील जागा, जमिनीची सुपीकता व पाणीपुरवठ्याच्या सोयी यामुळे सहाजिकच निश्चित केलेल्या आकारणीत फरक असे. स्थूलमानाने आकारणी निश्चित करण्याच्या चार पद्धती होत्या. ठोक पद्धत, पेरणी क्षमता पद्धत, नांगर पद्धत व क्षेत्र पद्धत अशा पद्धती होत्या.

**अ) ठोक पद्धत :**

पहिल्या पद्धतीत शेताच्या एकूण उत्पन्नापैकी काही भाग जमीन महसुल म्हणून घेतला जात असे. ही पद्धत साधी पण खर्चाची होती. शिवाय शेताच्या उत्पन्नात होणारे चढ–उतार लक्षात घेतले जात नसत. त्यामुळे काही वेळा सरकारचा तर काही वेळा शेतकऱ्यांचा तोटा होत असे या पद्धतीचे मोगल काळात गल्ला बक्षी किंवा बटाई पद्धतीशी साम्य आढळते.

**ब) पेरणी क्षमता पद्धत :**

या पद्धतीत एखाद्या जमिनीचा तुकडा पेरण्यास आवश्यक असलेल्या बियाण्यांच्या परिणामावर जमीन महसूल ठरविला जात असे. किंवा दुसऱ्या शब्दात म्हणजे जमिनीच्या पेरणी क्षमतेवर महसूल ठरविला जाई. या पद्धतीत अडचण अशी होती की पेरलेले बियाणे व आलेले उत्पन्न यांचे प्रमाण ठरविणे कठीण असे, कारण बियाण्यांचे ठराविक परिमाण सारख्याच परिस्थितीत सर्वच क्षेत्रात सारखेच उत्पन्न देईल याची शाश्वती नसे. किंवा एकाच क्षेत्रात वेगवेगळ्या परिस्थितीत सारखे उत्पन्न येत नसे.

**क) नांगर पद्धत :**

विशिष्ट शेत नांगरणी करिता आवश्यक असणाऱ्या नांगराच्या संख्येवरून जमीन महसुलाची आकारणी केली जात असे. ही पद्धत महाराष्ट्रातील काही भागात ही प्रचलित होती. या पद्धतीत जमिनीची सुपीकता

पाणीपुरवठ्याच्या सोई व काढलेली पिके हे घटक विचारात घेतले जात नाहीत. त्यामुळे ही पद्धत फारच व समाधानकारक होती.

**ड) क्षेत्र पद्धत :**

या पद्धतीत सरकारने मंजूर केलेल्या मोजणी गजाने शेतकऱ्यांच्या जमिनीची मोजणी केली जात असे. विजयनगर साम्राज्यात एकच प्रमाणभूत मोजणी गज असा नव्हता. वेगवेगळ्या वसाहतीत पूर्वी चालत आलेल्या विशिष्ट प्रथांवर आधारित वेगवेगळे मोजणी गज होते.

**३) जमीन महसुलाचा दर :**

शेतसारा हा विजयनगर साम्राज्यातील महसूलाचा मुख्य स्त्रोत होता. कर पैशाच्या तसेच वस्तूच्या स्वरुपात गोळा केला जाई. शेतजमिनीचे काळजीपूर्वक सर्वेक्षण करून शेतसारा ठरविला जाई व त्यांनंतर ठरल्याप्रमाणे शेतसारा शेतकऱ्याकडून गोळा केला जात असे. विजयनगर साम्राज्यातील परकीय प्रवासी फर्नाडो न्युनीज या पोर्तुगीज प्रवाशाने असे नमूद केले आहे कि, 'जमीन मालक आपल्या उत्पन्नातील जवळपास अर्धा भाग व हिस्सा राजाला देत असत.' साधारणपणे शेताच्या एकूण उत्पन्नापैकी सरकारचा १/६, १/४ मालकाचा असे. १/३० हिस्सा देवालयाचा असे, १/२० ब्राह्मणांचा आणि राहिलेला अर्धा हिस्सा शेतकऱ्यांचा असे. इतर हिस्सेदार यांचे वाटे शेतकरी सरकारलाच घालत असे. व सरकार संबंधित हिस्सेदाराना त्यांचे हीस्से देत असे. शेतकऱ्याने मात्र शेतीच्या उत्पन्नाच्या १/४ भाग सरकारला द्यावा अशी अपेक्षा असे. विजयनगर साम्राज्यात कृष्णदेवरायाने जमिनीची सर्व पाहणी करून प्रमाण जमीन महसूल ठरवून दिला. या काळात दोन विशिष्ट संज्ञा आढळून येतात. त्या म्हणजे 'प्राकूरेखे' (पूर्वीचा दर) व 'रायरेखे' (राजाचे दर) या होत. याचा अर्थ असा होतो की कोणतातरी दर पूर्वीच निश्चित केला गेलेला होता. विजयनगरच्या राजांनी बहुदा प्रचलित दर बदलून आपले स्वतःचे दर निश्चित केले. ओल्या जमिनीवरील महसुल कधी वस्तूच्या रूपात तर कधी रोख रकमेत जमा केला जात असे.

**४) महसूल गोळा करण्याच्या पद्धती :**

या काळात महसुल गोळा करण्याच्या चार पद्धती अस्तित्वात होत्या.

**१. रयतवारी पद्धत :**

पहिल्या पद्धतीत सरकारी अधिकारी अनेक ठिकाणी शेतकऱ्यांकडून प्रत्यक्षच महसुल जमा करीत असत. ज्या जमिनीचा महसुल हे अधिकारी जमा करीत असत त्या वैयक्तिक मालकीच्या असत हे उघड होते. या व्यक्तीबरोबर महसुलाबाबतचे करार सरकारने प्रत्यक्षपणे त्याच्याबरोबर केलेले असत ही पद्धत म्हणजे दुसरे तिसरे काही नसून रयतवारी पद्धती होती. यापैकी काही जमीनी राजाने स्वत:कडे ठेवलेल्या असाव्यात व त्याच्या जमिनीचा खंड महसूल अधिकारी जमा करीत व नंतर सरकारी दरबारी खजिन्यात भरत असावेत.

## २. गुत्तीगे पद्धत :

या दुसऱ्या पद्धतीत विशिष्ट भागातील महसुल सर्वात जास्त बोली बोलणाऱ्याला मक्त्याने दिला जात असे. यामुळे आपल्या पगारी अधिकायांकडून महसूल गोळा करण्याचा सरकारचा त्रास वाचत असे. पण त्यामुळे कोणत्याही पद्धतीने महसूल गोळा करण्यास मक्तेदारांना मिळत असे. मक्त्याच्या किंवा कंत्राटाच्या पद्धतीत हा दोष होता. कंत्राटाची पद्धती ही 'गुत्तीगे' (कंत्राट) पद्धत म्हणून ओळखली जात होती. 'गुत्तीगे' फक्त जमीन महसूलाचेच असे नाही तर ते इतर कोणत्याही कराचे असू शकते. उदाहरणार्थ मच्छीमारी, जलवाहतूक व जकात कर यांचे मक्ते कंत्राटी पद्धतीवर दिल्याचे आढळून येते. या पद्धतीच्या निश्चित स्वरूपाविषयी मतभेद आढळून येतात.

इतिहासकार मोरलांड म्हणतात की, दक्षिण भारतातील जमीन महसूल पद्धतीत ते सामान्य वैशिष्ट होते. ही अतिशय साधी पण फार जुलमी पद्धती होती. त्यात मक्तेदाराला रयतेकडून सरकारला द्यावयाच्या रकमेपेक्षा अधिक रक्कम जमा करता येत असे व जादाची रक्कम स्वतःला घेता येत असे. तर टी.व्ही. महालिंगम यांचा मते या दोन्ही पद्धतीत फरक असे. पहिल्या पद्धतीत फक्त कर किंवा महसूल यांचाच मक्ता दिलेला असे व मक्तेदारला त्या भागाच्या कारभाराशी काहीही कर्तव्य नसे, तर दुसऱ्या पद्धतीत मक्तेदाराकडे सर्वच विभाग त्याच्या कारभारासह सोपविलेला असे.

## ३. नाडू किंवा सभा :

तिसऱ्या पद्धतीत महसूल खेड्यातील समुदायाकडून म्हणजे 'नाडू' किंवा 'सभा' यांच्याकडून वसूल केला जाईल. हे संबंधित 'नाडू' किंवा 'सभा' आपापल्या गावातील शेतकऱ्याकडून महसुल गोळा करीत असत. अशाप्रकारे लोकांकडून प्रत्यक्ष महसूल गोळा करून तो सरकारात भरण्याचे कामाबद्दल सरकारी अधिकारी किंवा मक्तेदार हे जबाबदार नसून खेड्यातील 'नाडू' किंवा 'सभा' जबाबदार असत.

## ४. जाहीगिरदार पद्धत :

या चौथ्या आणि शेवटच्या पद्धतीत सरकारने काही सरदारांना त्याच्या सेवेबद्दल दिलेल्या जमिनीच्या महसुलाचा काही भाग सरदाराकडून सरकारला मिळत असे. अशा सरदारांना दोन प्रकारची जबाबदारी असे पहिली म्हणजे ठराविक रक्कम प्रतिवर्षी सरकारला देणे व दुसरी म्हणजे सरकाराकरिता काही लष्कर बाळगणे. अशा प्रकारे दोन वेगवेगळ्या पद्धती म्हणजे सरदारांच्या सेवेचा मोबदला त्यांना जमिनीच्या स्वरूपात देणे व महसुल गोळा करण्याचा अधिकार सर्वात जास्त बोली बोलणाऱ्यांना देणे, या पद्धती एकमेकात मिसळण्यात आल्या होत्या. म्हणून ही पद्धत म्हणजे 'गुत्तीगे' पद्धत व जहागीरदारी पद्धत यांचा संयोग होता. अशा प्रकारे विजयनगरकालीन जमीन महसुल व्यवस्था प्रचलित व्यवस्थेवर आधारलेली होती. त्यामध्ये काही सुधारणा करुन या काळातील राजांनी राज्याच्या महसुलवाढीच्या दृष्टिकोनातून प्रयत्न केले.

## ५) महसूल विभाग व अधिकारी :

विजयनगर राज्याच्या काळातील विविध श्रेणीतील महसूल अधिकारी आणि त्यांच्या कामाची सविस्तर माहिती मिळत नाही. त्याकाळात शेतसाऱ्याचा हिशोब व देखरेख ठेवण्यासाठी एका विशिष्ठ विभागाची

स्थापना करण्यात आली होती. या विभागाला 'आठवणे' असे म्हंटले जात असे. खेड्याच्या प्रमुखास गौडा म्हंटले जात असे. त्याच्याकडे हिशोब ठेवण्याकरिता हिशोबनीस सेनबोवा (शानभाग) असत. याच्या होशोबाच्या दाफ्तरास 'कडत' असे म्हंटले जाई. या अधिकाऱ्यामार्फत महसूल गोळा करण्यात येत असे. गडकरी व तळवार हे स्थानिक महसूल अधिकारी सुद्धा या कामी मदत करत असत.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–२**

अ) रिकाम्या जागा भरा

१) .............. च्या कारकीर्दीत 'हज–इ–शमी' नावाचा तलाव बांधला.

अ) सय्यद लोदी ब) रझिया सुलतान

क) फिरोजशहा तुघलक ड) अल्तमश

२) .............. या परकीय प्रवाशाने आपल्या प्रवासवर्णनात सुलतानशाही काळात ५० धरणे बांधल्याचा उल्लेख केला आहे.

अ) बर्नियर ब) ट्राव्हलयीन क) फेरीस्ता ड) बार्बोसा

३) .............. या सुलतानाने शेतीच्या विकासासाठी 'अमीर–ए–कोही' नावाचा विभाग सुरू केला.

अ) फिरोजशहा तुघलक ब) अल्लाउद्दीन खिलजी

क) मुहंम्मद तुघलक ड) रझिया सुलतान

४) सुलतानशाही काळात एकूण ............... प्रकारची पिके घेतली जात होती.

अ) २५ ब) ५० क) ५५ ड) ६०

५) फिरोजशहा तुघलकाने दिल्लीच्या आसपास .............. फळबागा तयार केल्या होत्या.

अ) ९०० ब) ८०० क) १२०० ड) १०००

६) .............. याने 'हज–इ–ईलाही' हा तलाव बांधला.

अ) फिरोजशहा तुघलक ब) अल्लाउद्दीन खिलजी

क) मुहंम्मद तुघलक ड) बल्बन

७) सुलतनशाही काळात सर्वसाधाररपणे कराची विभागणी .............. भागात करण्यात आली होती.

अ) २ ब) ३ क) ४ ड) ५

८) सुलतानशाही काळात सामान्य वर्गाला .............. टंका प्रतिवर्षी जिझिया कर द्यावा लागे.

अ) १० ब) २० क) ३० ड) ४०

९) युद्धातील लुटीतून मिळालेली संपत्ती ही ............. म्हणून ओळखली जात असे.

अ) खम्स ब) खराज क) शर्ब ड) जकात

१०) घल्ला बक्ष पद्धतीला ............. म्हणूनही ओळखले जाते.

अ) राशी बटाई ब) बटाई पद्धत क) खेत बटाई ड) लांक बटार्स

११) विजयनगर साम्राज्यात सामान्यत: जमिनीचे ............. भागात वर्गीकरण करण्यात आल होते.

अ) ३ ब) ५ क) २ ड) ६

१२) ब्राह्मणांना वैयक्तिक रित्या किंवा सामुदायिकरित्या दिलेल्या जमिनींना ............. असे म्हणत असत.

अ) ब्रह्मदाय ब) इनाम क) अग्रहार ड) देवदाय

१३) मठपुरा हा जमीन देणगी प्रकार ............. दिला जात असे.

अ) गावांना ब) मठांना क) देवळांना ड) ब्राह्मणांना

१४) विजयनगर साम्राज्यात शेतमजूरास ............. असे म्हणत.

अ) उम्बली ब) कुदी क) कदाय ड) वारूम

१५) विजयनगरकालीन शेतकऱ्याला आपल्या उत्पन्नाच्या ........... इतका भाग सरकारला द्यावा लागे.

अ) १/६ ब) १/३ क) १/४ ड) १/२

१६) बेद्दलू या याचा अर्थ ............. जमीन असा होतो.

अ) ओली जमीन ब) कोरडी जमीन क) बागायत जमीन ड) मळईची जमीन

१७) इनाम दिलेल्या खेड्याला ............. असे म्हणतात.

अ) वृत्ती ब) अग्रहार क) देवदाय ड) मठपुरा

१८) विजयनगर साम्राज्यात जमीन महसूल आकारणी निश्चित करण्याच्या ............. पद्धती होत्या.

अ) ४ ब) ५ क) ६ ड) ७

१९) विजयनगरकालीन ............. जमीन महसूल पद्धत ही अशास्त्रीय व बेभरवशाची होती.

अ) ठोक ब) पेरणी क्षमता क) नांगर ड) क्षेत्र

२०) विजयनगर साम्राज्यात ............. पद्धतीत जमिनीची मोजणी गजाने केली जात असे.

अ) ठोक पद्धतीत ब) क्षेत्र पद्धतीत क) नांगर पद्धतीत ड) पेरणी क्षमता पद्धतीत

### ३.२.३ उद्योग आणि व्यापार :

मध्ययुगीन भारताची अर्थव्यवस्था मुख्यत्वेकरून स्वयंपूर्ण होती. त्यामानाने सर्वसाधारण लोकांच्या गरजा कमी होत्या. देशाच्या आर्थिक जीवनात उद्योगधंद्यांचे स्थान महत्त्वाचे आहे. भरभराट पावलेले उद्योगधंदे लोकांच्या राष्ट्रीय संपत्तीत भर घालतात. त्यामुळे राष्ट्राच्या व्यापार व्यवसायाला प्रेरणा मिळते. उद्योगधंदे उत्कर्ष पावणाऱ्या अर्थव्यवस्थेचे मूळ आहे. त्यामुळे तत्कालीन उद्योगधंदे कशा स्वरूपात होते हे जाणून घेणे गरजेचे ठरते.

**सुलतानशाही कालीन उद्योगधंदे :**

सुलतानशाही काळात अर्थव्यवस्थेत उद्योगधंद्याना महत्वाचे स्थान आहे. सुलतानशाहीत विविध प्रकारच्या तयार मालाला कमी मागणी होती. निरनिराळे उद्योगधंदे, मध्यम दर्जाचे आणि साध्या प्रकारचे असल्यामुळे कच्च्या मालाला ही विशेष मागणी नव्हती. त्यामुळे आपल्याला असे दिसून येते की, या काळात मोठे कारखाने सुरू झाले नाहीत. तसेच मोठ्या प्रमाणावर उद्योगधंद्याची उभारणी झाली नाही. तत्कालीन कारागीर स्थानिक लोकांच्या गरजांना व परदेशी निर्यातीला पुरतील इतक्याच वस्तू तयार करत असावेत असे वाटते. परदेशी प्रवाशांनी लिहून ठेवलेल्या वृत्तांतामुळे या सर्व गोष्टींना दुजारा मिळतो. इब्न बतुता वर्णन करतो की, भारतातील नागरीकरणाचे प्रमाण जास्त होते तसेच व्यापार उदीमाच्या क्षेत्रातदेखील मोठ्याप्रमाणात वाढ झालेली होती. त्याचबरोबर आवश्यक ती कौशल्ये, इच्छाशक्ती व संसाधने असणाऱ्या व्यक्तींसाठी भारतीय नगरांमध्ये विविध क्षेत्रातील रोमांचक संधी उपलब्ध होत्या. बऱ्याचशा शहरांतील रस्त्यांवर तुडुंब गर्दी असे व आकर्षक बाजार विविध वस्तूंनी भरलेले असत. भारतीय उपखंडाचे आंतर-आशियाई व्यापारी जाळ्याशी दृढ संबंध प्रस्थापित झाले होते. भारतीय उत्पादकांना मोठी मागणी होती. याच भारतीय कलावंताना खूप फायदा होत असे. ज्या भारतीय वस्तूंना मागणी होती त्यात प्रामुख्याने कापड, धातुकाम, दगड आणि विट, लाकूड, हस्तीदंत, काचकाम, कागद, खेळणी, जडजवाहर, सुगंधी द्रव्येचा अंतर्भाव होत असे. त्याचबरोबर तत्कालीन काळातील वर्थेमा, महुआना आणि बार्बोसा या परकीय प्रवाशांनी व बरनी, अफीफ आणि अमीर खुस्रो यांनी या उद्योगाच्या भरभराटीच्या अवस्थेवर बराच प्रकाश टाकला आहे.

**१) कापड उद्योग :**

सुलतानशाही कालखंडातील कापड उद्योग हा सर्वात महत्त्वाचा आणि लोकप्रिय असा उद्योग होता. जरी भारतीय कापड उद्योग फार जुना असला तरी कापडाची विविधता मर्यादित होती. मुस्लिमांनी भारतात आकर्षक प्रकारचे वेगवेगळे कापड आणले. बंगाल हे कापड उद्योगाचे मुख्य केंद्र होते व कालांतराने याबाबतची गुजरात बंगालचा स्पर्धक म्हणून पुढे आले. याकाळात भारतात कपाशीचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जात होते. कुटीर उद्योग आणि मोठे उद्योग यामध्ये कापसापासून कापड बनविले जात असे. दिल्ली, आग्रा, बनारस, पाटणा, सोनारगाव, लाहोर, मुलतान, खंबायत, सुरत, ठठ्ठा, बुऱ्हाणपूर, देवगिरी यासारख्या मोठ्या गावांमध्ये, शहरांमध्ये उद्योगधंदे केंद्रित झाले होते. हा कापड उद्योग भारतातील व परदेशातील

लोकांच्या मागणीवर अवलंबून होता. भारतात फक्त उच्चकुलीन व सत्ताधारी वर्गातील लोक कलाकुसर केलेले तलम कापड वापरत असत, तर सर्वसामान्य लोक साधारण कपड्यावर समाधान मानत असत. भारतीय तलम, सुती कापडाला परदेशात मोठ्याप्रमाणात मागणी होती. कापड उद्योगाचे प्रमुख तीन प्रकार पुढीलप्रमाणे –

**अ) मलमल कापड उद्योग :**

सुलतानशाही काळात बंगालमध्ये उत्कृष्ट प्रतीचे आणि तलम मलमल तयार होत असे. येथील कापड उद्योग उच्च दर्जाला पोहोचला होता. ढाक्क्याची मलमल अतिशय प्रसिद्ध होती. त्यामुळे लोकांकडून त्याची प्रशंसा केली जात होती. अमिर खुसरो म्हणतो की, बंगालची मलमल इतकी तलम असे की, जर १०० हात लांबीचा मलमली चा तुकडा एखाद्या माणसाच्या डोक्यात भोवती गुंडाळला तर त्याचे केस त्याच्या घडीतून सुद्धा दिसू शकत असत. तसेच देवगिरीचे कापड तलम पाण्याप्रमाणे पारदर्शक होते. हे मलमलीचे कापड एखाद्या सुईच्या भोकातून ही जाऊ शकेल इतके ते तलम असे, तरीही त्या कापडाला सुईने काढता येत नसे. इतका त्या कापडाचा मजबूतपणा आपणास दिसून येतो. इब्न बतुता म्हणतो की, उत्कृष्ट मलमलीच्या एका संपूर्ण ताग्याची किंमत १०० टंका असे. बार्बोसाच्या वर्णनानुसार बंगाली, सिरबंद युरोपातील स्त्रियाच्या मस्तकावरील आवरण म्हणून फार लोकप्रिय होते. तो म्हणतो खंबायत हे सुद्धा सुती कापडासाठी प्रसिद्ध होते. तेथे छापील सुती कापड, मखमल, सॅटीन आणि टफेटा वगैरे निरनिराळ्या तलम व जाड्या भरड्या प्रकारचे कापड तयार होत असे. अल्लाउद्दीन खिलजीच्या काळातील वर्णन करताना बरनीने किनखाफ, जरीचे कापड, शस्तुरी, भिरैन आणि देवगिरी या कापडांच्या काही प्रकारचा उल्लेख केला आहे.

**ब) रेशीम कापड उद्योग :**

मध्ययुगात या कापडाचा उपयोग विशेषतः उच्चकुलीन वर्गात केला जात असे. पाटणा, मुर्शिदाबाद, काश्मीर, बनारस, कासिमबाजार आणि धोराघाट ही रेशीम उत्पादनाची प्रसिद्ध केंद्र होती. गुजरात येथे रेशीम उत्पादन प्रत्यक्षात होत नसले तरी तेथील रेशीम विणण्याच्या उद्योगाबद्दल ते प्रसिद्ध होते. खंबायत येथील रेशीम व रेशीम कापड अतिशय उत्कृष्ट दर्जाचे असे व त्यापासून रेशीम उद्योजकांना मोठे उत्पन्न मिळत असे. त्यामुळे खंबायत मधील रेशीम उद्योग अल्लाउद्दीन खिलजीच्या ताब्यात होता. रेशमी गालीच्यासाठी सुरत प्रसिद्ध होते. रेशमी कापड आसाम मध्येसुद्धा तयार होत असे. तेथील खासी आणि मणिपुरी या जमाती या व्यवसायात कुशल मानल्या जात होत्या.

**क) लोकर उद्योग :**

हा उद्योग काही भागापुरता मर्यादित होता. त्यामध्ये राजस्थान, लाहोर, काबूल, काश्मीर, आग्रा, फत्तेपूर सिक्री, अमृतसर, पाटणा, जौनपुर आणि बुहाणपूर इत्यादीचा समावेश होत असे. परंतु सर्वात उत्तम दर्जाचे लोकर मात्र भारता बाहेरून येत असे. काश्मीरमध्ये निरनिराळ्या प्रकारच्या शाली, ब्लांकेट्स आणि इतर लोकरी कपडे यांचे उत्पादन होत असे. तर फत्तेपूरसिक्री हे रेशमी गालीच्यासाठी प्रसिद्ध होते.

## २) धातु उद्योग :

प्राचीन काळापासून भारतात धातू उद्योग प्रसिद्ध आहे. सुलतानशाही काळामध्ये ही परंपरा सर्वसाधारणपणे त्याच स्वरूपात पाळली गेली. लोखंड आणि पोलाद यांना विविध कारणासाठी मोठ्या प्रमाणात मागणी होती. लोखंडाचा उपयोग तलवारी, बंदुका, तोफा आणि इतर शस्त्रे यांच्या उत्पादनासाठी केला जात असे. तसेच घरे, राजप्रसाद, किल्ले यांच्या बांधणीमध्ये सुद्धा याचा वापर केला जात होता तर भांडी व फर्निचर यासाठीही वापर करत असत. नांगर, कुऱ्हाडी, खुरपे, कोयते, विळे व बैलगाड्या आणि शेतीची अवजारे तयार करण्यासाठी याचा उपयोग केला जात होता. जहाजबांधणीच्या कामामध्ये मुशी व साचे तयार करण्यासाठी व तसराळी, पेले, सुरया, कात्री इत्यादी विविध वस्तू तयार करण्यासाठी लोखंडाचा उपयोग होत असे. गुजरात, गोवळकोंडा, सियालकोट, मुलतान, लाहोर आणि मेवाड हे लोखंडी व पोलादी वस्तूंच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध होते. गुजरातमध्ये धनुष्य, बाण आणि विशिष्ट प्रकारचे खंजीर तयार केले जात असत. तर मेवाड हे बंदुकांच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध होते.

श्रीमंत लोक प्रामुख्याने सोने व चांदीपासून बनविलेले दागिने वापरत असत. या काळात सोने व चांदी यांची कारागिरी प्रशंसनीय स्वरूपाची होती. सोने चांदी आणि बिदरी मिश्र धातूंची भांडी, हार, जडावाचे सोन्या-चांदीचे दागिने, ताटल्या, पेले आणि इतर वस्तू या उच्चकुलीन लोकात व मोठ्या शहरात नित्याच्या वापरत असत. नाजूक कलाकुसर आणि कुशल सुवर्णकार यासाठी गुजरात प्रसिद्ध होते. तांबे व पितळ या धातूंचा उपयोग भांडी तयार करण्यासाठी केला जात असे. सर्वसाधारण ही भांडी खालच्या वर्गातील लोक वापरत असत. तसेच बंदुका व तोफा तयार करण्यासाठी नाणी पाडण्यासाठी, यांचा वापर केला जात असे. बिहारमध्ये सिंगभूम, अलवार मधील बैरत येथे राजस्थानमधील उदयपूर, सिंघाना व इतर ठिकाणी खाणीमध्ये तांबे सापडते. बनारस, लखनौ आणि इतर काही ठिकाणे तांब्याच्या व पितळेच्या धातू कामासाठी प्रसिद्ध होती.

## ३) कपड्याचे रंगकाम उद्योग :

कापड आणि कापडाचे रंगकाम या दोन्ही उद्योगाची प्रगती एकाच वेळी झाली. रंगकाम आणि सुती कापड रंगविणे या उद्योगांना महत्त्व प्राप्त झाले. कारण रंगीबेरंगी पट्टे आणि नक्षीकाम असलेल्या कपड्यांना लोकांकडून मागणी असे. भडक आणि चमकदार रंगांना सर्वत्र मागणी असे. भारताच्या काही भागात विशेषतः लाहोरपासून अवधपर्यंतच्या पट्ट्यात निळीचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत असे. त्यामुळे या उद्योगाची वाढ झाल्याचे दिसून येते. त्याचबरोबर गोवळकोंडा, अहमदाबाद, मछलीपट्टणम, ढाका, कासीमबजार आणि गुजरात येथेही रंग काम व्यवसायाची प्रमुख केंद्रे बनली होती.

## ४) कागद उद्योग :

सुलतानशाही कालखंडात कागद उद्योगाचे श्रेय अरब, समरकंदचे कारागीर आणि चिनी लोक यांना जाते. प्रामुख्याने तुतीच्या झाडाचे धागे आणि तागाच्या व अंबाडीच्या धाग्याच्या कापडाच्या चिंध्या व तत्सम इतर पदार्थ यापासून कागद तयार केला जात असे. चिनी लोकांकडून अरबांनी ही कला अवगत करून

घेतली. तूतीच्या झाडाचा धागा अजिबात न वापरता फक्त काथ्याचा वापर करून कागद तयार करत असत. या कागदाचा उपयोग फर्मान काढण्यासाठी, वार्तापत्र लिहिण्यासाठी, पुस्तके लिहिण्यासाठी, चित्रे काढण्यासाठी आणि सजावट करण्यासाठी केला जात होता. अमिर खुसरो शमी वा सिरियनकागद बनविला जात असल्याचा संदर्भ देतो. हा कागद साधा व रेशमी या दोन प्रकारामध्ये बनविला जात आसे. तत्कालीन काळात कागदाला मागणी मर्यादित स्वरूपाची असे आणि ही मागणी पूर्ण करण्याइतपत पुरवठा होत नसे. काश्मीर, सियालकोट, दिल्ली, अवध, गया, बिहार, बंगाल आणि गुजरात या भागात प्रामुख्याने कागदी उद्योगाचा विकास झालेला होता.

**५) साखर उद्योग :**

सुलतानशाही काळात साखर उद्योग अस्तित्वात असल्याचे दिसून येते. साखरेसाठी लागणारा ऊस भारताच्या अनेक भागात विशेषतः लाहोरपासून ते दिल्लीपर्यंत तसेच बंगाल, माळवा आणि बिहार या भागात मोठ्या प्रमाणात ऊसाचे उत्पादन घेतले जात होते. बंगालमध्ये साखरेचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असल्याने येथील साखर परदेशात निर्यात केली जात होती. या साखर निर्यात व्यापाराविषयी चिनी प्रवासी महुआना म्हणतो की, बंगालमधील साखरेच्या निर्यात व्यापारामुळे बरेच उत्पन्न मिळत असे.

**६) चर्मोद्योग :**

मध्ययुगात चर्मोद्योग वाढीस लागला होता. चामड्याच्या विविध वस्तू तयार करण्यासाठी असलेली मागणी या उद्योगाच्या माध्यमातून पूर्ण केली जात असे. घोड्याचे लगाम व खोगीर चामड्यापासून तयार केले जात असत. त्यामुळे या उद्योगाला महत्त्व प्राप्त झाले होते. बंगालमधील साखरेच्या निर्यातीला चामड्याच्या पिशव्या वापरल्या जात असत. तसेच तलवारीच्या म्यानासाठी योद्धे चामड्याचा वापर करत असत. सर्वसाधारणपणे वापरात असलेली पादत्राणे चामड्याची असत. शेतकऱ्यांना पाण्याच्या पखाली, गोफण, बैलांना बांधण्याचे पट्टे इत्यादी गोष्टी चामड्यापासून तयार केल्या जात असत. हा चर्मोद्योग दिल्ली, बंगाल, गुजरात, आसाम आणि सिंध या भागात केंद्रीभूत व भरभराटीस आलेला होता. खंबायत हे पादत्राणांसाठी प्रसिद्ध होते. चामड्याच्या वस्तूची निर्मिती मोठ्या प्रमाणावर आणि उत्कृष्ट दर्जाची केली जात असे. त्यामुळे या वस्तूंना परदेशात ही मोठ्या प्रमाणात मागणी होती.

**७) काच उद्योग :**

या काळात याशिवाय इतरही अनेक उद्योग होते. काचेचा वापर विविध उद्देशासाठी केला जात असे. उदाहरणार्थ बांगड्या, मणी, आरसे, थाळ्या, वाडगे, पिकदाण्या यासारख्या काचेच्या वस्तू विशेषतः उच्चवर्णीय लोकांच्या वापरात असत. हा काच उद्योग गुजरात, गोरखपुर, आग्रा आणि बिहार येथे चालत होता.

## ८) बांधकाम उद्योग :

दगड आणि वीट कामाचा उद्योग येथे चालत होता. या उद्योगाची विशेष प्रगती झालेली होती. याविषयी अमिर खुस्त्रो याने वर्णन केले आहे तो म्हणतो की, दिल्ली येथील गवंडीकाम करणाया लोकांनी इतर मुस्लीम जगतातील लोकांना खूपच मागे टाकलेले होते. अल्लाउद्दीन खिलजी आणि फिरोजशहा तुघलक या सुलतानांनी कलेला विशेष प्रोत्साहन दिले होते. विटा तयार करणे आणि फरशीला चकाकी देणे यासारख्या उद्योगांची पूरक  उद्योग म्हणून त्या काळात वाढ झाली होती.

## ९) इतर उद्योग :

सुलतानशाही काळात आसाम, बुऱ्हाणपूर, जयपूर, बनारस, दिल्ली आणि काश्मीर व इतरही काही भागात कलात्मक नक्षीकाम केले जात होते. सुगंधी द्रव्य, वेताच्या आणि बांबूच्या वस्तू, जडजवाहीर, हस्तिदंतकाम, डिंक तयार करणे, लाकूड काम आणि खेळणी बनवणे यासारख्या उद्योगांची भरभराट काही भागात झाली होती. या उद्योगासाठी तत्कालीन काळात अनुकूल परिस्थिती होती. नकली जडजवाहीरचे काम मुख्यत्वेकरून गुजरातमध्ये केले जात होते. काश्मीर आणि सिंध मध्ये उत्कृष्ट प्रकारचे गालिचे तयार होत असत. तर हस्तिदंती कामासाठी उत्तरेतील मुलतान आणि दिल्ली हे प्रसिद्ध होते. उपरोक्त सर्व उद्योगांकरिता सुलतानांनी मोठ्या प्रमाणात राजाश्रय दिल्याने सुलतानशाही काळात उद्योगांची सुरुवात झाली आणि उद्योगधंद्यांमुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक सुधारणा होऊन काही केंद्रे विकसित झाल्याचे दिसते.

## ब) विजयनगर कालीन उद्योगधंदे :

दक्षिण भारतातही विविध उद्योगधंदे भरभराटीस आले. या उद्योगाविषयीची माहिती अब्दुल रजाक, निकोलो कोंटी, वर्थेमा, बार्बोसा, थेवेनॉट यांच्या प्रवास वृत्तांतातून मिळते. अशा या उद्योगधंद्यांची माहिती जाणून घेणे आपणास गरजेचे ठरते.

## १) कापड उद्योग :

दक्षिण भारतात कापडाला मोठ्या प्रमाणात मागणी असल्यामुळे कापड उद्योगाच्या केंद्राची वाढ झाली. गोवा, चौल, मैसूर, मलबार, आंध्र मधील मतफीली, कालिकत जवळील कानपमई, पुलिकत आणि चित्रदुर्ग भागातील बुद्धेहाळ ही कापड उद्योगाची केंद्रे होती. मलमल, मलमलीचे मोठे अंगरखे, पागोटे, खळ लावलेले कापड इत्यादी सुती कापडाचे विविध प्रकार आपणास पहावयास मिळतात. चिनी प्रवासी महुआना याने केलेल्या वर्णनानुसार कोईमतूर येथे 'चिहिली' या प्रकारच्या कापडाचे उत्पादन केले जात होते. त्याची किंमत आठ ते दहा वराह (सोन्याची नाणी) इतकी असे. दक्षिण भारतात छापील सुती कापडासाठी पुलिकत प्रसिद्ध होते. याचबरोबर व्यतिरिक्त अंबाडी, मखमल, सॅटीन आणि नारळापासून बनवलेला धागा यापासून कापड विणण्यात येत असे. कोईमतूर या भागात रंगीत, रेशीम कपड्यांचे उत्पादन केले जात होते तर बुदिहाळ या भागामध्ये अंबाडीच्या धाग्यापासून कापडाचे उत्पादन केले जात होते. दखखनमध्ये चौल व पेरून्तेरू ही ठिकाणे रंगकामाच्या उद्योगाबद्दल प्रसिद्ध होती, तर कोरोमंडल किनाऱ्यावर  मछलीपट्टणम येथे चिटाचे कापड तयार केले जात असे.

## २) धातू उद्योग :

१. सोने, चांदी, तांबे आणि लोखंड या धातूंचा उपयोग प्रामुख्याने नित्योपयोगी आणि चैनीच्या वस्तू बनविण्यासाठी केला जात असे. ग्रीबलच्या वर्णनानुसार असे समजते की, सोन्याचे साचे म्हैसूरपासून औरंगाबादपर्यंत पसरले होते. मैसूरमध्ये काही खाणी खूप खोलवर खणाव्या लागत असत आणि यांत्रिक उपकरणांमध्ये विशेष सफाई नसल्यामुळे विशिष्ट कालानंतर हे काम थांबवावे लागत असे. खनिजापासून सोने काढण्याची कला ही विशेष प्रगत झाली नव्हती. मनुष्यबळाच्या सहाय्यानेच हे काम करावे लागत असे. बिदनूर व कोलार येथे सोन्याच्या खाणी होत्या. सोन्याचा उपयोग मूर्ती तयार करण्यासाठी, देवाला देणगीदाखल दिलेल्या वस्तू तयार करण्यासाठी, राजे लोक आणि मुख्य सरदार यांचे दरबार सजविण्यासाठी, नाणी पाडण्यासाठी आणि दागिने तयार करण्यासाठी सोन्याचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात असे.

२. लोहयुक्त खनिजे म्हैसूर राज्यात विशेष करून चिक्कनायकनहल्ली आणि कोलार या जिल्ह्यात सापडतात. जोर्डानस हा परकीय प्रवासी म्हणतो की, भारताच्या पश्चिम किनाऱ्या लगतच्या भागात लोखंड सापडत असे. चित्रदुर्ग भागातील टेकड्यांत व सोंडूर संस्थांच्या कुमारस्वामी बेटाच्या भागात लोह खनिजे बहुदा आढळून येतात. या लोह्खनिजापासून यापासून चांगले लोखंड, कच्चे लोखंड आणि पोलाद तयार करत असत. लोखंडाचा उपयोग लष्करी कामासाठी मोठ्या प्रमाणावर होई. उदाहरणार्थ तलवारी, धनुष्य, बाण, ढाली, कट्यारी व परशु लोखंडापासून तयार केले जात असे. तसेच दिवे, पलंग व इतर गृहउपयोगी भांडी करण्यासाठीही लोखंडाचा वापर केला जाई. बिदनूर येथे निबय्या या नावाचा कारखाना होता. येथे सैन्याच्या उपयोगासाठी लागणाऱ्या वस्तू म्हणजे चिलखते, तोफा, तोफांचे गोळे तयार होत असत.

३. तांबे उद्योग मुख्यतः कुईलोन येथे सापडते. यापासून राजपरिवारातील सजावटीच्या कामासाठी तसेच गृहोपयोगी भांडी, देवळात लागणारी पूजा पात्रे तयार केली जात असत. तांबे, जस्त, कथील आणि शिसे यांच्या मिश्र धातूपासून तयार केलेल्या बिदरी धातूच्या वस्तूसाठी बिदर प्रसिद्ध होते.

## ३) दाग दागिने :

विजयनगर साम्राज्यात उत्तम प्रतीचे हिऱ्याच्या खाणी होत्या. मुख्यतः कर्नुल व अनंतपूर जिल्ह्यात हिरे मिळत होते. हिरे व इतर मौल्यवान रत्ना बद्दल परकीय प्रवासी बार्बोसा याने असे म्हटले आहे की, मौल्यवान रत्नांची या राज्यात मोठी ने-आण चालत असे. कारण येथील राज्यकर्त्यांची तेथे विशेष आवड होती. या रत्नांचा उपयोग मोठ्या प्रमाणावर देवांच्या मूर्तींचे दागिने करण्यासाठी, राजे व त्यांचे सरदार यांच्या चैनीच्या वस्तू तयार करण्यासाठी तर काही वेळेला सर्वसामान्य लोकांच्या दागिन्यासाठी केला जात असे. हिरे यांच्या व्यतिरिक्त माणके, पितस्फटिक अथवा पुष्कराज, शुभ्र नीलमणी, मोती व पाचू ही रत्ने उपलब्ध होत असत. याविषयी अब्दुल रजाक असे म्हणतो की,' या देशातील सर्व रहिवासी मग ते श्रीमंत असोत अगर गरीब असोत किंवा हलक्या वर्गाचे कारागीर असो तो आपल्या कानात, गळ्यात, बाहू वर, हातात व बोटात खड्यांचे दागिने वापरताना दिसतात.

**मिठाचा व्यवसाय :**

दक्षिण भारतात मिठाचा उद्योग काही भागातच केंद्रित झाल्याचा दिसून येतो. बार्बोसा याने मलबार मध्ये मीठ तयार करण्याचा धंदा हा एका विशिष्ट जातीचा म्हणजे 'वेटटूवन' जातीचा होता असा उल्लेख केला आहे. बल्लारी येथे मिठाचा धंदा करणारे लोक 'उप्पार' म्हणून ओळखले जात असत. या काळातील शिलालेखांवर मिठागरांवर घेतल्या जाणाऱ्या कराविषयी उल्लेख आढळतात. असे कर विशेषतः मलबार गुंटूर दक्षिण अर्काट, चींगलेपुट, तंजावर, त्रावणकोर, म्हैसूर व शिवमोगे याभागात आकारले जात होते.

**५) साखर उद्योग :**

विजयनगर साम्राज्यात मोठ्या प्रमाणात साखर मिळत असल्याबद्दलचे अनेक उल्लेख आपणास मिळतात. परंतु साखर निर्मितीच्या पद्धती बद्दलची माहिती फारशी मिळत नाही. साखर साधारणपणे बारीक शुभ्र किंवा ताडाची साखर या दोन प्रकारची मिळत असे. लालसर साखरेला दक्षिण भारतात जगरी (क्षरसीळ) म्हणतात. ही साखर नारळाच्या रसापासून बनवली जात असे. तसेच इतर जातीच्या ताडाच्या आणि तत्सम वृक्षाच्या रसापासून तयार करीत असत. बार्बोसा म्हणतो की, भटकळ या प्रसिद्ध व्यापारी केंद्रातून बारीक साखर निर्यात होत असे. त्या भागात अशी साखर मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत असे. ही साखर पिठाच्या रूपाने मिळत असल्याने ती लहान पुड्यांमधून मिळत असे. याचबरोबर साखरेच्या वड्या ही तयार केल्या जात असत.

**६) जहाज बांधणी उद्योग :**

जहाज बांधणीचा उद्योग मुख्यत्वेकरून कालिकत, कोचिन, चिंगुईकार आणि मालदीव येथे भरभराटीला आलेला होता. या केंद्रांमध्ये 'अल्मेडीया' म्हणजे वल्हवून नेण्याची व एकसंध इमारती लाकडाची जहाजे बांधली जात होती. 'अटल्या' म्हणजे समुद्र किनाऱ्यावर गस्त घालण्यासाठी बांधलेली होडी होय. समुद्रकिनाऱ्यावर वापरण्यायोग्य हलक्या वल्हयाची 'बरगटीम' (लरीसरींळा) होडी असे. 'फुस्टा' ही लांब अंतरावरील सफरीसाठी योग्य असे गलबत होती. 'पराव' म्हणजे वेताची वल्हि वेताचीच डोलकाठी असलेले जहाज होय. वर्थेमा याने केलेल्या वर्णनाप्रमाणे कालिकत येथे बांधली जाणारी जहाजे ही २०० टन वजनाची असत.

दक्षिण भारतामध्ये काही उर्वरित उद्योग आपणास दिसून येतात. यामध्ये लाकूड कामाचा उद्योग चर्मोद्योग मच्छिमाराच्या उद्योग, वीट उद्योग, कुंभार उद्योग यासारखे उद्योग या काळात अस्तित्वात होते. या उद्योगधंद्यांना विजयनगर साम्राज्यातील राज्यकर्त्यांनी मोठ्याप्रमाणात राजाश्रय दिला होता.

**ब) सुलतानशाहीकालीन व्यापार :**

सुलतानशाही काळातील व्यापार-वाणिज्य याचा विचार करताना अनेक घटकांचा विचार करावा लागतो. या काळात निर्माण होणाऱ्या उत्पादनापैकी ढाक्याची मलमल, बंगालचे रेशीम कापड, कातडी आणि साखर यासारखे उत्पादने भारतातून निर्यात केले जात होते. त्याचबरोबर भारतातून निर्यात होणाऱ्या मालामध्ये अन्नधान्य, मसाले आणि मौल्यवान रत्ने, अफू, सुगंधी तेल, मलम आणि तत्सम पदार्थ याचा समावेश असे.

तर आयात केल्या जाणाऱ्या वस्तू मध्ये प्रतिष्ठित वर्गाकडून मागणी असलेल्या चैनीच्या वस्तू म्हणजेच मखमली आणि भरतकाम केलेला माल, सोने, चांदी, तांबे, घोडे आणि खेचरे यांचा समावेश असे. असा हा व्यापार कसा केला जात होता याविषयीची माहिती जाणून घेणे गरजेचे ठरते.

**१) परदेशी व्यापार–आयात–निर्यात :**

सुलतानशाही काळात भारताचा परदेशी व्यापार हा समुद्र व भुमार्गे असा दोन्ही मार्गाने चालत होता. समुद्रमार्गे चालणाऱ्या व्यापारामुळे भारतीय वस्तू तांबडा समुद्र, पूर्व आफ्रिकेचा किनारा, मलाक्का बेटे, चीन आणि प्रशांत महासागर या पाच महत्त्वाच्या ठिकाणी नेल्या जात असत. इतर काही देश तर खुष्कीच्या मार्गाने भारतीय वस्तू अफगाणीस्तान, मध्य आशिया, इराण आणि इराक या चार देशांना निर्यात करण्यात येत असत. तांबड्या समुद्रामधून अलेक्झांड्रिया, दमास्कस, बगदाद आणि भूमध्य समुद्र व युरोपातील इतर काही ठिकाणी या महत्त्वाच्या व्यापारी केंद्रांनाही माल पाठविण्यात येत असे. परदेशी बाजारपेठांमधून चैनीच्या व इतर वस्तू आयात केले जात असत. सुलतान मुहंम्मद तुघलकाच्या कारकिर्दीत चीन, अलेक्झांड्रिया, इराकहून जरीचे सामान आणि रेशमी माल यांची आयात करण्यात येत असे. इराक, तुर्कस्तान, बल्ख, येमेन, इराण, कोस, होरमुझ आणि एडन येथून उत्तम प्रकारचे जातिवंत घोडे आयात केले जात असत. कापड व अन्नधान्य यासारख्या वस्तू भारतामधून इराणच्या आखातातील कलहट येथे आणि तांदूळ वगैरे येमेन येथे निर्यात होत असे.

बर्बोसाने पटेनेक्सी नावाच्या बंदराचा उल्लेख केला आहे. दीवचे राज्य सोडून भारताकडे येताना पटेनेक्सी नावाचे एक मोठे शहर आहे. ते एक चांगले बंदर असून तेथे मोठा व्यापार चालत असे बार्बोसा म्हणतो. गोवा येथील सागरी बंदरात मक्का, एडन, मलबार, आणि भारताचे इतर भाग येथून व्यापारी जहाजे येत असत. भावनगर या बंदरामध्ये जहाजावर जकातीची मोठी रक्कम जमा केली जात असे. भडोचजवळील गंधार बंदरावर सर्व प्रकारच्या वस्तूचा व्यापार चालत असे. मध्ययुगीन काळात खंबायत हे बंदर भरभराटीस आले होते. खंबायत हे हस्तिदंती कंकणे, खाटा, निरनिराळे रंगीत मणी, खडे आणि मोती, नक्षीकाम केलेले पोवळे, इतर किमती रत्ने यासाठी प्रसिद्ध होते.

मक्का आणि एडन येथून गुजरातमध्ये पोवळे, तांबे, पारा, हिंगुळ, शिसे, तुरटी, गुलाबपाणी, केशर, सोने, चांदी, या वस्तू मोठ्या प्रमाणावर आयत केल्या जात असत. चीन आणि मलाक्का येथून दीव येथे रेशीम येत असे. सुती कापड, सुती मलमल, आणि जाडेभरडे पांढरे सुती कापड हे अरबस्तान, इराण, मलाक्का, सुमात्रा, मेम्बासा, मालींदी आणि आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावर वसलेले मागडोक्सो येथे निर्यात केल्या जात असत. बंगालमधून मोठ्याप्रमाणावर साखर, कापूस, धान्य, आले, सुंठ आणि मांससुद्धा निर्यात केले जात असे. वर्थेमा या प्रवाशाच्या वर्णनानुसार रेशमी आणि सुती कपडे इराण, सिरीया, तुर्कस्तान, आफ्रिका, इथोपिया, आणि इतर देश येथे खंबायत आणि बंगाल येथून निर्यात केले जात असत. जमिनीमार्गे तुर्की लोक आणि मंगोल लोक मुलतान आणि क्वेटा, खैबरखिंड आणि काश्मीर या तीन मार्गांनी परदेशी व्यापार करत असत.

२) **अंतर्गत व्यापार :**

मध्ययुगीन काळात अंतर्गत व्यापार किनाऱ्यावरील व्यापार आणि देशांतर्गत व्यापार असा चालत होता.

अ) **किनाऱ्यावरील व्यापार :**

पटेनेक्सी (Patenexi) येथील रंगीत रेशीम कापड, सुती कापड, सुती माल, घोडे आणि गहू या वस्तू बंगालमध्ये पाठवण्यात येत असत. येथून भारतीय जहाजे हे माल भारतात इतर ठिकाणी पोहचवत असत. मलबारी जहाजे मुख्यत्वेकरून समुद्र किनाऱ्यावरील व्यापार करत असत. सोरठ व गुजरातमधील मंगरूळ येथून घोडे, गहू, तांदूळ, कापूस, कापड, आणि इतर वस्तू भारतातील निरनिराळ्या बाजारपेठेत नेल्या जात असत. तेथे नारळ, मेण, वेलदोडे, आणि मसाले हे पदार्थ आणले जात असत. किनारपट्टीवरील या व्यापारामुळे मोठ्या प्रमाणावर फायदा होत असे. दिवचा येथून होणारा व्यापार मलबार, भटकळ, गोवा, चौल आणि दाभोळ यांच्याबरोबर चालत असे. मलबारी नावामधून येणाऱ्या व्यापारी मालामध्ये सुपारी, लोखंड, भटकळची साखर, मिरे, आले, सुंठ, लवंग, दालचिनी, जायफळ, जायपत्री, चंदन, रेशीम कापड इ. चीन व मलाक्काहून आलेल्या वस्तूचा समावेश असे. त्याच जहाजातून रेशमी कापड, देशी कापूस, घोडे, गहू, सुगंधी तेल, आणि अफू नेत असत. बंगाल मधून व्यापारी जहाजे केप कोमोरिन मार्गे साखर, सिनबाफा, आणि बीटील्हा या प्रकारची कपडे घेवून खंबायत आणि मलबार येथे जात असत.

ब) **देशांतर्गत व्यापार :**

देशांतर्गत स्थानिक व्यापार हा मोठ्या प्रमाणावर केला जाणारा व्यापार होता. पश्चिम किनारपट्टीवरील पोरबंदर, सोरठ, मंगरूळ, दिव, गोवा, भावनगर या बंदरातून भारतात मोठ्या प्रमाणात देशांतर्गत व्यापार चालत असे. स्थानिक व्यापार मुख्यतः मंडई आणि आठवड्याचा बाजार येथे चालत असे. यामध्ये नित्योपयोगी वस्तू, भाजीपाला व अन्नधान्य यांचा समावेश असे. हा व्यापार घाऊक व्यापारी व जवळपासच्या खेड्यातील दुकानदार यांच्यामध्ये चालत असे. त्याचबरोबर जनावरांचा बाजारसुद्धा भरवला जात असे. तेथे गायी, बैल, म्हशी, बकऱ्या, मेंढ्या, घोडे, उंट विकत घेवून विकले जात असत. या व्यापारामध्ये मालाच्या विक्रीसाठी मोठ्या बाजारपेठांचे अस्तित्व ही प्रमुख गरज होती. उदा. मुलतान, लाहोर, जौनपुर, बनारस, अलाहाबाद, अजमेर, पुरी, आग्रा, पाटणा, ठठ्ठा, अहमदाबाद, बुऱ्हाणपूर, इ. व्यापारी केंद्रे प्रसिद्ध होती. येथे देशांतर्गत व्यापार मोठ्याप्रमाणात चालत असे. याकाळात समुद्र किनाऱ्यावरील व्यापाराबरोबरच देशांतर्गत व्यापार सुद्धा भरभराटीस आलेला दिसून येतो.

३) **व्यापारी जमाती :**

सुलतानशाही काळात काही विशिष्ट जमाती व्यापार करत असत. यामध्ये बंजारी, बनीये, मुलतानी व खुरासानी इ. या जमातींना समावेश होतो. या जमातींना भाट, दलाल, साहू व महाजन यांची मदत लागत असे. राजपुतान्याचे बंजारी लोक संपूर्ण भारतात व्यापारी मालाची दूरवर ने आण करीत असत. त्यांची दळणवळणाची प्रमुख साधने बैल, बैलगाडी, आणि घोडे ही होती. खुरासान अथवा शेजारी देशामधून

व्यापारासाठी भारतात आलेले खुरासानी मुसलमान व्यापारी हे भारतातील सर्व भागामध्ये व्यापार करत असत. गुजरातमधील व्यापारी बनीया लोक मुख्यत जैन समाजाचे होते. गुजरात, दख्खन, मलबार व कोचीन वगैरे पश्चिम किनारी हे बनीया लोक प्रामुख्याने व्यापार करत होते. यासारख्या अनेक व्यापारी जमाती सुलतानशाही काळात आपला व्यापार करीत असत.

**४) दळणवळण साधने :**

त्याकाळात व्यापारी आपला माल एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्यासाठी जनावरे किंवा मनुष्य यांचा वापर करत असत. याविषयीचे वर्णन इब्न बतूता याने केले आहे, त्याप्रमाणे येथील व्यापारी बैलगाडी व्यतिरिक्त उंट, गाढव, खेचर, होडी यांचाही वापर करत होते. होडीचा उपयोग नदीतून मालाची ने आण करण्यासाठी करत असत.

**५) वजन मापे :**

वस्तूच्या विनिमयामध्ये धान्याचे मोजमाप करण्यासाठी 'मण' हे अधिकृत माप होते. एक मण म्हणजे ४० शेर होते. एक शेर २४ तोळ्यांचा होता. एक तोळा म्हणजे १८० ग्रेनचा होता. फेरीस्ताच्या मते एक मणामध्ये ९६० तोळे होते.

**६) पेढी व्यवसाय :**

सुलतान काळातील पेढीव्यवसाय संदर्भात अमिर खुश्रो, बरणी यांनी माहिती दिली आहे. सरकारी अधिकाऱ्यांना त्यांच्या इक्तावर पेढीवाले कर्जे देत असे. हुंड्या म्हणजे पैशाच्या विनिमयाचे रोख रक्कम होती. पेढीवाले कर्जाच्या मोबदल्यात व्याज घेत असत. सुलतानकाळात समस्सुक हा रोख्याचा प्रकार होता. तर कर्जाऊ रकमा देणारे साहू होते. पेढीवाल्यांना महाजन म्हणून ओळखले जात होते.

**७) प्रमुख व्यापारी मार्ग :**

१) सुलतानशाही काळातील नगर, शहर, ग्राम, हे जवळजवळ भूमार्ग व जलमार्गांना जोडले गेले होते. या व्यापाऱ्यांच्या सुविधेसाठी व्यापारी मार्गावरती अनेक धर्मशाळा, तलाव आणि वृक्ष इ.ची सोय करण्यात आली. इब्न बतूताने आपल्या प्रवासवृतांतात अलिगढ, कनौज, ग्वाल्हेर, खुजुराहो, चंदेरी, धार, उजैनवरून दौलताबाद आदि दिल्लीला जोडणाऱ्या मार्गाचे वर्णन केले आहे. तो स्वतः गेला होता. या प्रवासवृतांतावरून आपणास अनेक मार्गाची माहिती मिळते.

२) सुलतानशाही काळात नदीमार्गे व्यापार केला जात होता. नदी किनारी वसलेल्या शहराशी हा व्यापार केला जात असे. सिंधू नदी अरबी समुद्राला जोडली गेल्याने नदीमार्गे केल्या जाणाऱ्या व्यापारामध्ये सिंधू नदीचा उपयोग मोठ्या प्रमाणावर केला जात होता. व्यापारी जहाजे ही खाडी नजीक असलेल्या देशा व्यतिरिक्त गुजरात बंदरातून हिंदी महासागरातून श्रीलंका, मलाया, हिंदी चीन, बर्मा, जपान व चीन या देशांना भारतीय व्यापारी माल घेवून जात होते. दिल्ली राजधानी ही वेगवेगळ्या मार्गांनी जोडली गेली होती. या मार्गाने अंतर्गत व्यापार हा भूमार्गे व छोट्या मोठ्या नद्यांच्या सहाय्याने केला जात होता. गंगा नदीतून पटना

व बंगाल व्यापार चालत असे. या व्यापारी सुविधाकरिता ठिकठिकाणी अनेक पूल आणि घाट बांधण्यात आलेले होते. अशा प्रकारे व्यापारी मार्ग अस्तित्वात होते.

**ड) विजयनगरकालीन व्यापार :**

दक्षिण भारतात चोल साम्राज्यानंतर जवळ-जवळ शंभर वर्षे येथे अर्थव्यवस्थेची घडी व्यवस्थित बसली नाही. व्यापार आणि उद्योग यांचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न विजयनगर साम्राज्याच्या राज्यकर्त्यांनी केला. विजयनगरकालीन परकीय प्रवाशांच्या प्रवास वृत्तांतातून सुलतानशाहीत ज्याप्रकारे व्यापार चालत होता तशाच प्रकारचा व्यापार दक्षिणेतही चालत असल्याचे दिसते. या काळात मोठ्या प्रमाणात मालाची आयात निर्यात केली जात होती. विजयनगर साम्राज्यात परदेशी व्यापार व अंतर्गत व्यापार असा दोन प्रकारचा व्यापार चालत होता. त्यामध्ये दळणवळणाची साधने, व्यापारी केंद्रे, व्यापारी जमाती कशा होत्या हे पाहणे गरजेचे ठरते.

**१) परदेशी व्यापार :**

विजयनगर साम्राज्यात परदेशाशी असलेला व्यापार भरभराटीस आलेला होता. विजयनगरच्या सरहद्दीवर खुश्कीचे मार्ग नसल्यामुळे परदेशी व्यापार फक्त सागरी मार्गाने चालत असे. दक्षिण भारतीच्या पश्चिम किनारपट्टीवर अनेक बंदरे होती. या बंदरांचे १) कोकण गट २) तुळुनाड गट ३) मलबार गट ४) माबार गट, ५) तेलंगणा गट असे पाच गटात वर्गीकरण करण्यात आले होते. तुळूनाडू गटातील बंदरे उत्तरेकडील गोवा ते दक्षिणेकडे माउंट, दिल्ली येथपर्यंत पसरलेली होती. आणि त्यामध्ये मीरजान, होंनावर, भटकळ, बारकुर, बसरुर, मंगळूर, आणि कुंबळा यासारख्या महत्त्वाच्या बंदरांचा समावेश असे. कोकण गटामध्ये तो व्यापार कोकण किनारपट्टीवरील बंदरातून केला जात होता. उदा. चौल, दाभोळ, राजापूर, वेगुर्ला, गोवा इ.

बर्बोसाने गोवा बंदराविषयीचे वर्णन आपल्या प्रवास वृत्तांतात केले आहे. राज्यकर्त्यांना गोव्याच्या व्यापारापासून बराच महसूल मिळत असे. त्याकाळात उत्तम दर्जाचे घोडे आयात केले जात होते. प्रत्येक वर्षी ओरमुझ येथून घोडे जहाजाद्वारे गोव्याला आणले जात असत. विजयनगर व दख्खनचे व्यापारी ते घोडे खरेदी करत असत. गोवा येथून ओरमुझला गहू, तांदूळ, साखर, लोखंड, मिरे, आले, निरनिराळ्या प्रकारचे मसाले आणि औषधे इत्यादी माल पाठवले जाई. मक्का आणि एडन येथून अनेक व्यापारी माल वाहून नेणारी जहाजे सुद्धा गोव्याला येत असत. त्याचबरोबर विजयनगर साम्राज्यात अंतर्गत व्यापार मलबार, चौल, दाभोळ आणि खंबायत येथून येणाऱ्या जहाजांनी होत असे.

**अ) तुळूनाडू गट :**

१. या गटातील मिरजान हे आघनासीन नदीच्या काठावर वसलेले पहिले सागरी बंदर होते. मलबार येथील झाम्बुको जहाजे येथे नारळ, खोबरेल तेल आणि गूळ हा माल घेऊन येत असत, आणि परत जाताना काळा जाडाभरडा तांदूळ नेत असत. येथून होन्नावर आणि मलबार यामध्ये काळा तांदूळ, नारळ, खोबरेल तेल, ताडगूळ आणि माडाची दारू यांचा व्यापार चालत असे.

२. भटकळ हे एक महत्त्वाचे बंदर होते, या बंदराविषयी वर्थेमा हा प्रवासी वर्णन करतो की, भटकळ हे भारतातील एक चांगले शहर असून तटबंदी असलेले अतिशय सुंदर आणि समुद्रापासून साधारणतः एक मैल दूरवर असे ते शहर होते. येथे मूर व ख्रिश्चन लोक राहत असत. भटकळहून ओरमुझला होणाऱ्या निर्यातीमध्ये पांढरा तांदूळ, पिठीसाखर आणि लोखंड यांचा समावेश होत असे. येथून अरबस्थान व इराण येथील मूर लोकांकडून चांगल्या प्रतीच्या बेहड्यांच्या साठ्याला मोठी मागणी असे. मक्का येथे जाणाऱ्या जहाजातून मूर लोक मसाले नेत असत. मलबारी लोक तेथून लोखंड व साखर यांची खरेदी करत असत. ओरमुझ येथील जहाजे भटकळला प्रत्येक वर्षी अनेक घोडे आणि मोती आणत असत.

३. मलबारी लोक ताडगूळ, नारळ, खोबरेल तेल, माडाची दारू, मोठ्या प्रमाणावर मिरे व औषधे आणून राज्यात विकत असत. आयात केलेल्या वस्तूंमध्ये नाणी पाडण्यासाठी, स्वयंपाकाची भांडी आणि इतर भांडी यासाठी लागणारे तांबे, पारा, हिंगुळाचा तांबडा रंग,पोवळे, तुरटी आणि हस्तीदंत यांचा समावेश होत असे. त्या प्रदेशात मिऱ्याचे खूप उत्पादन होत असे.

४. शरावती नदीवर वसलेले होंनावर हे बंदर दक्षिणेतील महत्त्वाचे बंदर मानले जात होते. 'होन्नावर' याचा शब्दशः अर्थ म्हणजे सोन्याचे खेडे होय. या बंदराचे वर्णन करताना पीयट्रो डेल्ला व्हेल्ले म्हणतो की, ओनोर हे एक समुद्राजवळील लहान ठिकाण आहे पण त्याचे बंदर म्हणून महत्त्व निर्विवाद आहे. ते नदीच्या दोन फाट्या पैकी एक फाटा दक्षिणेकडे आणि दुसरा उत्तरेकडे गढीपाशी मिळतो आणि त्या नद्या एका प्रवाहाने नदीला मिळतात. होन्नावर नगराच्या जवळील शरावती नदीचा प्रवाह २०० ते ३०० टनाची जहाजे जाऊ शकते इतका व मोठा होता.

५. किनाऱ्यावरील कुंदापूर नदीच्या मुखाशी वसलेले बसरूर दुसरे महत्त्वाचे व्यापारी शहर होते. अरबस्तान इजिप्त यासारख्या देशांमधून लोक येथे व्यापार करण्यासाठी लोक येत असत. येथील तांदूळ मलबार किनाऱ्यावर असलेल्या सैनिकांसाठी पाठविला जात असे. तसेच पोर्तुगीज हे गोव्यासाठीसुद्धा तांदूळ येथूनच घेत असत. येथून ६ ते ८ जहाजे तांदूळ मस्कत येथे निर्यात होत असत. तेथून परत येताना घोडे, खजूर, मोती आणि इतर व्यापारी माल अरबस्थानहून आणत असत. बसरुर येथून सडलेला आणि स्वच्छ तांदूळ मोठ्या प्रमाणावर मलबार, ओरमुझ, एडन, कन्नूर व कालिकत येथे निर्यात केला जात असे.

६. अलेक्झांडर हॅमिल्टन यांच्या मताप्रमाणे कर्नाटक वसाहतीमध्ये मंगळूर हे सर्वात मोठे व्यापाराचे केंद्र होते. सतराव्या शतकाच्या अखेरीस त्याचे महत्त्व कमी झाले असले तरी ते मलनाड प्रदेशाची बाजारपेठ म्हणून प्रसिद्ध होते. मंगळुर येथून एडन आणि मलबार येथे काळा तांदूळ निर्यात होत असे. तसेच तेथून मिरे ही निर्यात होत असे.

**ब) मलबार गट :**

१. मलबार येथून पंचवीस परकीय बंदरांबरोबर व्यापार चालत होता. आफ्रिका, युरोप, अरेबिया, इराण, सिलोन आणि नैऋत्य अशिया या सहा परदेशी बाजारपेठा बरोबर त्यांचा व्यापार चालत असे. पूर्व आफ्रिकेच्या किनाऱ्यावरील प्रमुख व्यापारी केंद्र म्हणजे सोफाला, मोझांबिक, मोंबासा व मानाडॉक्सी होती.

सोफाला आणि मोझांबिक यांच्यामध्ये सोन्याचा व्यापार चालत असे. नैऋत्य आशियातील मलाक्का, जावा, सुमात्रा, मोलुक्का बेटे, बंदा, बोर्निया व सेलेबिज ही बाजारपेठेची केंद्रे होती. मलाक्का येथून चिनी मातीच्या वस्तू, झिलाईदार वस्तू, कापूर व सुगंधी द्रव्य आयात केली जात असत. जावा व सुमात्रा येथून सोने आणि मीरे येत असे. मोलुक्का येथून लवंगा येत असत तर जायफळ आणि जायपत्री हे बंदा येथून येत असे.

२. मलबार गटातील प्रमुख सागरी बंदरे म्हणजे कन्नानोर, धर्मपट्टनम, कालिकत, कोचीन, कायनकोलम व कोईलोन हे होती. येथून दाभोळ, चौल, गोवा, खंबायत, कोरोमंडल किनारा, सिलोन, मालदीव बेटे, बंदा व ओरमुझ या बंदराबरोबर व्यापार चालत असे. कोचीन बंदरातून सुपारी, कोको, मिरे, गुळ व ताडगूळ यांचा व्यापार कोरोमंडळ किनारा, दाभोळ, चौल व खंबायत याबरोबर चालत असे. मलबार गटातील सर्वात दक्षीणेकडील सागरी बंदर कुईलोन हे होते. या महत्वाच्या बंदराचा पूर्वेकडील देशाशी विशेषतः चीनशी चांगला व्यापार चालत असे. चीनी वस्तूचे ते एक महत्वाचे केंद्र बनले होते. येथून विविध वस्तू सिलोन, कोरोमंडळ किनारा, बंगाल, मलाक्का, सुमात्रा व पेगू, येथे निर्यात केल्या जात असत. कुईलोनमध्ये मोठ्याप्रमाणावर उपलब्ध असलेले मिरे ही व्यापाराची प्रमुख वस्तू होती.

**क) कोरोमंडळ/माबार गट :**

विजयनगरच्या पूर्व किनाऱ्यावरील बंदराचा महत्वाचा गट होय. माबार गटातील किंवा कोरोमंडळ गटातील प्रमुख बंदरे म्हणजे कायल, नेगापट्टम, मैलापूर व पुलकित ही होती. कोरोमंडळ किनाऱ्यावरील व्यापाऱ्यांना शेट्टी असे म्हणत. परकीय प्रवासी बार्बोसा याने दिलेल्या माहितीवरून असे समजते की, फक्त मैलापूर व पुलिकत ही महत्त्वाची बंदरे विजयनगरचा एक भाग होती. मलबारहून येणारी व्यापारी जहाजे प्रत्येक वर्षी तांदूळ नेण्यासाठी कोरोमंडल किनाऱ्यास येत असत. खंबायतहून तांबे, पारा, हिंगूळ, मिरे व इतर वस्तू येत असत. मलाक्का, चीन व बंगालहून विविध प्रकारचे मसाले आणि औषधे येत असत. पेगु येथून पुलिकत येथे मोठ्या प्रमाणावर माणिक व कस्तुरी यांची निर्यात केली जात असे. तसेच पुलिकत मध्ये मोठ्या प्रमाणावर छापील कापडाचे उत्पादन केले जात होते. ते मलाक्का, पेगू, सुमात्रा, मलबार व गुजरात येथे निर्यात केले जात असे तर खंबायत, मलबार व मक्का येथून तांबे पारा, हिंगूळ, खांबयती वस्तू, रंग, धान्य, तसेच मक्का येथील मखमल व गुलाब पाणी यांची आयात केली जात असे.

**ड) तेलंगणा गट :**

या गटात मोटुपल्ली आणि मसुलीपट्टम ही दोनच महत्त्वाची बंदरे होती. मोटुपल्ली येथील व्यापारी मोती, गुलाबपाणी, चंदन, चीनी कापूर, हस्तिदंत, कापराचे तेल, तांबे, जस्त, रेझीन, रेशीम धागा, पोवळे, अत्तरे, सुगंधी द्रव्य, मिरे व सुपारी यांचा व्यापार करत असत. मोटूपल्ली आणि मसुलीपट्टम ही दोन्ही शहरे हिरे, उत्तम नाजूक कापड, मोठी रत्ने आणि मोती यासाठी प्रसिद्ध होती.

**२) अंतर्गत व्यापार :**

विजयनगर साम्राज्यात अंतर्गत व्यापार तीन प्रकारचा होता. अ) किनाऱ्यावरील व्यापाराचा उल्लेख सागरी व्यापार जाणून घेताना केला आहे. ब) नद्यांमधून केला जाणारा व्यापार त्या कालखंडात खंबायत, भटकळ, मंगळूर, मलबार, कोचीन, पुलिकत, कायल, मसुलीपट्टम या बंदरांमध्ये लहान गलबततून वाहतूक केली जात असे. यामध्ये तांदूळ, नारळ, खोबरेल तेल, गूळ आणि इतर वस्तू मलबार होऊन खंबायत व सुरत येथे पाठविल्या जात. तेथून सुती कापड व रेशमी वस्त्रे इत्यादी मलबार किनाऱ्यावर आणल्या जात असत. क) खुष्कीच्या मार्गाने केला जाणारा व्यापार मलबार भागातील पदार्थ कायल, नागापट्टम, पुलिकत, मोटुपल्ली व कन्याकुमारी याला वळसा घालून मसुलीपट्टम येथे पाठविल्या जात. तर कायल येथून कच्चे मोती, पुलिकत येथून कापड, मोटुपल्ली व मसुलीपट्टम येथून हिरे व रत्नांचे खडे, तर मलबार, गोवा, सुरत व खंबायत येथे व त्याचप्रमाणे बंगालच्या किनाऱ्यावर पाठवले जात असत.

तत्कालीन काळातील परदेशी प्रवासी पियट्रो डेल्ला व्हेल्ले, बार्बोसा, पेईस, अब्दुल रझाक व निकोलो कोंटी यांच्या प्रवास वृत्तांतातून विजयनगर साम्राज्यातील रस्त्या विषयी तुरळक माहिती मिळते. जमिनीवरून वाहतूक करण्यासाठी हत्ती, घोडे, खेचरे, पालख्या, बैलगाड्या, डोली, ओझी वाहून नेणारे बैल, तट्टे, इतकेच नव्हे तर म्हशी व गाढवे यांचाही वापर केला जात असे. जमिनीवरून केल्या जाणाऱ्या व्यापारी मालामध्ये मिरे, सुपारी, फळे, चंदनी लाकूड, वेलदोडे, जिरे, हिंग, लोखंड, डाळी, मोहरी, मेथी, सुके खोबरे, खजूर, चिंच, कात, सुती व रेशमी कापड, रेशीम गोंडे, तंबाखू, हळद, आले, सुंठ, बांबूच्या टोपल्या, गुळ, तूप, तेल, मीठ, तांदूळ, रागी आणि इतर धान्य यांचा समावेश होत असे.

**३) नद्यांमधून केला जाणारा व्यापार :**

याकाळात नदीमार्गे केला जाणारा व्यापार चालत असे. पण मालाच्या आयात निर्यातीवर वर बऱ्याच मर्यादा पडत असत. येथे पश्चिम घाट व पूर्व घाट यांनी बराच प्रदेश व्यापलेला होता या पर्वतांच्या रांगा समुद्रकिनाऱ्यापर्यंत गेल्या होत्या. पश्चिम घाट हा दक्षिणोत्तर एक हजार मैल लांब होता. त्याच्या काही रांगा पूर्वेकडे लांबवर पसरलेल्या होत्या याला सह्याद्रीच्या पर्वतरांगा असे म्हणतात. पूर्वघाट सुद्धा उत्तर–दक्षिण असा तेलंगण व कोरोमंडल या भागातून पसरलेला होता. त्याचे दक्षिणेकडील टोक पश्चिमेकडे वळून निलगिरी पर्वताजवळ पश्चिम घाटाला मिळाले होते.

विजयनगर साम्राज्यात मुख्यतः दोन नद्यांची खोरी होती. १) कृष्णा नदीचे खोरे यात तुंगभद्रा व भीमा या मुख्य उपनद्या होत्या आणि ३) कावेरी नदीचे खोरे. दक्षिण भारतातील नद्या वर्षातील काही दिवसच जलमार्ग म्हणून उपयोगी होत्या. यातून वाहणारे पाणी मोसमी पावसाचे होते. शिवाय या नद्या रुंद व खोल नव्हत्या तरीसुद्धा या नद्यांतून काही वाहतूक केली जात असे. दक्षिण भारताच्या पश्चिम भागातील गंगावळी, शरावती व नेत्रावती या सारख्या नद्या होत्या. या नद्यामार्गे केला जाणारा व्यापार हा लहान होड्या, तरफा व गलबते यांच्या साह्याने केला जात होता.

## ४) व्यापारी जमाती :

विजयनगर काळात स्थानिक व्यापारी आपल्या कुवतीनुसार त्यांचा व्यापार चालवीत असत. छोटे दुकानदार आणि शेतकरी हेही स्थानिक व्यापारात भाग घेत असत. खेड्यामध्ये तयार होणाऱ्या वस्तू एक तर खेड्यातल्या बाजारात विकल्या जात असत किंवा जवळच्या एखाद्या मोठ्या गावातील आठवडी बाजारात किंवा जत्रेत पाठवल्या जात असत.

१. विजयनगर काळातील व्यापारी जमातीमध्ये बनजिग, शेट्टी, मलबारी बनिया व रेड्डी यांचा समावेश होत असे. वीर बनजिग हे कर्नाटकातून येत असत. शेट्टी या जमातीचे लोक कर्नाटक, केरळ, तामिळनाडू आणि तेलंगण येथे आढळून येतात.

२. तेलंगणातील शेट्टी लोक सिलोनहून हत्ती, ओरमुझहून घोडे, गोव्याहून कस्तुरी व चीनहून सुंदर रेशीम आयात करत असत. तसेच पंजाबहून कापराची झाडे आणत असे. या सर्व वस्तू विजयनगर, कोंडाविडू, गुलबर्गा आणि ओरिसा येथील सत्ताधाऱ्यांना विकत असत. मलबार येथील शेट्टी लोक रत्ने, मोती, पोवळे, सोने आणि चांदी यांचे व्यवहार करत असत. हे न्युनिझ याच्या वर्णनावरून दिसून येते की, या काळात ब्राह्मण लोकांचा ही एक व्यापारी वर्ग होता. ब्राह्मण लोक व्यापारात प्रामाणिक, अचूक आणि हुशार असून हिशोबात ते चलाख असत. पण कष्टाच्या कामांमध्ये ते कमी पडत असत.

३. गुजराथी बनीया लोक कोचीन, कन्नूर आणि कालिकत येथे स्थायिक झालेले होते आणि निरनिराळ्या ठिकाणच्या निरनिराळ्या वस्तूंचा व्यापार ते करत असत. ते राजाला त्याच्या व्यापारावर मोठ्या प्रमाणात कर देत असत. विविध वस्तूंचा व्यापार करण्यासाठी ते निरनिराळ्या देशांना भेटी देत असत.

४. दक्षिण भारतातील व्यापारी संघाचे अस्तित्व हे त्या भागातील व्यापारी व्यवस्थापनाचे एक वैशिष्ट्य होते. हे व्यापारी संघ दोन प्रकारचे असत. प्रादेशिक संघ आणि व्यावसायिक संघ प्रादेशिक संघामध्ये एका प्रदेशात राहणारे परंतु निरनिराळ्या वस्तूंचा व्यापार करणारे व्यापारी असत. तर व्यावसायिक संघांमध्ये फक्त एका प्रकारच्या वस्तूचा व्यापार करणारे व्यापारी एकत्र येत असत. उदाहरणार्थ महानाड-शेट्टी हे पहिल्या गटात येत असत तर तांबुल शेट्टी हे दुसऱ्या प्रकारात मोडत असत.

## ५) व्यापारी केंद्रे :

विजयनगर काळात चालत असलेला समुद्रावरील आणि जमिनीवरील व्यापार निरनिराळ्या ठिकाणी भरभराटीला आलेले उद्योगधंदे, जलमार्ग व खुष्कीच्या मार्गामुळे शहरांची आणि गावांची वाढ झाली. यामुळे देशांतर्गत महत्त्वाची शहरे नावारूपास आली. यामध्ये विजयनगर शहर, आरग, इक्केरी, बिदनूर, मदुराई, श्रीरंगपट्टणम, पेनुकोंडा, उदयगिरि, चंद्रगिरी, तंजावर, कोंडविडु या प्रादेशिक राजधानीच्या शहरांचा समावेश होत असे. कोहिनूर, बनवासी, श्रीशैलम्, कालहस्ती, तिरुपती, चिदंबरम, श्रीरंगम् आणि रामेश्वरम् या तीर्थक्षेत्रांचा यामध्ये समावेश होतो.

१. विजयनगर शहराचे वर्णन करताना डोमिंगो पेस म्हणतो की, या रस्त्यावर अनेक व्यापारी अतिशय सुंदर घरांमध्ये राहत असत. त्यांच्याकडे अनेक प्रकारचे माणीक, हिरे, पाचू, मोती आणि कच्चे मोती इत्यादी विक्रीसाठी असत. रोज संध्याकाळी येथे एक जत्रा भरत असे. तेथे घोडे, लिंबे, संत्री, द्राक्षे, लाकूड इत्यादी वस्तू विक्रीसाठी ठेवण्यात येत असत. या शहरांमध्ये देशोदेशीचे आणि निरनिराळ्या जमातीचे लोक आढळतात. पेईसला हे शहर रोम सारखे भव्य आणि अतिशय सुंदर वाटते.

२. मलनाड प्रदेशातील इक्केरी हे शहर भरभराटीला आलेले होते. हे शहर अतिशय मोठे होते. येथे बाजारपेठा व धान्याची कोठारे बांधण्यात आली आहेत. तसेच रस्तेही मोठे होते.

३. बिदनूर हे पश्चिम कर्नाटकमधील वैभवशाली शहर होते. विल्क्सच्या मतानुसार ते पूर्वेकडील देशामधील सर्वात समृद्ध व्यापारी शहर होते. संपूर्ण दक्षिण भारताचे धान्याचे कोठार म्हणून बिदनूर प्रसिद्ध होते. निरनिराळे कारागीर व हस्तोद्योग करणारे लोक येथे मोठ्या प्रमाणात राहत होते. बिदनूर हे दक्षिण भारतातील सर्वात मोठ्या आणि दाट लोकवस्तीच्या शहरांपैकी एक शहर होते.

४. सागर हे दक्षिण भारतातील महत्त्वाचे देशांतर्गत शहर होते हे शहर नियोजनबद्ध असे होते बाजारपेठचे शहर म्हणून याची प्रसिद्धी दूरवर पसरलेली होती. त्यामुळे देशातील विविध भागातील व्यापारी या प्रसिद्ध व्यापारी केंद्रामध्ये येत असत. येथून देशातील उत्पादन केलेल्या वस्तू बाहेर पाठविल्या जात असत. येथे मिरे, कापड, लोखंडव धान्य या वस्तू हेग येथे निर्यात केल्या जात असत, आणि त्याच्या मोबदल्यात मीठ, नारळ, टेरा, जपानीका या वस्तू आयात केल्या जात असत. येथे उत्तम दर्जाचे चंदनी लाकूड याचा व्यापार चालत असे. बुकानन याने केलेल्या नोंदीनुसार असे दिसून येते की प्रत्येक वर्षी सागर येथून निर्यात केल्या जाणाऱ्या सुपारीचे वजन सुमारे आठ हजार लोड आणि मिऱ्याचे वजन सुमारे ५०० लोड इतके असे. प्रत्येक लोड सुमारे आठ मण अथवा १९६ १/२ पौंड वजनाचा असे.

५. गैरसोप्पा हे दुसरे महत्त्वाचे शहर दक्षिण भारतात होते. शरावती नदी वरच्या धबधब्याला त्याचे नाव दिल्यामुळे हे शहर अमर झाले. तेथे मिऱ्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जात होते म्हणून मिऱ्याच्या व्यापारासाठी हे शहर प्रसिद्ध होते. अशाप्रकारे विजयनगर साम्राज्यात व्यापार चालत असे या व्यापाराला या साम्राज्यातील राज्यकर्त्यांनी राजाश्रय देऊन तो वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. तसेच साम्राज्याचा आर्थिक पाया मजबूत करण्याचाही प्रयत्न या राज्यकर्त्यांनी केला होता. या व्यापारामुळे अनेक शहरांचा व्यापारी केंद्र म्हणून विकास झाला व ही शहरे देशामध्ये प्रसिद्ध झाली.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–३**

अ) रिकाम्या जागा भरा

१) महुआना हा प्रवाशी ............... या देशाचा रहिवाशी होता.

अ) ग्रीक ब) चीन क) रोम ड) इटली

२) ............. या इतिहासकाराच्या मते, उत्कृष्ट मलमलीच्या एका संपूर्ण ताग्याची किंमत १०० टंका असे.

अ) इब्न बतुता ब) महूआना क) आफीफ ड) वर्थेमा

३) ............... या राज्यात तुस्सार हे उत्कृष्ट प्रतीचे कापड होते.

अ) आसाम ब) मणिपूर क) गुजरात ड) ओरिसा

४) सुलतानशाही काळात कापड उद्योगाचे ............... प्रकार होते.

अ) ४ ब) ५ क) ३ ड) २

५) ............... येथे उत्कृष्ट प्रतीचे आणि तलम मलमल तयार होत असे.

अ) गुजरात ब) बंगाल क) आग्रा ड) दिल्ली

६) ............... या प्रदेशाने या मलमली कापडाचे सहा प्रकार सांगितले.

अ) महुआना ब) बार्बोसा क) बरणी ड) अफीफ

७) ............... हे शहर रेशीमगालीच्या साठी प्रसिद्ध होते.

अ) आग्रा ब) फत्तेपूरसिक्री क) बंगाल ड) गुजरात

८) ............... हे बंदूकांच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध होते.

अ) मेवाड ब) मुलतान क) लाहार ड) सियालकोट

९) ............... या राज्यात धनुष्य बाण आणि विशिष्ट प्रकारची खंजीर तयार केले जात असत.

अ) गोवळकोंडा ब) मेवाड क) गुजरात ड) लाहार

१०) ............... या लोकांनी प्रथम कागदाचा शोध लावला.

अ) ग्रीक ब) चीनी ड) गुजराती ड) राजस्थानी

११) दक्षिण भारतातील बंदराचे ............... गटात वर्गीकरण करण्यात आले होते.

अ) ५ ब) ६ क) ७ ड) ८

१२) ओरमुझ येथून ............... जहाजाद्वारे गोव्याला आणले जात असत.

अ) हत्ती ब) घोडे क) सोने ड) चांदी

१३) तुळूनाडू गटातील पहिले सागरी बंदर ............... हे होते.

अ) मिरजान ब) खंबायत क) मलबार ड) एडन

१४) होन्नावर हे बंदर ............... नदीवर वसलेले होते.

अ) कृष्णा ब) कावेरी क) शरावती ड) तुंगजभद्रा

१५) .............. हा परकीय प्रवासी म्हरतो की, भारताच्या पश्चिम किनाऱ्या लगतच्या भागात लोखंड सापडत असे.

अ) निकोलो कोंटी ब) अफीफ क) बार्बोसा ड) जोर्डासन

१६) ............... येथे तांबे सापडते.

अ) कोलार ब) म्हैसूर क) कुईलोन ड) बुदिहाळ

१७) लालसर साखरेला दक्षिण भारतात ............... म्हणतात.

अ) जगरी साखर ब) ताडाची साखर क) बारीक साखर ड) स्पटिक साखर

१८) 'होन्नावर' याचा शब्दाश: अर्थ म्हणजे ............... होय.

अ) सोन्याचे खेडे ब) चांदीचे खेडे क) मासळीचे खेडे ड) मिरे

१९) बसरूर हे व्यापारी शहर ............... या नदीच्या मुखाशी वसलेले होते.

अ) शरावती ब) कुंदापूर क) कावेरी ड) ताम्रपर्णी

२०) ............... येथे 'चिहिली' या प्रकारच्या कापडाचे उत्पादन केले जात होते.

अ) कोईमतूर ब) पुलीकत क) मलबार ड) चौल

## ३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ :

- बरिद: सूचना अधिकारी
- उलेमा: धार्मिक शिक्षण देण्यासाठी नियुक्त केलेली विद्वान मुस्लिम व्यक्ती
- इक्ता: जमीन महसूल गोळा करण्यासाठी सामंताना वाटण्यात आलेला प्रदेश
- दिवाण-ए-अमीरकोही : मुहंमद तुघलकाच्या काळात हे कृषी मंत्रालय म्हणून विभाग सुरू करण्यात आला.
- वकील-ए-दर : हा विभाग शाही महाल व सुलतान यांच्या व्यक्तिगत सेवेसाठी होता. यालाच राजशिष्टाचार विभाग या नावाने ओळखले जाते.
- कोट्टम/वलनाडू : विजयनगर साम्राज्यात गावाचा कारभार पाहण्यासाठी 'ग्राममंडळ' असे त्याच्या प्रमुखास 'अय्यंगार' असे म्हणत.
- स्थळ : विजयनगर साम्राज्यात गावाच्या समूहाला 'स्थळ' किंवा 'सीमा' असे म्हटले जाईल.
- खालसा जमीन : सुलतानाच्या व दरबाराच्या खर्चासाठी या जमिनीचा उपयोग केला जात असे.
- खराज : हा कर उत्पन्नाच्या १/३ पेक्षा कमी व १/२ पेक्षा जास्त घेतला जात नसे.
- खम्स : युद्धातील लुटीतून मिळालेली संपत्ती ही खम्स या नावाने ओळखली जाईल.

- नसक : 'नसक' म्हणजे पिकाची अंदाजाने केलेली किंमत होय.
- कुदी : विजयनगर साम्राज्यात शेतमजुरास 'कुदी' या नावाने संबोधले जाई.

**३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

स्वयं अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे

१) - अ) अरिझ-ए-मुमालिक
२) - अ) हत्तीविभाग
३) - ब) शिकदार
४) - ब) मुकदम
५) - ब) दिवाण-ए-बरिद
६) - अ) सुलतान
७) - क) आमीर-ए-आखुर
८) - क) अल्लाउद्दीन खिलजी
९) - अ) १३३६
१०) - अ) १३४७
११) - ब) ४
१२) - अ) २०
१३) - ब) कोट्टम
१४) - अ) अय्यंगार
१५) - क) इटली
१६) - ब) विजयनगर
१७) - ब) सभा नायक

स्वयं अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे

१) - क) फिरोजशहा तुघलक
२) - क) फेरीस्ता
३) - क) मुहंमद तुघलक
४) - अ) २५
५) - क) १२००
६) - ब) अल्लाउद्दीन खिलजी
७) - अ) २
८) - अ) १०
९) - अ) खम
१०) - ब) बटाई पद्धत
११) - क) २
१२) - अ) ब्रह्मदाय
१३) - ब) मठांना
१४) - ब) कुदी
१५) - क) १/२
१६) - ब) कोरडी जमीन
१७) - ब) अग्रहार
१८) - अ) ४
१९) - ब) पेरणी क्षमता
२०) - ब) क्षेत्र पद्धती

स्वयं अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे

| | |
|---|---|
| १) – ब) चीन | २) – अ) इन्ब बतुता |
| ३) – ड) ओरिसा | ४) – क) ३ |
| ५) – ब) बंगाल | ६) – अ) महुआना |
| ७) – ब) फत्तेपूरसिक्री | ८) – अ) मेवाड |
| ९) – क) गुजरात | १०) – ब) चीनी |
| ११) – अ) ५ | १२) – ब) घोडे |
| १३) – अ) मिरजान | १४) – क) शरावती |
| १५) – ड) जोर्डासन | १६) – क) कुईलोन |
| १७) – अ) जगरी साखर | १८) – अ) सोन्याचे खेडे |
| १९) – ब) कुंदापूर | २०) – अ) कोईमत्तूर |

## ३.६ सारांश :

मध्ययुगीन कालखंडात राज्य विस्ताराच्या बरोबरच प्रशासन हा महत्त्वाचा घटक मानला जात होता. या दृष्टिकोनातून सुलतानशाही व विजयनगर कालखंडात त्या-त्या राज्यकर्त्यांनी प्रशासनाची उत्तम व्यवस्था केली होती. प्रशासन चालवण्यासाठी राज्याची वेगवेगळ्या विभागात विभागणी करण्यात आली होती. या विभागावर अधिकाऱ्यांच्या नेमणूका करून तेथील प्रशासन सुयोग्य करण्याचा प्रयत्न केले. प्रशासनाचे सर्व अधिकार राज्यकर्त्यांकडे असल्याने त्याचे प्रशासनावर नियंत्रण होते. स्वतः राज्यकर्ते त्यामध्ये रस घेत असल्याने प्रशासनाला गती मिळाली होती. उदाहरणार्थ अल्लाउद्दीन खिलजी, बल्बन, मुहंम्मद तुघलक, फिरोजशह तुघलक, कृष्णदेवराया या राज्यकर्त्यांनी प्रशासनामध्ये वेगवेगळ्या योजना राबविले.

राज्यकारभाराच्या दृष्टिकोनातून अर्थव्यवस्था अतिशय महत्त्वाची मानली जाते. या अर्थव्यवस्थेवर राज्याचा सर्व डोलारा उभा होता. प्रशासन आणि वेगवेगळ्या योजना राबवायच्या असतील तर पैसा हा घटक सर्वात महत्त्वाचा होता. त्या दृष्टिकोनातून या राज्यकर्त्यांनी आपल्या कारकीर्दीत शेती उद्योग व व्यापार याला राजाश्रय दिला. या उद्योग-व्यापारामुळे अनेक बंदरे व शहरे नावारूपास येऊन ती जगप्रसिद्ध बनली. बाह्य देशाशी व्यापार मोठ्या प्रमाणात होऊ लागल्यामुळे राज्याचा आर्थिक पाया मजबूत होण्यास मदत झाली. शेतीच्या दृष्टिकोनातून या राज्यकर्त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण पावले उचलल्याचे दिसते. अल्लाउद्दीन खिलजी, फिरोजशहा तुगलक, यांनी तलाव बांधले, मुहंम्मद तुघलक याने अमीर-ए-कोही यासारखा विभाग सुरू केला. त्याचबरोबर या राज्यकर्त्यांनी जमिनीची मोजणी करून तीची प्रतवारी ठरवून त्यावर महसुल आकारण्यात आला. या महसुल वाढीसाठी शेतकऱ्यांना अवजारे, बी-बियाणे, पाणी, कर्ज याची उपलब्धता करून दिली. त्यामुळे राज्याचा महसुल वाढण्यामध्ये मदत झाली. सुलतानशाही काळात या उद्योग

व्यवसायामुळे राज्याच्या गरजा भागविण्यास मदत झाली. त्याचबरोबर राज्याची आर्थिक उन्नती होण्यासही मोठा हातभार लागला.

## ३.७ सरावासाठी स्वाध्याय

अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे द्या

१. सुलतानशाही कालीन केंद्रीय व प्रांतीय प्रशासनाची चर्चा करा.

२. विजयनगरकालीन केंद्रीय व प्रांतीय प्रशासनाची माहिती द्या.

३. सुलतानशाही कालीन जमीन महसुल विषयी माहिती द्या.

४. सुलतानशाही कालीन उद्योगधंद्या विषयी चर्चा करा.

५. विजयनगर साम्राज्यातील उद्योगधंद्याचे वर्णन करा.

६. सुलतानशाही कालीन व विजयनगरकालीन परदेशी व्यापाराची माहिती द्या.

ब) टिपा लिहा.

१. सुलतानशाही कालीन केंद्रीय प्रशासन

२. सुलतानशाही कालीन जमीन महसूल व्यवस्था

३. विजयनगरकालीन केंद्रीय प्रशासन

४. सुलतानशाही कालीन अंतर्गत व्यापार

५. विजयनगरकालीन अंतर्गत व्यापार

६. सुलतानशाही कालीन कापड उद्योग

७. विजयनगरकालीन व्यापारी केंद्रे

## ३.८ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके :


१. मुखिया हरबंस, मध्यकालीन भारत: नए आयाम, राजकमल प्रकाशन, दिल्ली २०११

२. डॉ. परुथी आर.के., मध्यकालीन भारत में शासन व्यवस्था, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, २००५

३. लेले माधव, विजयनगरच्या साम्राज्याचा इतिहास, पार्श्व पब्लिकेशन, कोल्हापूर, २०१९

४. श्रीवास्तव नीरज, मध्यकालीन भारत-प्रशासन समाज एवंसंस्कृती, ओरीयंट ब्लैकसोन, हैद्राबाद, २२९

५. हबीब इरफान, अनु. विजया कुलकर्णी, मध्ययुगीन भारत, नेशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली, २०१३

६. डॉ. कोलारकर, श. गो., मध्ययुगीन भारताचा इतिहास (१२०६ते १७०७), मंगेश प्रकाशन, नागपूर २०१४.

७. प्रो. सतीश चंद्र, मध्यकालीन भारत, ओरीएंट ब्लैकस्वान, हैदराबाद, २०१३.

८. प्रो. वर्मा, हरीश्चंद्र, मध्यकालीन भारत, भाग -१, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली २०१५.

९. चिटणीस, के. एन., मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था, पुणे १९९१.


❑❑❑

## घटक ४
# धर्म आणि वास्तूकला

**अनुक्रमणिका**


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ सुफी संप्रदाय

४.२.२ भक्ती चळवळ : कबीर आणि सूरदास

४.२.३ वास्तूकला : कुतुबमिनार (दिल्ली सल्तनत), हंपी (विजयनगर)

४.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

४.४ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ संदर्भ ग्रंथ


## ४.१ उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर खालील गोष्टींचे आकलन होईल.

- सुफी संप्रदायाच्या उदयाची पार्श्वभूमी समजेल.
- सुफी संप्रदायाचा प्रसार आणि लोकप्रियता समजून घेता येईल.
- सुफी संप्रदायाचे तत्वज्ञान समजून घेता येईल.
- भक्ती चळवळीचा उदय आणि प्रसार याची माहिती मिळेल.
- भक्ती चळवळीमधील संत कबीर व सूरदास यांच्याविषयी माहिती मिळेल.
- दिल्ली सल्तनतमधील वास्तूकलेविषयी माहिती मिळेल.
- विजयनगरकालीन वास्तूकलेविषयी माहिती मिळेल.

## ४.१ प्रास्ताविक

मध्ययुगीन कालखंडात इस्लाम धर्मामध्ये सुफी संप्रदायाची महत्वाची भूमिका होती. नवव्या शतकात सुफी संप्रदयाचा उदय झाला. सुफी संप्रदाय म्हणजे इस्लाममधील गूढ धार्मिक कल्पनांचा अथवा गूढवादाचा उदय होय. राबिया अल-अदाविया, अल-जुनेद आणि बायझिद बस्तामी हे सुरुवातीचे सुफी संत होय. इ.स. १०व्या शतकात सुफी संप्रदाय इस्लामिक साम्राज्याच्या महत्त्वाच्या प्रदेशांमध्ये पसरला. इराण, खुरासान, ट्रान्सोक्सियाना, इजिप्त, सीरिया आणि बगदाद ही महत्त्वाची सुफी केंद्रे होती. ११ व्या शतकापर्यंत त्याचा मोठ्या प्रमाणात विकास झाला.

भक्ती चळवळीने मध्ययुगीन कालखंडात सामाजिक व धार्मिक सुधारणा व परिवर्तनामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. भारतीय इतिहासात भक्ती चळवळ ही लोकप्रिय चळवळ बनली होती. शंकराचार्य, रामानुज, माधवाचार्य, निंबाकाचार्य, वल्लभाचारी, अक्कमहादेवी, जनाबाई, मीराबाई, आंदल, बहिणाबाई, करैक्कल अम्मैयार, कबीर, सूरदास इत्यादी अनेक सतांनी भक्ती चळवळीमध्ये मोलाचे योगदान दिले.

दिल्ली सल्तनत व विजयनगर मधील वास्तूकलामध्ये हिंदू आणि इस्लामिक शैलींचे अद्भुत मिश्रण दिसून येते. दिल्ली सल्तनतच्या उत्कृष्ठ वास्तुकला बरोबरच या काळात विविध कला प्रकारांची भरभराट झाली. विजयनगर कालखंडातही उत्कृष्ट वास्तूंची निर्मिती झाली. यासर्वाचा आढावा सदर प्रकरणात घेण्यात आला आहे.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ सुफी संप्रदाय

**१. सूफी संप्रदायाचा उदय :**

सुफी संप्रदायाचा उदयाचा कालखंड व त्याचे उगमस्थान याबाबत निश्चित माहिती उपलब्ध होत नाही. इ.स. ९ व्या शतकात सुफी संप्रदयाची सुरुवात झाली. कुराणापासून सुफी पंथाचा उदय झाला असे मानले जाते. सुफी पंथात ख्रिश्चन व हिंदू धर्माची काही तत्वे सापडतात. हिंदू धर्मातील भक्ती संकल्पनेचा समावेश सुफी संप्रदायामध्ये आढळून येतो. बौध्द धर्मातील आष्टांगमार्गाचा स्विकार सुफी संप्रदायात करण्यात आला आहे. सुफीवाद हा जीवनाचा एक मार्ग म्हणून ओळखला जातो व त्यामध्ये गूढवादाचा समावेश आहे. सुफी असणे म्हणजे सर्व बंधनांपासून मुक्त असणे आणि शुद्ध विवेक असणे होय. सुफी संप्रदायामध्ये एकूण पाच तात्विक विचार प्रवाह निर्माण झाले होते. सुफीवाद हा संपूर्ण माणूस कसा असावा हे समजून घेण्यावर आधारित आहे. सूफीवाद हा आचाराचा विषय आहे. वैयक्तिक आचरणाशी संबंधित आहे.

सुफी चळवळ पर्शियामध्ये सुरू झाली आणि ११ व्या शतकापर्यंत विकसित चळवळ बनली. अकराव्या आणि बाराव्या शतकात जेव्हा अनेक सूफी संतांनी भारतीय उपखंडात, प्रामुख्याने मुलतान आणि लाहोरमध्ये प्रवास केला तेव्हा सुफीवाद भारतात आला.

## २. सुफी शब्दाची उत्पत्ती :

'सूफी' या शब्दाच्या उत्पत्तीबाबत इतिहासकारांमध्ये विविध मतप्रवाह आहेत. सूफी हा शब्द अरबी भाषेतून आलेला आहे. 'सुफी' हा शब्द 'सफा' पासून निर्माण झाला आहे. सफा म्हणजे शुध्दता होय. सूफीचा अर्थ 'चटई' आसाही आहे. त्यावरून जे चटईवर एका ओळीत बसून ईश्वराची उपासना करतात ते सूफी संत होय. सुफा या मदिनेतील मशिदीच्या समोरच्या चबुतऱ्यावर बसणाऱ्या फकीरांना सूफी असे म्हटले जात होते त्यावरून हा शब्द रूढ झाला आसावा असे मानले जाते. काही इतिहासकारांच्या मते सूफी या शब्दाचा अर्थ 'लोकर' असा आहे. लोकरीचे वस्त्र परिधान करून साधकांनी तपस्या केली, धर्मप्रसार केला त्या संताना सूफी असे म्हटले जात होते. काही इतिहासकारांच्या मते 'सुफी' हा शब्द 'सफ' मधून व्युत्पन्न झाला आहे ज्याचा अर्थ स्वच्छता किंवा शुद्धता आहे कारण सुफींनी मन, शरीर आणि वर्तन यांच्या निरोगीपणावर खूप जोर दिला होता.

## ३. सुफी संप्रदायाचे तत्वज्ञान :

सुफीवादाचे मूळ तत्वज्ञान म्हणजे अस्तित्त्वाचा शोध घेणे आणि ते प्राप्त करणे होय. सुफी संप्रदायामध्ये गुढ़वादी ज्ञानाला महत्त्व आहे. अध्यात्म्याचे ज्ञान मिळविणे म्हणजे परमात्माशी एकरूप होणे होय. अज्ञान हे सर्व दुखाचे मूळ आहे. मोक्ष म्हणजे अज्ञानाचा नाश, अहंकार, आसक्ती याचा निरास आहे. सृष्टी व परमेश्वर हे भिन्न असून सृष्टीची निर्मिती परमेश्वराने केलेली आहे. परमेश्वर निरंतर असून तो सर्वव्यापी व सर्वश्रेष्ठ आहे. सुफी तत्वज्ञानात तीन मतप्रवाह आहेत.

१. **इजादिया :** परमेश्वराने शून्यातून सृष्टी निर्माण केली. सृष्टी व परमेश्वर भिन्न आहेत.

२. **शहुदिया :** परमेश्वर सर्वव्यापी व सर्वश्रेष्ठ आहे.

३. **वजूदिया :** परमेश्वर हे एक सत्य असून सर्वत्र तोच आहे.

सुफी संप्रदायामध्ये साधनमार्गातील सात टप्पे सांगितले आहेत. १. पश्चाताप २. संशय ३. संन्यास ४. दारिद्रय ५. शांतपणा ६. विश्वास ७. समाधान इ. होय. अध्यात्म जीवनातील प्रगतीला सुफी पंथात 'मार्ग' म्हणतात. ईश्वर प्राप्तीसाठी पुढील काही अवस्था मानलेल्या आहेत.

१) उबुदियात – म्हणजे सेवा होय.

२) इश्क – म्हणजे प्रेम आणि ईश्वराची ओढ होय.

३) जाहेद – म्हणजे निवृत्ती. परमेश्वराला सोडून बाकी सर्व गोष्टींचा त्याग होय.

४) मारिफत – म्हणजे ज्ञानप्राप्ती. परमेश्वराच्या स्वरूपाचे ज्ञान होते.

५) वजूद – म्हणजे उन्मादावस्था होय. यासाठी भक्त परमेश्वराची ध्यानधारणा करतो.

६) हकिकत– परमेश्वराला शरण जाण्याची भावना

७) वसल (मत्लन): – परमात्माच्या साक्षात्काराने भक्ताचे हृदय समाधानी होते.

सुफी संप्रदायाचे तत्वज्ञान म्हणजे ईश्वर एक असून तो सर्वव्यापी आहे. तो मंदिर, मस्जिदमध्ये नसून व्यक्तिच्या हृदयात आहे. धार्मिक क्रिया किंवा रोजे पाळणे हा पंथ मानत नाही. परमेश्वराचे निवास स्थान मनामध्ये असते. अहंकाराची भावना मनातून काढून टाकणे गरजेचे आहे. पुर्ण तन्मयतेने व्यक्तिने ईश्वराच्या प्रेमात तल्लीन झाले पाहिजे. सर्व मनुष्य हे एकाच परमेश्वराची लेकरे आहेत त्यामुळे सर्वांबरोबर प्रेमाने वागावे. दुसऱ्याचा तिरस्कार करू नये. जिवनातील गुरूचे स्थान महत्वाचे आहे गुरूशिवाय ज्ञान व गती प्राप्त होत नाही.

**४. सुफीचे आचारशास्त्र :**

सुफी संप्रदायातील आचारशास्त्रानुसार कुराणाचे पठण केले पाहिजे. रोज पाचवेळा नमाज पडले पाहिजे. परमेश्वराचे स्मरण व चिंतण केले पाहिजे. सुफी संप्रदायामध्ये आत्म्याच्या उद्धारास महत्त्व दिले आहे. आत्म्याच्या उद्धारासाठी चार आचार मार्ग सांगितले आहेत.

अ) शरियत – धर्माचरणाचे पालन करणारे नियम यात सांगितले आहेत. त्यात पुढील गोष्टींचा समावेश होतो. कुराणाचे पठन करणे, नमाज पडणे, चिंतन करणे, इद्रिंयाचा निषेध करणे इ. होय.

ब) मलकूत – दैवी आशिर्वाद होय.

क) जबरूत – सिद्धीची अर्थप्राप्ती होय.

ड) लाहूत – परमेश्वरात विलीन होणे.

सूफीवाद म्हणजे आत्मिक सुरुवात आणि इतरांशी संक्रमण करून स्वत:चा विकास होय. सूफींच्या मते, मनुष्य ही ईश्वराची अंतिम आणि सर्वात अद्वितीय निर्मिती आहे, ज्याचे स्वत:चे व्यक्तिमत्व, परिचय आणि जीवनाचा परमानंद आहे मात्र परिपूर्ण नाही. असे मानले जाते की देवाने मनुष्याला स्वत:ची प्रतिमा म्हणून निर्माण केले आणि त्याच्यामध्ये त्याचे सर्व गुणधर्म दिले. जसे आपण देवाला परिपूर्ण मानतो, तेव्हा मानवाने परिपूर्ण बनन्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**५. गुरूभक्ती :**

पीर (शिक्षक) आणि त्याचे मुरीद (शिष्य) यांच्यातील नातेसंबंधावर सूफी प्रणाली खूप अवलंबून होती. प्रत्येक पीरने आपले काम चालू ठेवण्यासाठी वली किंवा उत्तराधिकारी निवडले. सूफी पंथात गुरू भक्तीला अतिशय महत्व आहे. गुरू मार्गदर्शक असल्याने सूफी पंथात गुरूस महत्वाचे स्थान आहे. सूफीगुरूला शेख, पीर कवा मुर्शिद या नावाने ओळखतात तर शिष्याला 'मुरीद' असे म्हणतात. गुरूच्या समाधीची जागा म्हणजे दर्गा होय. दर्ग्याची यात्रा म्हणजे 'जिरायत' होय. गुरूच्या पुण्यतिथी निमित्त जी यात्रा भरते त्यास 'उरूस' असे म्हणतात. प्रथम शिष्याला पीराचा नंतर मुहंम्मद पैगंबराचा व शेवटी परमात्मा स्वरूपाचा साक्षात्कार घडवितो. गुरूभक्तीमध्ये गुरू सांगेल ते करण्याची तयारी शिष्याने ठेवावी लागते.

## ६. भारतातील सूफी पंथातील उपसंप्रदाय (सिलसिला) :

मध्ययुगीन भारतात सूफी संप्रदायाचा प्रसार होऊन त्याच्या अनेक शाखा व उपसंप्रदाय निर्माण झाले. भारतामध्ये प्रमुख असे सहा उपसंप्रदाय म्हणजेच सिलसिला होते हे पुढीलप्रमाणे –

### १. चिश्ती संप्रदाय :

चिस्ती सूफी संप्रदाय भारतात सर्वाधिक लोकप्रिय होता. ख्वाजा अब्दुल चिश्ती याने १२ व्या शतकात याची स्थापना केली. ख्वाजा मुइनुद्दीन चिश्ती यांनी हा संप्रदाय सर्वप्रथम भारतात आणला. पर्शिया हे ख्वाजा मोईनुद्दीन चिश्तीचे जन्मस्थान होते. बाराव्या शतकात त्याने मध्य आशियात प्रवास केला. भारतात येण्यापूर्वी अनेक इस्लामिक शिक्षण केंद्रांना भेट दिली. अजमेर येथे स्थायिक झाले नंतर संपूर्ण उत्तर भारतात त्यांनी चिश्ती संप्रदायाचा प्रसार केला. शेख अब्दुल, शेख मसूद, हजरत गेसूदराज शेख अली हे चिश्ती संप्रदायाचे प्रसार करणारे प्रमुख संत होते.

चिश्ती संताची जीवनशैलीचा व त्यांच्या आचारविचारांचा भारतीयांवर मोठा प्रभाव पडलेला दिसून येतो. अनेक सूफी संतांनी सर्व भारतभर धर्मप्रसाराची केंद्रे स्थापन केली व धर्मप्रसारासाठी अनेक ग्रंथ लिहिले. चिश्ती संताची जीवनशैली राहणीमान अत्यंत साधे, कपडे जाडेभरडे व कोणत्याही प्रकारचा डामडौल नव्हता. शारिरीक इच्छांवर नियंत्रण प्रस्थापित करणे व उपोषणाद्वारे शरीरावर नियंत्रण ठेवणे. कोणत्याही प्रकारचा संचय न करता ते दरिद्री जीवन जगत होते. विवाहित संतानी राजांकडून कोणतीही मदत न स्विकारता शिष्यांनी दिलेल्या मदतीवर व भेटीवर आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालविला. त्यांचा सर्व वेळ ध्यानधारणा करण्यात व्यतीत होत असे.

### २. कादिरिया संप्रदाय :

कादिरिया सिलसिला पंजाबमध्ये प्रचंड लोकप्रिय होता. अकबराच्या कारकिर्दीत, शेख अब्दुल कादिर आणि त्याचे पुत्र मुघलांचे निष्ठावंत होते. त्यांनी बगदाद येथे या संप्रदायाची स्थापना केली. वहादत अल वजुदच्या संकल्पनेचे समर्थन केले त्यानुसार देव आणि त्याची निर्मिती एक आहे असे मानले जाते. या संप्रदायातील सर्वात प्रमुख सूफी संत मियाँ मीर हा होता. मुघल राजकुमारी जहाँआरा आणि तिचा भाऊ दाराशिकोह यांनाही या संप्रदायाचे शिष्यत्व पत्करले होते. पंजाब बरोबरच बंगाल व बिहार या प्रदेशामध्येही या संप्रदायाचा प्रसार झाला होता.

### ३. सु–हावर्दी संप्रदाय :

इ स. १२ व्या शतकात इराक मध्ये सु–हावर्दी संप्रदायाची स्थापना नजीबउीन यांनी केली. मुलतानमधील शेख बहाद्दीन झकेरिया हे या संप्रदायाचे भारतातील पहिले संत होते. भारताच्या वायव्य भागात या संप्रदायाचा मोठया प्रमाणात विस्तार झाला. मध्ययुगीन भारतातील श्रीमंत संत म्हणून झकेरिया यांचा उल्लेख होतो. प्रादेशिक सत्ताधीशांशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित करून बंगाल व गुजरात मध्ये त्यांनी प्रसार

केला. शेख शरफुीन याह्या मनैरी यांनी बिहारमध्ये सुफी तत्त्वांचा प्रसार केला. उपवास, आत्मक्लेश किंवा इतर मार्गानी आत्मा शुद्धीवर त्यांचा विश्वास नव्हता. मानवतावादी सेवांच्या गरजेवर त्यांनी भर दिला.

### ४. नक्शबंदीया संप्रदाय :

अहमद-अदा-यश्वी याने १२ व्या शतकात मध्य आशियात याची स्थापना केली. याचे मुख्य केंद्र इराण होते. मुहमद-बाकी-बिला व शेख अहमद सरहदी यानी अकबराच्या कालखंडात या संप्रदायाचा प्रसार भारतात केला. धार्मिक सहिष्णुतेचा पुरस्कार केला. इस्लामी कट्टरता शिथिल केली. बुद्धीवादी दृ ष्टीकोणाचा स्विकार केला. मनावर संयम ठेवून ईश्वराचे सतत स्मरण करण्यावर भर दिला. धार्मिक कर्मकांडाला तीव्र विरोध केला. शरियत तत्त्वांचे पालन करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. हा संप्रदाय तुर्की-मंगोल विरूध्द इराणी धर्म, कल्पना व संस्कृती यातील संघर्ष मानला जातो.

### ५. सत्तारिया संप्रदाय :

इ.स. १५ व्या शतकात शेख अब्दुल्ला यानी या संप्रदायाचा भारतात प्रसार केला. सत्तारिया संप्रदायाची स्थापना अबु-यझीद-अल-बिस्तामी यानी केली. या पंथाची भक्ती साधना व तत्वज्ञान यावर हदू धर्माचा मोठा प्रभाव दिसतो. बाबर, हुमायून व अकबर या मुघल बादशहांशी या पंथाचे घनिष्ठ संबंध होते.

### ६. फिर्दोसीया संप्रदाय :

सैफुद्दीन बाखर्जी याने मध्यअषियामध्ये या संप्रदायाची स्थापना केली. बिहारमध्ये या संप्रदायाचा प्रामुख्याने प्रसार झाला. बद्रीन समरकंदी याने भारतात या संप्रदायाचा पाया घातला. तुघलक काळात हा पंथ प्रसिद्धीस आला. अहमद इब्न याहया मानेरी हा या संप्रदायातील भारतातील एक प्रमुख संत होता. कर्मकांड व ढोंगीपणा मान्य नव्हता. नितिमत्तेने प्रत्येकाने आचरण केले पाहिजे असा त्याचा आग्रह होता.

सुफी संप्रदायाचे वरील सहा संप्रदाय होते. या सहापैकी चिश्ती संप्रदाय व कादिरीया संप्रदायाचा सुलतानशाही कालखंडात प्रसार झाला. नक्शंबदी व सु-हावर्दी संप्रदायाचा मुघल कालखंडात प्रसार झाला. सत्तारिया व फिर्दोसीया संप्रदाय विशेष प्रभावी नव्हते.

### ७. सूफी संप्रदायाचे महत्व :

सूफी संप्रदायाचा उगम पश्चिम आशियात झाला असला तरी इस्लामी आक्रमणाबरोबरच भारतात सूफी संप्रदायाचे आगमन झाले. सूफीच्या धर्मप्रसारास सत्ताधीशांनी पाठबा दिला त्यामुळे सूफी संप्रदायाचा प्रसार झाला. एकेश्वरवाद, मानवतावाद, वैराग्य वृत्ती, तपश्चर्या, नामस्मरण, चिंतन यांची जोपासना करीत भक्तीचा प्रसार करण्याचे काम सूफी संप्रदायाने केले. इस्लामी सूफी संप्रदाय व भारतातील भक्तिसंप्रदाय यांच्यातील विचार व तत्वांचा परस्परांवर प्रभाव पडला होता. सूफी संतांनी सर्व भारतभर धर्मप्रसाराची केंद्रे स्थापन केली. संप्रदायाच्या प्रसारासाठी ग्रंथ व इतर साहित्याची रचना केली.

सूफी पंथीयांनी भारतातील हिंदु परंपरा, चालीरीती यांचा स्वीकार करून, स्वत: ग्रंथ लेखन करून उत्तम असे शिष्य निर्माण केले. त्यामुळे इस्लामी राजवटीला मदत झाल्याचे दिसते. इस्लामी राजकारणात मुसलमानी सत्तेच्या विस्तारासाठी सूफी संतानी मोठे कार्य केले. भारतात मानवतावादी दृष्टीकोनातून हिंदू मुस्लिम यांच्यात समन्वय साधण्याचे कार्य, धर्मप्रसाराचे कार्य सूफी संतानी केले. त्यामुळे हिंदूस्थानातील इस्लामी वर्चस्वाला स्थैर्य प्राप्त झाले.

**स्वयं अध्ययन प्रश्न – १**

खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.

१. सुफी संप्रदायामध्ये साधनमार्गातील .......... टप्पे सांगितले आहेत.

अ. सहा    ब. चार    क. सात    ड. पाच

२. सुफी संप्रदायात शिष्याला .................. असे म्हणतात.

अ. पीर    ब. शिख    क. मुरीद    ड. मुर्शिद

३. चिस्ती संप्रदायाची स्थापना .................... याने केली.

अ. ख्वाजा अब्दुल चिश्ती    ब. शेख अब्दुल

क. शेख मसूद    ड. शेख अली

४. गुरूच्या पुण्यतिथी निमित्त जी यात्रा भरते त्यास सुफी संप्रदायामध्ये ..............असे म्हणतात.

अ. उरूस    ब. जत्रा    क. यात्रा    ड. यापैकी नाही

५. इ स. १२ व्या शतकात इराक मध्ये सु–हावर्दी संप्रदायाची स्थापना ......... यांनी केली.

अ. नजीबउीन    ब. शेख बहाउीन झकेरिया

क. शेख शरफुीन याह्या मनैरी    ड. अहमद–अदा–यश्वी

## ४.२.२ भक्ती चळवळ : कबीर आणि सूरदास

### १. भक्ती चळवळ :

मध्ययुगातील भारताच्या सांस्कृतिक इतिहासात भक्ती चळवळ एक महत्त्वाचा भाग होती. भक्ती चळवळ ही सामाजिक–धार्मिक सुधारणांच्या दृष्टिने महत्वपूर्ण होती. या चळवळीमुळे मोठ्या प्रमाणात सामाजिक क्रांती घडून आली. भक्ती चळवळीने भारतीय समाजाच्या विविध स्तरातील लोकांच्यावर प्रभाव निर्माण केला. भारतीय समाजातील विविध चुकीच्या रूढी, परंपरा विरूध्द जागृती निर्माण करणे हे महत्वाचे काम भक्ती चळवळीने केले. मध्ययुगीन संतांनी भक्तीमार्गांचा पुरस्कार केला व त्यातून भक्ती मार्गाची चळवळ निर्माण झाली. संत कबीर, संत सूरदास यासारख्या अनेक संतानी यामध्ये मोठे योगदान दिले आहे.

## २. भक्ती चळवळीचा उगम

भक्तीमार्ग चळवळीच्या उदयाबाबत इतिहासकारामध्ये विविध मतभेद आढळतात. सर्वसाधारणपणे सातव्या आणि बाराव्या शतकाच्या दरम्यान भक्ती चळवळ प्रथम भारतात सुरू झाली. भक्ती मार्गाचा उगम उपनिषद आणि भगवदगीता या ग्रंथातून झालेला आहे असे मत मांडले आहे. दक्षिणेकडील प्रदेशांमध्ये, विशेषत: तामिळनाडूमध्ये प्रथम भक्ती चळवळीचा प्रसार झाला. पंधराव्या शतकाच्या अखेरीस उत्तरेकडील प्रदेशात त्याचा विस्तार झाला. सुलतानशाहीच्या काळात निर्माण झालेल्या भक्ती चळवळीवर हिंदू व मुसलमान या दोन धर्मातील तत्वज्ञानाचा प्रभाव होता.

## ३. भक्ती चळवळ : उदयाची कारणे :

### १. हिंदू धर्मातील वाईट चालीरिती :

हिंदू धर्मामध्ये अनेक निरर्थक कर्मकांड आणि धार्मिक प्रथा रूढ झाल्या होत्या. अंधश्रद्धा मोठया प्रमाणात होती. सामान्य माणसांना उदारमतवादी धर्माची आवश्यकता होती. यातूनच सर्वसमावेषक अशा भक्ती चळवळीचा उदय झाला.

### २. हिंदू धर्माचे तत्वज्ञान :

हिंदू धर्माचे तत्वज्ञान वेद व उपनिषेद यावर अवलंबून होते. हे तत्वज्ञान सामान्य लोकास समजण्यास अवघड होते. समान्य लोकांना उपासनेची साधी सरळ व सोपी पद्धत, सोपी धार्मिक विधी, सामाजिक चालीरीती आणि प्रथा याची आवष्यकता होती. त्यांना भक्तिमार्ग हा एक पर्याय होता.

### ३. मुस्लीम सत्तेचे अत्याचार :

मुस्लीम सत्तेने हिंदू प्रजेवर अनेक अत्याचार केले. राजकीय, सामाजिक, धार्मिक दृष्टया हिंदूना कोणतेही स्थान देण्यात आले नाही. मोठया प्रमाणात महसूल, जिझिया कर हिंदूवर लादण्यात आला होता. मुस्लीम अत्याचारातूनन मुक्त व्हावे या हेतूने लोक परमेश्वरास शरण गेले. त्यातूनच भक्ती चळवळीचा उदय झाला.

### ४. हिंदू धर्मातील जाती व्यवस्था :

हिंदू धर्मामध्ये जातीभेद कठोर होता. समाज अनेक जाती व उपजातीमध्ये विभागला होता. मनुस्मृती सारख्या अनेक ग्रंथाचा प्रभाव समाजावर होता. जातीभेद नष्ट करण्याचे काम भक्ती चळवळीने केले.

### ५. ईस्लाम धर्माचा प्रभाव :

मुस्लीम राज्यकर्त्यानी भारतावर आक्रमण केले व आपली सत्ता स्थापन केली. त्यांनी भारतात मुस्लीम धर्माचा प्रसार केला. धर्मांतरास प्रोत्साहन दिले. धर्मांतर करतील त्यांना मोठी बक्षिसे, जहागिरी दिल्या. त्यांना करातून सूट दिली. यातूनच इस्लामी धर्माच्या आक्रमणापासून हिंदू धर्माचे रक्षण करावे या हेतूने भक्ती चळवळ सुरू झाली.

### ६. हिंदू–मुसलमान याच्यात ऐक्य :

मध्ययुगीन कालखंडात मुस्लीम राज्यकर्त्यांनी भारतावर आक्रमण करून राजकीय सत्ता स्थापना केली. त्यानंतर हिंदू व मुस्लीम यांच्या रूढी, परपंरा संस्कृती यांचा एकमेकावर प्रभाव पडला. यातून भक्ती चळवळीचा उदय झाला.

### ७. सुफी पंथाचा प्रभाव:

इस्लाम धर्म कट्टर होता. मात्र सुफी संप्रदायाचा उदय झाल्या नंतर त्याच्यामध्ये शिथीलता आली. सूफी संप्रदायाच्या सहिष्णुवृत्तीमुळे परस्परामध्ये प्रेम, माणुसकी, दुसऱ्याबद्दल आदर व दुसऱ्यांना मदत करणे इ. संदेश लोकांपर्यंत पोहचला. त्यामुळे भक्ती चळवळीचा उदय झाला.

### ८. वंचितासाठी कार्य :

भक्ती चळवळीने प्रामुख्याने उपेक्षित, वंचित समाजासाठी कार्य केले. समाजात समानता आणण्याचे कार्य केले. त्यांच्यात ईश्वर भक्ती, परस्पराविषयी प्रेम निर्माण केले. त्यामुळे सर्व जातीधर्मातील संत निर्माण झाले. या संतांच्या प्रयत्नातून भक्ती चळवळ उदयास आली.

## ४. भक्ती चळवळीचे स्वरूप/वैशिष्ट्ये :

भक्ती चळवळीमध्ये अनेक संतानी महत्वाची भूमिका बजावली आहे. भक्तीचा अधिकार सर्वाना आहे व मानवी जीवनाचे अंतिम ध्येय मोक्षप्राप्ती आहे. यासाठी ईश्वराची उपासना करणे, नामस्मरण करणे महत्वाचे आहे. परमेश्वराविषयी प्रेम, आपुलकी, श्रध्दा म्हणजेच भक्ती होय. भक्ती चळवळीचे स्वरूप अथवा वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे होती.

### १. सामाजिक समतेचा स्विकार :

भक्ती चळवळीने सामाजिक समता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. परिणामी समाजातील जाती विषमता कमी झाली. समाजात एकोपा निर्माण झाला.

### २. एकेश्वरवादाचा पुरस्कार :

प्राचीन कालखंडापासून हिंदू समाजामध्ये अनेक देवदेवतांची निर्मिती झाली होती. परंतु परमेश्वर हा एकच आहे व त्याची अनेक रूपे आहेत ही भावना निर्माण झाली. भक्ती चळवळीमध्ये एकेश्वरवादाचा पुरस्कार करण्यात आला.

### ३. धार्मिक कर्मकांडाला विरोध :

हिंदु धर्मामध्ये अनेक धार्मिक कर्मकांड व अंधश्रध्दा होत्या. भक्ती चळवळीमध्ये धार्मिक कर्मकांडास विरोध करण्यात आला.

**४. स्थानिक भाषेचा वापर :**

भक्ती चळवळीचा विस्तार अभंग, भारूड, किर्तन याच्या माध्यमातून झाला. याकरीता स्थानिक भाषेचा वापर केला गेला. त्यामुळे भक्ती चळवळ सामान्य लोकापर्यंत पोहचली.

**५. ग्रहस्थ आश्रमास मान्यता :**

भक्ती चळवळीने संन्यास आश्रम व वानप्रस्थ आश्रम यास विरोध केला. ग्रहस्थाश्रमास परवानी दिली. परमार्थ करून परमेश्वर प्राप्त करता येतो असा सल्ला समाजाला दिला.

**६. हिंदू–मुस्लीम ऐक्य:**

तत्कालीन मुस्लीम राज्यकर्त्यांच्या कट्टर मुस्लीम पुरस्कारमुळे हिंदू–मुस्लीम समाजात संघर्ष निर्माण झाला होता. भक्ती चळवळीने एकेश्वरवादाचा पुरस्कार केल्याने हिंदू–मुसलमान समाजात ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

**७. दलित समाजाचा उध्दार :**

भक्ती चळवळीने सर्वच जाती–जमातीतील लोकांना भक्ती करण्याचा अधिकार आहे असे सागितले. त्यामुळे दलित जातीतून अनेक संत निर्माण झाले.

**८. धर्मांतरास बंदी:**

मुस्लीम राजवटीत सक्तीने किंवा आमिष दाखवून धर्मांत्तर सक्तीने केले जात असे. या धर्मांतरास भक्ती चळवळीने विरोध केला.

**९. गुरूचे महत्त्व:**

भक्ती चळवळीमध्ये गुरूला महत्वाचे स्थान होते. गुरूशिवाय ज्ञान नाही आणि ज्ञानाशिवाय भक्ती नाही. भक्तीमुळेच मनुष्य जीवाला मोक्षप्राप्ती मिळते.

**१०. धार्मिक सहिष्णुता निर्माण :**

भक्ती चळवळीमुळे समाजामध्ये धार्मिक सहिष्णुता निर्माण झाली. आपआपसामधील संघर्ष कमी होण्यास मदत झाली.

हिंदुस्थानातील मुस्लिम सत्तेची स्थापना व सत्तधिशांनी इस्लाम धर्म वाढीसाठी केलेले प्रयत्न यामुळे भक्ती चळवळीला चालना मिळाली. हिंदू धर्माचे जतन करणे, धर्मांतर थांबवणे आणि समाज व्यवस्था यामध्ये सुधारणा हे भक्ती चळवळीतील सुधारकांचे एक मुख्य उद्दिष्ट होते.

**५. भक्ती चळवळीतील प्रमुख संत :**

भक्ती चळवळीत अनेक नामवंत भक्ती संतांचा प्रभाव होता. शंकराचार्यांपासून योगीपर्यंत या भक्ति संतांनी भक्ती चळवळीस योगदान दिले आहे. शंकराचार्य, रामानुज, माधवाचार्य, निंबाका, वल्लभाचारी, अक्कमहादेवी, जनाबाई, मीराबाई, आंदल, बहिणाबाई, करैक्कल अम्मैयार, कबीर, सूरदास इत्यादी अनेक संत होवून गेले. यामधील निवडक संत कबीर व सूरदास यांच्या कार्याचा आढावा खालील प्रमाणे–

## ५.१ संत कबीर :

### ५.१.१ प्रारंभिक जीवन :

कबीराच्या जन्माबाबात व मातापित्याबाबत निश्चित माहिती प्राप्त होत नाही. मात्र काही इतिहासकारांच्या मते ८ जून १३९८ मध्ये वाराणसी येथे कबीरचा जन्म झाला असावा. कबीराचा जन्म ब्राम्हण स्त्रीच्या पोटी व संगोपन मुसलमान कुटूंबात झाले. एका विधवा ब्राम्हण स्त्रीच्या पोटी त्यांचा जन्म वाराणसी येथे झाला. विधवा ब्राह्मण स्त्रीने लोकभयास्तव नवजात बालकाला उत्तर प्रदेशातील वाराणसी पासून तीन किलोमीटर दूर लहरताल तलावाजवळ सोडून दिले. नीमा आणि नीरू हे मुस्लीम दांपत्य वाराणसीला जात असताना दोघेही विश्रांतीसाठी लहरतारा तालावाजवळ थांबले होते. त्याच वेळी नीमाला कबीरदास सापडले. नीरू व नीमा नावाच्या मुसलमान विणकर (जुलाहा) दांपत्याने त्यांचे पालनपोषण केले. भक्ती अंदोलनातील एक प्रमुख संत म्हणून कबीरास ओळखले जाते. ते व्यवसायाने विणकर होते. त्यांचे दोहे आजही देशभर गायले जातात.

### ५.१.२ संत कबीर यांचे शिक्षण :

संत कबीर यांच्या शिक्षणाबाबत विविध मते आहेत. कबीरांना आभ्यासात आवड नव्हती. आई वडील गरीब असल्यामुळे त्यांना शिक्षण घेणे शक्य नव्हते. यामुळेच ते पुस्तकी शिक्षण प्राप्त करू शकले नाहीत. काही इतिहासकारांच्या मते संत कबीर यांचे शिक्षक रामानंद स्वामी होते. सुरुवातीला रामानंद स्वामी त्यांना आपला शिष्य म्हणून स्वीकारायला तयार नव्हते. परंतु नंतर त्यांनी कबीरांना आपले शिष्य म्हणून स्वीकारले.

### ५.१.३ साहित्य निर्मिती :

कबीरदास उत्तर भारतातील एक सुप्रसिद्ध संत म्हणून ओळखले जातात. त्यांची प्रमुख भाषा 'सधुक्कडी' होती. परंतु त्याच्या कवितांमध्ये हिंदी भाषेचा प्रभाव दिसतो. कबीराच्या साहित्यावर व विचारांवर हिंदू, मुसलमान, सूफी, योगमार्गी, नाथपंथी या सर्वाचा प्रभाव आढळतो. कबीर हे निरक्षर होते मात्र त्यांनी अनेक रचना केल्या. तो ज्ञानी व बहुश्रुत होता. कबीरांने केलेल्या सर्व रचना मौखिक स्वरूपात होत्या. त्यास त्याच्या अनुयायांनी लेखनबद्ध केले. 'कबीर ग्रंथावली' व 'बीजक' हे त्याच्या रचनेचे अधिकृत संग्रह मानले जातात. धर्मदास या शिष्याने 'बीजक' हा कबीरांच्या काव्यांचा ग्रंथ निर्माण केला तर दुसरा संग्रह, काशीमधील नागरी प्रचारिणी सभेत तयार केला आहे. शिखांच्या ग्रंथसाहिबातही कबीराची काही पदे समाविष्ट आहेत. मध्ययुगीन भारतात एक सर्वश्रेष्ठ संत म्हणून कबीरांस ओळखले जाते. कबीराच्या रचना उत्कृष्ट आहेत. त्यांचे अनेक दोहे प्रसिध्द आहेत. त्यातील काही रचना खालील प्रमाणे –

कल करे सो आज कर, आज करे सो अब।
पल में प्रलय होएगी, बहुरि करेगा कब ।।

कबीर दास जी म्हणतात की कोणतेही कार्य उद्यावर टाळू नये, जे करायचे आहे ते आजच करावे आणि ते आत्ताच या क्षणी करावे. कुणालाच ठाऊक नाही, पुढच्या क्षणी प्रलय आलं तर आयुष्य संपेल, मग जे करायचं ते कधी करणार.

ऐसी वाणी बोलिए, मन का आपा खोये।
औरन को शीतल करे, आपहुं शीतल होए।।

कबीर दास जी म्हणतात की दुसऱ्यांच्या प्रती कठोर वाणीचा प्रयोग करु नये. दुसऱ्यांना सुख देणारी वाणी बोलावी ज्याने आपल्या मनालाही शांती मिळते.

निंदक नियरे राखिए, अंगन कुटी छवाय ।
बिन पानी, साबुन बिना, निर्मल करे सुभाय ।।

कबीर दास जी म्हणतात की जे तुमच्यावर टीका करतात त्यांना नेहमी सोबत ठेवावे. कारण ते लोक तुमचे दोष तुमच्यासमोर ठेवतात, ज्या सुधारून तुम्ही नेहमी प्रगतीच्या दिशेने वाटचाल कराल.

पोथी पढ़ि पढ़ि जग मुआ, पंडित भया न कोय ।
ढाई अक्षर प्रेम का, पढ़े सो पंडित होय ।।

कबीर दास जी म्हणतात की या जगात कोणालाच खरे ज्ञान किंवा अंतिम सत्य केवळ पुस्तके वाचून मिळू शकत नाही, यासाठी फक्त प्रेमाची अडीच अक्षरे पुरेशी आहेत.

बड़ा हुआ तो क्या हुआ, जैसे पेड़ खजूर ।
पंथी को छाया नहीं, फल लागे अति दूर ।।

कबीर दास जी म्हणतात की मानवी जीवनाचे उद्दिष्ट परोपरकार असले पाहिजे. जसे खजुराचे झाड उंच वाढले तरी ते प्रवाशाला सावली देत नाही आणि त्याची फळेही दूरवर असतात.

हिंदू मुस्लिम ऐक्याविषयी विचार प्रकट करताना म्हणतात.

भाई रे दुई जगदीश कहा, से आया, वह कौन बौराया ।
अल्ला, राम, रहीम, केशव, हरी हजरत नाम धराया ।।

मन पवित्र नसेल तर तीर्थयात्रा निरूपयोगी ठरते हे सांगताना म्हणतात,

मन मथुरा, दिल द्वारिका, काया कासी जान ।
इस द्वारे का देहरा, तापे प्रेति पिछाना ।।

कबीरांनी धार्मिक मतभेद कमी केले. अद्वैती, सूफी, योगमार्गी, भक्तिमार्गी या सर्वांनाच आपलासा वाटावा, असा भक्तिमार्ग रूढ करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

### ५.१.४ संत कबीर यांचे योगदान :

कबीर यांनी उत्तर भारतात मोठ्या प्रमाणात भक्ती आंदोलन चालवले. कबीरांनी लोकांचे डोळे उघडून त्यांना मानवता, नैतिकता व अध्यात्मिकताचा धडा शिकवला. ते अहिंसेचे अनुयायी व प्रचारक होते. समाजसुधारणा यासाठी खूप सारे लिखाण कार्य केले. कबीर यांनी लिहिलेले दोहे, कविता व गीत अनेक भाषांमध्ये उपलब्ध आहेत. नाथ परंपरा, सुफी परंपरा इत्यादी मिश्रित अध्यात्मिक स्वभावाचे संत होते. .

कबीरांनी लोकांमधील भेदभाव नष्ट करून बंधुभाव वाढवला. त्यानी राम व रहीम हे एकच आहेत असे सांगितले. हिंदू व मुस्लीम एकता याबाबत त्यांचे कार्य मोठे आहे. कबीरांनी हिंदू आणि इस्लाममधील दरी कमी करण्याचा प्रयत्न केला. दोन्ही धर्माचे लोक त्यांचे अनुयायी होते. कबीरांचे शिष्य धर्मदास, चत्रभुज, बंकेजी व सेहतजी यांनी कबीरांच्या विचारांच्या प्रसारासाठी कार्य केले.

कर्मकांड, तीर्थे, मुर्तिपूजा, जातीयता या गोष्टीला त्यांनी कडाडून विरोध केला. त्यांनी एकेश्वरवादाचा पुरस्कार केला. काम, क्रोध, मोह, मत्सर यापासून जो दूर राहतो तो परमेश्वराच्या जवळ जाण्यास पात्र ठरतो. ईश्वरप्राप्ती ही कोणाची मक्तेदारी नाही तो सर्वांचा अधिकार आहे असे त्यांचे मत होते. संत कबीरांनी सर्व आयुष्यभर मानवमात्रासाठी कार्य केले. त्यांनी मानवता हाच खरा धर्म मानला.

### ५.२ संत सुरदास:

सूरदास हे मध्ययुगीन कालखंडातील प्रसिध्द हिंदी कवी होते. जन्मत: ते अंध होते. त्यांनी ब्रजभाषेत तीन काव्यात्मक उत्कृष्ट कृती रचल्या. श्री वल्लभ संप्रदायाने अष्टचाप म्हणून नियुक्त केलेल्या कवींमध्ये ते अग्रगण्य मानले जातात.

### ५.२.१ प्रारंभिक जीवन :

इ.स. १५ व्या शतकात सूरदासाचा जन्म दिल्लीजवळील सिरी या खेडयामध्ये गरीब सारस्वत ब्राह्मण कुटुंबात झाला. एके दिवशी त्यांच्या घराजवळून गायक चालले होते त्यांचे गायन सुरदास यांच्या कानावर पडले. त्यास संगिताची आवड निर्माण झाली व तो त्या गायकांच्या बरोबर राहीला. मात्र काही दिवस जाताच अंध सुरदास याचे गायकांना आझे वाटू लागले परिणामी त्यांनी त्यास सोडून दिले. सुरदास एकाकी जिवन जगत होते. एका रात्री त्यांना स्वप्न पडले की भगवान श्रीकृष्ण आणि लोक भजनातून त्यांची स्तुती करत आहेत. सूरदास जागा झाला आणि त्याला खात्री झाली की परमेश्वर आपल्याला बोलावत आहे. म्हणून ते मथुरेतील यमुना किनारी गौघाटावर गेले. तेथे त्यांनी कविता लिहिण्यास सुरुवात केली आणि त्यांना संगीतबद्ध केले.

### ५.२.२ सूरदासांचे गुरु – श्री वल्लभाचार्य :

बालपणापासून सूरदास गानविद्येत कुशल बनला होता. ज्योतिष व शकुनविद्या अवगत होती. यमुनाकाठी गौघाट येथे राहून त्याने अध्यात्म साधना केली. पुष्टिमार्गाचे संस्थापक वल्लभाचार्य हे त्याचे गुरू होते. श्री वल्लभाचार्यांनी सूरदासांना हिंदू तत्त्वज्ञान आणि ध्यानाचे धडे दिले आणि त्यांना अध्यात्माच्या

मार्गावर आणले. वल्लभाचार्यांनी त्याला पुष्टिमार्गाची दीक्षा दिली व श्रीकृष्णभक्तीचा उपदेश केला. वल्लभाचार्यानी त्यास कृष्णभक्तिपर पदे रचण्याची आज्ञा दिली. साधारण ते या काळात त्याचे वास्तव्य गौघाट येथे व त्यानंतर गोवर्धन येथे होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य श्रीकृष्णाची पूजाआर्चा व भजन-कीर्तनात व्यतीत केले. त्याने श्रीकृष्णभक्तिपर अनेक पदे रचली.

**५.२.३ सुरदास व सम्राट अकबर :**

गायक आणि भक्त म्हणून सूरदास यांची ख्याती सर्वदूर पसरली होती. एके दिवशी मोगल सम्राट अकबराच्या दरबारातील गायक तानसेनने सूरदासांचे एक गाणे गायले. अकबर बादशह व सूरदासाची भेट तानसेनाच्या मध्यस्थीने मथुरेत झाली. अकबर हा व्यापक विचारांचा मुस्लिम असल्याने सूरदासला आपल्या दरबारात बोलावले. अकबर सुरदासाचे गायन ऐकून मंत्रमुग्ध झाला. सूरदासाच्या पदांवर लुब्ध झालेल्या अकबराने आपली स्तुतिकवने रचण्याची आज्ञा सूरदासाला केली. पण 'मी केवळ कृष्णकीर्तन करतो, अन्य कुणाचे कीर्तिगान करणे मला रुचत नाही' असे परखड उत्तर सूरदासाने दिले. तसेच अकबराने दिलेले इनामही त्याने नाकारले.

**५.२.४ सूरदासाचे साहित्य :**

सूरदासाच्या स्फुट पदांचा संग्रह 'सूरसागर' या नावाने प्रसिद्ध आहे. भागवत पुराणाच्या आधारे रचलेल्या या ग्रंथात कृष्णाच्या लीलांचे गुणगान, कृष्णजन्मापासून ते ब्रजभूमीतील क्रीडा, मथुरागमन, द्वारकेला प्रयाण व पुन्हा कुरुक्षेत्रात ब्रजवासी लोकांची भेट, येथ पर्यंतच्या सर्व घटनांचे साद्यन्त, क्रमवार वर्णन आहे. सूरसागर मध्ये काव्य व संगीत यांचा उत्तम मिलाफ साधला आहे. त्याने ब्रजभाषेत पदे रचली. त्यांतील विविध रागांतील अनेक पदे गेयतेमुळे फार लोकप्रिय झाली. तसेच त्यांतील 'विनयपदे' (प्रार्थनागीते) प्रसिद्ध आहेत. काही विद्वानांच्या मते ही पदे वल्लभाचार्यांकडून पुष्टिमार्गाची दीक्षा घेण्यापूर्वी सूरदासाने रचली असावीत.

कृष्णभक्तीचा प्रवाह जनताभिमुख करण्यात सूरदासाच्या पदांचा वाटा मोठा आहे. प्रगल्भता, गांभीर्य, वैराग्याची ओढ इ. वैशिष्टांमुळे त्याची काव्ये प्रसिध्द झाली. सूरसागर मधील काव्यदृष्ट्या सर्वांत हृदयस्पर्शी भाग म्हणजे 'भ्रमरगीत' होय. काव्यात्मता, सहजसुलभ शैली इ. वैशिष्टे त्यात उत्तमरित्या प्रकटली आहेत. ज्ञानमार्गी उद्धव व प्रेमभक्तिमार्ग अनुसरणाऱ्या गोपी यांच्यातील पद्यसंवाद 'भ्रमरगीता'त आहे. निर्गुण, निष्प्रेम अव्यक्त मार्गापेक्षा सगुण प्रेममय व्यक्त मार्गाची भक्ती सहजसाध्य व श्रेष्ठतम आहे, हा यातील प्रतिपाद्य संदेश आहे. मधुर व कोमल ब्रजभाषेत रचलेल्या या पदांत सूरदासाचा भक्तिभाव व तत्त्वचिंतन प्रभावीपणे प्रकटले आहे. सूरदासाच्या पदांत वात्सल्य व शृंगार या दोन रसांचा उत्कृष्ट परिपोष साधलेला आढळतो. श्रीकृष्ण हा सर्वश्रेष्ठ परमेश्वर असून त्याची भक्ती व अनुग्रह (पुष्टी) हाच मानवाच्या अंतिम कल्याणाचा श्रेष्ठतम मार्ग, हे या संप्रदायाचे तत्त्वज्ञान सूरदासाने सोप्या गेय पदांतून मांडले. पदांची भाषा सहजसोपी व नादमधुर असून प्रसंगचित्रे प्रत्ययकारी आहेत. लौकिक व अलौकिक अशा उभयविध पातळ्यांवरील जीवनानुभूतींची प्रचिती

त्याच्या काव्यातून एकाच वेळी येते. सूरदासाने ब्रजभाषेत रचलेल्या भक्ती व शृंगार रसांचा परिपोष साधणाऱ्या पदांनी ब्रजभाषेचे वाङ्मयीन सामर्थ्य व हिंदी साहित्याचे सौंदर्य वृधिंगत केले.

सूरदासाला हिंदी साहित्यातील 'सूर' (सूर्य) म्हणून संबोधिले जाते. गोस्वामी विठ्ठलनाथांनी सूरदासाचा 'पुष्टिमार्गाचे जहाज' या शब्दांत गौरव केला.

**६. भक्ती चळवळीचे परिणाम/प्रभाव :**

भक्ती चळवळ ही एक सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळ होती. भारतीय समाजातील जातीय भेद, अंधश्रद्धा दूर करणे हा याचा प्रमुख उद्देश होता. सामान्य लोकांच्या सहभागामुळे भक्ती चळवळ तळागाळापर्यंत पोहचली. सामान्य लोकामध्ये मोठी आवड निर्माण झाली याकरीता संतांनी मोलाचे कार्य केले. समाजातील विविध घटकांवर भक्ती चळवळीचे परिणाम खालील प्रमाणे दिसून येतात.

**१. धार्मिक परिणाम :**

भक्ती चळवळीच्या उदयामुळे हिंदू आणि मुस्लिमांना खोट्या अंधश्रद्धेपासून जागृत केले. दोन्ही धर्मांनी त्यांच्या विचार आणि पद्धतींमधील फरक दूर करण्याचा प्रयत्न केला. धार्मिक असहिष्णुता निर्माण झाली.

**२. सामाजिक परिणाम :**

भक्ती चळवळीचा सर्वात लक्षणीय परिणाम समाजातील जातीव्यवस्था नष्ट होण्यासाठी झाला. भक्ती चळवळीतील संतांनी एकत्र येऊन समाजात सामाजिक समता आणली. स्त्रीयांना समाजामध्ये मानाचे स्थान प्राप्त झाले. चळवळीमुळे वंचित घटकांना दर्जा प्राप्त झाला. हिंदू आणि मुस्लिमांमधील संबंध सुधारले. जनतेच्या विचारधारेत सकारात्मक बदल घडवून आणले.

**३. राजकीय परिणाम:**

भक्ती चळवळीमुळे राजकीय क्षेत्रातही मोठा प्रभाव पडला. अनेक राज्यकर्त्यांनी सामाजिक-धार्मिक दृष्टया भक्ती चळवळी अंतर्गत उदारमतवादी धार्मिक धोरण स्वीकारले.

**४. नैतिक परिणाम :**

भक्ती चळवळीमुळे जनतेच्या मनामध्ये प्रामाणिकपणा व कठोर परिश्रम यास प्रोत्साहन मिळाले. स्त्री-पुरुष दोन्हीही वर्गाला समाजसेवेसाठी द्वारे खुली झाली. एकमेकाबद्दल सहानुभूती निर्माण झाली. तसेच भक्ती चळवळीमुळे राग आणि मत्सर करण्याऐवजी संयम बाळगण्यास आणि आत्मसंयम ठेवण्यास शिकवले.

**५. भाषा व वाङ्मयाचा विकास :**

प्रादेशिक भाषांची प्रगती हा भक्ती चळवळीचा महत्त्वपूर्ण परिणाम आहे. अभंग, भारूड, ओव्या यामुळे वाङ् मयाचा विकास झाला. समृद्ध साहित्याची निर्मिती झाली.

### ६. सांस्कृतिक परिणाम :

भक्ती चळवळीमुळे समाजामध्ये अनेक मोठया मंदिराची बांधकामे सुरू झाली. वेगवेगळ्या देवदेवतांची पूजा सुरू झाली. त्यामुळे समाजात सांस्कृतिक जागृती निर्माण झाली.

एकूणच भक्ती चळवळीने जातिव्यवस्थेचा तीव्रपणे प्रतिकार केला. कोणत्याही भाषेचा दाबाव न घेता दैनंदिन भाषेत गीते तयार करण्यावर भर दिला. सर्वांना समान अधिकार व समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

**स्वयं अध्ययन प्रश्न – २**

खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.

१. संत कबीर यांचे गरू .................. हे होते.

अ. स्वामी रामानंद ब. स्वामी विवेकानंद क. स्वामी दयानंद ड. वल्लभाचार्य

२. 'बीजक' हा ............. यांच्या काव्याचा संग्रह आहे.

अ. सूरदास ब. कबीर क. ज्ञानेश्वर ड. जनाबाई

३. ब्रजभाषेत .......... यांनी काव्यरचना केल्या.

अ. सूरदास ब. कबीर क. ज्ञानेश्वर ड. जनाबाई

४. सूरदासांचे ............... हे गुरू होते.

अ. स्वामी रामानंद ब. स्वामी विवेकानंद क. स्वामी दयानंद ड. वल्लभाचार्य

५. ................ यांचा स्फुट पदांचा संग्रह 'सूरसागर' या नावाने प्रसिद्ध आहे

अ. सूरदास ब. कबीर क. ज्ञानेश्वर ड. जनाबाई

### ४.२.३ वास्तूकला : कुतुबमिनार (दिल्ली सल्तनत) हंपी (विजयनगर)

#### ४.२.३.१ दिल्ली सल्तनत काळातील वास्तुकला :

भारतीय कला व वास्तुकलेची सुरुवात प्राचीन कालखंडात 'सिंधू संस्कृती' पासून झाली. रेखीव 'नगर नियोजन' हे त्याकाळच्या वास्तुकलेचे वैशिष्ट होते. तेराव्या शतकातील इस्लाम आक्रमणानंतर भारतीय वास्तुशैलीत आमुलाग्र बदल झाले. इस्लामिक वास्तुकलेत मशीद व समाधी स्थळे यांचा समावेश होता. इस्लामिक वास्तुशैलीमध्ये कमानी व घुमट याचा प्रामुख्याने समावेश होता. हे वास्तूप्रकार भारताला नवीन होते. दिल्ली सल्तनतच्या कुतुबद्दीन ऐबक याने 'कुवत-उल-इस्लाम' ही भारतातील पहिली मशीद बांधली.

भारतीय वास्तुकला व इस्लामिक वास्तुकला यांच्या मिश्रणातून 'इंडो-इस्लामिक' शैली निर्माण झाली. दिल्ली सल्तनत नंतर आलेल्या मुघलांच्या काळात बांधलेली समाधीस्थळे, मशिदी, किल्ले व उद्याने ही या प्रकारच्या वास्तुशैलीची परिपूर्ण उदाहरणे आहेत. दिल्ली सल्तनतच्या कला आणि स्थापत्यशास्त्रात इस्लामिक आणि भारतीय परंपरांचा प्रभाव असलेली एक वेगळी शैली आहे. सल्तनतची राजधानी म्हणून, दिल्लीत

अनेक वास्तू इंडो-इस्लामिक शैलीमध्ये निर्माण झाल्या. दिल्ली सल्तनतच्या कला आणि स्थापत्यकलेचा भारतातील त्यानंतरच्या वास्तुशैलींवर प्रभाव पडला.

**१.१ सल्तनत कालखंडातील वास्तुकलेची वैशिष्टे :**

दिल्ली सल्तनतचा राजधानीवर प्रभाव होता. परिणामी शहराच्या वास्तुकलेवरही त्यांचा प्रभाव दिसून येतो. दिल्ली सल्तनत कालखंडातील स्थापत्यकलेतील वैशिष्टे पुढीलप्रमाणे दिसून येतात.

**१.२ इस्लामिक प्रभाव :**

दिल्ली सल्तनतच्या शासकांनी त्यांच्या स्थापत्य शैलीमध्ये घुमट, कमानी आणि मिनार यांसारख्या विशिष्ट इस्लामिक घटकांसह अंतर्भूत केले, जे सहसा जटिल सुलेखन आणि भौमितिक रचनांनी सुशोभित केले जात होते.

**१.३ मोठे अंगण :**

दिल्ली सल्तनत कालखंडात निर्माण झालेल्या वास्तू या मोठ्या व विस्तृत जागेत बांधण्यात आल्या. वास्तूपुढे विस्तृत अंगण ठेवण्यात आले होते. त्याचा वापर सार्वजनिक कामकाजासाठी व समारंभासाठी केला जात असे.

**१.४ बागा :**

दिल्ली सल्तनतच्या कालखंडात विविध राज्यकर्ते यांनी भव्य उद्यानांची निर्मिती केली. स्वतंत्र उद्याने व वास्तूंच्या पुढे उद्यानांची निर्मिती केली.

**१.५ इस्लामिक आणि भारतीय शैलींचे मिश्रण:**

दिल्ली सल्तनतच्या कालखंडातील कला आणि स्थापत्यशास्त्रात इस्लामिक आणि भारतीय शैलींचे मिश्रण दिसून येते. अनेक वास्तूमध्ये हिंदूवास्तूंचा प्रभाव दिसून येतो. घंटा-आकाराचे घुमट तसेच कमळ यासारख्या हिंदू कलेचा प्रभाव दिसून येतो.

**१.६ लाल दगडाचा वापर :**

दिल्ली सल्तनतच्या राज्यकर्त्यांनी त्यांच्या वास्तुच्या बांधकामाकरीता स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या लाल दगडाचा वापर केला. त्यामुळे आनेक वास्तू या लाल रंगामध्ये पहावयास मिळतात.

राजधानी दिल्ली हे सल्तनत साम्राज्याची राजधानी होती. देशातील सर्वात भव्य वास्तूंची निर्मिती येथे झालेली आहे. दिल्ली सल्तनतने यात मोलाचे योगदान दिले. दिल्ली सल्तनतच्या कालखंडातील कुतुबमिनार या वास्तुकलाचा आढावा खालीलप्रमाणे -

### ४.२.३.२ कुतुबमिनार :

मोहम्मद घोरीच्या मृत्यूनंतर कुतुबुद्दीन ऐबकने भारतात स्वतंत्र सत्ता (दिल्ली सल्तनत) स्थापित केली. तो न्यायप्रिय व उदार होता परिणामी दिल्ली सल्तनत स्थापनेनंतर राजकीय, धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात मोठे परिवर्तन घडून आले. याचाच परिणाम म्हणजे दिल्लीतील मेहरौली येथे कुतुबमिनारची निर्मिती होय. ही वास्तू स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. कुतुबमिनार हा दिल्लीतील असलेला उंच मिनार आहे. दिल्ली सल्तनतीचा संस्थापक कुतुबुद्दीन ऐबक याने कुतुबमिनारचे बांधकाम सुरू केले, त्याने या वास्तूचा पहिला मजला बांधला. त्यांचे उत्तराधिकारी इल्तुतमिश यांनी पुढील तीन मजले बांधून मिनार अधिक उंचावली. पुढे तुघलक घराण्यातील सुलतान फिरोजशाह तुघलक यांनी पाचवा मजला बांधून ती पूर्णत्वास नेली. पुढील कालखंडात त्याची दुरुस्ती फिरोज शाह तुघलक आणि सिकंदर लोदी यांनी केली. मेजर आर. स्मिथ यांनीही  मिनारची दुरुस्ती आणि जीर्णोद्धार केला.

### २.१ वैशिष्ट्ये :

कुतुबमिनार ही इंडो-इस्लामिक स्थापत्यशैलीचे उत्कृष्ट उदाहरण मानली जाते. हिंदू आणि इस्लामी स्थापत्यशैलीचा संगम येथे दिसून येतो. कुतुबमिनार सुमारे ७२.५ मीटर उंच असून ती जगातील सर्वात उंच विटांची मिनार आहे. तिच्या तळाचा व्यास सुमारे १४.३ मीटर असून शिखराकडे तो २.७ मीटरपर्यंत कमी होत जातो. संपूर्ण मिनार पाच मजल्यांची आहे आणि प्रत्येक मजल्याला बाहेर आलेली गोलाकार गॅलरी आहे. बांधकामासाठी प्रामुख्याने लाल व पिवळ्या वाळूच्या दगडांचा वापर झाला आहे. भिंतींवर कुराणातील मजकूर आणि फारसी-नागरी लिपीतील लेख कोरलेले आहेत. पहिल्या तीन मजल्यांवर गोल व कोनीय रेषांचे नक्षीकाम आढळते, तर वरचे दोन मजले तुलनेने साधे आहेत. आतमध्ये सुमारे ३७९ पायऱ्यांचा अरुंद जिना आहे

### २.२ कुतुबमिनार संकुलातील इतर इमारती :

कुतुबमिनार संकुलात इतरही अनेक ऐतिहासिक वास्तू आहेत. त्या सर्वच वास्तू दिल्ली सल्तनतकालीन स्थापत्य, धर्म आणि सांस्कृतिक परिवर्तनाचे प्रतीक आहेत. या वास्तूतून  एकत्रितपणे मध्ययुगीन भारताचा इतिहास समजतो. त्यामुळे हे संकुल भारतीय वारशातील अत्यंत महत्त्वाचे स्थळ ठरते. कुतुबमिनार संकुलात पुढील वास्तू दिसून येतात. 'कुव्वत-उल-इस्लाम मशिद' ही दिल्लीतील पहिली मशिद मानली जाते. कुतुबुद्दीन ऐबक यांनी तिचे बांधकाम सुरू केले. या मशिदीच्या बांधकामात काही हिंदू व जैन मंदिरांच्या अवशेषांचा वापर करण्यात आला होता. त्यामुळे येथे हिंदू आणि इस्लामी स्थापत्यशैलीचा संगम दिसतो. ही मशिद दिल्ली सल्तनतीच्या स्थापनेचे प्रतीक मानली जाते. 'अलई दरवाजा' हे कुतुब संकुलातील भव्य प्रवेशद्वार आहे. इ.स. १३११ मध्ये अलाउद्दीन खिलजी यांनी ते बांधले. लाल दगड आणि संगमरवरी नक्षीकामामुळे ही वास्तू अत्यंत आकर्षक दिसते. 'लोहस्तंभ' हा गुप्तकालीन (चौथे शतक) लोखंडी स्तंभ आहे. सुमारे ७ मीटर उंच असलेला हा स्तंभ गंज न लागल्यामुळे प्रसिद्ध आहे. प्राचीन भारतीय धातुकर्म कौशल्याचे हे एक अद्वितीय उदाहरण आहे. या स्तंभावर संस्कृत लेख कोरलेला आहे. 'अलाई मीनार' ही

अपूर्ण राहिलेली मिनार आहे. अलाउद्दीन खिलजीने कुतुबमिनारपेक्षा दुप्पट उंच मिनार बांधण्याचा संकल्प केला होता, परंतु त्याच्या मृत्यूनंतर हे काम थांबले. आज फक्त तिचा तळभाग उरलेला आहे. 'इल्तुतमिशची कबर' ही इ.स. १२३५ मध्ये बांधलेली आहे. प्रारंभीच्या इस्लामी कबरी स्थापत्याचा हा एक उत्तम नमुना आहे.

**२.३ महत्त्व :**

**१) ऐतिहासिक महत्त्व :** कुतुबमिनार हा एका विस्तृत ऐतिहासिक संकुलाचा भाग आहे. कुतुबुद्दीन ऐबक यांनी बांधकाम सुरू करून इस्लामी सत्तेची पायाभरणी केली. मध्ययुगीन भारतातील राजकीय परिवर्तनाची साक्ष देणारी वास्तू आहे. हि वास्तू दिल्ली सल्तनत स्थापनेचे प्रतीक मानले जाते.

**२) स्थापत्यकलेचे महत्त्व :** कुतुबमिनार इंडो-इस्लामिक स्थापत्यशैलीचे उत्कृष्ट उदाहरण आहे. जगातील सर्वात उंच विटांची मिनार आहे. लाल व पिवळ्या वाळूच्या दगडांवरील नक्षीकाम व कुराणातील लेखन करण्यात आले आहे.

**३) धार्मिक महत्त्व :** कुतुबमिनार हे विजयाचे प्रतीक म्हणून बांधण्यात आले असल्याचे मानले जाते. इस्लामी सत्तेची स्थापना आणि सामर्थ्य दर्शवण्यासाठी ही भव्य मिनार उभारण्यात आली. मिनारवरून अजान (नमाजासाठीचे आवाहन) देण्यात येत असे. कुतुबमिनार इस्लामी संस्कृतीच्या प्रसाराचे प्रतीक मानले जाते.

**४) सांस्कृतिक महत्त्व :** कुतुबमिनार हिंदू व इस्लामी स्थापत्यशैलीचा संगम मानला जातो. भारतातील सांस्कृतिक विविधतेचे प्रतीक आहे.

**५) वारसा व पर्यटन महत्त्व :** कुतुबमिनारला १९९३ मध्ये UNESCO कडून जागतिक वारसा स्थळाचा दर्जा मिळाला आहे. त्यामुळे तिचे आंतरराष्ट्रीय महत्त्व वाढले. भारतातील एक प्रमुख पर्यटनस्थळ म्हणून कुतुबमिनारला दर्जा प्राप्त झाला आहे. देश-विदेशातील मोठ्या संख्येने पर्यटक याठिकाणी दरवर्षी येथे भेट देतात.

एकंदरीत कुतुबमिनार हा भारतीय मध्ययुगीन इतिहास, इस्लामी स्थापत्यकला आणि सांस्कृतिक वारसा यांचे प्रतीक आहे. कुतुबमिनाराला अनेकदा नैसर्गिक आपत्तींचा सामना करावा लागला. १३व्या व १४व्या शतकातील भूकंपामुळे काही भाग पडले होते. त्यानंतर दुरुस्ती व पुनर्बांधणी करण्यात आली. ब्रिटिश काळातही तिचे संवर्धन करण्यात आले. अनेक नैसर्गिक आपत्ती व दुरुस्त्यांनंतरही ही वास्तू आज भव्यतेने उभा आहे. कुतुबमिनार ही केवळ एक ऐतिहासिक वास्तू नसून ती भारतीय इतिहासातील राजकीय, धार्मिक आणि सांस्कृतिक संक्रमणाचे प्रतीक आहे. तिच्या भव्य रचनेतून आणि सूक्ष्म नक्षीकामातून मध्ययुगीन स्थापत्यकलेची प्रगल्भता दिसून येते. इतिहास, कला आणि संस्कृती यांचा संगम असलेली कुतुबमिनार ही भारताच्या वारशातील एक अमूल्य ठेवा आहे.

**४.२.३.३ विजयनगरकालीन वास्तुकला :**

विजयनगरच्या सम्राटांनी प्राचीन मंदिरांचे जतन केले. अनेक नवीन मंदिरे बांधण्यासाठी महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरू केले. साम्राज्यातील वास्तुविशारदांना विविध कलाकृती करण्यासाठी प्रोत्साहन दिले. साम्राज्यातील शिल्पकार, कलाकार आणि वास्तुविशारदानी मंदिर बांधणीसाठी आपले कौशल्य पणाला लावले व भव्य स्मारके तयार केली. परिणामी, अनोखी स्थापत्यशैली उदयास आली. त्यास पुढे विजयनगरची वास्तुशैली म्हणून ओळखली गेली. विजयनगरच्या वास्तूकलेचे महत्व ओळखून युनोस्कोने १९८६ मध्ये कर्नाटकातील हम्पी येथील अवशेषांना जागतिक वारसा स्थळाचा दर्जा बहाल केला, जागतिक स्तरावर त्याचे सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्व मान्य केले आहे.

**१. विजयनगर वास्तुकला शैली :**

विजयनगर साम्राज्यात अनेक मंदिरे उभारली गेली. होयसाळ, चोल आणि चालुक्य साम्राज्यांसारख्या पूर्ववर्तींच्या स्थापत्यशैलींपासून प्रेरणा घेऊन विजयनगर साम्राज्याने बांधकामे केली. द्रविड वास्तुशिल्प परंपरेचाही वापर करण्यात आला होता. विजयनगरकालीन उल्लेखनिय वास्तूंचा आढावा खालील प्रमाणे–

**१.१. क्वीन्स बाथ' :**



विजयनगर कालखंडात 'क्वीन्स बाथ' हे राजेशाही सदस्यांकरीता, वैयक्तिक आंघोळीसाठी किंवा शांत विश्रांती क्षेत्र म्हणून वापरले जात होते. 'क्वीन्स बाथ' ही भरीव चौकोनी रचना आहे. ही वास्तू भव्य व आतील बाजूस खुली आहे. कमानीचे दरवाजे व आतील डोम सजवलेले आहेत. यावास्तूस बाल्कनी व कॅरिडॉर करण्यात आला आहे.

**१.२. लोटस महाल:**



'लोटस महाल' ही दोन मजली वास्तू आहे. या वास्तूमध्ये हिंदू व मुस्लीम स्थापत्याचे मिश्रण आहे. विजयनगर साम्राज्यातील सम्राट आणि त्यांच्या सल्लागाराच्या बैठका, विविध महत्वाचे कार्यक्रम याकरीता याचा वापर केला जात असे. या वास्तूस अनेक प्रवेशद्वार आहेत. वास्तूस असणारे घुमट सुशोभित करण्यात आले आहेत.

### १.३. हत्तीचे तबेले:



विजयनगर कालखंडातील हत्तींचे तबेले ही अंत्यत आकर्षक इमारत आहे. राजेशाही लोक वापरत असलेले हत्ती याठिकाणी ठेवले जात असत. या ठिकाणी आकरा ते बावीस यादरम्यान हत्ती ठेवण्याची क्षमता होती. हत्तींच्या तबेलासमोर रिकामी जागा सोडण्यात आली आहे. याचा वापर परेड ग्रांउड म्हणून केला जात असे. दगडी बांधकाम असणाऱ्या या वास्तूस घुमट, आकर्षक कमानी आहेत.

### १.४. शाही व्यासपीठ :



एक उत्तम व्यासपीठ विजयनगर राजधानीमध्ये बांधण्यात आले होते. व्यासपीठाच्या सभोवताली भिंतीवर विविध आकृती रेखाटण्यात आले आहेत. युद्धातील प्राण्यांची मिरवणूक, शिकारीची दृश्ये, युद्धातील योद्धे, लाठांसह लोकनृत्य सादर करणाऱ्या स्त्रिया आणि संगीतकार यांचा यामध्ये समावेश आहे. राजधानीतील महत्त्वाचे कार्यक्रम प्रसंगी, महानवमीचा शाही उत्सव, धार्मिक विधी आणि विविध मनोरंजनाचे कार्यक्रम पाहण्यासाठी राजा या व्यासपीठावर बसत असे. या व्यासपीठास 'महानवमी दिब्बा' (विजयाचे घर) म्हणूनही ओळखले जाते.

### १.५. पाण्याच्या टाक्या:



विजयनगर कालखंडातील पाण्याच्या टाक्या अत्यंत आकर्षकरित्या बांधण्यात आल्या आहेत. या पाण्याच्या टाक्यांना 'पुष्पकर्णी' म्हणूनही ओळखले जात असे. या टाक्या मोठ्या आकाराच्या असून त्याचे बांधकाम काळ्या दगडात करण्यात आले आहे. या टाक्या चौकोणाकार असून त्यास उतरण्यासाठी पिरॅमिड सारख्या पायऱ्या आहेत. तुंगभद्रा नदीतून जलवाहिनीद्वारे यामध्ये पाणी सोडले

जात असे. या पाण्याचा टाक्यांचा वापर धार्मिक समारंभांदरम्यान विधी, स्नान आणि प्रार्थनेपूर्वी शुद्धीकरणासाठी किंवा धातूच्या देवतांच्या विसर्जनासाठी केला जात असे.

**१.६. रामचंद्र मंदिर :**



विजयनगरच्या राजांनी श्रीरामास आपले आदर्श मानले होते. राजे व इतर शाही लोकांना पूजा करण्यासाठी या मंदीराची रचना करण्यात आली आहे. श्रीराम हे आपली पत्नी सिता हिला रावणाच्या ताब्यातून सोडवण्यासाठी लंकेस गेले त्यावेळी त्यांना वानर सेनापती हनुमान आणि वानर राजा सुग्रीव यांनी मदत केली. सीतेला वाचवण्यासाठी लंकेला जाण्यापूर्वी श्रीरामांनी घेतलेली विश्रांती, रामायणामधील 'अरण्यकांड' मधील दृष्ये, राम-सिता व लक्ष्मण आरण्यात राहत होते याची चित्रे मंदिराच्या आतील व बाहेरील बाजूच्या भिंतीवर रेखाटण्यात आली आहेत. हनुमानाचे जन्मस्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संपूर्ण राजधानीत हनुमानाच्या प्रतिमा दिसतात.

**१.७ कृष्ण मंदिर :**

हम्पी आणि हेमाकुटा टेकडीच्या दक्षिणेला हे उध्वस्त झालेले मंदिर आहे. हे सम्राट कृष्णदेवरायाने ओरिसातील लष्करी मोहिमेनंतर बांधले होते. मंदिर दुहेरी आवारात आहे. मंदिराचा काही भाग आणि त्याच्या कंपाऊंडची पडझड झाली आहे, आणि काही जीर्णोद्धार केले गेले असले तरी, ते सामान्यत: खराब स्थितीत आहे. आतील भागात आता कोणतीही प्रतिमा नाही.

**१.८. लक्ष्मी नरसिंह मंदिर**

हंपीच्या दक्षिणेला ही विष्णूची उग्र रूप असलेली नरसिंहाची ६.७ मीटर उंचीची खडकातून कापलेली भव्य मूर्ती आहे. मुळात मूर्तीमध्ये एका गुडघ्यावर लक्ष्मीची छोटी प्रतिमा होती तोडफोडीमुळे ती पडली असावी. लक्ष्मीची मूर्ती आता कमलापुरम येथील संग्रहालयात आहे. नरसिंह हे शेषाच्या कुंडलीवर बसलेले दाखवले आहेत. शेषा येथे सात डोक्यांसह दर्शविले आहे, डोके नरसिंहाच्या वर कमान करून छत तयार करतात. या पुतळ्याचा नुकताच जीर्णोद्धार करण्यात आला आहे.

**१.९. सुग्रीवाची गुहा :**

ही एक नैसर्गिक गुहा आहे. वानरराजा सुग्रीवाचे मूळ निवासस्थान आहे. जिथे रामाने त्याला आणि हनुमानाला त्याच्या प्रवासात भेटल्याचे सांगितले जाते. गुहेचे योग्य व्यवस्थान केले आहे त्यामुळे ती यात्रेकरूंचे लक्ष वेधून घेते.

### १.१०. विरुपाक्ष मंदिर :



हेमाकुटा या टेकडीवर विरूपाक्ष मंदीर आहे. हे सर्वात जुने मंदीर आहे. विरूपाक्ष देव भगवान शिवाचा एक अवतार मानला जातो. विजयनगर साम्राज्याची संरक्षक देवता म्हणून यास महत्वाचे स्थान आहे. मंदीर पूर्वमुखी असून अतीशय सुंदररित्या याचे बांधकाम करण्यात आले आहे. विरूपाक्ष व त्याची पत्नी पंपा याचा विवाह प्रत्येक वर्षी येथे लावला जातो आणि हा येथिल मोठा वार्षिक सण म्हणून साजरा केला जातो. पंपास पार्वतीचे रूप मानले जाते. पंपा नावावरून हंपी हे नाव पडले असे मानले जाते.

### १.११. विठ्ठल मंदिर :



विठ्ठल मंदीर



'विवाह हॉल'(कल्याण मंडप)



दगडी रथ–गरुड मंदिर

विठ्ठल मंदीर ही पंधराव्या शतकातील भव्य वास्तू आहे. मंदिराची रचना आयताकृती असून त्याच्या परीसरात आसपास अनेक इतर मंदीरे आहेत. या मंदीरामधील एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे खुले व अनेक–स्तंभ असलेला 'विवाह हॉल' (कल्याण मंडप) होय. देवाचे व त्याच्या पत्नीचे प्रतीकात्मक विवाह याठिकाणी होतात.

मंदिर परिसरामध्ये एक दगडी रथ आहे यास गरुड मंदिर असेही म्हटले जाते. गरुड हे विष्णूचे वाहन आहे. धार्मिक सणांवेळी मिरवणुकीत देवतांच्या धातूच्या प्रतिमा घेऊन जाण्यासाठी या रथाचा वापर केला जात असे.

याशिवाय विजयनगर शहराच्या सभोवतालच्या प्रदेशामध्ये विखुरलेल्या भव्य दगडांच्या सहायाने अनेक कोरीवकामे करण्यात आली आहेत. यामध्ये कृष्णदेवयाने दान केलेले वीस फुटांपेक्षा जास्त उंचीचे एक नेत्रदीपक नरसिंहाचे दगडी कोरीव शिल्प, विष्णूचा मनुष्य–सिंह अवतार, विष्णू सात नागांच्या शैयावर विराजमान अवतार, दगडी रथ इ. समावेश आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न – ३**

खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.

१. कुतूबमिनार ही वास्तू .............. यांनी बांधली आहे.

अ. कुतुबुद्दीन ऐबक ब. गियास-उीन तुघलक

क. अल्लाउद्‌दीन खिलजी ड. महम्मद लोदी

२. .................... ही भारतातील सर्वात पहिली मशीद आहे.

अ. कुव्वत-उल-इस्लाम ब. जामा मशीद

क. हाजी अली दर्गा ड. बाबरी मशीद

३. युनोस्कोने १९८६ मध्ये कर्नाटकातील हम्पी येथील अवशेषांना जागतिक वारसा स्थळाचा दर्जा बहाल केला.

अ. १९८७ ब. १९६८ क. १९८६ ड. १९८५

४. विजयनगर कालखंडातील पाण्याच्या टाक्यांना .............. म्हणून ओळखले जात असे.

अ. पुष्पकर्णी ब. पुष्पलता क. पुष्प ड. यापैकी नाही

५. विजयनगरमधील हेमाकुटा या टेकडीवर ..............चे मंदीर आहे.

अ. विरूपाक्ष ब. विठ्ठल क. विष्णु ड. नरसिंह

६. विजयनगर साम्राज्याची संरक्षक देवता म्हणून ......... यास महत्वाचे स्थान आहे.

अ. विठ्ठल ब. विरूपाक्ष क. विष्णु ड. नरसिंह

७. 'पंपा' या देवीच्या नावावरून .......... हे शहराचे नाव पडले आहे.

अ. विजयनगर ब. हंपी क. हेमकुटा ड. यापैकी नाही

## ४.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

- **शेख, पीर कवा मुर्शिद :** सूफीगुरूला शेख, पीर कवा मुर्शिद या नावाने ओळखतात.
- **'मुरीद' :** सूफी शिष्याला 'मुरीद' असे म्हणतात.
- **दर्गा :** सूफी गुरूच्या समाधीची जागा म्हणजे दर्गा होय.
- **उरूस' :** गुरूच्या पुण्यतिथी निमित्त जी यात्रा भरते त्यास 'उरूस' असे म्हणतात.

## ४.४ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

- **स्वयं अध्ययन प्रश्न–१ ची उत्तरे**

खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.

१. क. सात २. क. मुरीद ३. अ. ख्वाजा अब्दुल चिश्ती

४. अ. उरूस ५. अ. नजीबउीन

- **स्वयं अध्ययन प्रश्न–२ ची उत्तरे**

खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.

१. अ. स्वामी रामानंद २. ब. कबीर ३. अ. सूरदास ४. ड. वल्लभाचार्य

५. अ. सूरदास

- **स्वयं अध्ययन प्रश्न–३ ची उत्तरे**

खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.

१. अ. कुतुबुीन ऐबक २. अ. कुव्वत–उल–इस्लाम ३. क. १९८६

४. अ. पुष्पकर्णी ५. अ. विरूपाक्ष ६. ब. विरूपाक्ष ७. ब. हंपी

## ४.५ सारांश

मध्ययुगीन कालखंडातील सुफी संप्रदायाच्या उदयाची वेगवेगळी कारणे होती. सूफी संप्रदायामुळे इस्लाम धर्मातील कट्टरपणा कमी झाला. सहिष्णुवृत्तीच्या सूफी संप्रदायाने समाजामध्ये शांतता व सलोखा निर्माण केला. सुफी चळवळ तिच्या समतावादी विचारांमुळे आणि प्रार्थनेतील साधेपणामुळे अधिक लोकप्रिय झाली.

भक्तीचळवळीचा विकास विविध कारणांमुळे झाला. हिंदू समाजामध्ये जातीव्यवस्था कठोर होती. जैन व बौद्ध धर्म या दोघांनीही धर्माचा प्रचार सुरू केला होता. सूफी संप्रदायाची लोकप्रियता वाढत होती. अशावेळी समाजास भावनिक आणि आध्यात्मिक गरजा पूर्ण करणाऱ्या धर्माची गरज होती. यातूनच हिंदू धर्मातील भक्ती परंपरेचा विकास आणि प्रसार झाला. संतांनी पारंपारिक धर्म नाकारला व भक्ती चळवळीचा विकास झाला.

दिल्ली सल्तनत मध्ये गुलाम घराणे, खिलजी घराणे, तुघलक घराणे, सय्यद घराणे, आणि लोधी घराणे यांचा यामध्ये समावेश होतो. दिल्ली सल्तनत मधील राज्यकर्त्यांनी वास्तूकला मध्ये भरीव कामगिरी केली. मोठे अंगण, लाल दगडाचा वापर, हिंदू संस्कृतीचा प्रभाव, प्रशस्त बागा इ. सल्तनत कालीन वास्तूकलेची वैशिष्टे दिसून येतात. विजयनगर कालखंडातही वास्तूकलेचा विकास झाला. विजयनगरच्या सम्राटांनी प्राचीन

मंदिरांचे जतन व नवीन मंदिरांचे बांधकाम केले. भव्य स्मारके तयार केली व विजयनगरची स्थापत्यशैली म्हणून नवीन वास्तूशैली उदयास आली. परिणामी जागतिक स्तरावर विजयनगरचे सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्व प्रकट झाले आहे.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) टीपा लिहा

१. सुफी संप्रदायाचे तत्वज्ञान

२. सुफीचे आचारशास्त्र

३. चिश्ती संप्रदाय

४. कादिरिया संप्रदाय

५. भक्ती चळवळीच्या उदयाची कारणे

६. भक्तीचे चळवळीचे स्वरूप/वैशिष्ट्ये

७. संत कबीर

८. संत सुरदास

९. भक्ती चळवळीचे परिणाम/प्रभाव

१०. सल्तनत कालखंडातील वास्तुकलेची वैशिष्टे

११. विजयनगरकालीन वास्तुकला

ब) दिर्घोत्तरी प्रश्न :

१. सूफीवादाचा उदय, प्रसार आणि लोकप्रियता याचे मूल्यांकन करा.

२. भारतातील सूफीसंप्रदायाचा इतिहास सांगा.

३. सुफीवादाच्या विविध तत्त्वज्ञानाचे विश्लेषण करा.

४. भारतातील सूफी पंथातील उपसंप्रदाय (सिलसिला) विषयी माहिती लिहा.

५. भक्ती चळवळीविषयी सविस्तर माहिती लिहा.

६. संत कबीर यांचे भक्ती चळवळीतील योगदान स्पष्ट करा.

७. संत सूरदास यांचे भक्ती चळवळीतील योगदान स्पष्ट करा.

८. विजयनगरकालीन वास्तुकलेविषयी सविस्तर माहिती लिहा.

९. सल्तनत कालखंडातील वास्तुकलेविषयी सविस्तर माहिती लिहा.

## ४.७ संदर्भ ग्रंथ :


- सरकार, जदुनाथ. फॉल ऑफ द मुघल एम्पायर, ५ वा खंड. नवी दिल्ली, ओरिएंट, १९९२
- हुसेन, हमीद, सूफीवाद आणि भक्ती चळवळ. नवी दिल्ली, मानक पब्लिकेशन्स, २००७.
- शर्मा, कृष्णा, भक्ती आणि भक्ती चळवळ. नवी दिल्ली रू मुन्शीराम मनोहरलाल पब्लिशर्स, २००२.

- डॉ. शेख एजाज, सूफी संप्रदाय, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २००९
- वकील अलीम, सूफी संप्रदायाचे अंतरंग, पुणे, २०००
- डॉ. अनिल कठारे, मध्ययुगीन भारत, कल्पना प्रकाशन
- Dr. Singh Amarkant, Bhakti and Sufi Movement, Pushpanjali Prakashan, 2018
- https://smarthistory.org/art-and-architecture-of-vijayanagara-empire/
- Hussain, Hamid, Sufism and Bhakti Movement, Manak Publications, New Delhi, 2007.
- Karmarkar, A.P. (1947) [1947]. Cultural history of Karnataka: ancient and medieval Dharwad: Karnataka Vidyavardhaka Sangha. OCLC 8221605
- Lycett, Mark T. and Kathleen D. Morrison. "The 'Fall' of Vijayanagara Reconsidered: Political Destruction and Historical Construction in South Indian History." *Journal of the Economic and Social History of the Orient* 56, No. 3 (2013): 433-70.
- Michell, George. *The New Cambridge History of India 1:6 Architecture and Art of Southern India*. Cambridge: Cambridge University Press, 1995.
- Mujaffar, Husan Sayyad, Indian History: Culture And Society Under Delhi Sultanate, New Delhi.
- Ray Aniruddha, The Sultanate of Delhi (1206– 1526): Polity, Economy, Society and Culture, Manohar Publication, 2019
- Sharma, Krishna, Bhakti and the Bhakti Movement, New Delhi, Manoharlal Publishers, 2002.


❑❑❑

# घटक १

# उत्तर भारतातील प्रमुख सत्ताधिश

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

  १.२.१ शेरशहा सुरीचा वारसा

  १.२.२ अकबर: धार्मिक धोरण

१.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

१.४ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ संदर्भ ग्रंथ


**१.० उद्दिष्टे:**

या घटकाच्या अभ्यासानंतर खालील गोष्टींचे आकलन होईल.

- शेरशहा सुरी याने साम्राज्यविस्तार कशाप्रकारे केला याची माहिती मिळेल.
- शेरशहा सुरीची प्रशासन व्यवस्था कशाप्रकारे होती याची माहिती मिळेल.
- शेरशहा सुरीने जमीन महसूल पध्दती, स्थापत्यशास्त्र क्षेत्रात केलेली प्रगती याविषयी माहिती मिळेल.
- शेरशहाने न्यायव्यवस्था, दळणवळण, अर्थव्यवस्थेसह विविध क्षेत्रात केलेल्या सुधारणाविषयी माहिती मिळेल.
- अकबराच्या धार्मिक धोरणाविषयी माहिती मिळेल.
- अकबराच्या धार्मिक धोरणाचे फायदे व तोटे याविषयी माहिती मिळेल.

## १.१ प्रास्ताविक :

मध्ययुगीन कालखंडामधील बादशहा शेरशाह हा धडाडीचा योद्धा व कुशल राज्यकर्ता होता. त्याने आपल्या साम्राज्यात कल्याणकारी राज्याची संकल्पना राबवली. साम्राज्यात उत्कृष्ठ न्यायव्यवस्था, अर्थव्यवस्था, महसूल व्यवस्था व दळण वळण व्यवस्था राबविली. विविध क्षेत्रात उल्लेखनिय प्रगती करून साम्राज्य प्रगतीपथावर नेले. त्याच्या सुधारणांमुळे राज्याची आर्थिक स्थिती भक्कम झाली. मध्ययुगातील एक कार्यकुशल व प्रतापी राजा म्हणून शेरशहाची इतिहासात नोंद झाली आहे.

हिंदूस्थानला आपला देश मानणाऱ्या सम्राट अकबराने मोगल साम्राज्याचा पाया मजबूत केला. राज्यारोहणप्रसंगी त्याच्या ताब्यात निश्चित असा कुठलाच प्रदेश नव्हता. विश्वासार्ह असे सैन्यही त्याच्या हुकमतीखाली नव्हते. तरीही त्याने आपला पालक बैरामखान याच्या मदतीने साम्राज्यविस्तार केला. प्रतिस्पर्धी मुहम्मदशाह आदिल सूर ह्याचा दिवाण हेमू याचा पानिपतच्या मैदानावर पराभव केला. अकबराचे भारताच्या इतिहासातील स्थान फार मोठे आहे. त्याने विशिष्ट लोकांची राज्य करण्याची मिरासदारी नष्ट केली. देश एकछत्री अंमलाखाली आणला.

अकबरचे धार्मिक धोरण हे सहिष्णुता, समन्वय आणि उदारमतवाद्यांवर आधारित होते. त्याने जिझिया व तीर्थयात्रा कर रद्द करून हिंदू समाजावरील धार्मिक बंधने कमी केली तसेच रजपूत, हिंदू, जैन व इतर धर्मीयांना राज्यकारभारात सहभागी करून घेतले. इबादतखाना, महजरनामा आणि सुल्ह-ए-कुलया उपायांमुळे त्याच्या धोरणाला वैचारिक आधार मिळाला.

मध्ययुगीन कालखंडातील शेरशहा सुरी व सम्राट अकबर याचे धार्मिक धोरण याविषयी सखोल माहिती आपणास या प्रकरणामध्ये मिळणार आहे.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ शेरशहा सुरीचा वारसा

#### १. शेरशहाचे पूर्व चरित्र:

शेरशाह सुरी यास 'शेरखान' या नावानेही ओळखले जाते. शेरशाह सूरीचे मूळ नाव फरीद असे होते. आजोबा इब्राहीम सूर व वडील हसन सूर हे मूळचे अफगाणिस्तान मधील शेरगढी येथील होते. नोकरीनिमित्त ते हिंदुस्थानात आले. सुलतान सिकदंर लोदीचा सुभेदार जमालखान याचे पदरी जौनपूर येथे ते नोकरीस होते. फरीदचे वडील हसन यांनी त्यांच्या पराक्रमावर खुश होवून जमालखान याने बिहारमधील ससाराम व खवासपूर हांडा हे परगणे जहागिरी म्हणून दिले.

फरीद आपल्या वडीलाबरोबर ससाराम येथे आला. मात्र त्याची सावत्र आई त्यास त्रास देत होती. घरातील सावत्र आईच्या त्रासास कंटाळून तो १५०१ मध्ये जौनपूरच्या मदरसात राहवयास गेला. तिथेच त्याने

आपले शिक्षण पूर्ण केले. अरबी व फार्सी या भाषा अवगत केल्या. गणितामध्ये प्राविण्य मिळवले. गुलिस्तान, बुस्तान, सिकंदरनामा या ग्रंथाचा अभ्यास केला. पुढे काही मित्रांच्या आग्रहास्तव ससाराम व खवास्सपूर यांचे व्यवस्थापन फरीदकडे आले. १५१८ ते १५२२ या कालखंडात त्याने उत्तमप्रकारे कारभार केला. परंतु पुन्हा सावत्र आईच्या हस्तक्षेपामुळे त्यास ती जहागीरी सोडून आग्र्याच्या सुलतान इब्राहिम लोदीकडे आश्रय घ्यावा लागला. आग्र्यास असताना फरीदने दौलतखान या अमीराची मर्जी संपादन केली. दरम्यान त्याचे वडील हसनचे निधन झाले. दौलतखानाने लोदी सुलतानास सांगून फरीद यास त्याच्या वडिलांची जहागीर देण्याविषयी सांगितले. मात्र सुलेमान या त्याच्या सावत्र भावाने चैंडचा जहागीरदार मुहम्मदखान याची मदत घेऊन त्यास विरोध केला.

वडीलांची जहागिरी न मिळाल्यामुळे फरीदने बिहारचा सुलतान बहारखान याचेकडे नोकरी पत्करली. त्याच्या पदरी नोकरीस असताना एकदा शिकारीच्या वेळी फरीदने एकट्याने वाघ मारला, म्हणून त्यास बहारखानाने 'शेरखान' ही उपाधी दिली. फरीदमधील गुण ओळखून त्याची दक्षिण बिहारचा उप-राज्यपाल म्हणून नेमणूक केली. इ.स. १५२७ मध्ये शेरखान मोगल बादशाह बाबराच्या सैन्यात दाखल झाला. मुघल युद्धपद्धती व प्रशासन याचे ज्ञान घेणे हा त्याचा मुख्य हेतू होता. बाबरास त्याने अनेक स्वाऱ्यामध्ये मदत केली. परीणामी बाबराने त्याची मूळ जहागीर ससराम व खवास्सपूर १५२८ मध्ये त्यास परत मिळवून दिली. बाबरास शेरखानच्या हालचालींबद्दल संशय आला आणि त्याने आपल्या अधिकाऱ्यामार्फत शेरखानवर कडक नजर ठेवली. शेरखान बाबराच्या सैन्यामधून निसटला व बिहार सुलतानाच्या पदरी पुन्हा रूजू झाला. बिहारचा सुलतान मरण पावल्यानंतर त्याची पत्नी दुदूबीबीने आपला अल्पवयीन मुलगा गादीवर बसवले व त्याच्या नावे राज्यकारभार चालविला. मुहम्मद लोदीने तिच्या राज्याला वेढा दिला असता बाबराने तिला मदत केली. तिने बाबराचे मांडलिकत्व पत्करले आणि शेरखानची राज्याचा प्रतिनिधी म्हणून नेमणूक केली. दुदूबीबीचा मृत्यू १५३० मध्ये झाला व शेरखानच्या हाती सर्व सत्ता आली.

## २. शेरखानचा साम्राज्यविस्तार:

### २.१ चुनार किल्ल्यावर वर्चस्व:

बादशहा हुमायुन व शेरखान यांच्यामध्ये चुनार येथे संघर्ष झाला. या संघर्षामध्ये शेरखानचा पराभव अटळ होता तेंव्हा शेरखानने आपण पराभव मान्य केल्याचे नाटक केले व माघार घेतली. हुमायुन बरोबर वाटाघाटी केल्या व युक्तीने चुनारचा किल्ला आपल्या ताब्यात घेतला. हुमायुननेही चुनारचा किल्ला शेरखानच्या ताब्यात देण्याचे मान्य केले. हुमायुन परत गेल्यानंतर शेरखानने आपले सैन्य मजबूत केले व तो अफगाणाचा नेता बनला. स्वतःस 'हजरत-ए-आला' ही पदवी धारण केली. हुमायन यास हे समजताच त्याने शेरखानचा बंदोबस्त करण्याकरीता हिन्दूबेग यास पाठवले. मात्र शेरखानने त्यास आपल्या बाजूस वळविले. परिणामी हिन्दूबेगने हुमायन यास शेरखानबाबत चुकीची माहिती दिली त्यामुळे हुमायुनने आक्रमण केले नाही. शेरखान यास आपले सैन्य वाढविण्यासाठी वेळ मिळला व तो शक्तीषाली बनला.

### २.२ बिहारवर वर्चस्व:

शेरखानच्या वाढत्या सामर्थ्यामुळे त्याचे अनेक शत्रू निर्माण झाले. बिहारच्या सरदारांनी एकत्र येवून बंगालच्या महमूदशी युती केली. शेरखान यास हे समजताच त्याने आक्रमण केले व बंगालचा सुलतान आणि सरदार यांच्या संयुक्त सैन्याचा बिहारमधील सूरजगढ येथे पराभव केला. महमूदशाह बंगालला पळून गेला आणि त्याच्यासोबत त्याचे सहकारीही पळून गेले. संपूर्ण बिहार शेरखानच्या ताब्यात आला आणि तो एकमात्र स्वामी बनला. सूरजगडचा विजय शेरखानच्या आयुष्यातील महत्त्वाची घटना होती.

### २.३ बंगालवर स्वारी:

सूरजगढ येथील विजयानंतर शेरखानने १५३५ मध्ये बंगालच्या महमूदशाहवर हल्ला केला. महमूदशाहने शेरखानला पैसे देऊन आपले प्राण वाचवले. काही कालावधीनंतर शेरखानने १५३७ मध्ये बंगालची राजधानी गौडला पुन्हा वेढा घातला व ते जिंकूण घेतले. गौडचे नाव बदलून 'जन्नताबाद' असे ठेवले.

### २.४ चौसाची लढाई:

हुमायुन व शेरखान यांच्यामध्ये चौसायेथे २६ जून १५३९ रोजी युध्द झाले. युध्दादरम्यान हुमायुन बरोबर शेरखानने चर्चा व तह करण्याचे नाटक केले. पावसाळा सुरू होताच अचानक हुमायुनच्या सैन्यावर हल्ला केला व विजय मिळवला. या विजयामुळे शेरखानचा उत्साह वाढला. त्याने त्यानंतर स्वतःस 'शेरशाह सुलतान-ए-आदिल' ही पदवी धारण केली. शेरखान येथून पुढे 'शेरशहा' म्हणून ओळखला जावू लागला. या युध्दानंतर बिहार आणि बंगालचा संपूर्ण प्रदेश त्याच्या वर्चस्वाखाली आला.

### २.५ कनौज-बिलरामची लढाई:

चौसायेथील पराभवानंतर हुमायूनने आपला गेलेला प्रदेश मिळवण्यासाठी खूप प्रयत्न केले. परंतु सर्वोतोपरी प्रयत्न करूनही त्यास यश प्राप्त झाले नाही. १७ मे १५४० रोजी कनौजजवळ मुघल आणि अफगाण सैन्य यांच्यामध्ये लढाई झाली. हुमायूनच्या सैन्याचा दारुण पराभव झाला. हुमायून कसातरी पळून जाण्यात यशस्वी झाला. या विजयामुळे शेरशाह दिल्ली, आग्रा, संभल आणि ग्वाल्हेरचा स्वामी झाला. यायुध्दानंतर काही काळासाठी मुघल घराणे संपले आणि पुढील पंधरा वर्षे सत्ता सूर घराण्याच्या हाती गेली.

### २.६ पंजाबची लढाई:

मुघल साम्राज्याचा प्रमुख बनल्यानंतर शेरशाहने हुमायूनचा भाऊ कामरान याच्यावर आक्रमण केले. कामरानकडून १५४०-१५४२ या कालखंडात त्याने पंजाब जिंकून घेतले. सिंधू आणि झेलम नद्यांच्या उत्तरेकडील प्रदेश आपल्या ताब्यात घेतला व रोहतासगडचा किल्ला बांधला.

### २.७ माळवाची प्राप्ती:

हुमायून बरोबरच्या संघर्षावेळी शेरशाहास माळव्याच्या शासकाने मदत केली नव्हती. त्यामुळे १५४२ मध्ये शेरशाहने माळव्यावर हल्ला केला. माळव्याचा शासक कादीरशहाने लढाई न करता गुजरातला पलायन केले. शेरशाहने माळव्यास आपल्या साम्राज्यात सहभागी करून घेतले.

### २.८ मुलतान, सिंधची प्राप्ती:

शेरशहाने मुघल सत्तेवर वर्चस्व निर्माण केल्यानंतर मुलतान व सिंधचा प्रदेश ताब्यात घेण्यासाठी आपल्या सरदारास पाठविले. शेरशाहच्या आदेशानुसार त्याच्या सरदाराने मुलतान व सिंधवर १५४३ मध्ये हल्ला केला व दोन्ही प्रांत जिंकून शेरशाहच्या साम्राज्यात जोडले गेले.

### २.९ सामेलचे युध्द व मारवाडची प्राप्ती:

राणासंग याच्या मृत्यूनंतर चितोडचे रजपूत राजावरील प्रभावामध्ये घट झाली. मारवाडच्या मालदेवने आपला प्रभाव व क्षेत्र वाढवले. मारवाडच्या मालदेव याच्यावर १५४३ मध्ये शेरशाहने आक्रमण केले. यावेळी शेरशहाबरोबर ८०००० हजार घोडेस्वार, हत्ती, तोफखाना होता. अजमेर, जोधपूर दरम्यान सामेल येथे राजपूत व अफगाण सैन्य यांच्यामध्ये १५४४ मध्ये लढाई झाली. शेरशाहने मालदेवचा पराभव करण्यासाठी मुत्सद्देगिरीचा अवलंब केला. त्याने बनावट पत्रे मालदेवजवळ पोहच होतील याची व्यवस्था केली. याचा परिणाम असा झाला की, आपले काही सरदार आपणास सोडून जाणार आहेत अशी मालदेवला शंका आली. परिणामी मालदेवने माघार घेण्याचे ठरवले. परंतु त्याच्या काही सैन्याने शेरशाहच्या सैन्यावर जोरदार हल्ला चढवला व ते शौर्याने लढले झालेल्या युध्दात शेरशाह विजयी झाला. या लढाईची व्याप्ती प्रचंड होती. शेरशहाने या लढाई बाबत उद्गार काढले की, 'मूठभर धान्यासाठी मी भारताचे साम्राज्य गमावून बसलो असतो.'

### २.१० कालिंजरचे युध्द:

कालींजरचा शासक किरतसिंग होता. त्यास शेरशहाचे वर्चस्व मान्य नव्हते. शेरशाहने कालिंजरवर स्वारी करण्याची योजना आखली. शेरशाहने १५४४ मध्ये कालींजर किल्ल्यास वेढा घातला. वेढाप्रसंगी शेरशाह शस्त्रागाराची पाहणी करत असताना बॉम्बस्फोटात गंभीर जखमी झाला. जखमी अवस्थेतही त्याने आक्रमण चालू ठेवण्याचा आदेश दिला आणि संध्याकाळपर्यंत किल्ला ताब्यात घेतला. किल्ला ताब्यात आला मात्र शेरशाहाचा त्याच दिवशी मृत्यू झाला.

## ३. शेरशाह सुरी: प्रशासन व्यवस्था

शेरशहा एक उत्तम प्रशासक होता. प्रशासकीय व्यवस्थेत त्याने मोठे व महत्त्वाचे बदल घडवून आणले. कोणताही धार्मिक भेदभाव न करता प्रशासनात सर्वांना समान संधी दिली. साम्राज्यात शांतता व लोकांचे कल्याण हे प्रमुख तत्व स्विकारले. विविध सामाजिक सुधारणा केल्या. शेरशहाच्या प्रशासन व्यवस्थेची प्रमुख वैशिष्टे खालील प्रमाणे आहेत.

### ३.१ केंद्रीय प्रशासन:

शेरशाहने दिल्ली सल्तनतीच्या काळापासून चालू असणारे केंद्रीय प्रशासन चालू ठेवले होते. अल्लाउद्दीन खिलजी प्रमाणेच निरंकुश शासन स्थापन केले. अफगाण परंपरेचे पालन करण्याचा प्रयत्न केला होता. त्याचा कारभार लोकशाही पध्दतीचा होता. शेरशाह सूरीने कोणतीही नवीन प्रशासकीय व्यवस्था स्थापन केली नाही

परंतु प्रथमपासून लागू असणाऱ्या प्रशासन व्यवस्थेमध्ये आवश्यक ते बदल केले. सर्व सत्तेचे केंद्रीकरण करून सर्व सत्ता आपल्या हातात ठेवली. प्रशासन, लष्कर, न्यायव्यवस्था आणि कायदा या क्षेत्रातत उल्लेखनिय कार्य केले. त्याच्या केंद्र सरकारमध्ये चार मुख्य मंत्री होते,

**१. दिवाण–ए–विजारत:**

शेरशहाचा हा सर्वात महत्वपूर्ण विभाग होता. राज्याच्या उत्पन्नावर आणि खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी या विभागाची निर्मिती करण्यात आली होती. शेरशहा स्वतः या विभागामध्ये लक्ष घालत असे.

**२. दिवाण– ए –अरीझ:**

या विभागाच्या प्रमुखास 'दिवाण–ए–ममालिक' असेही म्हटले जात असे. सैन्य व्यवस्था संदर्भात हा विभाग काम करत असे. सैन्याची भरती करणे, लढाईस सैन्य पाठवणे, सैन्याचे पगार देणे इत्यादी कामे हा विभाग करत होता.

**३. दिवाण–ए– रसालतः**

परराष्ट्र व्यवहार पाहणारा हा विभाग होता. या विभागास 'दिवाण–ए–मोहता–सिब' असेही म्हटले जात असे. परकीय दूतांचे स्वागत करणे, त्यांची राहण्याची व्यवस्था करणे, पत्रव्यवहार करणे इत्यादी कामे या विभागामार्फत केली जात असत.

**४. दिवाण–ए–कझा :**

न्यायव्यवस्था पाहणार हा विभाग होता. मुख्य काझी या विभागाचा प्रमुख होता.

**५. दिवाण–ए–ईन्सा :**

राजकीय बाबी पाहण्यासाठी व प्रांतातील पदाधिकारी यांच्याबरोबर पत्रव्यवहार करण्यासाठी या विभागाची निर्मिती करण्यात आली होती. राज्यात घडणा–या विविध घटनांची माहीती सम्राटास देण्याचे कामही हा विभाग करत होता.

**६. दिवाण–ए–बरीद:**

शेरशहाचा हा गुप्तचर विभाग होता. या विभागाच्या प्रमुखास 'बरीद–ए–ममालिक' असेही म्हटले जात असे. या विभागाचे अनेक हेर साम्रात्यातील विविध भागात होते. साम्राज्यातील सर्व माहिती गुप्तपणे ते राजास देत असत.

आशाप्रकारे शेरशहाने भक्कम केंद्रीय प्रशासन निर्माण केले होते. शेरशाह स्वतः सर्व विभागाच्या कामकाजावर व दैनंदिन व्यवहारावर देखरेख करत असे. आपल्या कारकिर्दीत इतर कोणासही महत्त्व प्राप्त होवू नये याची त्याने दक्षता घेतली होती. प्रशासनातील भ्रष्टाचार त्याने दूर केला व कल्याणकारी धोरणे राबविली.

### ३.२ प्रांतीय प्रशासन:

शेरशाहच्या कालखंडात प्रांतिक प्रशासनाबाबत इतिहासकारांची वेगवेगळी मते आढळून येतात. डॉ. कनुनगो यांच्या मते, 'शेरशाहच्या काळात कोणतेही प्रांतीय प्रशासन कार्यरत नव्हते. सर्व सत्ता केंद्र व परघणा या दोन घटकामध्ये विभागली होती. याचे कारण म्हणजे शेरशहा प्रशासनामध्ये इतर कोणासही महत्व देवू इच्छित नव्हता.' डॉ. परमात्माशरण यांच्या मते 'शेरशहाच्या कालखंडात त्याचे साम्राज्य वेगवेगळया प्रातांत विभागले होते. तसेच प्रत्येक विभागाचा प्रमुख लष्करी अधिकारी होते.'

आधुनिक इतिहासकारांच्या मते शेरशाहच्या काळात अनेक प्रांत किंवा सुभा होते. एक निश्चित प्रांतिक संघटना होती. शेरशाहने प्रांतीय प्रशासनात दोन नवीन प्रयोग राबविले होते. पहिला प्रयोग बंगालमध्ये १५४१ मध्ये केला. बंगालमध्ये त्याने गव्हर्नरची नेमणूक केली. हा बंगालचा गव्हर्नर अन्यायी वृत्तीने वागू लागला तेंव्हा शेरशाहने त्याला कैद केले आणि बंगालचे अनेक तुकडे करून प्रत्येकासाठी स्वतंत्र अधिकारी नेमले. उप-गव्हर्नरांची नियुक्ती हा त्यांचा दुसरा प्रयोग होता. पंजाबच्या हैबतखानच्या अधिपत्याखाली दोन उप-गव्हर्नर नेमले. त्यांच्या काळात ही योजना बहुधा मुलतान, बलुचिस्तान आणि सरहिंदमध्ये लागू करण्यात आली होती. शेरशाहने प्रांतीय गव्हर्नरांवर कडक नियंत्रण ठेवले आणि वेळोवेळी त्यांच्या लष्करी व प्रशासकीय कामकाजावर देखरेख ठेवली.

### ३.३ स्थानिक प्रशासनः

शेरशाह सूरीने प्रातांचे विभाजन स्थानिक स्तरावर सरकार, परगणा आणि गाव असे केले होते.

#### सरकार/जिल्हा प्रशासन:

स्थानिक प्रशासनामध्ये सरकार म्हणजेच जिल्हा हा मोठा घटक होता. शेरषहाने सरकारचा कारभार पाहण्यासाठी खालील दोन अधिकाऱ्यांची निवड करण्यात आली होती.

#### १. शिकदार-ए-शिकदारन:

हा सरकारचा प्रमुख अधिकारी होता. तो त्याच्या हाताखाली असणाऱ्या शिकदार यांच्यावर लक्ष ठेवत असे. वर्चस्वाखालील प्रदेशामध्ये शांतता ठेवणे हे याचे प्रमुख काम होते. याचे पद सैनिक अधिकारी याच्या बरोबर होते. यास ५००० सैनिक ठेवण्याची परवानगी होती. याच्या मदतीसाठी फौजदार या अधिकाऱ्यांची नेमणूक केली जात असे.

#### २. मुन्सिफ-ए-मुसिफान:

हा अधिकारी न्यायदानाचे काम करत असे. प्रमुख न्यायाधिशाची भुमिका यास पार पाडावी लागत असे. शेरशाहने सरकरांच्या कारभारात स्वतः लक्ष घातले होते. न्यायव्यवस्था स्थापन केली. अधिकाऱ्यांना नेहमी लोकांच्या सोयीकडे लक्ष देण्याचे आदेश दिले. सैन्य आणि आर्थिक व्यवस्था पाहण्यासाठी वेगवेगळे

अधिकारी नेमले. बंडखोरीस आळा घातला. सरकारच्या अधिकार्यांची नियुक्ती आणि बडतर्फीचा अधिकार स्वतःकडे ठेवला त्यामुळे सत्तेवर पुर्णतः नियंत्रण शेरशहाचे राहीले.

### ३.४ परगणाचे प्रशासन:

प्रत्येक सरकर किंवा जिल्हा अनेक परगणांमध्ये विभागला गेला होता. या विभागाचा कारभार पाहण्यासाठी खालील दोन अधिका-यांची नियुक्तीक करण्यात आली होती.

१. शिकदार: हा परगणाचा प्रमुख अधिकारी होता. परगणामध्ये शांतता व सुव्यवस्था राखणे हे याचे मुख्य काम होते.

२. मुन्सिफ: महसूल गोळा करणे. जमिनीचे मोजमाप करणे इ. जबाबदारी होती.

३. खजिनदार किंवा पोतदार व कारकून: वरील दोन अधिकाऱ्यांना सहकार्य करण्यासाठी या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. जमिनीच्या नोंदी हिंदी व फारसीमध्ये ठेवणे, महसूल गोळा करणे, जमिनीचे मोजमाप करणे, शांतता प्रस्थापित करणे याकरीता हे अधिकारी मदत करत असत.

### ३.५ ग्राम प्रशासन:

शेरशहाच्या कालखंडातील सर्वात लहान विभाग ग्राम होता. ग्राम प्रशासनातील प्रमुखास 'मुखिया' असे म्हटले जात होते. ग्रामातील शेतकऱ्याकडून महसूल गोळा करण्याची प्रमुख जबाबदारी मुखियावर होती. शेतकऱ्यांकडून महसूल गोळा करून तो खजिनदाराकडे पाठवत असे. महसूल गोळा करण्याबरोबरच गावात शांतता व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी, गावाचे रक्षण करण्याची जबाबदारी मुखियाकडे होती.

### ३.६ महसूल प्रशासन:

शेरशाहच्या कालखंडात जमीन महसूल हे उत्पन्नाचे प्रमुख साधन होते. शेरशहाने जमीन महसूल व्यवस्था आणि जमीन प्रशासनाकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले होते. शेरशहाने जमीन महसूल प्रशासनाच्या क्षेत्रात अनेक सुधारणा केल्या. महसूल दर निष्चित करण्यासाठी जमिनीची मोजणी करून घेतली. जमिनीची उत्तम, मध्यम व कनिष्ठ अशी प्रतवारी केली. साम्राज्याच्या वेगवेगळ्या भागांमध्ये वेगळ्या प्रकारच्या उत्पादनासाठी जमीन महसूलाचे वेगळे दर होते. जमीन महसूल रोख रकमेत देण्याचीही व्यवस्था होती. त्यांने जमीनदारी व्यवस्थेच्या जागी रयतवारी पद्धतीला प्रोत्साहन दिले.कच्चा माल आणि तयार उत्पादनांच्या आयात आणि निर्यातीवरही शुल्क आकारले जात होते. गैर-मुस्लिमांवर जिझीया कर आकारला जात होता. नजराणा किंवा भेटवस्तू जमीनदार आणि सरकारी अधिकारी यांच्याकडून मिळवल्या जात होत्या. मीठ करातूनही राज्याला बर्यापैकी उत्पन्न मिळाले.

### ३.७ लष्करी यंत्रणा:

शेरशाह सैन्यव्यवस्थेचे महत्व जाणून होता. साम्राज्य रक्षणासाठी त्याने प्रचंड सैन्य निर्माण केले होते. त्याच्या सैन्यात सुमारे १,५०,०००, पायदळ, २५,०००, घोडदळ, ५००० हत्ती आणि तोफखाना होता. शेरशहाने सैन्यनिर्मितीसाठी खालील बाबी केल्या.

१. शेरशाहने सरदारांकडून राज्याला ठराविक संख्येने सैनिक पुरविण्याची प्रथा संपुष्टात आणली आणि त्याऐवजी थेट सैनिकांची भरती सुरू केली.

२. सैनिकांचे त्याच्या गुणवत्तेनुसार वेतन निश्चित केले व रोख पगार देण्याची व्यवस्था केली.

३. सैनिक व अधिकार्यांना त्यांची क्षमता आणि कार्यक्षमतेच्या आधारावर पदोन्नती देण्यात आली.

४. प्रत्येक सैनिकाची त्याच्या शरिराची वर्णनात्मक सुची तयार केली.

५. घोडदळात निकृष्ट दर्जाचा घोडा बदलू नये म्हणून घोडयांनाही प्रमाणित करण्यात आले.

६. साम्राज्याच्या वेगवेगळ्या भागात अनेक सैन्य छावण्या बांधल्या व तेथे प्रत्येक भागात एक मजबूत सैन्य दल उभारले.

७. तोफखाना अद्यावत केला व सैनिकांना चांगल्या दर्जाच्या तोफा पुरवण्याची व्यवस्था केली.

८. सैन्यात कडक शिस्त निर्माण केली.

### ३.८ न्यायव्यवस्था:

शेरशाहने न्यायव्यवस्थेत मोठया प्रमाणात सुधारणा केली. सर्वांना समान न्याय देण्याचे धोरण स्विकारले. जवळचा नातेवाईक असला अथवा मोठा सरदार असला तरीही त्याने कोणत्याही गुन्हेगाराला कधीही माफ केले नाही. संपूर्ण साम्राज्यात कायदा न्यायालये स्थापन केली. न्यायदान करण्याचे काम काझी, मुखीया, मुन्सिफ, अमीर इ. करत होते. सर्वोच्च न्यायदान करण्याचा अधिकार मात्र सम्राटाने स्वताकडे ठेवला होता.

## ४. शेरशहाने केलेल्या विविध सुधारणा

### ४.१ लोककल्याणकारी उपक्रम:

शेरशाह मुलतः परोपकारी व उदारमतवादी वृत्तीचा शासक होता. त्याने आपल्या प्रजेसाठी अनेक कल्याणकारी योजना राबविल्या. प्रजेसाठी चांगले रस्ते तयार केले. वृक्ष लागवडीकडे लक्ष दिले. रस्त्यांच्या कडेला सावली देण्यासाठी अनेक झाडे लावली. शिक्षणाचे महत्व ओळखून अनेक शाळा बांधल्या. दुष्काळ

जर पडलाच तर दुष्काळाच्या वेळी लोकांना मदत करण्यासाठी धान्याचे कोठार बांधून घेतले व त्यात धान्य राखून ठेवले. प्रजेमधील जे निराधार लोक आहेत त्यांना अन्न देण्यासाठी धर्मादाय राज्य म्हणजेच 'लंगर' स्थापन केले. शुद्ध आणि उच्च दर्जाची नाणी पाडली. प्रमाणित व योग्य वजने व मापे तयार केलीत. सरकारी रुग्णालये उघडली. जनतेच्या सोयीसाठी पोलीस व टपालाची व्यवस्था केली होती.

### ४.२ अर्थव्यवस्थेत सुधारणा घडवून आणली:

शेरशहाने चलनाची सुधारित प्रणाली सुरू केली. मिश्र धातूपासून एकसमान दर्जाची सोने, चांदी आणि तांब्याची उत्तम नाणी प्रचलित केली. चांदीचे नाणे 'रुपया' आणि तांब्याचे नाणे 'दाम' म्हणून ओळखले जात असे. त्याच्या नंतर शतकानुशतके चांदीचा रुपया हे एक प्रमाणित नाणे राहिले. कस्टम ड्युटी लागू करण्याचे श्रेय त्याला जाते.

### ४.३ दळणवळणाच्या साधनांमध्ये सुधारणा:

शेरशहाने सैन्याच्या हालचाली सुलभ करण्यासाठी आणि व्यापार आणि व्यापाराला चालना देण्यासाठी चांगले रस्ते तयार करून घेतले. रस्त्यांच्या कडेला सावलीसाठी झाडे लावली. विश्रांतीची ठिकाणे सराई स्थापन केली. बंगालपासून पंजाबकडे जाणारा ग्रँड ट्रंक रोड तयार केला. चित्तोडसारख्या ठिकाणांना गुजरातच्या बंदरांशी जोडले. घोड्यांद्वारे वाहून नेल्या जाणार्या व्यापाराकरीता घोड्यांच्या चैक्या स्थापन केल्या. व्यापाऱ्यांना कोणत्याही प्रकारची हानी पोहोचू नये म्हणून कठोर कायदे व दंड ठेवला होता. व्यापारी आणि प्रवाशी यांना कोणताही त्रास होता कामा नये असे आदेष त्यांनी आपल्या राज्यपालांना दिले होते.

### ४.४ शिक्षणाची उत्तम व्यवस्था केली:

शेरशहा शिक्षणाचे महत्व जाणून होता. त्याकरीता त्याने आपल्या प्रजेच्या शिक्षणाची उत्तम व्यवस्था केली. अनेक हिंदू शाळांना आर्थिक अनुदान दिले. मुस्लिम प्रजेसाठी अरबी आणि पर्शियन भाषेतील अनेक मख्तब चालू केले. उच्च शिक्षणासाठी मदरसे स्थापन केले. शिक्षणास प्रोत्साहन देण्यासाठी विविध प्रकारची शिष्यवृत्ती चालू केली. गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षण व पालनपोषणाची व्यवस्था राज्याकडून केली.

### ४.५ स्थापत्यशास्त्रात क्षेत्रात प्रगती:

शेरशाहने स्थापत्यशास्त्राच्या क्षेत्रातही प्रगती केली. अनेक मशिदी, किल्ले आणि सराई बांधल्या. पाटणा येथील शेरशाह सुरी मशीद आणि पुराण किला, दिल्ली येथील किला-ए-कुहना मशीद हे त्यांचे स्थापत्यामधील मोठे योगदान होते. किला-ए-कुहना मशीद ही उत्तर भारतातील प्रसिद्ध वास्तूंमध्ये गणली जाते. प्रवेशद्वार व मिनारांवरील कलाकुसरीत पर्शियन प्रभाव दिसून येतो. इमारतीचे इतर भाग भारतीय आकृतिबंधानुसार बांधलेले आहेत. सहस्राम तलावाच्या मधोमध बांधलेली बिहारमधील मशीद इंडो-मुस्लिम स्थापत्यकलेचे मिश्रण आहे. भव्यता व सौंदर्य याचा तो उत्कृष्ट नमुना आहे. याची बाहेरील रचना मुस्लिम शैली व आतील बाजू हिंदू शैलीचे प्रतिनिधित्व करते. शेरशाहने यमुना नदीच्या काठावर नवीन शहर वसवले.

## ४.६ जमीन महसूल पध्दतीत सुधारणा केली:

शेतकरी कल्याणासाठी शेरशहा खूप आग्रही होता. शेरशहाने जमीन महसूल व्यवस्थेवर विशेष लक्ष दिले. जमिन महसूलाची 'काबुलियत' आणि 'पट्टा' ही प्रथा सुरू केली. जमीनदारी आणि जहागीरदारी पद्धतींच्या तुलनेत रयतवारी पद्धतीला प्राधान्य दिले. जमिनीची मोजणी योग्य प्रकारे करून घेतली. जमिनीची सुपिकता, मिळणारे उत्पादन, मालाच्या किमंती या आधारे त्यांनी जमीन महसूल निश्चित केला. शेतकऱ्यांना महसूल रोखीने देण्याचा पर्याय दिला. जमिनीचा महसूल निश्चित करताना लष्करी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या की त्यांनी प्रवास करताना उभ्या पिकांना नुकसान पोहोचवू नये.

## ४.७ न्यायव्यवस्थेत सुधारणा केली:

शेरशाह सुरीने स्वतःस 'सुलतान-ए-आदिल' किंवा 'न्यायी शासक' ही पदवी धारण केली होती. न्यायव्यवस्थेकडे त्यांने विशेष लक्ष दिले होते. गुन्हेगारी कायदा खूप कडक ठेवला होता. त्याकरीता ठिकठिकाणी न्यायालयाची स्थापना केली. त्यास 'दार-उल-अदालत' असे म्हटले जात असे. कायदा व सुव्यवस्थेसाठी विविध ठिकाणी काझींची नियुक्ती केली. सर्वांना समान न्याय दिला. गुन्हेगार मोठा सरदार असो, स्वतःच्या जातीचा असो किंवा जवळचा नातेवाईक असो त्यास कधीही माफ केले नाही. गावपातळीवर पंचायती आणि जमीनदार यांच्याकडेही दिवाणी व फौजदारी खटल्यांची सुनावणी करण्याचे अधिकार ठेवले. उत्कृष्ठ न्याय शासक म्हणून शेरषहा यषस्वी झाला होता.

## ५. शेरशाहचे मुल्यमापन:

### ५.१ दूरदृष्टी असणारा शासक:

शेरशाह सुरी दूरदृष्टी असणारा शासक होता. त्या हेतूनेचा त्याने बाबराच्या पदरी नोकरी पत्करली होती. कर्तव्यनिष्ठता, शिस्तप्रियता व कष्टाळू वृत्तीचा होता. त्याने वेगवेगळे प्रयोग केले त्यावरून तो प्रगतीशील विचाराचा होता.

### ५.२ सुशिक्षित व कलेची आवड असणारा शासक:

शेरशहा सुशिक्षित होता. अरबी आणि पर्शियन भाषा त्यास अवगत होती. त्यास इतिहास आणि साहित्याचा अभ्यास करण्याची आवड होती. त्यास वास्तुकलेचीही प्रचंड आवड होती.

### ५.३ मेहनती व कर्तव्यनिष्ठ शासक:

शेरशहा वयाच्या अठ्ठावन्नव्या वर्षी सम्राट झाला. तो प्रचंड मेहनती व कर्तत्वनिष्ठ शासक होता. त्यास शेतकरी, गरीब, निराधार यांच्याबद्दल अत्मियता होती. प्रजेच्या कल्याणाकरीता तो दररोज तब्बल सोळा तास काम करत असे. त्याच्यामध्ये उत्साह व महत्त्वाकांक्षा प्रचंड होती.

### ५.४ उत्कृष्ठ सैनिक व सेनापती:

शेरशाह एक सक्षम सैनिक व सेनापती होता. अमर्याद शौर्य आणि संयम याच्या जोरावर त्याने अनेक युध्दात विजय मिळवला. बिहार, बंगाल, पंजाब, माळवा, गुजरात, राजपुताना आणि सिंध इत्यादी प्रदेश त्याने आपल्या साम्राज्यात विलीन केले होते. त्याच्या साम्राज्याच्या सीमा पंजाबपासून माळव्यापर्यंत आणि बंगालपासून सिंधपर्यंत पसरल्या होत्या. रणांगणात तो सामान्य सैनिकाप्रमाणे राहत असे. त्यामुळे सैनिकांना तो आपल्यातीलच वाटत असे.

### ५.५ कायदा आणि सुव्यवस्थेचा संस्थापकः

शेरशाहाने आपल्या संपूर्ण साम्राज्यात कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित केली होती. जनतेस त्रास देणाऱ्यांचा त्यांने बंदोबस्त केला. जमिन महसूल हे उत्पन्नाचे मुख्य साधन आहे हे तो ओळखून होता त्यामुळे जमिनीचा महसूल देण्यास नकार देणाऱ्या जमीनदार, चोर आणि डाकूंशी तो अत्यंत कठोरपणे वागला. परीणामी शेरशाह सूरीचा जमिनदारांवर, अधिकाऱ्यांवर आणि सरदारांवर वचक होता. केंद्रीय कारभारात इतरांना महत्त्व दिले नाही अथवा हस्तक्षेप करून दिला नाही. सम्राटाविरूद्ध कट कारस्थान रचणाऱ्यांचा बंदोबस्त केला. प्रांत, सरकार, परगणे आणि खेडे या पातळीवर त्यांनी आपले साम्राज्य व्यवस्थित प्रस्थापित केले. प्रांताचे राज्यकारभाराच्या सोईसाठी छोटे-छोटे भाग केले. त्यावर आर्थिक बाबी पाहणारा व कायदा व सुव्यवस्था पाहणारा अष्या दोन अधिका-यांची नियुक्ती केली.

शेरशहाने संरक्षण आणि शांतता निर्माण करण्याचे अधिकार स्थानिक अधिकाऱ्यांवर सोडले. त्यामुळे केंद्रीय प्रशासनावरील ताण कमी झाला. प्रशासन प्रक्रियेत मोठ्या संख्येने लोकांना सहभागी करून घेतले.

### ५.६ उत्कृष्ठ लष्करी प्रशासक:

शेरशहा स्वतः एक उत्कृष्ठ सैनिक व सेनापती होता. शासक म्हणून त्यांनी सैन्य प्रशासन आणि संघटनेकडे विषेष लक्ष दिले. मोठयाा संख्येने कार्यक्षम सैन्य तयार केले. सैनिकांची थेट भरती सुरू केली. 'हुलिया' आणि 'दाग' या प्रथा सुरू केल्या. त्याच्या सैन्यात १५,००० पायदळ, धनुष्य आणि बाणांनी सशस्त्र २५,००० घोडदळ, ५००० हत्ती आणि शस्त्रागार होते.

### ५.७ सर्वसमावेषक धार्मिक धोरणः

शेरशहा सुन्नी पंथीय मुसलमान होता. मात्र तो कट्टर वृत्तीचा नव्हता. त्याने मोठ्या संख्येने हिंदूंना प्रशासनात उच्च पदे दिली. प्रत्येक व्यक्तीस धार्मिक स्वतंत्र दिले. धर्माला वैयक्तिक बाब मानले. राजकारण आणि धर्म यांचा कधीही संबध येवू दिला नाही. जास्तीत जास्त प्रजेचे कल्याण कसे होईल याकडे त्यांने लक्ष दिले.

एकूणच शेरशहा सुरीने लोककल्याणाच्या दृष्टिने विविध योजना राबविल्या. तो स्वतः परक्रमी सैनिक व उत्कृष्ट प्रशासक होता. प्रशासनावर त्याचे वर्चस्व होते. एक न्यायी शासक म्हणून तो यशस्वी झाला होता.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – ०१**

**खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा व वाक्य पुर्ण करा.**

१. ................ यास 'शेरखान' या नावानेही ओळखले जात होते.

अ. शेरशाह सुरी | ब. हुमायुन

क. बाबर | ड. इब्राहिम लोदी

२. बंगालची राजधानी गौडचे नाव बदलून 'जन्नताबाद' असे ................ याने ठेवले.

अ. शेरशाह सुरी | ब. हुमायुन

क. बाबर | ड. इब्राहिम लोदी

३. शेरखानने 'शेरशहा' ही पदवी ........... युध्दानंतर धारण केली.

अ. कालिंजरचे | ब.चैसाचे

क. कनौजचे | ड. पंजाबचे

४. शेरशहाच्या कालखंडात ..................... हा परगणाचा प्रमुख अधिकारी होता.

अ. मंमुन्सिफ-ए-मुसिफान | ब. शिकदार-ए-शिकदारन

क. शिकदार | ड. खजिनदार

५. शेरशहाच्या कालखंडात ग्राम प्रशासनातील प्रमुखास ............ असे म्हटले जात होते.

अ. मुखिया | ब. शिकदार

क. मुन्सिफ | ड. खजिनदार

**१.२.२ अकबर: धार्मिक धोरण**

**१. अकबराचे पूर्व चरित्र:**

सम्राट अकबर हा भारताचा तिसरा मोगल सम्राट होता. त्याचा जन्म १५ ऑक्टोबर १५४२ रोजी अमरकोट (सिंध) येथे झाला. वयाच्या त्रेसष्टाव्या वर्षी आग्रा येथे २७ ऑक्टोबर १६०५ रोजी मृत्यू झाला. त्याचे संपूर्ण नाव जलालुद्दीन महम्मद अकबर असे होते. वडीलांचे नाव हुमायून व आईचे नाव हमीदाबानू होते. अकबराने सर्वधर्मसमभावाचे तत्व स्वीकारून धार्मिक सलोखा स्थापित करण्याचा प्रयत्न केला. तत्कालीन भारतातील शक्तिशाली व सार्वभौम साम्राज्य उभारण्यामध्ये अकबराचे योगदान महत्त्वपूर्ण होते.

मुघल सम्राट हुमायूनचा चैसा आणि कन्नौज येथे झालेल्या युध्दात शेरशाह सुरीच्या सैन्याने पराभव केला. त्यानंतर हुमायून पश्चिमेकडे सिंध प्रातांत पळून गेला. तेथेच त्याचा हमीदबानू बरोबर विवाह झाला व पुढच्याच वर्षी अकबराचा जन्म झाला. अकबरचे पालनपोषण काबूलमध्ये त्याचे काका कामरान मिर्झा व त्याची पत्नी अस्करी मिर्झा यांनी केले. नऊ वर्षांचा असताना अकबराची गझनीचा गव्हर्नर म्हणून प्रथम नियुक्ती झाली.

शेरशाह सूरीचा मुलगा इस्लामशाह याच्या उत्तराधिकारी गोंधळानंतर हुमायूनने १५५५ मध्ये दिल्ली जिंकली व तो पुन्हा दिल्लीचा सम्राट बनला. मात्र हुमायूनचा २६ जानेवारी १५५६ रोजी अपघाती मृत्यू झाला. अकबराचा संरक्षक बैरामखान याने १४ फेब्रुवारी १५५६ रोजी पंजाबातील कलनौर येथे अकबरास हुमायुनचा उत्तराधिकारी म्हणून जाहीर केले व त्याचे राज्यारोहन केले.

अकबराने मोगल साम्राज्याचा पाया मजबूत केला. राज्यारोहणप्रसंगी त्याच्या ताब्यात निश्चित असा कोणताच प्रदेश अथवा सैन्य नव्हते. अकबराचा पालक म्हणून १५५६ पासून १५६० पर्यंत सर्व सत्ता बैरामखानाच्या हातात होती. आपला पालक बैरामखान याच्या मदतीने अकबराने आपला प्रतिस्पर्धी मुहम्मदशाह आदिल सूर ह्याचा दिवाण हेमू याचा पानिपतच्या मैदानावर पराभव केला. नंतर सिकंदर सूरसारख्या इतर शत्रूंनांही शरणागती पत्करण्यास भाग पाडले व दिल्लीचे आपले आसन स्थिर केले.

बैरामखानाचा कारभार एककल्ली होता तो क्रूर व अन्यायी स्वभावाचा होता. त्याच्या एककल्ली कारभारामुळे प्रचंड असंतोष पसरला होता. अकबराने हे ओळखून बैरामखानाकडून सत्ता काढून घेतली. बैरामखानाने बंड केले पण शेवटी त्यास अकबरास शरण जावे लागले. अकबरानेही त्यास सन्मानाने वागविले. पुढे बैरामखान मक्केस जात असताना त्याचा एका अफगाणाने खून केला. बैरामखानानंतर अकबराची प्रमुख दाई माहम अनघा हिच्या गटाचे काही दिवस दरबारात वर्चस्व राहिले. माहम अनघाच्या मृत्यूनंतर अकबराने सर्व सत्ता स्वतःच्या हाती घेतली.

**२. अकबराचे धार्मिक धोरण:**

भारतातील सर्वमुस्लिम शासकांपैकी सम्राट अकबर हा धार्मिकदृष्ट्या सहिष्णुव उदारमतवादाचा पुरस्कर्ता करणारा सम्राट होता. त्याचे धार्मिक धोरण हे त्याच्या राज्यकारभाराचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. अकबराचे धार्मिक धोरण 'सुल्ह-ए-कुलच्या' सिद्धांतावर आधारित होते. ज्याचा अर्थ सार्वत्रिक शांतता तसेच प्रत्येक व्यक्तीसाठी सहिष्णुता असा आहे. कोणत्याही धर्मांमध्ये भेदभाव न करता सर्व धर्मास समान न्याय देण्याचे धोरण त्याने अवलंबले. धार्मिक सहिष्णुता, समन्वय आणि समानतेवर आधारित धोरण अवलंबून राजकीय दीर्घकालीन स्थैर्य निर्माण करण्याचा प्रयत्न अकबराने केला. प्रजेचे कल्याण करण्याकडे त्याचा कल होता. सर्व धर्माचा समन्वय साधून सलोखा निर्माण करण्याचे धोरण त्याने राबविले. साम्राज्याच्याविस्तार व बळकटीसाठी त्याचे हे धोरण महत्वपूर्ण ठरले. अकबराच्या धार्मिक धोरणाचा विस्तृत आढावा खालील प्रमाणे-

### २.१ पार्श्वभूमी :

लहानपणापासूनच अकबरावर, सूफी, शियापंथ व हिंदू धर्म याचा प्रभाव होता. अकबराची आई हमीदा बेगम ही शिया घराण्याची मुलगी होती व ती स्वतः फारसी विद्वान होती. वडील हुमायुन हे सुन्नी पंथाचे होते. म्हणूनच सुन्नी व शिया विवाह बंधनातून जन्मलेल्या अकबराने आपले धोरण सुरुवातीपासूनच सहिष्णु ठेवले. शियापरंपरेचे अनुयायी असलेल्या विद्वानांकडून अकबरास शिक्षण मिळाले. ज्यात दोन इराणी शियांचा समावेश होता. अकबराच्या धार्मिक सहिष्णुतेच्या दृष्टीने या बाबी महत्वाच्या ठरल्या. अकबराने सर्व प्रजेला त्यांचा कोणताही धर्म असला तरी समानतेने स्वीकारले. त्याने धार्मिक, सामाजिक, साम्राज्यवादी आणि राजकीयदृष्ट्या विविध महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या. त्या सुधारणानी धार्मिक धोरण आणि विचारांच्या विकासात महत्वाची भूमिका बजावली.

### २.२ तीर्थयात्रा कर रद्द –

पूर्वीच्या मुस्लिम शासकांनी हिंदू यात्रेकरूवर यात्रा कर लादला होता. हा कर प्रामुख्याने प्रयाग, काशी, मथुरा, उज्जैनयांसारख्या तीर्थस्थळावर आकारला जात असे. अकबराने हिंदू यात्रेकरूवर लावला जाणारा तीर्थयात्रा कर १५६३ मध्ये रद्द केला.या निर्णयामागे अकबराचा उद्देश धार्मिक सहिष्णुता वाढवणे आणि हिंदू प्रजेचा विश्वास संपादन करणेहा होता.हा निर्णय अकबराच्या सर्व धर्म समभावाच्या धोरणाचा भाग होता.

### २.३ जिझिया कर रद्द –

भारतात मुस्लिम राजवटीमध्ये जिझिया कर आकारला जात होता. जिझिया कर हा मुस्लिम नसलेल्या प्रजेकडून (मुख्यतः हिंदूंवर) आकारला जात असे. हा कर हिंदू प्रजेस अपमानास्पद वाटत असे. इस्लामचे हिंदूधर्मापेक्षा श्रेष्ठत्व सिद्ध करणारा हा कर होता. या करातून उत्पन्न जास्त मिळत होते तरीही सम्राट अकबराने तीर्थयात्रा कर रद्द केल्यानंतर १५६४ मध्ये जिझिया कर रद्द केला. हा इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा होता. जिझिया कर रद्द करून अकबराने हिंदू प्रजेला दिलासा दिला व त्यांचा विश्वास संपादन केला. हा कर रद्द करण्यामागे अकबराचा उद्देश धार्मिक समता प्रस्थापित करणे व सर्वधर्मीय प्रजेला समान वागणूक देणेहा होता. या निर्णयामुळे हिंदू समाजात अकबराविषयी विश्वास व निष्ठा वाढली. जिझिया कर रद्द करणे हे अकबराच्याधार्मिक सहिष्णुतेच्या व उदार धोरणाचे प्रतीकमानले जाते.

### २.४ हिंदूंशी वैवाहिक व राजकीय संबंध :

सम्राट अकबर हा धार्मिक दृष्टीने सहिष्णूवृत्तीचा होता. त्याच्या दरबारामध्ये असणा–या लालची, स्वार्थी मुस्लिम राज्यकर्त्यांपेक्षा धाडसी, अंगी शौर्य असणारे स्वामीभक्त, वचनाचे पक्के हिंदू – रजपुत लोक त्यास राज्यविस्ताराच्यादृष्टिने योग्य वाटत होते. त्यामुळे त्यांच्याबरोबर सलोख्याचे संबंध ठेवणे योग्य होईल असे अकबरास वाटत होते. अकबरने रजपूत राजकन्यांशी विवाह केले. रजपूत सरदारांना उच्च पदे दिली त्यांचा मान, सन्मान व स्वायत्तता जपली. यामुळे हिंदू–मुस्लिम ऐक्य बळकट झाले व धार्मिक तणाव कमी झाला.

**२.५ सर्व धर्मांना समान संरक्षण :**

सम्राट अकबरच्या राजवटीत मंदिरे, मशिदी, जैनउपाश्रय, चर्च यांना संरक्षण मिळाले. कोणत्याही धर्माच्या उपासनेवर बंदी घातली नाही. त्याने हिंदू मंदिरे, चर्च आणि इतर प्रार्थना स्थळांच्या बांधकाम आणि देखभालीवरील सर्व निर्बंध काढून टाकले. हिंदू आणि ख्रिश्चन यांना मंदिरे आणि चर्च बांधण्याची परवानगी दिली. सार्वजनिक उपासना व सार्वजनिक उत्सव यास परवानगी दिली. अकबराचे हे धोरण त्या काळासाठी अतिशय प्रगत मानले जाते.

**२.६ प्रशासनात सर्वाना संधी:**

अकबराने प्रशासनात सर्व धर्मातील लोकांना सामावून घेतले. मुस्लिम बरोबरच हिंदूंना उच्चपदांवर काम करण्याची संधी दिली. तोडरमल, भगवानदास व राजा मानसिंग यासारखे अधिकारी उच्च पदावर कार्यरत होते. अनेक मनसबदार हिंदू होते. अकबराच्या काळात हिंदू सैन्य व अधिकाऱ्यांची संख्या जास्त होती.

**२.७ हिंदू प्रथा–परंपरेचा स्वीकार :**

सम्राट अकबराने अनेक हिंदू प्रथा परंपरांचा स्वीकार केला. हिंदू धर्मातील सण–उत्सवांना राजदरबारात मान्यता दिली. दिवाळी, होळी, रक्षाबंधन यांसारखे सण दरबारात साजरे होत आणि त्यात अकबर स्वतः सहभागी होत असे.तुलादान ही हिंदू प्रथा स्वीकारली. वेगवेगळ्या शुभ प्रसंगी तुलादान करून ते साहित्य नंतर गरजूंना वाटले जात असे. गरिबांना दान देण्याची प्रथा स्वीकारली. संस्कृत ग्रंथांचे फारसी भाषेत अनुवाद करण्याची आज्ञा त्याने दिली. हिंदू समाजाच्या भावनांचा आदर म्हणून अकबरानेगो–हत्येवर बंदीघातली. हिंदू प्रथा–परंपरांचा स्वीकार करून त्याने भारतीय संस्कृतीचा सन्मान केला आणि एक समन्वयवादी, सर्वसमावेशक शासनप्रणाली उभी केली.

**२.८ धर्मांतर करण्याची मुभा :**

पूर्वीच्या मुस्लीम राज्यकर्त्यानी इस्लाम सोडून इतर धर्मात धर्मांतर करण्यास जनतेस परवानगी दिली नव्हती. तसेच युद्धकैद्यांना गुलाम बनवले जात असे आणि नंतर त्यांना धर्मांतर करण्यास भाग पाडले जात असे अकबराने ही क्रूर प्रथा रद्द केली. अकबराने जबरदस्तीने इस्लाम स्वीकारण्याची प्रथा बंद केली. जनतेस धर्मांतराचे बंधन राहीले नाही, जनतेस त्यांना आवडणारा धर्म स्वीकारण्यास, धर्मांतर करण्यास परवानगी देण्यात आली होती. हिंदू, ख्रिश्चन स्वेच्छेने धर्मांतर करू शकत होते.

**२.९ इबादतखाना:**

इबादतखाना याचा शब्दशः अर्थ 'पूजास्थान' किंवा 'उपासना भवन' असा होतो. हे अकबराच्या धार्मिक समन्वयवादाचे केंद्र होते. प्रत्यक्षात हे विविध धर्मांतील विद्वानांमध्ये धार्मिक, तत्त्वज्ञानात्मक व वैचारिक संवादासाठीचे व्यासपीठ होते. सम्राट अकबराने इ.स. १५७५ मध्ये फत्तेपूरसिक्री येथे इबादतखाना स्थापन केला. येथे मुस्लिम उलेमा, हिंदू पंडित, जैन साधू, ख्रिश्चन मिशनरी, पारशी विद्वान यांच्यात धार्मिक व तात्त्विक चर्चा होत असत. यामुळे अकबरचे धार्मिक दृष्टिकोन अधिक व्यापक झाले. सर्व धर्मीय विद्वानांना

आमंत्रित करून ईश्वराचे स्वरूप, धर्मग्रंथांची मांडणी, कर्म-पुनर्जन्म, एकेश्वरवाद, नैतिक मूल्ये, धार्मिक सहिष्णुता अशा विषयांवर मुक्त वादविवाद होत असे. विविध धर्मीय उलेमांतील कट्टरता, परस्पर टीका व अहंकार पाहून अकबराचा रूढीवादी धर्मगुरूंवरील विश्वास कमी झाला आणिधार्मिक सहिष्णुतेच्या धोरणाला अधिक बळ मिळाले. इबादतखान्याच्या चर्चांतूनच अकबरानेसुल्ह-ए-कुल (सर्वधर्म समभाव)या तत्त्वाची मांडणी केली. यामुळे भारतातील विविध धर्मांमध्ये संवादाची परंपरा बळकट झाली आणि अकबर एक सहिष्णू, विवेकी व दूरदृष्टीचा शासक म्हणून इतिहासात ओळखला गेला.

**२.१० महजरनामा:**

उलेमांच्या कट्टरतेला आळा घालण्यासाठी सम्राट अकबरने इ.स. १५७९ मध्ये 'महजरनामा'जाहीर केला. हा एक महत्त्वाचा धार्मिक-राजकीय जाहीरनामाहोता. यामुळे धार्मिक बाबींमध्ये अंतिम निर्णयाचा अधिकार सम्राटाकडे आला. जर इस्लामी धर्मातील उलेमांमध्ये (धर्मगुरूंमध्ये) एखाद्या प्रश्नावर मतभेद निर्माण झाले, तरसम्राट अकबराचा निर्णय सर्वांवर बंधनकारक असेल. म्हणजेच अकबर स्वतः 'इमाम-ए-आदिल' (न्यायप्रिय धार्मिक मार्गदर्शक) म्हणून काम पहिल. यामुळे उलेमांची मक्तेदारी कमी झाली. हा निर्णय धार्मिक स्वातंत्र्याच्या दिशेने महत्त्वाचा टप्पा होता. महजरनाम्यामुळे उलेमांचा धार्मिक व राजकीय प्रभाव कमी झाला. अकबराची धार्मिक स्वातंत्र्य व सहिष्णुतेची भूमिका अधिक मजबूत झाली. पुढे सुल्ह-ए-कुल (सर्वधर्म समभाव) आणि दीन-ए-इलाहीया संकल्पनांसाठी वैचारिक पाया तयार झाला.

**२.११ दीन-ए-इलाही :**

अकबराच्या धार्मिक धोरणाचे प्रामुख्याने तीन टप्पे मानले जातात. १) धार्मिक सहिष्णुतेची सुरुवात २) इबादतखान्यातील धार्मिक चर्चा ३) महजरनाम्याद्वारे उलेमांचा प्रभाव कमी करणे. या सर्व टप्प्यांचा परिपाक म्हणजे इ.स. १५८२ मध्ये दीन-ए-इलाहीची स्थापना होय.इ.स. १५८२ मध्ये सम्राट अकबरने 'दीन-ए-इलाही' ही संकल्पना मांडली. यामध्ये इस्लाम, हिंदू, जैन, ख्रिश्चन तत्त्वे यांचा समन्वय होता. हा स्वतंत्र धर्म नसून नैतिक व आध्यात्मिक आचारसंहिता होती. अकबरच्या धार्मिक समन्वयाचा प्रयत्न होता. मुहम्मद पैगंबर यांच्या धर्मप्रसाराला एक हजार वर्षांचा कालखंड पूर्ण झाला होता. त्यामुळे सम्राट अकबराला इस्लामिक नियमांमध्ये बदल करणे शक्य व योग्य वाटले. याच विचारमंथनातून दीन-ए-इलाहीचा जन्म झाला. दीन-ए-इलाही म्हणजे ईश्वरी धर्म / दैवी मार्ग होय.

**२.११.१ दीन-ए-इलाहीची दीक्षा व शपथ :**

दीन-ए-इलाही स्वीकारणाऱ्या व्यक्तींना एक विशेष करारपत्रावर स्वाक्षरी करावी लागत असे. त्या कराराचे चार मुख्य स्तर होते ते म्हणजे संपत्तीचे बलिदान, जीवनाचे बलिदान, सन्मानाचे बलिदान, धर्माचे बलिदान करणे. दीक्षेवेळी ईश्वराशिवाय कोणी देव नाही व अकबर हा देवाचा उपप्रतिनिधी आहे. हे मान्य करावे लागत असे. दीन-ए-इलाहीचे अनुयायी इल्लाहियस म्हणून ओळखले जात असत.

**२.११.२ दीन–ए–इलाहीचे आचारविधी व नियम :**

दीन –ए–इलाहीच्या सदस्यांना नियमांचे पालन करावे लागत असे. प्रत्येक शिष्याने स्वतःचे रात्रीचे जेवण तयार करणे, वाढदिवसानिमित्त मेजवानी व दानदेणे, मांसाहार टाळण्यावर भर, कसाई, मच्छीमार यांची भांडी वापरण्यास मनाई, सामाजिक निर्बंधमध्ये गर्भवती, वृद्ध व वांझ स्त्रियांशी सहवास टाळणे, अल्पवयीन मुलींशी सहवास निषिद्ध मानण्यात येत असे.

**२.११.३ दीन–ए–इलाहीचे दहा सद्‌गुण :**

दीन–ए–इलाहीचा नैतिक व तात्त्विक पाया खालील दहा सद्गुणांवर आधारित होता.

१) **उदारता व परोपकार :** मानवाने स्वतःच्या संपत्तीचा उपयोग समाजहितासाठी करावा व गरजू व्यक्तींना मदत करावी, हा या सद्‌गुणाचा मुख्य उद्देश होता.

२) **क्षमाशीलता व क्रोधावर संयम :** दुष्कर्म करणाऱ्यालाही क्षमा करणे आणि क्रोधावर नियंत्रण ठेवणे ही उच्च नैतिकता मानली जात होती.

३) **सांसारिक इच्छांपासून अलिप्तता :** भोग, लोभ व भौतिक सुखांपासून दूर राहून संयमित जीवन जगण्यावर भर देण्यात आला.

४) **भौतिक जीवनापेक्षा आध्यात्मिक जीवनावर भर :** क्षणभंगुर भौतिक जीवनापेक्षा शाश्वत आध्यात्मिक उन्नतीस अधिक महत्त्व देण्यात आले.

५) **सत्कर्मांचे चिंतन व भक्ती :** स्वतःच्या कृतींचा सतत विचार करणे, सत्कर्म करणे आणि ईश्वरभक्तीत मन रमवणे आवश्यक मानले गेले.

६) **विवेकबुद्धीचा वापर :** अंधश्रद्धेपेक्षा विवेक, बुद्धी आणि विचारशक्तीच्या आधारे निर्णय घेण्यावर भर होता.

७) **मृदू वाणी व सौजन्यपूर्ण वर्तन :** सौम्य भाषाशैली, नम्रता आणि सर्वांशी सन्मानपूर्वक वागणे हा आदर्श मानला गेला.

८) **इतरांच्या हिताला प्राधान्य :** स्वतःच्या स्वार्थापेक्षा इतरांच्या कल्याणाला अधिक महत्त्व देणे हे नैतिक कर्तव्य समजले गेले.

९) **भौतिक जगापासून अलिप्तता व परमात्म्याशी आसक्ती :** सांसारिक बंधनांपासून मुक्त होऊन आत्म्याचे परमात्म्याशी नाते दृढ करण्यावर भर होता.

१०) **ईश्वरप्रेमातआत्मसमर्पण :** संपूर्ण आत्मा ईश्वराच्या प्रेमात समर्पित करून अहंकाराचा त्याग करणे हे अंतिम ध्येय मानले गेले.

दीन-ए-इलाहीचे अंतिम ध्येय सार्वत्रिक शांतता व धार्मिक स्वातंत्र्य हे होते. दीन-ए-इलाही हा नवा धर्म नसून एक नैतिक-धार्मिक प्रयोगहोता.तो अकबराच्या वैचारिक स्वातंत्र्याचा, धार्मिक समन्वयवादाचा, भारतीय सांस्कृतिक प्रभावाचा परिणाम होता.मर्यादित स्वरूप असूनही, दीन-ए-इलाहीने अकबराला उदारमतवादी व सहिष्णू शासक म्हणून इतिहासात स्थान मिळवून दिले.

**२.१२ अकबरच्या धार्मिक धोरणाचे मूल्यमापन:**

अकबरचे धार्मिक धोरण हे मध्ययुगीन भारतात धार्मिक सहिष्णुतेचा आदर्श नमुना मानले जाते. अकबरच्या धार्मिक धोरणाचे मूल्यमापन खालील प्रमाणे -

**धार्मिक सहिष्णुतेला चालना :** अकबराने सर्व धर्मांप्रती समान दृष्टीकोन ठेवून सुल्ह-ए-कुलचे तत्त्व स्वीकारले, त्यामुळे धार्मिक तणाव कमी झाला.

**राष्ट्रीय एकात्मता बळकट झाली :** विविध धर्म व समाजघटकांना एकत्र बांधण्याचे कार्य त्याच्या धोरणामुळे साध्य झाले.

**राजकीय स्थैर्य निर्माण झाले :** धार्मिक सलोख्यामुळे बंडखोरी कमी होऊन साम्राज्याला स्थैर्य लाभले.

**हिंदू-मुस्लिम ऐक्य वाढले :** हिंदू परंपरांचा सन्मान व राजपूतांशी सहकार्यामुळे दोन्ही समाजांतील विश्वास वाढला.

**धार्मिक करांची समाप्ती :** जिझिया व तीर्थयात्रा कर रद्द करून अल्पसंख्याकांवरील आर्थिक अन्याय दूर केला.

**उलेमांचा विरोध :** महजरनामा व दीन-ए-इलाहीमुळे सनातनी मुस्लिम उलेमांनी अकबराच्या धोरणाला तीव्र विरोध केला.

दीन-ए-इलाही जनसामान्यांमध्ये रुजली नाही : हा विचार मर्यादित लोकांपुरताराहिला आणि अकबराच्या मृत्यूनंतर लुप्त झाला.

अकबरचे धार्मिक धोरण हे मध्ययुगीन भारतात धार्मिक सहिष्णुता, सांस्कृतिक समन्वय आणि राजकीय स्थैर्य निर्माण करणारे अत्यंत प्रगतिशील धोरण ठरले. हे धार्मिक धोरण मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील एक क्रांतिकारी पाऊल होते. त्याने धर्माच्या आधारे भेदभाव न करता सर्व प्रजेला समान मानले. सुल्ह-ए-कुल (सर्वांशी सलोखा) ही संकल्पना त्याच्या धोरणाचे सार सांगते. त्यामुळे अकबर केवळ एक महान सम्राटच नव्हे, तर धार्मिक सहिष्णुतेचा आदर्श शासक म्हणून ओळखला जातो.

**स्वयं अध्ययन प्रश्न – २**

खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.

१) सम्राट अकबराचा जन्म.......... येथे झाला.

अ) कनौज ब) अमरकोट

क) अजमेर ड) मेवाड

२) अकबराचा पालक म्हणून.......... याने जबाबदारी पार पाडली.

अ) बैरामखान ब) मानसिंह

क) राणा प्रताप सिंह ड) सिंकदर सुरी

३) अकबराने.......... धर्माची स्थापना केली.

अ) दिन-ए-इलाही ब) शिख

क) शिया ड) भागवत

४) --------- याने फत्तेपूरसिक्री येथेइबादतखानास्थापन केला.

अ) सम्राट अकबर ब) शेरशहा सूरी

क) बैरामखान ड) यापैकी नाही

५) उलेमांच्या कट्टरतेला आळा घालण्यासाठी ----- याने 'महजरनामा' जाहीर केला.

अ) बैरामखान ब) शेरशहा सूरी

क) सम्राट अकबर ड) यापैकी नाही

## १.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

**दिवाण–ए–विजारत:** उत्पन्न आणि खर्चावर नियंत्रण ठेवणारा विभाग.

**दिवाण– ए –अरीझ:** सैन्य व्यवस्था संदर्भात काम पहाणारा विभाग.

**दिवाण–ए– रसालत**: परराष्ट्र व्यवहार पाहणारा विभाग.

**दिवाण–ए–कझा:** न्यायव्यवस्था पाहणार विभाग.

**दिवाण–ए–ईन्सा:** राजकीय बाबी व प्रांतातील पदाधिकारी यांच्याबरोबर पत्रव्यवहार करणारा विभाग.

**दिवाण–ए–बरीद:** शेरशहाचा गुप्तचर विभाग

**दिवाण–ए–ममालिक:** सैन्य व्यवस्था पाहणाऱ्या विभागाचा विभाग प्रमुख

**दिवाण–ए–मोहता–सिब:** परराष्ट्र व्यवहार पाहणा–या विभागाचा प्रमुख.

**बरीद–ए–ममालिक:** गुप्तचर विभागाचा प्रमुख

**दिन–ए–इलाही:** अकबराने स्थापन केलेला धर्म

## १.४ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

**स्वयंअध्ययन प्रश्न – ०१**

खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा व वाक्य पुर्ण करा.

१. अ. शेरशाह सुरी    २. अ. शेरशाह सुरी    ३. ब. चैसाचे

४. क. शिकदार    ५. अ. मुखिया

**स्वयंअध्ययन प्रश्न – २**

खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.

१) ब) अमरकोट    २) अ) बैरामखान    ३) अ) दिन–ए–इलाही

४) अ) सम्राट अकबर    ५) क) सम्राट अकबर

## १.५ सारांश

मध्ययुगीन कालखंडातील शेरशहा सूरी एक धाडसी सैनिक, सेनापती, यशस्वी राज्यकर्ता आणि सक्षम प्रशासक होता. त्याने आपल्या साम्राज्याचा साम्राज्यविस्तार करत असताना अनेक लढाया सैन्याच्या व मुत्सेद्दीगिरीच्या बळावर जिंकल्या. तो विद्वानांचा आश्रयदाता होता. एक न्याय्य शासक म्हणून शेरशहा खूप यशस्वी होता. शेरशाह आणि त्याच्या न्यायव्यवस्थेची इतकी भीती होती की, त्याच्या काळात डाकू आणि चोर प्रवाशांच्या मालमत्तेचे रक्षण करत होते. जमीनदार त्यास घाब्ररून होते कोणीही त्याच्याविरुद्ध बंड करण्याचे अथवा त्रास देण्याचे धाडस केले नाही.

शेरशाहची हिंदूंबद्दलची वृत्ती आदराची होती. धर्मनिरपेक्ष राज्याची स्थापना करणारा आणि निःपक्षपातीपणे आपल्या सर्व प्रजेच्या कल्याणाकडे लक्ष देणारा राष्ट्रीय दृष्टिकोन असलेला शेरशहा सम्राट होता. मात्र त्याच्या काळात अकबरासारखी धार्मिक सहिष्णुता प्रस्थापित होऊ शकली नाही. याचे कारण म्हणजे शेरशाहच्या काळात, त्यांना धार्मिक आणि राजकीय सनातनी विरुद्ध तसेच गेल्या ३०० वर्षांच्या जातीय सल्तनतच्या सुस्थापित परंपरांविरुद्ध संघर्ष  करावा लागला.

सम्राट अकबराची धार्मिक सहिष्णुता ही राजकीयदृष्ट्या महत्वपूर्ण होती. राज्य विस्तार व राज्याचे एकत्रीकरण करण्यासाठी, त्याने राजपूतांशी मैत्री केली. रजपूत राजकन्यांशी लग्न करून वैवाहिक संबंध निर्माण केले. हिंदू आणि राजपूत सरदार तोडरमल, बिरबल आणि राजामानसिंगसारखे आणि विचारवंतांशी जवळचा संबंधामुळे त्याचे विचार आणि धोरणे अधिक उदार झाली.

दीन-ए-इलाहीच्या प्रयोगामुळे धार्मिक संवादाला चालना मिळाली, मात्र हा प्रयोग मर्यादित स्वरूपाचा ठरला आणि जनतेत लोकप्रिय झाला नाही. काही उलेमांनी अकबरावर इस्लामविरोधी असल्याची टीका केली, तरीही त्याचा मुख्य उद्देश धर्मांतील संघर्ष कमी करून सार्वत्रिक शांतता व सामाजिक ऐक्य प्रस्थापित करणे हा होता. अकबराच्या सहिष्णुवृत्तीमुळे मुघल साम्राज्यात वाढ झाली.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

**टिपा लिहा.**

१. सामेलचे युध्द

२. शेरशहा सुरीचे केंद्रीय प्रशासन

३. शेरशहा सुरीचे प्रांतीय प्रशासन

४. शेरशहा सुरीचे स्थानिक प्रशासन

५. शेरशहा सुरीचे महसूल प्रशासन

६. दीन-ए-इलाही

७. अकबरच्या धार्मिक धोरणाचे मूल्यमापन

८. इबादतखाना

९. महजरनामा

**खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

१. शेरशहा सुरीच्या साम्राज्यविस्तार विषयी सविस्तर माहिती लिहा.

२. शेरशहा सुरीच्या प्रशासन व्यवस्थेविषयी सविस्तर माहिती लिहा.

३. शेरशहा सुरीने केलेल्या विविध सुधारणा विषयी सविस्तर माहिती लिहा.

४. शेरशाह सुरीचे गुण व दोष स्पष्ट करा.

५. सम्राट अकबराने स्थापन केलेल्या दीन-ए-इलाहीविषयी सविस्तर माहिती लिहा.

६. सम्राट अकबराचे धार्मिक धोरण स्पष्ट करा.

## १.७ संदर्भ ग्रंथ


- गहलोत, जगदीशसिंह, राजपूताने का इतिहास, जोधपूर, १९६०
- जोशी, महादेवशास्त्री, राजस्थान, पुणे, १९६३
- देशपांडे, हरिहरराव, राजपूत राज्यांचा उदय आणि -हास, पुणे, १९६२
- Majumdar, R.C. Ed.*The History and Culture of the Indian People*, *Vols*. 3 to 5, Bombay,197०.
- Sharma, Dasbarath, Ed, *Rajastan Through the Ages*, Bikaner, 1966.
- od, James, *Annals and Antiquities of Rajasthan*, 2 *Vols,* London, 1957.
- Krishjnamurti, R. Akbar –The Religious Aspect, 1961.
- Shelat, J. M. Akbar, Bombay, 1964.
- Smith, V .A. Akbar, The Great, Mogul 1542-1605, New Delhi, 1966.
- Ali, M. Athar, Mughal India, Studies in Polity, ideas, Society and Culture, Oxford University Press, 2006
- Habib, Irfan, Akbar and his India, New Delhi, Oxford University Press, 1997.


❑❑❑

## घटक २

# दक्षिण भारतातील प्रमुख राज्यकर्ते

**अनुक्रमणिका**


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

  २.२.१ चाँदबिबी

  २.२.२ इब्राहिम आदिलशहा दुसरा

२.३ पारिभाषिक शब्द शब्दार्थ

२.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ यादी


### २.० उद्दिष्ट्ये :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास खालील माहिती मिळेल.

- मध्ययुगीन भारतामधील दक्षिणेतील प्रमुख सत्तांचे महत्व विशद करता येईल.
- मध्ययुगीन भारताच्या इतिहासावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या कर्तबगार स्त्रियांमध्ये चाँदबिबीचे योगदान स्पष्ट करता येईल.
- मुघल आक्रमणापासून निजामशाहीचे संरक्षण करण्यामध्ये चाँदबिबी कशी यशस्वी झाली हे सांगता येईल.
- दक्षिण भारताच्या इतिहासातील चाँदबिबीच्या कर्तबगारीची माहिती सांगता येईल.
- इब्राहिम आदिलशहाच्या धोरणाची माहिती देता येईल.

## २.१ प्रास्ताविक :

इ.स. १२०६ पासून इ.स. १७५७ पर्यंतचा भारताचा कालखंड हा मध्ययुग समजता जातो. अरब मुसलमानांच्या भारतावरील आक्रमणाच्या वेळी भारतात विभिन्न राज्ये होती. त्यांच्यात राजकीय एकतेचा अभाव होता. या कालखंडात अनेक मुस्लीम आक्रमणे झाली. मुहम्मद बिन कासिम, महंमद गझनी, कुतुबुद्दीन ऐबक, अल्लाउद्दीन खिलजी, मुहम्मद तुघलक या आक्रमकांनी अनेक आक्रमणे करून संपत्तीची लूट केली. तुघलक साम्राज्याच्या विघटनातून दक्षिणेत बहमनी व विजयनगर साम्राज्याचा उदय झाला. इ.स. १५२६ साली बाबर यांनी भारतावर आक्रमण करून दिल्ली सलतनतचा शेवट केला व मुघल सत्तेचा उदय झाला. मध्ययुगीन भारताच्या इतिहासाचे दोन कालखंड पडतात. पहिला कालखंड इ.स. १२०६ ते इ.स. १५२६ याकाळात सुलतानशाही कालखंड म्हणून ओळखले जाते तर दुसरा कालखंड इ.स. १५२५ ते इ.स. १७५७ या काळाला मुघलशाही कालखंड म्हणून ओळखला जातो.

मध्ययुगीन भारताच्या इतिहासात दक्षिणेत निर्माण झालेल्या बहामनी या मुस्लीम साम्राज्याची पाच शकले निर्माण झाली. निजामशाही, आदिलशाही, कुतुबशाही, इमादशाही आणि बरीदशाही. या राजवटींनी दक्षिण भारतात अनेक शतके आपला दबदबा कायम राखला होता. साम्राज्य विस्ताराचा, लढायांचा व एकमेकांवर कुरघोडी करण्याचा असा हा काळ होता. अशा काळात अहमदनगरच्या निजामशहाची कन्या आणि आदिलशहाची बेगम असलेल्या सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात राजकीय आणि प्रत्यक्ष रणांगणावर आपली तलवार गाजवली. शत्रूनेही 'चांद सुलतान' हा किताब देऊन तिच्या शौर्याचा गौरव केला.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ चाँदबिबी

अब्दुल मुजफ्फर अल्लाद्दिन हसन बहमन शहा हा बहामनी सत्तेचा संस्थापक. तो हसन गंगू या नावाने इतिहासात प्रसिद्ध आहे. इराणचा प्राचीन राजा बहमुन याचा तो वंशज, म्हणून त्याला बहमन शहा हे नाव मिळाले अशी आख्यायिका आहे. त्याने दिल्लीचा सुलतान मुहंमद तुघलक याच्या सेनेचा पराभव केला. तुघलक याची सत्ता दुबळी झाली आहे असे पाहून दक्षिणेतील अनेक मुसलमान सरदारांनी स्वतंत्रपणे राज्यकारभार सुरू केला. बहामनी साम्राज्य पाच राज्यांत विभागले गेले (बिदरची बरीदशाही, अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही, बेर/वऱ्हाडची इमादशाही, गोवळकोंड्याची कुतुबशाही ही ती पाच राज्ये होती). त्यांच्यामध्ये कधी सहकार्य, कधी लढाई अशा गोष्टी चालत राहिल्या. त्यांपैकी निजामशाही प्रबळ ठरली व दीर्घकाळ टिकली. त्यांच्यात साम्राज्य विस्तारासाठी व स्वतःच्या वर्चस्वासाठी कायम लढाई सुरू असे. विजयनगरच्या विरुद्ध एकत्र येण्यासाठी या पाच शाह्या एकमेकांसोबत युती करत असत. याच युतीसाठी निजामशाह हुसेन याने आपली मुलगी चाँदबीबी हिचा विवाह अली आदिलशहा याच्याबरोबर करून दिला. यावेळी विवाहात हुंडा म्हणून हुसेन निजामशहा याने जावई आदिलशहा यास सोलापूरचा अत्यंत महत्त्वाचा किल्ला दिला. या किल्ल्याचा पुढे आदिलशाहीस खूप उपयोग झाला. आदिलशहा

चाँदबिबीच्या बुद्धिमत्तेवर व शौर्यावर मोहित होता. याच चाँदबिबीने मध्ययुगीन भारताच्या इतिहासावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमठवला.

चाँदबिबीच्या काळातील सय्यद अली तबातबा आणि फेरिश्ता या इतिहासकारांनी तिच्या कार्याची प्रशंसा केलेली आहे. फेरिश्ताने 'गुलशन-ई-इब्राहिमी' या ग्रंथात तिच्याविषयी गौरवोद्गार काढले आहेत. कर्नल मिडोज टेलर यानी तिच्यावर 'नोबल क्विन' ही तीन खंडाची कादंबरी लिहिली आहे. एलफिन्स्टन व अंटानियो फ्रेझर यांनीही आपल्या इतिहासग्रंथामध्ये तिच्या कार्याची नोंद घेतलेली आहे. इतकेच नाही तर विजापूरचा इब्राहिम आदिलशहा दुसरा याची तिच्यावर कविता जगप्रसिद्ध आहेत.

**१) जन्म, बालपण आणि विवाह :**

निजामशाही घराण्यातील एक कर्तबगार आणि शूर स्त्री म्हणून चाँदबिबीला ओळखले जाते. तिचा जन्म हुसैन निजामशाह व खुतजा यांच्यापोटी इ.स. १५५० साली झाला असल्याचा संदर्भ तारीख-इ-शहावी या ग्रंथात दिलेला आहे. पण काही इतिहासकारांच्या मते तिचा जन्म सन १५४७ मध्ये झाला असावा असे मानले जाते. चाँदबिबी अहमदनगरचा सुलतान बुरहान-उल-मुल्क (१५९१-१५९५) याची बहिण होती. हुसेन निजामशहा हे पराक्रमी योद्धा होते, तर त्यांची राणी खुतजा ही अतिशय देखणी स्त्री होती. चाँदबिबीने त्या दोघांचेही गुण जन्मतःच आत्मसात केले होते. राज्यकारभाराचे धडे गिरवत चाँदबिबी लहानाची मोठी झाली. बालपणी तिला शिकार आणि लष्करी प्रशिक्षणाचे धडे दिले गेले. चाँदबिबीस सतारवादन, गीत गायन तसेच चित्रकलेची विशेष आवड होती. अरबी, फारसी, तुर्की, मराठी, कन्नड इत्यादी भाषा अवगत केल्या होत्या. हुसेन निजामशाहाने आपल्या कन्येचा विवाह आदिलशाही सुलतान अली याच्याबरोबर इ.स. १५६२ मध्ये केला. त्यानंतर ती विजापूरला गेली.

**२) विजापूरच्या प्रशासनातील कार्य :**

चाँदबिबीने आपला पती अली आदिलशाहाला राज्यकारभारात मदत करायला सुरवात केली. आदिलशाहीला त्रास देणाऱ्या विविध टोळ्यांशी संबंध सुधारले. मांडलिक राजांवर वचक निर्माण केला. या माध्यमातून तिने आपल्या राज्यामध्ये शांतता निर्माण केली. ती जनकल्याणाच्या कामामध्ये उत्साहाने सहभागी होत असे. गोरगरीबांना मदत करीत असे. यामुळे विजापूरच्या जनतेमध्ये ती अत्यंत लोकप्रिय बनली. चाँदबिबीचा पती अली अदिलशाहा याचा मृत्यू झाला. आदिलशहा आणि चाँदबिबीस पुत्र नसल्याने आदिलशहाचा पुतण्या इब्राहिम यास गादीवर बसवून चाँदबिबी राज्यकारभार पाहू लागली. तो केवळ नऊ वर्षाचा होता. त्याच्या शिक्षण व संगोपनाची जबाबदारी चाँदबिबीवर होती. ही जबाबदारी तिने कार्यक्षमपणे सांभाळली.

चाँदबिबीला माणसाची पारख होती. राज्यकारभाराचे ज्ञान होते. आदिलशाहीतील योग्य व्यक्ती हेरून तिने राज्याच्या योग्य त्या जबाबदाऱ्या त्याच्यावर सोपवल्या. आदिलशाहा असलेल्या इब्राहिमचे शिक्षण, राज्यातील सुधारणा, राज्याचे संरक्षण याकडे कटाक्षाने लक्ष दिले. राज्याचे व्यवस्थापन अतिशय चोख राखले होते. चाँदबिबीचे आदिलशाहीवर नियंत्रण आणि उत्तरोत्तर तिची वाढणारी लोकप्रियता तिच्या काही सरदारांना

खटकत होती. आदिलशाहीतील मुख्यमंत्री म्हणून कामिल खान हा हुशार उमराव काम पाहत होता. राणी चांदबिबीच्या लोकप्रियतेमुळे त्याच्या मनात तिच्याविषयी मत्सर निर्माण झाला.

कामलखान याने चाँदबिबी विरोधात कटकारस्थान रचले. हे चाँदबिबीस समजताच ती संतप्त झाली व तिने कामलखानची मुख्यमंत्रिपदावरून हकालपट्टी केली आणि किश्वरखान नावाच्या सरदाराकडे हे पद सोपवले; परंतु किश्वरखान यानेही अनियंत्रितपणे राज्यकारभार करण्यास सुरवात केली व चाँदबिबीशी विश्वासघात करून राज्यातील काही सरदार फोडून राज्य स्वतःकडे घेण्याचा डाव रचला. सरदारांचा एक मोठा गट स्वतःकडे वळवून चाँदबिबीस पदत्याग करायला सांगून विजापूर सोडून जाण्यास सांगितले. यामुळे चाँदबिबी व किश्वरखान यांच्यात वितुष्ट निर्माण झाले. किश्वरखानाने चाँदबिबीवर तिचा भाऊ मुर्तजा निजामशाहाला विजापूरवर आक्रमण करण्यासाठी प्रवृत्त केल्याचा आरोप करून कैद केले. चाँदबिबीने या राजद्रोहास प्रखर विरोध केला. परंतु बंडखोर सरदारांनी चाँदबिबीला अटक करून राजवाड्याबाहेर काढले तिला अत्यंत अपमानित करून सातारच्या किल्ल्यात डांबण्यात आले.

काही काळानंतर किश्वरखानाचा स्वार्थीपणा लक्षात आल्यावर त्याच्याबरोबर असलेल्या सरदारांना आदिलशाही गादीशी आपण गद्दारी केल्याचा पश्चाताप झाला. राणीच्या अपमानामुळे सरदार इखलासखान व सरदार मंडळी संतप्त झाली आणि त्यांनी किश्वरखानाला सत्तेवरून दूर करण्याचा निश्चय केला. त्यांनी चाँदबिबीची कैदेतून सुटका केली. आपला कट फसला हे लक्षात येताच किश्वरखान विजापूरमधून फरार झाला अहमदनगरकडे पलायन केले. तेथे गेल्यावर त्याला असे आढळून आले की अहमदनगरचा दरबार त्याला संरक्षण देऊ इच्छित नाही. यामुळे तो कुतुबशाहीची राजधानी गोवळकोंडा इकडे गेला. तेथे गेल्यावर काही काळाने मुस्तफाखानाच्या एका नातेवाइकांने मुस्तफाखानाबरोबर दगाबाजी केल्याचा सूड म्हणून त्याचा खून केला.

याचवेळी विजापूर दरबारात हबशी आणि दखखनी सरदारांमध्ये भांडणे सुरू होती. त्याचा फायदा घेण्यासाठी वऱ्हाड, अहमदनगर व गोवळकोंड्याच्या सुलतानानी विजापूरवर हल्ले सुरू केले. या कठिण प्रसंगी चाँदबिबीने विजापूरच्या संरक्षणाची चांगली व्यवस्था केली. प्रचंड पाऊस आणि अंधार असतानाही आपल्या चौक्यांना भेटी देऊन सैन्याचे मनोधैर्य वाढविले. शत्रूसैन्य साठ फुटाची तटबंदी उध्वस्त करण्यात यशस्वी झाले. चाँदबिबीने ताबडतोब कोसळलेली भिंत उभी केली. हे काम संपेपर्यंत ती स्वतः हजर होती. तिने मराठी सैन्याची मदत मिळविली. विजापूरी सरदार दिलावरखानाच्या सैन्याने शत्रूपक्षाचा पराभव केला. राज्याचा वजीर इकलासखान याला कैद करून त्याचे डोळे काढले. अनेक सरदारांना कैद केले, अनेकांना ठार मारले व आदिलशाही सांभाळण्याचा प्रयत्न केला. राज्याचे प्रतिनिधीपद स्वतःकडे घेतले.

### ३) निजामशाही वाचविण्याचे प्रयत्न :

निजामशाही हे चाँदबिबीचे माहेर आणि आदिलशाही सासर असल्याने या दोन्ही राज्यांबद्दल तिला आपुलकी व ओढ होती. ही दोन्ही राज्ये एक राहावीत, त्यात सुव्यवस्था नांदावी यासाठी चाँदबिबीने अथक प्रयत्न केले. त्याचबरोबर चाँदबिबीची सर्वात मोठी कामगिरी म्हणजे मुघली आक्रमणापासून निजामशाहीचे

केलेले संरक्षण होय. इब्राहिम निजामशहाच्या काळात अहमदनगर दरबारात कट कारस्थानांना ऊत आलेला होता. त्यातच विजापूरशी झालेल्या युद्धात निजामशहा मारला गेला. त्यानंतर निजामशाही दरबारात गोंधळ व अराजक निर्माण झाले. बादशहा अकबर याच्या आज्ञेवरून राजपुत्र मुरादच्या नेतृत्वाखाली मुघल सैन्य अहमदनगरवर चालून आले. त्यामुळे निजामशाहीसमोर मोठे संकट उभे राहिले. त्यावेळी निजामशाहीतील सरदारांनी पत्रे पाठवून चाँदबिबीला विनंती केली की तिने अहमदनगरला यावे, सरदारांना एकत्रित करून अहमदनगरचे  संरक्षण करावे. अशा कठिण प्रसंगी चाँदबिबीने दक्षिणेत येण्याचा निर्णय घेतला. अहमदनगर राज्याचा कारभार कशा पद्धतीने चालविता येईल यासंबंधी योजना आखण्यासाठी विचारविनिमय करण्याकरता बैठक बोलावली. यामध्ये हबशी सरदारांनी असे सुचविले की, इब्राहीम निजामशहाचा अल्पवयीन मुलगा याला चाँदबीबीच्या राजपालकत्वाखाली सिंहासनावर बसवावे. परंतु मिया मंजूने ही योजना झिडकारली व अहमद यास नगरच्या गादीवर बसविले होते. चाँदबिबीने इब्राहिमशहाचा दुसरा मुलगा बहादूर याची बाजू घेतली. त्याला गादीवर बसविण्याच्या व मुघलांपासून निजामशाहीचे संरक्षण करण्याच्या कामास ती लागली. इखलासखान, नेहगखान व मियामंजू हे सर्वजण निजामशाहीची सत्ता मिळविण्यासाठी प्रयत्नशिल होते. आपल्या संबांधित व्यक्तीला गादीवर बसविण्यासाठी ते धडपडत होते.

नेहंगखानाने मोगली सैन्याची फळी फोडून किल्ल्यामध्ये प्रवेश केला आणि तो राणीस येऊन मिळाला. राजपुत्र मुरादने नगरच्या किल्ल्याला वेढा दिलेला होता. दिवसेंदिवस वेढा अधिक कडक होत होता. याप्रसंगी आदिलशाहा व कुतुबशहा यांची मदत मिळविण्यासाठी मियामंजू तिकडे रवाना झाला. त्याने आपल्या बरोबर सुलतान अहमद याला घेतले होते. ज्याक्षणी त्याने किल्ला सोडला, त्याचक्षणी चाँदबिबीने किल्ल्याच्या संरक्षणाची सूत्रे आपल्या हाती घेतली. थोड्याच दिवसांत तिने अन्सारखानचा खून केला चाँदबिबीने राजपुत्र बहादुरला 'निजामशाहा' म्हणून घोषित केले. राज्याचा सर्व कारभार तिने आपल्या हाती घेतला. या कामी तिला महमदखानाचे साहाय्य लाभले. तिने दरबारातील सर्व मनसबदारांना विशेषतः दखखनी आणि हबशी यांना एकत्र आणले. हबशींचे प्रमुख नेते मुजाहिद्दीन समशेदखान, अफझलखान बोरिशी, मुहम्मद जमान तसेच दक्षिणी मुसलमान नेता मुहंम्मदखान या सर्वांना आपल्या बाजूला वळविले. मुहंम्मदखानाकडे मुख्य प्रधानपद देऊन त्याच्यावर किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी सोपविली. शहरातील प्रजेच्या संरक्षणाची जबाबदारी समशेरखानाकडे देण्यात आली. तिने आपल्या सैन्यामध्ये नवा जोश व उत्साह निर्माण केला.

मुघल सैन्याने अहमदनगरच्या किल्ल्याला चारी बाजूंनी वेढा दिलेला होता. राजपुत्र मुराद स्वतः वेढा लढवत होता. चाँदबिबीने किल्ल्याच्या संरक्षणाची जय्यत तयारी केली होती. ती रात्रंदिवस किल्ल्याच्या संरक्षणासाठी झटत होती याचवेळी आदिलशाही व कुतुबशाही फौजा राणीच्या मदतीसाठी येत असल्याचे पाहून राजपुत्र मुरादने किल्ल्याची तटबंदी उध्वस्त करण्यासाठी सुरूंग खोदले. सुरुंगाचा स्फोट झालेनंतर ढासळलेल्या तटातून आपले सैन्य किल्ल्यात घुसवावे अशी योजना आखली. तेव्हा चाँदबिबीने आपल्या सैन्याला हे सुरुंग नष्ट करण्याचे आदेश दिले व ती स्वतः त्यांच्याबरोबर काम करू लागली. दोन सुरुंग नष्ट करण्यात सैन्य यशस्वी झाले. पण तिसऱ्या सुरूंगाचा स्फोट झाला. तटाची एक बाजू उध्वस्त झाली, अनेक

सैनिक ठार झाले. हे पाहून अधिकाऱ्यानी पलायन करायला सुरवात केली व राणीलाही पलायन करण्यास सांगितले. तेव्हा राणीने अंगावर चिलखत चढविले आणि हातात नंगी तलवार घेऊन जेथे खिंडार पडले आहे, तिथे धावत गेली. राणीचे धाडस पाहून पळणारे सैनिक माघारी फिरले व त्वेषाने लढू लागले. मुघल सैन्याने खिंडार पडलेल्या ठिकाणी तोफा डागल्या, त्यात किल्ल्याची तटबंदी ढासळली. चाँदबिबी तटाच्या तोंडाशी उभे राहून मुघल सैन्याला कापून काढू लागली. राणीने तटाची भिंत बांधण्याचे आदेश दिले. कुशल कारागिरांनी थोड्याच काळात भिंत बांधून काढून मुघलांचा रस्ता बंद केला. मुघल सैन्य पुन्हा पुन्हा किल्ल्यावर चालून येत होते. परंतु तितक्याचवेळा निजामशाही सैन्य बंदुका व तोफा यांचा भडीमार करून हल्ले परतवून लावत होते. किल्ल्याभोवतालचा खंदक मुघल सैनिकांच्या प्रेतांनी भरून गेला होता. चाँदबिबी व तिच्या सैन्याने मोठ्या शौर्याने सर्व हल्ले परतवून लावले. तिने याप्रसंगी साहसाची जी अचाट कामगिरी केली ती पाहून शत्रुनेही तिची प्रशंसा केली व ती जगभर प्रसिद्ध झाली.

मुघलांपुढे आपला टिकाव लागणार नाही, हे ओळखून राणीने विजापूरकडे मदत मागितली. त्याप्रमाणे विजापूरी सरदार सोहेलखान आपले सैन्य घेऊन निघाला. ही बातमी मोगलांना समजली, त्यातच किल्ला घेण्यात अपयश आल्यामुळे मुघल सैन्य निराश बनले होते. तेव्हा राजपुत्र मुरादने तहाची बोलणी सुरू केली व तह केला. त्यानुसार मुघलांनी बहादुरशाहाला निजामशहा म्हणून मान्यता दिली, निजामशाहीतील वऱ्हाड प्रांत मुघलांना देण्यात आला. राजपुत्र मुराद हा चाँदबिबीचे असामान्य शौर्य व पराक्रम पाहून थक्क झाला व तिला 'चाँद सुलताना' असा किताब दिला. त्यानंतर मुघल सैन्य अहमदनगरचा वेढा उठवून वऱ्हाडकडे निघुन गेले.

**४) निजामशाही वाचविण्याचे अखेरचे प्रयत्न :**

निजामशाही सरदार आपापसात भांडत होते. त्यांना गप्प करण्यासाठी व राज्यकारभार सुरळीत करण्यासाठी चाँदबिबीने आपला पुतण्या इब्राहिम आदिलशाहकडे मदत मागितली. वजीर मुहंम्मदखानाने मोगल अधिकारी खान-ए-खानान यास नगरवर हल्ला करण्यासाठी बोलाविले. यावेळी चाँदबिबीच्या सरदारांनी मिळून मुहम्मदखानास पकडून राणीच्या स्वाधिन केले. मुघलांच्या विरुद्ध लढण्यासाठी राणीने फौज उभी केली. तसेच आदिलशाहा आणि कुतूबशाहाकडेही मदत मागितली.

आदिलशहाने सोहेलखान नावाचा सेनापती व कुतूबशहाने मुहंम्मद कुली सुलतान यांच्या नेतृत्वाखाली सैन्य रवाना केले. उभयतांमध्ये गोदावरीतिरी सोनपत येथे घनघोर लढाई झाली (१६ जानेवारी १५९७) या लढाईमध्ये आदिलशाही सरदार सोहेलखान याने मोठा पराक्रम गाजविला. चाँदबिबीने निजामशाही वाचवण्यासाठी निकाराचा लढा दिला पण या युद्धात मित्र सैन्याचा पराभव झाला. मुघल सैन्य विजयी झाले.

**५) चाँदबिबीचा अखेर :**

चाँदबिबीने सासर आदिलशाही व माहेर निजामशाही या दोन्ही शाह्यांना सांभाळण्याचा प्रयत्न करत होती. परंतु सरदारामध्ये अंतर्गत कलह मोठ्या प्रमाणात होता. या यादवीचा फायदा घेऊन दिल्लीतील प्रबळ सत्ताधारी अकबराने आपल्या सरदारांस निजामशाहीवर चालून जाण्यास सांगितले. मोगल सैन्याशी आपण

मुकाबला करू शकत नाही हे ओळखून चाँदबिबीने मुघल सरदारांशी तहाची बोलणी करावी, असा सल्ला निजामशाहीतील सरदारांनी दिला. परंतु चाँदबिबीच्या या सल्ल्याने ती राज्याशी राजद्रोह करत आहे हे सगळीकडे सरदारांनी पसरवून एका बेसावध क्षणी त्यांनी चाँदबिबीस अटक केली.

१३ जुलै १६६० रोजी चाँदबिबीचा खून केला. त्याचवेळी मुघल सैन्याने किल्ल्याला खिंडार पाडून अहमदनगरचा किल्ला ताब्यात घेतला. निजामशाही सुलतान बहादूरशहाला कैद करून ग्वाल्हेरच्या किल्ल्यात पाठवण्यात आले. या युद्धात चाँदबिबीचा बळी जाऊन देखिल निजामशाहीचा विनाश टळू शकला नाही. चाँदबिबीच्या मृत्यूविषयी विविध मतप्रवाह दिसून येतात. मुघल इतिहासकार काफीखान याने चाँदबिबीने विहीरीमध्ये उडी टाकून जीव दिला, अशी माहिती दिली आहे. काझी शहाबुद्दीन याच्यामते चाँदबिबी व तिच्या मैत्रिणींनी 'मधली बावडी' नावाच्या विहीरीमध्ये जीव दिला. अशाप्रकारे दक्षिण भारतातील एक पराक्रमी स्त्रीचा शेवट घडून आला. मोगलांनी अहमदनगरवर हल्ला करून ते बेचिराख केले. निजामशाहीतील लोकांना आपली चूक समजली; परंतु तोपर्यंत खूप उशीर झाला होता.

**चाँदबिबीच्या कार्याचे मुल्यमापन :**

मध्ययुगीन भारताच्या इतिहासामध्ये एक पराक्रमी स्त्री म्हणून चाँदबिबीचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. ती अत्यंत रुपवान व सुंदर होती. ऐन तारूण्यात पतीचे निधन होऊनही तिने आपले वर्तन शेवटपर्यंत निर्मळ ठेवले. विजापूर आणि अहमदनगर प्रशासनाच्या कार्यावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविलेला. निजामशाही वाचविण्यासाठी मुघलांशी दिलेला लढा अभूतपूर्व असा आहे. तिचा पराक्रम आणि शौर्य पाहूनच राजपुत्र मुराद याने तिला 'चाँद सुलताना' किताब देऊन तिचा गौरव केला. अनेक इतिहासकारांनी तिच्याबद्दल गौरवोद्गार काढलेले आहेत. इब्राहिम आदिलशाहाने तिच्यावर कविता लिहून आपली चुलती फार देखणी होती, त्याचबरोबर तिचे रणभूमीवरील शौर्य, प्रजेविषयी कळवळा आणि इब्राहिमच्या बालपणात त्याला दिलेले मातेचे प्रेम याविषयी माहिती दिलेली आहे. अल्ताफ हुसेन असाद याने लिहिले आहे की, 'चाँदबिबी ही अहमदनगरची अजिंक्य स्त्री होती. त्याकाळी स्त्रियांना काहीच महत्व नसताना चाँदबिबीने जे शौर्य दाखविले ते हिंदुस्थानातच नव्हे तर सर्व जगामध्ये अलौकिक उदाहरण आहे.

कर्नल मिडोज टेलर याने चाँदबिबीवर 'नोबल क्विन' ही कादंबरी लिहून तिची तुलना इंग्लंडची राणी एलिझाबेथ हिच्याशी केलेली आहे. तो म्हणतो, ती स्वतः साधी, प्रामाणिक, दयाळू व धार्मिक असून हिंदुस्थानामधील स्त्रियांमध्ये एक मौल्यवान व निर्दोष अनमोल रत्न म्हणून उजळत आहे.' माउंट स्टुअर्ट एलफिन्स्टन यानेही आपल्या 'हिस्ट्री ऑफ इंडिया' ग्रंथात चाँदबिबी ही हिंदुस्थानमधील स्त्रियांमध्ये मोठा नावलौकिक मिळवलेली स्त्री आहे, असे गौरवोद्गार काढले आहेत. अंटोनिओ फ्रेझार याने, 'चाँदबिबीने सर्व फौज व जनता आपल्याकडे वळवून आपल्या राज्याचे संरक्षण केले. इतिहासामध्ये पुरुषांच्या बरोबरीने आपले कर्तृत्व सिद्ध केले', असे लिहिले आहे. प्रसिद्ध इतिहासकार फेरिश्ता याने 'गुलशन-ए-इब्राहिमी' या ग्रंथात चाँदबिबीविषयी अतिशय चांगले लिहिले आहे. अशाप्रकारे अनेक इतिहासकारांनी चाँदबिबीच्या कार्याची तोंड भरून स्तुती केली व गौरवोद्गार काढले आहेत.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-१**

अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.

१) चाँदबिबीचा जन्म इ. स. १५५० साली झाला, अशी माहिती .......... ग्रंथातून मिळते.

अ) गुलशन-इ-इब्राहिमी ब) तारीख-इ-शहावी

क) नाबेल क्वीन ड) यापैकी नाही

२) चाँदबिबी अहमदनगरचा सुलतान .......... याची बहिण होती.

अ) बुरहान-उल-मुल्क ब) इब्राहिम निजामशाह

क) हुसेन निजामशाह ड) मूर्तझा निजामशाह

३) आदिलशाही सुलतान .......... याच्याशी चाँदबिबीचा विवाह झाला होता.

अ) अलि ब) इब्राहिम क) बहादूर ड) इस्माइल

४) चाँदबिबीचा पती अली अदिलशाहा याचा इ. स. ...........मध्ये मृत्यू झाला.

अ) १५५० ब) १५५६ क) १५६० ड) १५१५

५) इब्राहिम आदिलशाहाची बहिण खदिजा हिचा विवाह मुर्तजा निजामशाहाचा मुलगा .......... याच्याबरोबर घडवून आणला.

अ) हुसेन ब) दुसरा अहमद क) बहादूर ड) इस्माइल

ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) चाँदबिबीला कोणकोणत्या भाषा अवगत होत्या.

२) राजपुत्र मुरादने चाँदबिबीचे असामान्य शौर्य व पराक्रम पाहून थक्क होवून कोणता किताब दिला.

३) किश्वरखानाने चाँदबिबीला कोठे कैदेत ठेवले होते.

४) सोहेलखान व मुहंम्मद कुली यांच्यात कोठे युद्ध झाले.

५) चाँदबिबीचा मृत्यू केव्हा झाला.

## २.२.२ इब्राहिम आदिलशहा दुसरा (इ.स. १५३० ते इ.स. १६२७)

जगाच्या इतिहासात अनेक राजे-महाराजे, बादशाहा आणि सुलतान होऊन गेले पण कविह्रदयाचे, प्रतिभावान व सर्जनशील व्यक्तिमत्त्वाचे राज्यकर्ते अगदीच अपवादात्मक आहेत. अशा काही अपवादात्मक राज्यकर्त्यांपैकी एक म्हणजे सोळाव्या शतकात होऊन गेलेला सुलतान इब्राहिम आदिलशाह दुसरा हा राज्यकर्ता. सुसंस्कृत, उदार व विद्येचा चाहता होता. इतर सुलतानांपेक्षा अनेक बाबतीत वेगळा राज्यकर्ता म्हणून भारताच्या इतिहासात महत्वाचे स्थान आहे.

इ.स. १३४७ ते १५२७ या कालखंडात दक्षिण पठारावर राज्य करणारी बहामनी राजवट ही एक शक्तिशाली व महत्त्वाची मुस्लिम राजवट होती. या राजवटीचा विजापूरचा सुभेदार म्हणून युसुफ आदिलशाह ह्यास १४८९ साली नेमण्यात आले. पुढे तो स्वतंत्र झाला आणि त्याने विजापूरलाच स्वतंत्र राज्य स्थापन केले. हे राज्य म्हणजेच विजापूरची आदिलशाही. म्हणून युसुफ आदिलशाह हा आदिलशाहीचा संस्थापक. सन १४९० ते १६८६ अशी सुमारे दोनशे वर्षे आदिलशाही टिकली. या दोनशे वर्षात एकूण नऊ सुलतान होऊन गेले. सुलतान इब्राहिम आदिलशाह दुसरा हा त्यातला सहावा सुलतान. विजापूरचा पाचवा सुलतान अली आदिलशाह पहिला (इ.स. १५३४-१५८०) याचा विवाह अहमदनगरच्या सुलतान हुसेन निझाम शाह पहिला याच्या चाँदसुलताना किंवा चाँदबिबी हिच्याशी झाला होता. ह्यांना मूल नव्हते म्हणून अली आदिलशाह पहिला याने तो हयात असतानाच त्याचा पुतण्या इब्राहिम आदिलशाह दुसरा (राज्यकार्यकाल इ.स.१५८०-१६२७) याला राज्याचा वारस घोषित केले होते. सुलतान अली आदिलशाह पहिला याच्या इच्छेनुसार त्याच्या मृत्यूनंतर नवव्या वर्षीच विजापूरच्या गादीवर बसवण्यात आले. आदिलशाही राजवटीच्या या सहाव्या सुलतानाचे वय लहान असल्यामुळे बुद्धिमान व कर्तृत्ववान चाँदबीबी आणि शक्तिमान व महत्त्वाकांक्षी सरदार कमाल खान ह्यांच्या मार्गदर्शनाखाली त्याची कारकीर्द सुरू झाली. पुढे वयात आल्यावर त्याने सर्व राज्यकारभार हाती घेतला. राज्याचा विस्तार केला व राज्याची घडी नीट बसवली.

**१) जन्म व बालपण :**

इब्राहिम आदिलशाहाचा जन्म इ. स. १५७१ मध्ये झाला. आदिलशाही सुलतान अली आदिलशाहाला मुलगा नव्हता. त्यामुळे त्याने त्याचा भाऊ तहमारस्य याचा मुलगा म्हणजे इब्राहिम याला आपला वारस म्हणून नेमले होते. त्याच्या पुढच्याच वर्षी अलीचा खून झाला. तेव्हा दरबारातील अधिकाऱ्यांनी नऊ वर्षाच्या इब्राहिमचा राज्याभिषेक केला. (इ. स. १५८०). अशाप्रकारे अल्पवयात इब्राहिम हा विजापूरचा सुलतान बनला. इब्राहिमला वारस नेमल्यामुळे अली आदिलशाह पहिल्याने त्याच्या शिक्षणावर विशेष लक्ष दिले होते. स्वतः इब्राहिमसुद्धा कुशाग्र बुद्धीचा असल्याने विद्येचा भोक्ता होता. 'बसातीन स्सलातीन' व 'तारीखे करिश्ता' या ग्रंथात इब्राहिमविषयी असा उल्लेख आहे की, तो लहानपणी अन्य मुलांप्रमाणे खेळात वेळ घालवण्यापेक्षा अभ्यासात रमत होता. त्याने लहानपणीच 'कुरान शरीफ' या पवित्र ग्रंथाचे पूर्ण अध्ययन केले होते. चित्रकला, हस्तकला आणि संगीतशास्त्रातसुद्धा त्याला गोडी होती. अली आदिलशाह प्रथमच्या मृत्यूनंतर त्याची राणी आणि इब्राहिम आदिलशाह दुसरा याची मलिका चाँदबिबीने इब्राहिमच्या शिक्षणाकडे लक्ष दिले. इब्राहिम तिचा फारच लाडका होता.

यावेळी राज्यकारभाराची सर्व सुत्रे कामिलखान दखखनी व अली आदिलशाहाची पत्नी चाँदबिबी यांच्या हातामध्ये होती. कामिलखान हा अनुभवी व कुशल राजकारणी असल्यामुळे दरबारातील अधिकाऱ्यांनी त्याची राजप्रतिनिधी म्हणून नेमणूक केली होती. परंतु तो अत्यंत महत्वकांक्षी असल्यामुळे त्याने सत्ता आपल्याकडेच कायम राहावी यासाठी कारस्थाने सुरू केली. तसेच दरबारातील किश्वरखान, दिलावरखान आणि हमीदखान या सरदारांनीही राज्यकारभारावर वर्चस्व निर्माण करण्यासाठी कटकारस्थाने सुरू केली होती. त्यामुळे इब्राहिमच्या सुरवातीच्या काळात दरबारामध्ये गोंधळ मोठ्या प्रमाणात होता.

## २) आदिलशाहीतील अराजकता :

कामिलखान हा जुना अनुभवी आणि नावाजलेला असा दरबारी होता. युद्धातील पराक्रम आणि मुलकी कारभारातील कौशल्य या बाबत त्याचा दबदबा होता. सुलतान अल्पवयीन आहे याचा फायदा घेऊन प्रतिनिधी कामिलखानाने सर्व सत्ता आपल्या हाती घ्यावी, या उद्देशाने पावले टाकायला सुरवात केली, त्याने दडपशाहीचा अवलंब सुरू केला. इतकेच नव्हेतर चाँदबिबीला अपमानास्पद वागणूक देऊ लागला त्यामुळे ती संतप्त बनली. तिने कामिलखानाला सत्तेवरून दूर करण्यासाठी किश्वरखानाला जवळ केले. किश्वरखानाने आपल्या सहकाऱ्यासह अचानक कामिलखानावर हल्ला करून त्याला ठार मारले (इ. स. १५८०)

कश्वरखानाने विजापूरचे प्रतिनिधीपद आल्यानंतर कामिलखानाचेच अनुकरण केले. अनियंत्रितपणे राज्यकारभार करण्यास सुरूवात केले. आदिलशाहीतील गोंधळाचा फायदा घेण्यासाठी निजामशाहा व कुतूबशहा यांनी राज्यावर आक्रमणे सुरू केली. किश्वरखानाच्या मनमानीला कंटाळून चाँदबिबी आणि दरबारी मंडळीनी प्रतिनिधीपद मुस्ताफाखानास देण्याची योजना आखली. किश्वरखानाला त्याची कुणकुण लागताच त्याने मुस्ताफाखानावर हल्ला करून त्याला ठार मारले. ही बातमी चाँदबिबीला समजताच ती अत्यंत संतप्त बनली.

किश्वरखानाने चाँदबिबीवर तिचा भाऊ मुर्तजा निजामशाहा याला विजापूरवर आक्रमण करण्यासाठी प्रवृत्त केल्याचा आरोप करून कैद केले. तिला अत्यंत अपमानित करून सातारच्या किल्ल्यात डांबण्यात आले. राणीच्या अपमानामुळे सरदार इकलासखान व इतर सरदार मंडळी संतप्त झाले आणि त्यांनी किश्वरखानाला सत्तेवरून दूर करण्याचा निश्चय केला. हे समजताच किश्वरखानाने घाबरून अहमदनगरकडे पलायन केले. तेथे आश्रय न मिळाल्याने तो गोवळकोंड्याला गेला, पण तेथे मुस्ताफाखानाच्या एका नातलगाने त्याचा खून केला.

इकलासखान (एकलासखान) याने विजापूरचे प्रतिनिधीपद आपल्याकडे घेतले. त्याने चाँदबिबीला कैदेतून मुक्त करून राजधानीत आणले आणि सुलतानाच्या देखभालीची जबाबदारी तिच्यावर सोपविली. इकलासखान हा क्रूर होता. त्याने किश्वरखानाच्या बाजूच्या अनेकांच्या कत्तली केल्या, अनेकांना तुरुंगात डांबले. अनेक अधिकाऱ्यांची उचलबांगडी केली. त्याच्या काळात परकिय मुसलमान, दक्षिणी मुसलमान यांच्यातील संघर्ष वाढला. इकलासखानास, हमीदखान व दिलावरखान या बलाढ्य सरदारांचे सहकार्य मिळाल्यामुळे त्याची मनमानी वाढली. दरबारातील अंतर्गत गोंधळाचा फायदा घेण्यासाठी कुतूबशहाने विजापूरवर आक्रमण करायला सुरवात केली. दिलावरखानाच्या नेतृत्वाखाली आदिलशाही सैन्याने शत्रू सैन्याचा दारूण पराभव केला. या विजयामुळे दिलावरखानाचे दरबारातील वजन वाढले. त्याला प्रतिनिधीपद आपल्याकडे असावे असे वाटू लागले. त्याने हमीदखानाच्या मदतीने इकलासखानास कैद करून त्याचे डोळे काढले

## ३) स्वतंत्र कारकिर्दीस सुरवात :

दिलावरखानाने राजप्रतिनिधी म्हणून नेमणूक झाल्यावर दरबारातील अमीर उमरावांना आपल्या बाजूला वळविले. दरबारातील महत्वाची पदे आपल्या नातेवाईक व मुलांना दिली. सुलतानाच्या खाजगीतील सर्व

जागा त्याने आपल्या मुलांकडे सोपविल्या. दरबारातील परदेशी मुसलमानांची हकालपट्‌टी करून त्याने दरबारावर आपले वर्चस्व निर्माण केले. सन १५८४ मध्ये इब्राहिमचा विवाह कुतूबशाहाची कन्या मलिकाजहान हिच्याशी घडवून आणला.

इब्राहिम हळूहळू मोठा होत होता आणि त्याने आपल्या कर्तृत्वाने राज्यकारभारावर छाप पाडायला सुरवात केली. जनतेमध्ये तो लोकप्रिय होत चालला. मात्र दिलावरखानाला हेच खटकू लागले. त्याने इब्राहिमला दूर करून त्याच्याजागी त्याचा भाऊ इस्माईल याला बसविण्याचे कारस्थान रचले. इस्माईल यावेळी बेळगावच्या किल्ल्यात कैदेत होता. त्याच्याबरोबर दिलावरखानाने संधान साधले. हे कारस्थान समजल्यावर दरबारातील अधिकारी व जनता त्याच्यावर नाराज झाली. आपले बिंग फुटताच तो इब्राहिमशहापुढे शरण आला व त्याने माफी मागितली. सुलतानाने त्याला माफ करून राज्य कारभाराची सूत्रे त्याच्याकडेच पुर्ववत ठेवली.

इब्राहिमला राजकारणाची चांगली जाण आलेली होती, त्याचा आत्मविशस वाढलेला होता. दरबारातील ऐनउलमुल्क, आंकुसखान आणि आदिम अलीखान या मातब्बर सरदारांचे पाठबळ इब्राहिमला मिळाले होते. त्यामुळे इब्राहिमची ताकद वाढली. तेव्हा पूर्ण तयारीनिशी इब्राहिमने दिलावरखानावर हल्ला केला. या संघर्षामध्ये दिलावरखानाचा मुलगा ठार झाला. दिलावरखानाने युद्धभूमीतून पळ काढला व तो अहमदनगरला गेला. पुढे इब्राहिमने त्याला पकडून त्याचे डोळे काढले व सातार्‍यात कैदेत ठेवले. या घटनेनंतर इब्राहिमने स्वतःचा राज्याभिषेक समारंभ घडवून आणला. १७ मे १५९० रोजी इब्राहिम राजधानीत आला, अधिकार्‍यांच्या नेमणूका केल्या. पुढील काळात इब्राहिमने स्वतंत्रपणे राज्यकारभार करायला सुरवात केली.

**४) इस्माईलचे बंड :**

सुलतान इब्राहिमशाहाला सत्ता हाती घेताच दुहेरी संकटाचा सामना करावा लागला. एका बाजूने बुरहान निजामशाहाचे आक्रमण आणि दुसर्‍या बाजूने कैदेत असणार्‍या भाऊ इस्माईलने आपल्या भावाविरुद्ध बंड केले. त्याने बेळगावचा सुभेदार व तेथील सैन्याला आपल्या बाजूला वळविले. दरबारातील अधिकार्‍याना लाच देऊन आपल्या बाजूला घेतले. सुलतानाला मदत करणार्‍या ऐनउलमुल्क व आंकूसखान यांनाही फितूर केले. आपला वकिल बुरहान निजामशाहाकडे पाठवून मदतीची याचना केली. निजामशाहाने त्याला मोठ्या सैन्यानिशी मदत करण्याचे आश्वासन दिले. इस्माईलने बेळगाव आणि आसपासचा प्रदेश ताब्यात घेऊन स्वतःला आदिलशाही सुलतान म्हणून घोषित केले. अशाप्रकारे इस्माईलने सुलतानाच्या विरोधात बंडाचे निशाण रोवले. तेव्हा सुलतानाने एलियासखानाला बंडाचा बिमोड करण्यासाठी बेळगावला पाठवले. त्याने बेळगांवच्या किल्ल्याला वेढा दिला, परंतु त्याला अपयश आले. इस्माईलला मदत करण्यासाठी बुरहान निजामशाहा आपले सैन्य घेऊन विजापूरकडे निघाला.

इब्राहिम आदिलशाहाने या दुहेरी संकटाचा मुकाबला करण्यासाठी जय्यत तयारी केली. त्याने हमीदखानाची सेनापतीपदी नेमणूक केली आणि त्याला बंडखोराविरुद्ध पाठविले. हमीदखानाने सावधपणे

पावले टाकायला सुरवात केली. इस्माईल व ऐनउलमुल्क या दोघांनाही गाफिल ठेवून अचानकपणे त्यांच्यावर जोरदार हल्ला केला. बंडखोरांच्या सैन्याची दाणादाण उडाली. दोघांनाही कैद करण्यात आले. शिपायाने ऐनउलमुल्क याचे शिर कापून इब्राहिमशाहाकडे पाठविले, त्याने ते शिर आपल्या राजवाड्यासमोर टांगून ठेवले होते. बंडखोरांची अवस्था काय होते हे इतरांना समजावे यासाठी सुलतानाने असे केले. बंडखोर राजपुत्र इस्माईल याचे डोळे काढत असताना त्याचा मृत्यू झाला. बंड मोडल्याची बातमी समजताच बुरहान निजामशाहा ताबडतोब अहमदनगरला परतला.

**५) इब्राहिम आदिलशाहाचे कार्य :**

**१) अलबारच्या रायांना (नायकांना) वठणीवर आणले :**

इब्राहिम आदिलशहाने आपल्या राज्याची घडी व्यवस्थित बसविल्यानंतर मलबारच्या रायांना वठणीवर आणण्याचे ठरविले. नायकांनी आदिलशाही दरबाराला न जुमानता खंडण्या देण्याचे बंद केले होते. तेव्हा सुलतानाने मंजूखानास खंडण्या वसूल करण्याच्या कामासाठी पाठवले. तो सैन्य घेऊन बंकापूरला आला आणि तेथे मलबारच्या रायांना आपापल्या खंडण्या घेऊन भेटण्यास बोलाविले, जे खंडणी देतील त्यांना माफ केले जाईल. परंतु जे बंडखोर करतील त्यांचा सूड घेतला जाईल, अशी त्याने धमकी दिली. मलबारच्या रायांमध्ये गंगा नाईक हा प्रमुख होता. त्याने आपली खंडणी दिलीच पण सैन्य घेऊन मंजूखानाच्या मदतीला आला. त्यामुळे इतर नायकांना वठणीवर आणणे, मंजुखानाला सोपे गेले.

**२) निजामशाहीचा पराभव :**

बुरहान निजामशाहाच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा इब्राहिम हा सुलतान बनला. नुकत्याच झालेल्या युद्धात आदिलशाहीकडून झालेल्या पराभवाचा बदला घेण्यासाठी आदिलशाहीवर स्वारी काढली तेव्हा आदिलशाहाने हमीदखानाला प्रचंड सैन्यासह निजामशाही सैन्याविरुद्ध पाठविले. उभयतांमध्ये नळदुर्ग या ठिकाणी घनघोर युद्ध झाले. या युद्धामध्ये इब्राहिम निजामशाहा ठार झाला. पळणाऱ्या शत्रू सैन्याचा पाठलाग करत आदिलशाही सैन्य निजामशाहीच्या सीमेपर्यंत पोहोचले. परंतु सुलतानाने आपल्या सैन्याला माघारी बोलावले. (इ.स. १५९५)

**३) मोगलांबरोबर संबंध :**

इ. स. १५९० ते १५९७ या काळात इब्राहिमने मुघलांना विरोध करण्याचे धोरण स्विकारले होते. दक्षिणेतील शह्यांवर सातत्याने मुघलांची आक्रमणे होत असत. अकबराने राजपुत्र मुराद याला निजामशाहीवर आक्रमण करण्यासाठी पाठवले. त्यावेळी निजामशाही वजीर मलिक अंबर याने ईब्राहिम आदिलशाहाकडे मदत मागितली. मुघलांचा धोका आपणालाही होऊ शकतो हा विचार करून त्याने काही किल्ले, मोक्याची ठिकाणी व काही फौज मलिक अंबरच्या मदतीला पाठविली. पुढे मुघल बादशाहा जहाँगिरने मलिक अंबरचा बंदोबस्त करण्यासाठी शहजादा परवेझला पाठविले. या संघर्षात इब्राहिमने तटस्थ रहावे, या बादशाहाच्या सुचनेकडे दुर्लक्ष करून त्याने आपले सैन्य मलिक अंबरच्या मदतीला पाठविले होते. इ. स. १६१० नंतर

इब्राहिम आदिलशाहा व मलिक अंबर यांच्यातील संबंध बिघडले तेव्हा इब्राहिमने बादशाहा जहाँगिरकडे आपला वकील पाठवून मुघलांबरोबर मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले.

**४) बरीदशाहीचा शेवट :**

बादशाहा जहाँगिरने दक्षिणेतील सर्व राज्यकारभाराची जबाबदारी इब्राहिम आदिलशाहाकडे सोपविली होती. त्याने इ. स. १६१९ मध्ये राजधानी बिदरवर आक्रमण करून तेथील सत्ताधीश मिर्झा अली बरीद याचा पराभव केला. इब्राहिमने बरीदशाही जिंकून दक्षिणेच्या राजकारणातून तिचा शेवट घडवून आणला.

**५) कुतुबशाहीशी संबंध :**

इब्राहिम आदिलशाहाने कुतूबशहाची कन्या चाँद सुलताना उर्फ मलिकाजहान हिच्याशी विवाह केला (१५८६). या वैवाहिक संबंधामुळे आदिलशाही व कुतूबशाही यांच्यामध्ये स्नेहाचे संबंध निर्माण झाले. वेळप्रसंगी एकमेकांना लष्करी मदत करून हे संबंध दृढ करण्याचे प्रयत्न केल्याचे दिसून येते. इब्राहिम आदिलशाहाने इ. स. १५९० ते १६२७ याकाळात कार्यक्षमपणे कारभार केला. सुरवातीच्या काळात त्याच्यावर आलेल्या संकटाचा, बंडाचा व्यवस्थितपणे मुकाबला केला. तसेच आपल्या राज्यावर आलेल्या शत्रुच्या आक्रमणाचा प्रतिकार करून जनतेच्या हिताला प्राधान्य दिले. अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना केल्या. स्वतः मुसलमान असूनही त्याने प्रशासनात हिंदूंच्या मोठ्या प्रमाणात नेमणूका केल्या. त्याने साहित्य, वास्तूकला, चित्र, कला, संगीत यासारख्या कलांना प्रोत्साहन दिल्यामुळे त्यांची भरभराट घडून आली. कार्यक्षम सत्ताधीश इब्राहिम आदिलशाहा दुसरा याचा मृत्यू सप्टेंबर १६२७ मध्ये झाला.

**६) सुलतान इब्राहिमशहाचे सेवक निवडीसंबंधीचे धोरण :**

बहुसंख्य रयत हिंदू आणि राज्यकर्ते मुसलमान अशी स्थिती असल्याने शासनाच्या मुलकी आणि लष्करी सेवेत नेमणुका करताना सुलतान काळजी घेत असत. कोणत्याही पदावर नेमणूक करायला कोणीही केवळ हिंदू म्हणून अपात्र मानला जाऊ नये अशी भूमिका होती. हिंदूंच्या मोठ्या प्रमाणावर नेमणुका करावयास सुरवात केली. इब्राहीमने अंतू पंडित व शिवाजी महाराज यांचे वडील शहाजी यांचे दरबारातील स्थान महत्वाचे होते. या दोघांच्या नेमणुका पाहिल्यास इब्राहीम चे धोरण कसे उदार, सर्वसंग्राहक व सर्वसमावेशक होते हे दिसते.

**७) सुलतान इब्राहिमशहाचे धार्मिक धोरण :**

आदिलशाही सुलतान इब्राहिम दुसरा याने आपल्या राज्यामध्ये उदार व धर्मसहिष्णू धोरणांचा स्विकार केला होता. मध्यकाळात मुस्लिम सत्ताधिश इतर धर्मियांवर अन्याय, अत्याचार करण्यामध्ये धन्यता मानत होते. त्याकाळात अशाप्रकारचे उदार धार्मिक धोरणांचा स्विकार करणारा इब्राहिम इतरांपेक्षा वेगळा वाटतो. म्हणूनच सम्राट अकबरानंतर इब्राहिम आदिलशाहा दुसरा याचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते. त्याचे धार्मिक धोरण पुढीलप्रमाणे :

### अ) उदार धार्मिक धोरण :

आदिलशाही सुलतान अली याच्याकाळात राज्यातील अनेक प्राचीन हिंदू मंदिरांचा विध्वंस करण्यात आलेला होता. तसेच अनेक मुर्त्या फोडण्यात आल्या होत्या. सातत्याने हिंदूवर अन्याय, अत्याचार करण्यात येत होता. या आदिलशाही राजवटीची एक महत्त्वाची विशेषतः म्हणजे सुलतानांच्या ठिकाणी असणारी धार्मिक सहिष्णुता व भाषिक सहिष्णुता. काही सुलतानांच्या पत्नी हिंदू होत्या. त्या मराठी व दखनी भाषा बोलत. इब्राहिमची एक पत्नीही हिंदूच होती. इब्राहिमची चाँदबिबी काकूही मराठी, दखनी चांगली बोलू शकत असे. तीही उदार विचारांची होती. या परंपरेत व संस्कारात वाढलेल्या इब्राहिम आदिलशाह दुसरा याच्या व्यक्तिमत्त्वात काव्य व संगीतकला यांबरोबरच परधर्म सहिष्णुता हा गुण विशेषत्वाने जाणवणारा होता. 'जगत्गुरू बादशहा' म्हणून ओळखला जाणाऱ्या या सुलतानाने खिश्चन धर्मप्रचारकांना संरक्षण दिले होते, त्याच्या राज्यातील अनेक मुलकी आणि लष्करी अधिकारी हे ब्राह्मण आणि मराठा होते. हिंदू धर्मातील विचार, हिंदू पुराणे, हिंदू देव-देवता, संस्कृत भाषा, मराठी भाषा, हिंदू कलावंत यांच्या विषयी त्याने नेहमी उदार दृष्टिकोन ठेवला होता. प्रत्यक्ष वागणुकीने व्यवहारात उपयोगात आणला होता.

### ब) शिया-सुन्नी भेद नाही :

सुफी तत्त्वज्ञानाचा व विचारांचा त्याच्यावर परिणाम झालेला होता. ते तत्त्वज्ञान तो स्वतः जगत होता. गुलबर्गाचे सुफी संत हजरत बंदानवाझ यांचा तो भक्त होता. तो स्वतः सुन्नी मुस्लिम होता. शिया आणि सुन्नी पंथांमध्ये तसेच हिंदू आणि मुस्लिमांमध्ये त्याने समन्वय साधला. आदिलशाही राज्यामध्ये शिया व सुन्नी पंथीयांची संख्या मोठी होती. इब्राहिमने शिया पंथ सोडून सुन्नी पंथ चालू केला होता. असे असले तरी शिया व सुन्नी यांच्याबाबतीत त्याने भेदभाव केला नाही. मुस्लिमांतील शिया व सुन्नी यांच्यात सुसंवाद साधला होता तसाच मुस्लिम व हिंदूंमध्येही सुसंवाद साधला होता. त्याने सर्वांना आपापल्या पद्धतीने धर्माचरण करण्याची परवानगी दिलेली होती.

### क) हिंदू मंदिरे व साधुसंतांना देणग्या :

इब्राहिम हिंदू संस्कृतीने भारावलेला होता. तो संगिताचा शौकिन व उत्कृष्ट गीत रचनाकार होता. यासाठी तो सरस्वतीचा भक्त व गणपतीचा शिष्य बनला होता. त्याने शिव, इंद्र, गणपती व सरस्वती या हिंदू देवदेवतांवर अनेक कवने रचली आहेत. ती अत्यंत अप्रतिम होती. त्याने अनेक हिंदू मंदिरे व साधुसंतांना देणग्या दिलेल्या होत्या. तो हिंदूंच्या पुजाविधीमध्ये मोठ्या भक्तिभावाने सहभागी होत असे.

### ड) कट्टर मुस्लिमांच्या विरोधास जुमानले नाही :

इब्राहिम हिंदूच्या पुजाअर्चा, आचारविचार यांचे पालन करीत होता. तसेच इतर धर्मियांना अदारतेने वागवित होता. हे त्याचे धोरण कट्टर मुस्लिमांना आवडले नाही. मुस्लिम धर्मातील मुल्ला, मौलवी, काझी यांनी इब्राहिमला कट्टर विरोध केला. त्यांनी हिंदू देवदेवतांच्या पुजाविधी बंद करण्याचे आदेश दिले. तेव्हा सुलतानाने स्पष्टपणे सांगितले की, ''मी मुसलमान आहे व राहणार आहे, परंतु मुसलमान राहिल्यामुळे मला

संगितापासून दूर जावे लागणार असेल तर मी मुसलमान धर्मही सोडेन आणि हिंदू धर्माप्रमाणे आचरण करेन. सांगीत साधना सरस्वतीच्या पूजेशिवाय होऊच शकत नाही. तेव्हा ती मी सोडणार नाही.'' यावरून असे दिसून येते की कट्टर मुस्लिमांनी कितीही विरोध केला तरी इब्राहिमने आपले उदार धोरण सोडले नाही.

**इ) मराठी भाषेला राजभाषेचा मान :**

मराठी आणि दखनी भाषेवर त्याचे प्रभुत्व होते. 'मराठी भाषेला राजभाषेचा मान देणारा हा पहिला मुसलमान सुलतान. त्याच्या फार्मानावर 'श्रीसरस्वती'ची नाममुद्रा असे आणि मराठी व फारसी या दोन्ही भाषांतून त्याचे फार्मान जाहीर होई. एका राज्याच्या गादीवर असलेल्या मुसलमान सत्ताधीशाने हिंदू धर्मातील देव देवता आणि भारताची सांस्कृतिक परंपरा यांच्या विषयी आदरभाव दाखवावा हे दक्षिणेतील मुसलमानी सत्तेच्या परंपरेशी अत्यंत विसंगत होते. संत एकनाथांनी पुरस्कारिलेला सर्वधर्मसमभाव इब्राहिम आदिलशाहच्या साहित्यातही आढळतो. एकनाथकाळीच भारतीय संगीतात समन्वयाची प्रक्रिया सुरू झालेली होती. कित्येक इराणी रागांना भारतीय संगीताच्या रागमालेत स्थान मिळालेले होते. समर्थ साहित्यातही काही इराणी राग येतात. इब्राहिम आदिलशाहने संगीताच्याही क्षेत्रात समन्वयाचा पुरस्कार केलेला आहे. समकालीन सामाजिक आणि सांस्कृतिक प्रवृत्तींचे प्रतिबिंब इब्राहिम आदिलशाहच्या काव्यात पडलेले आहे

**८) इब्राहिम आदिलशाहाच्या काळातील सांस्कृतिक विकास :**

इब्राहिम आदिलशाहा स्वतः उत्तम गायक व गीत रचनाकार होता. विद्या व कलेचा चाहता होता. त्याने आपल्या दरबारामध्ये अनेक कवी, पंडीत, गायक व कलाकार यांना राजाश्रय दिलेला होता. यामुळेच त्याच्या काळात साहित्य, शिल्प, वास्तू, चित्रकला व संगीत या क्षेत्राचा विकास घडून आला. त्याची माहिती पुढीलप्रमाणे–

सुफी तत्त्वज्ञानाच्या प्रभावाने निराग्रही धार्मिक वृत्ती त्याच्या अंगी बाणवली होतीच. या सर्वांतून व्यापक जीवनदृष्टिकोन विकसित झाला होता. यातून त्याचे प्रजाविषयक धोरण जसे ठरले तसे कलाविषयक धोरणही ठरले होते. प्रजाहित जसे धर्मातीत जाऊन जपले पाहिजे तसेच कला ही धर्मातीत जाऊन जपली पाहिजे, जोपासली पाहिजे अशी त्याची धारणा झाली होती. सर्व कलाविद्या अवगत झाल्या पाहिजेत. त्यासाठी दैवीकृपा असली पाहिजे. आशीर्वाद असले पाहिजेत. व्यक्ती म्हणून विचार करणारे असे हे भक्तिबहळ मन होते. या मनाचा आविष्कार त्याच्या भक्तिगीतातून झालेला आहे. असे असल्याने किताब–ए–नवरसच्या ग्रंथारंभी मंगलाचरणाचा पहिला दोहरा सरस्वतीचे वंदन करण्यासाठी येतो, तर लगेच पहिले गीत सुफी संत गुलबर्गाचे हजरत बंदानवाज गेसूदराज यांचा आशीर्वाद घेण्यासाठी येते, कारण सुलतान इब्राहिम कवी त्यांचा भक्त होता. दरवर्षी गुलबर्गाला भरणाऱ्या उरुसासाठी जात होता. म्हणून किताब–ए–नवरसचे ५९ क्रमांकाचे कळसगीत हजरत बंदानवाज गेसूदराज यांच्या उरुसाचे वर्णन आहे.

एक यशस्वी सुलतान असलेला इब्राहिम आदिलशाह दुसरा हा वैभवसंपन्न सल्तनतचा सुलतान होता. कर्तृत्ववान पण रसिक राज्यकर्ता होता. अनेक कलांना दाद देत व स्वतःला कलानिर्मितीत झोकून देत जगणारा होता. आपल्या आवडी चोखंदळपणे जपत, मोठ्या रसिकतेने जीवनोपभोगांचा आस्वाद घेत,

आंनदाने, जीवनाचा आकंठ उपभोग घेत, आसक्तीने जीवनाला सामोरा जात जगणारा सुलतान होता. त्याची अनेक गीते मदिरा आणि मदिराक्षी यांचा आनंदाने आस्वाद घेण्याला वाहिलेली आहेत. नवरस महालाच्या मागील भागात खास जनानखाना होता. त्याला अनेक बायका असल्या तरी त्याच्या आवडत्या चाँद सुलताना राणीच्या रूप-गुणांवर तो जास्त फिदा झालेला होता असे दिसते.

**अ) साहित्य :**

आदिलशाहीतील सुलतानांपैकी काही अपवाद वगळता बहुतेक सुलतान कलाप्रेमी व कवी होते. या सुलतानांतील सुलतान इब्राहिम आदिलशाह दुसरा हा अतिशय तरल कल्पनाशक्ती असलेला, संवेदनाक्षम व कविहृदयाचा होता. या सुलतानाच्या कलाप्रेमाची, स्वतः कलानिर्मितीत रमण्याची, कलावंतांची बूज राखण्याची, त्याच्या संगीतप्रेमाची आणि काव्यनिर्मिती करून त्या कवितांचे गायन करण्याची सर्वच इतिहासकारांनी आणि चरित्रकारांनी विशेषत्वाने नोंद घेतली आहे. अशा कविमनाच्या सुलतानाला काव्यलेखनातही चांगली गती होती. त्याने लिहिलेल्या किताब-ए-नवरस (नौरसनामा) या ग्रंथाचे आजही काव्यरसिकांना आणि अभ्यासकांना आकर्षण वाटणे कमी झालेले नाही.

इब्राहिम स्वतः विद्वान असून त्याने आपल्या दरबारामध्ये अनेक साहित्यिकांना राजाश्रय दिलेला होता. त्यामुळे त्याच्या काळात साहित्यामध्ये मोठी वाढ झाली. फारसी साहित्यातील सर्वात मोठा कवी झुहूरी हा इब्राहिमच्या दरबारात होता. त्याने तीस हजारांहून अधिक कविता लिहिल्या आहेत. बुऱ्हाण निजामशाहवरील 'साकीनामा' ह्या त्याच्या काव्याबद्दल त्याला फार मोठी बेदागी मिळाली होती.

ललित्तेर स्वरूपाच्या ग्रंथलेखनासही त्याने उत्तेजन दिले होते. मध्ययुगातील प्रसिद्ध इतिहासकार फेरिश्ता याला इब्राहिमने राजाश्रय दिलेला होता. त्याने सुलतानाच्या विनंतीवरून 'गुलशन-ए-इब्राहिमी' या इतिहासग्रंथाची निर्मिती केली. इब्राहिमच्या सेवेतील रफ़िउद्दिन शिराझीने लिहिलेला 'तजकिरात-उल-मुल्क' हाही एक त्याकाळातील महत्वाचा इतिहास ग्रंथ होय. त्याच्या काळातील सलामी नावाच्या लेखकाने 'मजबा-उलघराईबा' हे पुस्तक लिहिले. त्यामध्ये इब्राहिम, त्याचा दरबार, राजधानी इत्यादीची स्तुती करणेत आलेली आहे.

**ब) संगीत :**

इब्राहीम आदिलशहा कवी तर होताच, पण तो एक तितकाच किंवा त्याहूनही जास्त मोठा असा संगीततज्ञ होता. तो स्वतः उत्कृष्ट गायक होता. त्याने कलेच्या प्रसारासाठी आयुष्यभर प्रयत्न केला. त्याने देशभरातील गायकांना आपल्या दरबारामध्ये राजाश्रय दिलेला होता. त्याच्या दरबारात चार हजार गायक कलाकार होते. यातील अनेकांना नियमित वेतन दिले जाई तर अनेकांना इनाम जमिनी दिलेल्या होत्या. इब्राहिमने गायनकला अवगत करण्यासाठी मोठे परिश्रम घेतलेले होते. रात्रभर जागून तो रियाझ करीत असे. मोठा संगीततज्ञ म्हणून त्याला मान्यता मिळाली होती. तर त्याने स्वतःला 'जगतगुरू' पदवी घेतली होती. विजापूरमध्ये रोजच्या रोज मैफिली भरत असत. इब्राहिमने गवयांचे हुजरी, दरबारी व शहरी असे वर्गीकरण

केलेले होत. एकूण सगळे गाणारे निरनिराळी वाद्ये वाजविणारे आणि कलावंताना दाद देणारे रसिकही ह्या सगळ्यांना 'लष्कर-ह-नौरस' म्हटले जाई. संगीताच्या माध्यमातून हिंदू आणि मुसलमानांमध्ये त्याने सांस्कृतिक समभाव निर्माण केला. याप्रकारे सर्वधर्मसमभाव असलेल्या संस्कृतीची परंपरा त्याने निर्माण केली.

**क) चित्रकला :**

संगीताच्या खालोखाल चित्रकलेसाठी इब्राहिमची कारकीर्द उल्लेखनीय आहे. विजापूरच्या दरबारातील चित्रकलेला अगदी पहिल्या आदिलशहापासून उत्तेजन मिळत आलेले होते. इब्राहिमच्या काळात चित्रकलेची भरभराट घडून आली. त्याने आपल्या दरबारामध्ये इराणी, हिंदी चित्रकारांप्रमाणेच युरोपियन चित्रकारांनाही राजाश्रय दिलेला होता. इब्राहिमच्या दरबारी चित्रकारांत कुणा हिंदू कलावंताचे नांव आढळत नाही. त्याच्या आश्रयाखाली प्रमुख चित्रकार फारुख हुसेन हा इराणमधून आलेला होता. दुसरा एक मूर्तुझाखान म्हणून होता तो हि इराणीच असावा. तिसरा मुहमद अली हा होता. त्याच्या काळातील इराणी, हिंदी व युरोपियन चित्रकारांच्या चित्रशैलीतून नवीन दक्षिणी चित्रशैली विकसित झालेली होती. विजापूर व कुमरगी येथील भित्तीचित्रामध्ये पोलोसारखे खेळ, शिकारी, कुस्ती, संगीत मैफिली यासारख्या विषयांवरील चित्रे काढलेली दिसतात.यामध्ये युरोपियन पोषाखातील स्त्रीपुरुष आणि युरोपियन घाटाचे मद्याचे प्यालेही होते. इब्राहिमच्या काळात कागद, कापड व भिंतीवर शेकडो चित्रे काढली गेली. तत्कालिन चित्रे पुणे, मुंबई, कलकत्ता, दिल्ली याबरोबरच लंडन, डब्लिन, इस्तंबूल या परकिय शहरांमध्ये आज उपलब्ध आहेत. दरबारी चित्रकार फारूख हुसेन या चित्रकाराने हत्तीवर बसलेल्या सुलतानाचे काढलेले चित्र उपलब्ध आहे. सुलतानाने तुर्की, इराणी व दक्षिणी पेहरावातील विविध चित्रे काढून घेतलेली होती. संगीतातील विविध राग यांची वैशिष्टे दाखवणारी चित्रे काढलेली होती. इब्राहिमच्या कारकिर्दीतले विजापुरातल्या सामाजिक जीवनाचे वर्णन असलेले असे एक हस्तलिखित पुस्तक व दुसरे पाकशास्त्रावरील एक पुस्तक उपलब्ध आहे. संगीतातील निरनिराळ्या राग-रागीण्याची वैशिष्ट्ये दाखविण्यासाठी चित्रे काढली गेली आहेत. या सर्वांवरून तत्कालिन काळात चित्रकलेची किती प्रगती झालेली होती याची माहिति मिळते.

**ड) स्थापत्यकला :**

इब्राहिमच्या काळात स्थापत्यकलेची मोठी प्रगती झाली. इब्राहिमने सात मंझिल, दिलखुशा महाल, हैदरी बुरूज आणि मल्लिकाजहान मशीद यासारख्या प्रेक्षणीय वास्तू उभ्या केल्या. त्याने आपली राणी मल्लिकाजहान हिच्यासाठी मल्लिकाजहान मशीद ही सुंदर वास्तू बांधली. दिलखुशा महल ही चारमजली वास्तू होती. सात मंझिल ही इमारत अत्यंत वैशिष्टपूर्ण असून सात मजली होती. तिला सात खणी महाल असेही म्हणत असत. या महालाच्या भिंती विविध चित्रांनी सुशोभित करण्यात आलेल्या होत्या. अंद मशीद व आथर महाल या सुंदर व प्रेक्षणीय वास्तूही त्याच्या काळात उभारल्या गेल्या.

मेहतरमहाल नावाची एक आगळीवेगळी वास्तू त्याने बांधली होती. वास्तविक हा महाल म्हटला जात असला तरी वास्तविक ते एका मशिदीकडे नेणारा महाद्वार आहे. त्याने आपल्या राणीच्या नावाने 'ताजबावडी' नावाचा जलाशय बांधला होता. तथापि वास्तुनिर्मितीच्या क्षेत्रातील इब्राहिमच्या कारकिर्दीतील

सर्वात मोठे काम म्हणजे 'इब्राहिम रोझा' होय. रोझा म्हणजे उद्यान होय. चारी बाजूंनी भक्कम तटबंदी असलेल्या विशाल जागेत हे उद्यान होते. या उद्यानामध्ये दोन इमारती बांधलेल्या आहेत. इमारती भोवतीची उद्याने फळाफुलांनी सदैव बहरलेली असत.

विजापूर शहराखेरीज अन्यत्रही काही बांधकामे आदिलशाहीच्या काळात होत होती. त्याच्या काळातील आणखी एक उल्लेखनिय वास्तू म्हणजे नळदुर्ग किल्ल्यातील पाणी महाल होय. किल्यातून जाणाऱ्या बोरी नदीचे पाणी अडविण्यासाठी एक खूप उंच आणि रुंद बंधारा बांधण्यात आला. या धरणातच इब्राहिमने एक महाल बनविला. यामधील नयनरम्य पाण्याचे कारंजे पाहण्यासारखे आहेत. याकाळात कंधार व पन्हाळा याठिकाणीही इब्राहिमच्या काळात काही बांधकामे झाली. इब्राहिमने आपल्या दरबारामध्ये मलिक संदळ, इतवारखान यासारख्या वास्तूतज्ञांना राजाश्रय दिलेला होता.

**विजापूरला विद्यापूर बनवले :**

इब्राहिम हा विद्याप्रेमी सुलतान होता. आपली राजधानी ही ज्ञानाचे केंद्र व्हावे, येथे विद्येचा विकास व्हावा असे त्याला वाटत होते. तो ज्या भाषेत लिहायचा व बहुधा ती दख्खनी हिंदी म्हणून ओळखली जात होती. इब्राहीमवर संस्कृतचा विलक्षण प्रभाव होता. त्यामुळे ठरवून त्याने इ.स. १६०४ मध्ये विजापूरचे नाव बदलून 'विद्यापूर' केले होते. इब्राहिमच्या सर्व विद्याकलांना उत्तेजन देण्याच्या धोरणामुळे कित्येक ठिकाणचे कित्येक विद्वान व कलाकार या शहरामध्ये येऊन राहिले होते. सर्वत्र शांतता व सुव्यवस्था असल्याने सर्व जातीधर्माचे लोक गुण्यागोविंदाने रहात होते.

**नवरसपूर (नौरसपूर) शहराची स्थापना :** इब्राहिमने नवरसपूर(नौरसपूर) नावाने नवीन शहराची स्थापना केली होती. आपल्या काव्यातून आणि गीतातून नऊ रसांचा अविष्कार व्हावा, अशी त्याची भावना होती. म्हणूनच त्याने या शहराला नवसपूर असे नाव दिले होते. या शहरामध्ये त्याने भव्य असा राजवाडा बांधला होता. तसेच प्रेक्षणीय महाल, संगीत महाल व अनेक लहान मोठ्या वास्तू या शहरामध्ये बांधल्या होत्या. अल्पावधीतच हे शहर प्रसिद्ध झाले होते.

कला ही इब्राहिमची जीवननिष्ठा होती. कला आणि कलाकार यांना राजाश्रय देणे ही त्याच्या कलामनाची भूक होती. कला हे त्याचे स्वप्न होते. राज्यकर्ता असल्याने विद्यापूरजवळ 'नवरसपूर' या कलानगरीची स्थापना करून 'नवरसमहाला'च्या रूपाने त्याने आपले स्वप्न प्रत्यक्षात उतरवले होते. श्रेष्ठ चित्रकारांच्या कुंचल्यांतून साकारलेल्या अप्रतीम चित्रांनी त्या महालाच्या भिंतींना सजवले होते. जलाशयाने आणि त्यातील कारंजांनी वातावरण नेत्रसुखेद बनवले होते. जलाशयासमोर असलेल्या 'नवरसमहाला'तील मंचावर बैठक मांडून आपल्या प्राणप्रिय मोतीखाँ तंबोऱ्यावर बसून गायन करण्यात त्याने स्वतःला झोकून दिले होते. त्या महालात काव्यगायनाचे जलसे भरवून वातावरण काव्यमय बनवले होते. अशा पद्धतीने प्रत्यक्षातील सल्तनतविश्वात कलाविश्व सामावले गेले होते. सल्तनतआश्रय लाभल्याने कलाविश्व विकास पावले होते.

दक्षिण भारताच्या इतिहासामध्ये इब्राहिम आदिलशाहा दुसरा 'जगद्गुरू' या नावाने प्रसिद्ध आहे. तो बुलंद व्यक्तिमत्वाचा सुलतान होता. त्याने आपल्या आचार विचाराने खऱ्या अर्थाने हिंदू-मुसलमानांचे सामाजिक आणि तात्विक ऐक्य घडवून आणले. हा खऱ्या अर्थाने जगद्गुरू होता. तो विलासी असला तरी

सुसंस्कृत, सज्जन आणि सहृदयी असा माणूस होता. तितकाच तो रसिक होता. त्याने सातत्याने प्रजेच्या कल्याणाचा विचार करून राज्यकारभार केला. त्यामुळे तो आपल्या प्रजेमध्ये अत्यंत लोकप्रिय बनलेला होता.

खरे म्हणजे राज्यविस्तार, त्यासाठी करावी लागणारी युध्दे व तहनामे, राज्यरक्षण व त्यासाठी करावे लागणारे सततचे डावपेच, रुक्ष, नीरस, कटकटींची कामे असलेला नित्याचा राज्यकारभार, त्या कामांमध्ये आवश्यक असलेली सततची व्यग्रता, सर्व राजकीय-सामाजिक व्यवधाने आणि हे सर्व करीत असताना संवेदनशीलतेची जपणूक करीत सर्जन करणे या दोन्ही परस्पर विरुध्द टोकाच्या गोष्टी आहेत. असे जरी असले तरी परस्पर विरुध्द टोकांवर असणाऱ्या गोष्टी लीलया साध्य करणारी व्यक्तिमत्त्वे जगाच्या इतिहासात नोंदवली गेली आहेत. अर्थात या दोन्ही गोष्टी लीलया साध्य करण्यासाठी मूळ व्यक्तिमत्त्व अष्टपैलू तर असावे लागतेच पण त्याच बरोबर व्यक्तिमत्त्वाची लहानपणापासूनची जडण घडण होणे गरजेचे आहे.

सुलतान इब्राहिम आदिलशाह दुसरा हा कर्तृववान, श्रेष्ठ राज्यकर्ता म्हणून आणि कुशल प्रशासक म्हणून ओळखला जातो. 'जगद्गुरू' म्हणूनही तो ओळखला जाई. सुफी तत्त्वज्ञानाचा व विचारांचा त्याच्यावर परिणाम झालेला होता. ते तत्त्वज्ञान तो स्वतः जगत होता. गुलबर्गाचे सुफी संत हजरत बंदानवाझ यांचा तो भक्त होता. तो स्वतः सुन्नी मुस्लिम होता. शिया आणि सुन्नी पंथांमध्ये तसेच हिंदू आणि मुस्लिमांमध्ये त्याने समन्वय साधला. सामंजस्य निर्माण केले. संगीताच्या माध्यमातून हिंदू आणि मुसलमानांमध्ये त्याने सांस्कृतिक समभाव निर्माण केला. याप्रकारे सर्वधर्मसमभाव असलेल्या संस्कृतीची परंपरा त्याने निर्माण केली.

त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे याशिवायही काही पैलू आहेत. कवी, गायनप्रेमी, संगीतप्रेमी, तानपुरावादक, विविध वाद्ये सहजतेने हाताळणारा, चित्रकार, रसिक, विविध कलांचा चाहता, कलावंतांचा कदरदान व पोशिंदा असे काही त्याचे लक्षणीय विशेष होते. तो बहुभाषक होता. दखनी, उर्दू, मराठी, कन्नड अशा भाषांवर त्याचे प्रभुत्त्वही होते. फार्सी भाषाही त्याला अवगत होती इतकेच. इब्राहिम आदिलशाह दुसरा ह्याने राजकारणाच्या आणि राज्यकारभाराच्या धकाधकीच्या आयुष्यात नैसर्गिक प्रतिभाशक्तीकडे दुर्लक्ष केलेले नव्हते. कलाप्रेमी आणि कलासक्त असलेला हा राजा स्वतःही उत्तम कलावंत होता. अनेक वाद्ये वाजवण्याची आणि गायनाची कला त्याला अवगत होती. विद्येची आणि कलेची अधिष्ठात्री देवता असलेल्या श्रीसरस्वतीची आणि विघ्नहर्त्या गणपतीची स्तोत्रे आणि स्तुतिकाव्येही त्याने लिहिली होती. गायली होती. तो कवी तर होताच पण सहृदय रसिकही होता. कला आणि कलावंतांचा उदार आश्रयदाता होता. त्याच्या आश्रयाने वास्तुकलाही राजधानी विजापूरच्या परिसरात कशी बहरली होती याची साक्ष उत्तम वास्तुशिल्पकलेचे नमुने आजही देतात.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-२**

अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.

१) .......... या सुलतानाच्या मृत्यूनंतर इब्राहिम हा विजापूरचा सुलतान बनला.

अ) युसूफ आदिलशाहा  ब) अली अदिलशाहा

क) तहमास  ड) हुसेनशहा

२) चाँदबिबीने सुरवातीच्या काळात .......... याला राजप्रतिनिधी म्हणून नेमले होते.

अ) मुस्ताफाखान ब) दिलावर खान क) कामिलखान ड) किश्वरखान

३) इब्राहिम आदिलशाहाची बहिण .......... हिचा विवाह निजामशाहाच्या मुलाशी झाला.

अ) चाँदबिबी ब) नुरजहाँ क) मुमताज ड) खदिजा

४) इब्राहिमशाहाचा भाऊ .......... याने त्याच्याविरुद्ध बंड केले होते.

अ) इस्माईल ब) हुसून क) मुर्तजा ड) मिरान

५) इब्राहिम आदिलशाहाने .......... या नव्या शहराची स्थापना केली.

अ) विजापूर ब) नवरसपूर क) अहमदनगर ड) विद्यापूर

ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) आदिलशाहीची स्थापना कोणी केली

२) इब्राहिमने स्वतःस कोणती पदवी धारण केली होती.

३) इब्राहिमने आदिलशहाने कोणता ग्रंथ लिहिला.

४) 'तजकिरात-उल-मुल्क' या ग्रंथाचा लेखक कोण.

५) इब्राहिम आदिलशाहा दुसरा याचा मृत्यू केव्हा झाला.

## २.३ पारिभाषिक शब्द शब्दार्थ

१) काझी - मुस्लीम धर्मगुरू, न्यायाधीश

२) मिर्झा - जमीनदार किंवा राजपुत्र्

३) बादशहा - राजाधिराज, सार्वभौम राजा

४) मनसबदार - 'मनसब' म्हणजे हुद्दा किंवा दर्जा आणि तो ज्याच्याकडे असतो तो मनसबदार.

५) मुघल - (१५२६ ते १७०७) दिल्लीवर राज्य करणारे महत्त्वाचे राजघराणे, या घराण्यात बाबर, हुमायून, अकबर, जहांगिर, शहाजहान व औरंगजेब व राज्यकर्ते होऊन गेले.

## २.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयं अध्ययन प्रश्न क्र. १

अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.

१) तारीख-इ-शहावी २) मूर्तझा निजामशाह ३) अलि

४) १५५० ५) हुसेन

ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) अरबी, फारसी, तुर्की, मराठी, कन्नड इत्यादी भाषा अवगत केल्या होत्या

२) चाँद सुलताना' असा किताब दिला.

३) सातारा ४) सोनपत ५) १३ जुलै १६६०

स्वयं अध्ययन प्रश्न क्र. २

अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.

१) अली अदिलशाहा २) कामिलखान ३) खदिजा ४) इस्माईल

५) नवरसपूर

ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) युसुफ आदिलशाह २) 'जगद्गुरू'

३) किताब-ए-नवरस (नौरसनामा) ४) रफ़िउद्दिन शिराझी

५) सप्टेंबर १६२७

## २.५ सारांश

मध्ययुगीन भारताच्या इतिहासावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमठविणाऱ्या कर्तबगार स्त्रियांमध्ये चाँदबिबीचे नाव अजरामर आहे. तिने आपल्या कर्तृत्वाने निजामशाही व आदिलशाही कारभारावर आपला प्रभाव पाडलेला आहे. आपले माहेर आणि सासरचे नाव उज्ज्वल करण्याचे काम तिने केले. निजामशाही वाचविण्यासाठी मुघल सत्तेशी दिलेला लढा अभूतपूर्व असा होता. रणभूमीवरील शौर्य, पराक्रम, प्रजेविषयीची कळकळ यामुळे चाँदबिबी आपल्या प्रजेमध्ये अत्यंत लोकप्रिय बनली. शौर्य, धैर्य, उदारता, प्रसंगावधान व कार्यक्षमता या गुणांनी तिने इतिहास घडविला.

दक्षिणेतील बहमनी सत्ता निष्प्रभ झाल्याचा फायदा घेऊन त्याच राज्यातील विजापूरचा सुभेदार युसुफ आदिलखान १४८९ मध्ये स्वतंत्र झाला. तोच आदिलशाही घराण्याचा संस्थापक. युसुफ आदिलखान, इस्माइल आदिलशाह, इब्राहिम आदिलशाह, पहिला अली आदिलशाह यांच्यानंतर दुसरा इब्राहिम आदिलशाह गादीवर आला (१५८०). हा शहाजीराजांना समकालीन होता, तर त्याच्यानंतर जन्मलेले मुहम्मद आदिलशहा आणि दुसरा अली आदिलशहा हे दोघे शिवरायांचे समकालीन होते.

दुसरा इब्राहिम आदिलशाह हा धर्मनिरपेक्ष, हिंदू धर्म प्रेमी होता. त्याच्या कारकिर्दीत हिंदूंच्या कत्तली, हिंदू धर्मस्थळांचा विध्वंस, हिंदू-मुस्लीम भेद अशा नोंदी नाहीत. सर्वधर्मियांना समान वागणूक देणाऱ्या या बादशहाने हिंदू, मुस्लीम प्रार्थनास्थळांना देणग्या दिल्या, शिवाय तळकोकणात आणि गोव्यात काही गिरीजाघरेही (चर्चेस) बांधून दिली होती. त्यांतील काही गिरीजाघरे अद्यापि गोव्याच्या बिशपच्या आधिपत्याखाली आहेत. इस्लामी जगात कुप्रसिद्ध असलेले शिया आणि सुन्नी वादही त्याने आपल्या राज्यात

काही प्रमाणात आटोक्यात आणले होते. हा बादशहा त्याच्या फर्मानांची सुरुवात ‘अज पूजा सिरी सरसती अशी करत असे. याचा अर्थ असा की, ‘हा इब्राहिम आदिलशहा श्री सरस्वतीची पूजा करून हे फर्मान बजावत आहे. तो स्वतःला श्रीसरस्वती आणि श्रीगणपती या बुद्धी देवतांचा पुत्र मानी, तसेच स्वतःला जगद्गुरू समजत असे. याबाबतचा उल्लेख बसातीन उस्स सलातीन मध्ये वारंवार येतो. त्याने विजापूर जवळ ‘नवरसपूर नावाचे शहर वसवून त्यात ‘आसारमहाल नावाचा सुंदर महालही बांधला. त्याने अल्पवयात आपल्यावर पडलेली सुलतानपदाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. अंतर्गत व बाह्य शत्रूंपासुन आपल्या राज्याचे संरक्षण केले.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) टिपा लिहा

१) चाँदबिबीचे निजामशाहीतील कार्य

२) इब्राहिम आदिलशहाचे अंतर्गत धोरण

३) इब्राहिम आदिलशहा कालीन साहित्य

ब) दिर्घोत्तरी प्रश्न

१) चाँदबिबीने निजामशाहीचे कशाप्रकारे संरक्षण केले याची सविस्तर चर्चा करा.

२) इब्राहिम आदिलशाहाच्या काळातील सांस्कृतिक प्रगतीचा आढावा घ्या.

३) इब्राहिम आदिलशाहाच्या काळातील राजकीय परिस्थितीचा आढावा घ्या.

## २.७ संदर्भ ग्रंथ


१) डॉ. धनंजय आचार्य, मध्ययुगीन भारत, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर २००८

२) डॉ. श. गो. कोलारकर, मध्ययुगीन भारत, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९४

३) सदाशिव आठवले, जगद्गुरू इब्राहिम आदिलशाह, श्रीविद्या प्रकाशन, पुणे १९९७

४) अनु. भ. ग. कुंटे, मूळ लेखक फेरिश्ता : गुल्शन इब्राहिम, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मंबई, १९८२

५) संपा. डॉ. अरुण प्रभुणे, सुलतान इब्राहीम आदिलशाह दुसरा कृत किताब-ए-नवरस भाषांतर व आकलन, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, २०१८


❑❑❑

घटक ३

# प्रशासन आणि अर्थव्यवस्था

अनुक्रमणिका

३.१ उद्दिष्टे

३.२ प्रास्ताविक

३.३ विषय विवेचन

३.३.१ प्रशासन : केंद्रीय आणि प्रांतिक

३.३.२ जमीन महसूल: अकबर आणि मलिक अंबर

३.३.३ उद्योग आणि व्यापार

३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ३.१ उद्दिष्टे

- मध्ययुगीन काळातील केंद्रीय प्रशासन व प्रांतिक प्रशासनाचे आकलन होईल.
- मुघल सम्राट अकबरच्या काळातील जमीन महसूल व्यवस्था लक्षात येईल.
- निजामशाहीचा वजीर मलिक अंबरद्वारे विकसित जमीन महसूल व्यवस्था समजून घेता येईल.
- मध्ययुगीन काळातील उद्योग व व्यवसाय स्पष्ट होतील.
- मध्ययुगीन व्यापार, व्यापरी केंद्रे व व्यापारी जिन्नस यांचे आकलन होईल.

## ३.२ प्रास्ताविक

भारतामध्ये मुघल सत्तेची स्थापना जहीरुद्दीन मुहम्मद बाबर याने इ.स. १५२६ मध्ये केली. सन १५३० मध्ये बाबरच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र हुमायून बादशाह बनला. सन १५४० पर्यंत हुमायून सत्तेवर राहिला.

बिहार मधील अफगाण शासक शेरशाह सुरी याने कनौजच्या युद्धात (१५४०) हुमायूनचा पराभव केला. शेरशाह सुरी कडून पराभूत झाल्यानंतर हुमायूनला भारतातून इराणला परागंदा व्हावे लागले. हुमायूनकडून दिल्लीची सत्ता हस्तगत केल्यानंतर शेरशाह सुरी याने १५४० ते १५४५ पर्यंत राज्य केले. शेरशाह सुरी याने प्रशासन व्यवस्थेत महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या. पुढे १५४५ ला शेरशाहच्या मृत्यूनंतर त्याच्या वंशजांनी १५५५ पर्यंत राज्य केले. सन १५५५ मध्ये इराणच्या बादशाहच्या मदतीने हुमायूनने पुन्हा भारताची सत्ता हस्तगत गेली. पुढे हुमायूनचा पुत्र अकबर सत्तेवर आल्यानंतर मुगल सत्तेचा साम्राज्य विस्तार मोठ्याप्रमाणात झाला. अकबरच्या काळात केंद्रीय व प्रांतिक प्रशासन व्यवस्थेचा पाया सुदृढ करण्यात आला. परिणामी, अत्यंत स्थिर व कार्यक्षम केंद्रीय व प्रांतिक प्रशासन व्यवस्था स्थापित होऊन अकबर पासून औरंगजेबच्या काळापर्यंत मुघल साम्राज्य स्थिर राहू शकले.

सम्राट अकबर याने साम्राजाची अर्थव्यवस्था बळकट राहावी या दृष्टीने पारंपारिक जमीन महसूल व्यवस्थेत बदल केले. अकबरच्या काळात झालेल्या जमीन महसूल व्यवस्थेतील बदलांचा दीर्घकालीन सकारात्मक परिणाम मुघल साम्राज्याच्या अर्थव्यवस्थेवर झाला. दख्खन मधील निजामशाहीचा वजीर मलिक अंबर याने आपल्या राज्यातील जमीन महसूल व्यवस्थेत अनेक सुधारणा केल्या त्याचा देखील दीर्घकालीन प्रभाव दख्खन मधील जमीन महसुल व्यवस्थेवर पडला. अकबर आणि मलिक अंबर यांच्या जमीन महसूल व्यवस्थेचा अभ्यास आपण या घटकात करणार आहोत.

मध्ययुगीन राजवटीत उद्योग धंद्यांना प्रोत्साहन देण्यात आले होते. विशेषत: मुघलकाळात भारतातील लहान-मोठ्या उद्योगधंद्यात भरभराट झाली. तसेच भारतातील अंतर्गत व्यापार व परराष्ट्रीय व्यापारातही याकाळात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. मध्ययुगीन भारतातील उद्योगधंदे व व्यापार यांचा अभ्यास आपण प्रस्तुत घटकात करणार आहोत.

## ३.३ विषय विवेचन

### ३.३.१ प्रशासन : केंद्रीय आणि प्रांतिक

मुघल प्रशासकीय व्यवस्थेचे मूळ उद्दिष्ट हे मुघल साम्राज्याच्या विविध भागांवर नियंत्रण ठेवणे व ते सुदृढ करणे असे होते. मुघल साम्राज्याला व मुघल सम्राटांच्या सत्तेला आव्हान देणाऱ्या बंडखोर शक्तींना आळा घालणे हा देखील त्यामागील महत्त्वाचा हेतू होता. मुघल साम्राज्याच्या प्रत्येक प्रांतामध्ये त्या प्रदेशातील संबधित शासक किंवा प्रबळ सरदार यांचा प्रभाव असलेले लोक मोठ्या संख्येने असायचे. त्यामुळे मुघल सम्राटाच्या सत्तेला निर्माण होऊ शकणाऱ्या आव्हानांच्या शक्यतेचे प्रमाण जास्त होते. मुघल सत्तेने आपल्या प्रशासकीय संरचनेद्वारे या अडचणींवर मात तर केलीच सोबतच प्रांतात प्रभाव असलेल्यांना प्रशासकीय सेवेसोबतच लष्करी सेवेत सामावून घेऊन आपल्या प्रशासन बळकट करण्यासोबतच प्रांतावरील आपली पकड देखील मजबूत केली. दिल्ली सल्तनत आणि शेरशाहच्या काळात उभ्या राहिलेल्या प्रशासन

व्यवस्थेचा काही प्रभाव मुघल प्रशासन व्यवस्थेवर होता. मात्र, मुघलांनी विशेषत: अकबर याने प्रशासन व्यवस्थेत मुलभूत सुधारणा करून ती मुघल साम्राज्यात लागू केली.

- **शेरशाहची प्रशासन व्यवस्था :**

मुघल प्रशासकीय यंत्रणेना विकसित होण्याच्या प्रक्रियेत शेरशाह सुरी आणि त्याच्या वंशजांच्या काळातील (१५४०-१५५५) टप्पा महत्त्वाचा आहे. शेरशाह सुरीच्या काळात केंद्रीकृत राज्यव्यवस्थेअंतर्गत प्रशासन व्यवस्थेची रचना करण्याचा प्रयत्न झाला होता. मुघल सम्राट अकबर याने या व्यवस्थेला निश्चित स्वरूप दिले. त्यामुळे, अकबरची प्रशासन व्यवस्था ही शेरशाहने स्थापित केलेल्या प्रशासनव्यवस्थेच्या आधारे निर्माण झाली.

शेरशाहच्या अधिपत्याखालील केंद्रीय प्रशासनाच्या कामकाजाविषयी आपल्याला फारच कमी माहिती मिळते. मात्र, शेरशाहने केंद्रीकृत पद्धतीने शासन केले, सर्व अधिकार स्वत:च्या हाती ठेवून राज्यकारभार केला. त्यामुळे शेरशाह जिवंत असेपर्यंत राज्यकारभार कार्यक्षमपद्धतीने चालवता आला. मात्र, शेरशाहच्या मृत्यूनंतर त्याचे उत्तराधिकारी दुबळे निघाल्याने प्रशासन व्यवस्था तितकीशी कार्यक्षम राहिली नाही.

शेरशाहच्या प्रशासन व्यवस्थेत 'गाव' हा सर्वात लहान प्रशासकीय घटक होता. अनेक गावांच्या समूहाने एक 'परगणा' बनत असे. काही परगणे मिळून 'शिक' बनत असे जे मुघल काळातील 'सरकार' सारखे असे. तथापि, पंजाब, बंगाल, माळवा इत्यादी काही भागात अनेक 'शिक' हे एका अधिकाऱ्याच्या अधिपत्याखाली सोपविण्यात आले होते. या अधिकाऱ्यांची तुलना मुघल काळातील 'सुभेदार' पदाशी करता येते. राज्यव्यवस्था आणि गाव यांच्यातील दुवा म्हणून काम करणारा गावचा प्रमुख 'मुकादम' म्हणून ओळखला जाई. मुकादम हा जरी सरकारी अधिकारी नसला तरी गावातील शांतता व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी मुकादमची असे. गावातील सर्वप्रकारच्या नोंदी ठेवण्याचे काम करणारा अधिकारी 'पटवारी' म्हणून ओळखला जाई. पटवारी हा देखील सरकारी अधिकारी नसला तरी मुकादम प्रमाणेच तो गावाच्या समुदायातील असे.

'शिकदार' हा परगण्याचा प्रभारी होता. परगणा स्तरावर महसूल गोळा करणे हे त्याचे प्रमुख कार्य होते. शेरशाहच्या काळात त्यांची वारंवार बदली होत असे. शिकदार याला त्याच्या कामामध्ये दोन 'कारकून' मदत करत असत. हे कारकून हिंदी आणि फारसी या दोन भाषेत नोंदी ठेवत असत. जमिनीचे मोजमाप वगैरे करण्याची जबाबदारी 'मुन्सीफ' नावाच्या अधिकाऱ्याची होती. शिकदार आणि मुन्सीफ या दोघांची नियुक्ती ही थेट केंद्रीय सत्तेद्वारे केली जात असे. 'कानुंगो' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अधिकाऱ्याकडे परगणा स्तरावर नोंदी ठेवण्याची जबाबदारी असे. 'कानुंगो' हे पद वंशपरंपरागत होते. परगण्यातील खजिन्याची जबाबदारी ही 'पोतदार' या अधिकाऱ्याकडे सोपवण्यात आली होती.

अनेक परगण्यांना एकत्रित करून 'शिक' (सरकार) बनत असे. 'शिकदार-इ-शिकदारान' हा शिक (सरकार) चा प्रमुख अधिकारी असे. शिक अंतर्गत येणाऱ्या सर्व परगण्यातील शिकदारांच्या कामावर देखरेख

व नियंत्रण ठेवणे ही शिकदार-इ शिकदारानची मुख्य कामे होती. 'मुन्सीफ-इ-मुन्सीफान' हा शिक स्तरावर जमीन महसूल संबधी कर्तव्ये पार पाडत असे. शेरशाहच्या साम्राज्यात एकूण ६६ शिक होते.

शेरशहाने न्याय व्यवस्थेला खूप महत्त्व दिले. हिंदू धर्मियांचे दिवाणी खटले हे पारंपारिक संस्था जसे की जातपंचायत यांच्या मार्फत सोडवले जात. मुस्लीम धर्मियांचे दिवाणी खटले हे काझी समोर चालवले जात. फौजदारी खटल्यांचा न्याय निवडा शिकदार करत असत. गुन्ह्यांचा शोध लावण्याची सर्वात मोठी जबाबदारी गावच्या मुकादम वर असे. गुन्हा घडलेल्या गावातील मुकादम जर गुन्हेगाराला पकडण्यात अयशस्वी ठरला तर तो कठोर शिक्षेस पात्र होई.

- **केंद्रीय प्रशासन व्यवस्था**

मुघल साम्राज्य भारताच्या बहुतांश भागात पसरलेले होते. बाबर आणि हुमायून यांना सततच्या युद्धजन्य परीस्थितीमुळे, लष्करी बाबींत व्यस्त असल्याकारणाने प्रशासनाची निश्चित स्वरुपाची घडी बसवण्याकडे लक्ष देता आले नाही.

अकबरच्या कालखंडात प्रशासनाचे विविध विभाग, त्याचे मुख्य अधिकारी व त्यांची कामे यांचे स्वरूप निश्चित झाल्याचे दिसून येते. वैयक्तिक व खाजगी जीवनात या अधिकाऱ्यांनी कशा प्रकारचे वर्तन ठेवावे याचे देखील नियम व सूचना तयार केल्याचे दिसून येते. परिणामी, प्रशासनातील अधिकारी हे साम्राज्याच्या कारभाराचे माध्यम म्हणून विकसित झाले.

**बादशाह (सम्राट):** प्राचीन भारतीय परंपरेत नेहमीच शक्तिशाली सत्ताधीशाची संकल्पना प्रभावी होती. इस्लाम धर्मातील उलेमा, कायदे तज्ज्ञ आणि लेखकांचेही शक्तिशाली शासकाच्या संकल्पनेला समर्थन होते. परिणामी, राजेशाहीच्या दैवी उत्पत्तीच्या संकल्पनेस भारतीय जनमानसात सहजपणे समर्थन मिळण्याची व त्यावर जनतेचा विश्वास बसण्याची शक्यता होती. त्यामुळे 'बादशाह' (पादशाह) अर्थात 'सम्राट' याचे स्थान सर्वोच्च स्थानी मानले गेले. मुघलांनी 'झरोखा दर्शन'ची प्रथा अवलंबली होती. मुघल सम्राटाच्या नुसत्या दर्शनाने आपल्या समस्या व अडचणी सुटतील असे जनतेला वाटत असे. झरोखा दर्शनाच्या माध्यमातून मुघल सम्राट हा परमेश्वरानंतर सर्वोच्च स्थानी असल्याची भावना निर्माण झाली. मुघल साम्राज्याच्या दरबारी रितीरिवाज यांच्यामध्ये देखील अशी भावना निर्माण होईल यावर कटाक्ष ठेवण्यात आला होता. मुघल सम्राट पदाबद्दल अशा स्वरूपाची भावना असल्याने जनतेची व अमीर-उमरावांची सम्राटाबाबतची निष्ठा मोठ्याप्रमाणात वाढली.

सम्राटाच्या हाती सर्वाधिकार एकवटल्याने सरदार, अधिकारी यांच्या नेमणुका, बरखास्ती, बढती इत्यादी सर्व बाबी सम्राटाच्या हाती आल्या. त्यामुळे संपूर्ण साम्राज्यावर सम्राटाचे नियंत्रण प्रस्थापित झाले. सर्वोच्च पदावर असल्याने सम्राटाकडे शिकार करणे, मनोरंजनासाठी प्राण्यांच्या झुंजी लावणे, दर शुक्रवारी पालखीतून जाऊन मशिदीत नमाज पठण करणे, सुवर्णतुला करणे इत्यादी अधिकार सम्राटाला लाभले होते.

**मंत्री व मंत्रालये :** मुघल प्रशासनात राज्यकारभाराच्या सोयीसाठी सम्राट मंत्र्याची नेमणूक करीत असे. मंत्री सम्राटाला कामकाजात मदत करीत असे. वेळप्रसंगी मंत्री सम्राटाला सल्ला देण्याचे काम करत. परंतु मंत्र्यांनी दिलेला सल्ला सम्राटाने मानलाच पाहिजे असे बंधन नव्हते. मंत्री हे आपले प्रशासकीय पद टिकविण्यासाठी सम्राटाची मर्जी सांभाळत असत. मुघल प्रशासनात प्रत्येक सम्राटाच्या काळात मंत्र्यांची संख्या बदललेली दिसून येते. ही संख्या कमीतकमी ४ व जास्तीत जास्त ८ असलेली दिसून येते. उदा. सम्राट अकबराच्या काळात एकूण ८ मंत्री होते. त्याची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे

**(१) वजीर (प्रधानमंत्री):** मुघल सम्राटानंतर 'वजीर' हे अत्यंत महत्त्वाचे पद होते. सर्व मंत्री अथवा अधिकाऱ्यांमध्ये वजीर हा प्रमुख होता. वजीरचे मुख्य काम हे सम्राटाला सल्ला देण्याचे होते. एवढेच नव्हे तर सम्राट व मंत्री यांच्यातील दुवा म्हणून काम पाहत असे. सम्राटाच्या गैरहजेरीत वजीरास राज्याचा कारभार सांभाळावा लागत होता. सम्राट वयाने लहान असेल तर बहुतांश वेळा वजीरच सम्राटाच्या नावे राज्यकारभार करीत असे. वजीराचे मुख्य कार्य लष्करी अधिकाऱ्यांची नियुक्ती व बढती करणे, साम्राज्याच्या जमाखर्चावर नियंत्रण ठेवणे, महसुल वसुलीसंबधी निर्णय घेणे इत्यादी होते.

**(२) दिवाण:** 'दिवाण' हे अर्थखाते सांभाळणारे मंत्रीपद होते. वजीरानंतरचे हे महत्त्वाचे पद होते. अकबराच्या काळात प्रारंभी हे पद स्वतंत्र नव्हते. तेंव्हा वजीर हाच आर्थिक बाबींशी संबधित कामे पार पाडत असे. बैरमखान हा वजीर होता तोपर्यंत वजीर व दिवाण हे पद एकच होते. मात्र, बैरमखानला वजीर पदावरून मुक्त केल्यानंतर सम्राटाचे पद शक्तिशाली करण्याच्या दृष्टीकोनातून सम्राट अकबर याने वजीर पदाकडील आर्थिक जबाबदारी काढून घेतली. आर्थिक जबाबदारी सांभाळण्यासाठी अकबरने 'दिवाण' हे पद निर्माण केले. अकबरने या पदाचा कारभार राजा तोरडमल याच्याकडे सोपविला. तोरडमल याने दिवाण पदाचा कारभार अत्यंत उत्तमपणे सांभाळून साम्राज्याची आर्थिक घडी बसविण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडली.

दिवाणपदी असणाऱ्यास साम्राज्याचा जमाखर्च सांभाळण्याचे काम पहावे लागत असे. साम्राज्याचा महसूल ठरवणे व महसूल व्यवस्था सुव्यवस्थितपणे चालवणे ही कामे देखील दिवाण करत असे. राज्याचा महसुल ठरविण्याचे कामही दिवाण पार पाडत असे. दिवाण याला त्याच्या कामात मदत करण्यासाठी सहाय्यक दिवाण असे. साम्राज्याच्या अर्थखात्यात पुढील विभाग असत. (१) 'दिवाण-ए-खालसा' (सरकारी जमीन व्यवस्थापन विभाग), (२) 'दिवाण-ए-जहागीर' (जहागीर व मनसबदारी जमीन व्यवस्थापन विभाग), (३) 'साहिब-ए-तौजी' (लष्करी हिशेबनीस), (४) 'दिवाण-ए-बयूतत' (कारखाना प्रमुख - उद्योग विभाग), (५) 'मुशरिफ-ए-खजाना' (कोषाध्यक्ष), (६) 'सदर' या विभागात सचिवाची व इतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याचा वजीराला अधिकार होता. मुजफ्फरखान, राजा तोडरमल व नंतर शहा मन्सूर हे अकबराचे नामांकित दिवाण होते. जमाखर्च पाहणे, जमीन महसूलासंबंधीची कामे पार पाडणे, महसुल उत्पन्न वाढावे यासाठी शेतीचा विकास घडवून आणणे. ही सर्व कामे सुरळीतपणे पार पडावीत यासाठी अधिकारी किंवा कर्मचारी यांची निवड करणे ही कामे देखील दिवाण करत असे.

**(३) मीरबक्षी:** 'मीरबक्षी' यास सैन्यमंत्रीही म्हटले जात होते. हा सैन्यासंबंधीचे सर्व कामकाज पाहत असे. सैनिक, मनसबदार व इतर सेनाधिकारी यांची भरती करणे, त्यांचे प्रशिक्षण, नावे, दर्जा, वेतन, बढती, बदली, बडतर्फी इ. माहिती नोंद ठेवण्याचे काम मीरबक्षी करीत असे. सैन्याचा पगार वाटप करणे, युद्ध मोहिमेचे नियोजन करणे, हेर व बातमीदार नेमणे, राजवाड्याभोवती पहारेदारांची व्यवस्था करणे, मनसबदाराच्या घोडदळाची संख्या ठरविणे. तसेच घोड्यांची अदलाबदल करू नये यासाठी घोड्यांना डाग देणे इत्यादी प्रमुख कर्तव्ये मीरबक्षीला पार पाडावी लागत होती.

**(४) खान–ए–सामा:** 'खान-ए-सामा' किंवा 'मीर सामा' म्हणून ओळखला जाणारा मंत्री हा बादशहाचा खाजगीचा कार्यभार व वस्तू उत्पादन करणाऱ्या 'कारखाने' यांची व्यवस्था पाहत असे. तो बादशहा व त्याचे कुटुंब, जनानखाना यांचा दैनंदिन आहार, विहार, रक्षण, त्यांना लागणाऱ्या वस्तूंचा पुरवठा करणे ही कामे करत असे. म्हणजेच राजकुटुंबाच्या गरजांची पूर्तता करण्याचे काम खान-ए-सामा यास करावे लागे. सम्राटाच्या भोजनाची व्यवस्था करणे. मोहिमेच्या वेळी त्यांच्या निवासासाठी तंबू व सर्व सामानाची व्यवस्था खान-ए-सामाकडे असे. खान-ए सामा या मंत्र्याचा संपर्क सतत सम्राटाशी येत असल्याने या पदाचे महत्त्व फार मोठ्या प्रमाणावर वाढले होते. तसेच हा बादशहाचा अत्यंत जवळचा व महत्त्वाचा मंत्री असून त्याची अनेकदा वजीरपदी बढती केलेली दिसून येते.

**(५) सदर–उस–सुदूर (धार्मिक बाबींचा मंत्री):** 'सदर-उस-सुदूर' हा साम्राज्याच्या धार्मिक बाबींचा कारभार पाहत असे. साम्राज्यातील धर्मदाय विभागाचा 'सदर-उस-सुदूर' प्रमुख होता. सम्राटाला धार्मिक बाबतीत सल्ला देणे, सम्राटामार्फत दानधर्म करणे. साम्राज्यातील अधिकारी व प्रजा यांच्याकडून कुराण व शरीयत मध्ये दिलेल्या आज्ञांचे पालन करून घेणे, इस्लाम धर्मास चालना देणे. साम्राज्यातील उलेमा (धर्मगुरू) आणि काझी (न्यायाधीश) यांच्या नियुक्त्या करणे, मशिद व धार्मिक तीर्थक्षेत्रासंबंधी व्यवस्था लावणे, मुस्लिमांच्या धार्मिक संस्थांना ईनाम जमिनी देऊन सहाय्य करणे, कलावंत व विद्वानांना आर्थिक मदत करणे, सम्राटाने दिलेले निर्णय धर्मबाह्य होणार नाहीत यासंबंधी लक्ष देणे. वादग्रस्त प्रश्नांचा निकाल लावणे, दानधर्म, धर्माच्या बाबतीत बादशहाला सल्ला देण्याचे काम करणे. बादशहानंतर सदर-उस-सुदूर हाच साम्राज्याचा सर्वोच्च धर्मप्रमुख समजला जाई. प्रांतिक व स्थानिक सदर नेमण्याचा अधिकार 'सदर-उस-सुदूर' यास होता.

**(६) काजी–उल–कजात:** 'बादशहा' म्हणजेच 'सम्राट' हा राज्याचा प्रमुख न्यायाधीश असे. त्याखालोखाल 'काजी-उल-कजात' हा न्यायमंत्री म्हणून काम पहात असे. काजी-उल-कजात हा आपल्या हाताखालील प्रांतिक व स्थानिक पातळीवर 'काजी' नियुक्त करीत असत. इस्लाम कायद्यानुसार धार्मिक खटल्यांची सुनावणी करणे, दिवाणी व फौजदारी दाव्यांचा निकाल लावणे आणि बादशहाला न्यायदानात मदत करणे ही काजी - उल - कजात याची प्रमुख कार्ये होती. मुघलकाळात सामान्य व्यक्तीस अर्ज करून न्याय मागण्याची तरतूद होती.

**(७) दरोगा–ए–डाकचौकी:** पत्रव्यवहार खाते व गुप्तहेर खात्याचा कारभार पाहणाऱ्या मंत्र्यास 'दरोगा–ए–डाकचौकी' म्हणून ओळखले जात असे. मुघलकाळात पत्रव्यवहार व गुप्तहेर विभागास फार महत्त्वाचे स्थान हाते. दरोगा–ए–डाकचौकी या मंत्र्यास साम्राज्याचा पत्रव्यवहार सांभाळावा लागत होता. याशिवाय शत्रू पक्षाकडील गुप्त माहिती काढून ती सम्राटास सादर करावी लागत होती. शत्रूच्या हालचालीवर लक्ष ठेवण्याचे काम त्यास करावे लागे.

**(८) मीर आतीश:** मुघलकाळात तोफखाना विभागाचा प्रमुख हा 'मीर आतीश' म्हणून ओळखला जात असे. या अधिकाऱ्यास तोफखान्यासंबंधीची सर्व कामे पार पाडावी लागत. तोफा बनविणे, बंदुका व दारूगोळा तयार करणे, त्यांची नीटनेटकी व्यवस्था लावणे. तोफा निर्मितीविषयी महत्त्वाच्या किल्ल्यावर कारखाने तयार करणे. तोफखान्यासंबंधीची माहिती सम्राटास पुरविणे इत्यादी कामे मीर आतीश या अधिकाऱ्यास पार पाडावी लागत होती.

**(९) मुघलांच्या केंद्रीय प्रशासनातील इतर अधिकारी व त्यांचे कार्य:** मुघल केंद्रीय प्रशासनात 'मुहतसिब' हा जनतेचा सदाचार व निरीक्षक म्हणून काम पाहत होता. 'मीर–ए– तोजक' हा अधिकारी सैन्यांच्या खर्चाचा हिशेब ठेवण्याचे काम करीत असे. 'दिवाण–ए–खालसा' हा राखीव जमिनीची महसुल व्यवस्था ठेवण्याचे काम पाहत होता. 'मीर–इ–बर' हा अधिकारी जंगलाची व्यवस्था ठेवत असे. 'मीर–इ–बहर' हा अधिकारी लढाऊ जहाजांच्या व व्यापारी जहाजांच्या निर्मितीचे काम पाहत होता. 'मीर–इ–मुश्रीफ' हा अधिकारी उत्पन्न व खर्च यांच्या नोंदी ठेवणे हे काम करत असे. मुघल साम्राज्याच्या केंद्रीय प्रशासनात अशा स्वरूपाची विविध विभाग निर्माण करण्यात आले होते. अकबराच्या काळात ही विविध खाती दुय्यम स्वरूपात मोडत असली तरी मुख्य खात्यास मदत करीत होती.

उपरोक्त उल्लेख केलेल्या अधिकाऱ्यांशिवाय अकबरने 'नवरत्न दरबार' बनवला होता. अकबराच्या दरबारात जे नऊ प्रतिष्ठित लोक होते ज्यांना नऊ रत्ने (नवरत्न) म्हटले जाते. या नवरत्न दरबाराच्या सदस्यांनी अकबरला अनेक महत्त्वाचे निर्णय घेताना मदत केली. नवरत्न दरबारातील सदस्य हे अत्यंत बुद्धीमान आणि कुशल होते. राज्यकारभार आणि इतर अनेक बाबींमध्ये अकबरला सल्ला देण्याचे काम नवरत्न दरबाराचे सदस्य करत असत. राजा बिरबल, तानसेन, अबुल फजल, फैजी, राजा मानसिंग, राजा तोडरमल, मुल्ला दोप्याजा, फकीर अझीजोद्दिन, अब्दुल रहीम खान–इ–खाना हे लोक अकबरच्या नवरत्नामध्ये समाविष्ट होते.

- **मनसबदारी व्यवस्था:**

मुघल शासकांनी प्रशासकीय व लष्करी सेवा देणाऱ्या प्रमुख अमीर, उमराव सरदार यांना योग्य राजकीय दर्जा व आर्थिक मोबदला निश्चित करण्यासाठी मनसबदारी पद्धतीचा वापर केला. 'मनसब' हा अरबी शब्द असून त्याचा अर्थ 'पद', 'दर्जा' किंवा 'हुद्दा' असा होतो. परिणामी, 'मनसबदार' म्हणजे पद प्राप्त व्यक्ती किंवा दर्जा प्राप्त व्यक्ती होय. 'मनसब' देणे, मनसब निश्चित करणे, मनसबमध्ये बढती देणे अथवा कमी करणे, मनसबदाराची मनसब बरखास्त करणे इत्यादींचे सर्वाधिकार हे मुघल बादशाहकडे होते. मनसबदारी

व्यवस्था स्थापन केल्याने मुघल प्रशासकीय व लष्करी अधिकाऱ्यांची दर्जानुसार क्रमवारी लावणे, त्यांची नागरी आणि लष्करी कर्तव्ये निश्चित करणे, त्यांच्या सेवेचा मोबदला निश्चित करणे ही कामे सुलभ झाली. मनसबदारांची संपूर्ण राजकीय व आर्थिक प्रगती ही बादशाहच्या कृपादृष्टीवर आधारलेली असल्याने मनसबदारांची बादशाहच्या प्रति निष्ठा वाढत असे मनसबदारी ही लष्करी आणि नागरी प्रशासकीय व्यवस्था होती. सन १५७१ मध्ये मुघल सम्राट अकबराने ही व्यवस्था प्रस्थापित केली. एखाद्याला मनसब देताना ती 'जात' आणि 'सवार' या दोन स्वरूपात दिली जात असे. 'जात' म्हणजे मनसबदाराला दिलेला 'हुद्दा' किंवा 'दर्जा' होय. 'सवार' म्हणजे मनसबदाराने बाळगवायची घोडेस्वारांची संख्या होय. मनसबदाराला त्याच्या सेवेच्या मोबदल्यात 'जागीर' दिली जात असे. मनसबदारी व्यवस्था ही मुघल काळातील प्रशासकीय व लष्करी अधिकाऱ्यांच्या नेमणूक व देखरेखीची व्यवस्था होती.

- **सुभा प्रशासन (प्रांतिक प्रशासन):**

मुघलकाळात प्रशासकीय कारभाराच्या सोयीसाठी साम्राज्याचे जे विभाग केले होते त्या विभागास 'सुभा' म्हणजे 'प्रांत' म्हटले जात असे. सम्राट अकबराने आपल्या साम्राज्याचे १५ सुभे बनविले होते. सुभ्यांच्या प्रशासनासाठी केंद्रीय प्रशासनाप्रमाणेच प्रशासकीय व्यवस्था तयार करण्यात आली होती. अकबरच्या काळात पुढील सुभ्यांचा समावेश होता. (१) अलाहाबाद, (२) आग्रा, (३) अयोध्या, (४) अजमेर, (५) अहमदाबाद, (६) बिहार, (७) बंगाल, (८) दिल्ली, (९) काबूल, (१०) लाहोर, (११) मुलतान, (१२) मावळ, (१३) वऱ्हाड, (१४) खानदेश, (१५) अहमदनगर इत्यादी.

औरंगजेबाच्या काळात ही संख्या २१ वर पोहोचली होती. त्यामध्ये (१) दिल्ली, (२) आग्रा, (३) गुजरात, (४) खानदेश, (५) बंगाल, (६) बिहार, (७) अजमेर, (८) मावळ, (९) काबूल, (१०) अवध, (११) अलाहाबाद, (१२) मुलतान, (१३) लाहोर, (१४) वऱ्हाड, (१५) ठठ्ठा, (१६) ओरिसा, (१७) औरंगाबाद, (१८) काश्मीर, (१९) बीदर, (२०) विजापूर, (२१) हैद्राबाद इत्यादी. मुघल काळातील सुभ्यांची प्रशासन व्यवस्था पुढीलप्रमाणे होती.

**(१) सुभेदार किंवा सिपहसालार (सुभेदार):** अकबरच्या काळात सुभ्याच्या प्रमुखास 'सुभेदार' किंवा 'सिपहसालार' असे म्हटले जात होते. पुढे औरंगजेबच्या काळात यास 'सुभेदार' किंवा 'नजीम' असे म्हणत. या प्रांतप्रमुखास प्रांतातील राज्यकारभारात अंतर्गत स्वातंत्र्य होते. संपूर्ण प्रांताचा कारभार सुभेदार सांभाळत असल्याने त्याच्यावर फार मोठी जबाबदारी पडत असे. ही जबाबदारी उत्कृष्टपणे पार पडावी यासाठी बादशहा हा आपल्या विश्वासातील व्यक्तीची नियुक्ती करीत असे. विशेषतः राजपुत्र किंवा सम्राटाच्या कुटुंबातील सदस्याची किंवा योग्य सेनापतीची निवड केली जात असे.

सुभेदार किंवा प्रांत प्रमुखावर संपूर्ण सुभ्यातील अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या होत्या. सुभ्यात किंवा प्रांतात शांतता व सुव्यवस्था राखणे, प्रांतातील महसुल वसूल करणे, प्रांतिक लष्कराची व्यवस्था ठेवणे, प्रजेच्या कल्याणासाठी रस्ते, कालवे, दवाखाने, धर्मशाळा व बागांची निर्मिती करणे. प्रांतातील न्यायदान व्यवस्था सांभाळणे, एखाद्या गुन्हेगाराने गंभीर गुन्हा केला असल्यास त्यास शिक्षेसंबंधी बादशहाची मान्यता

घेणे. प्रांतामधील मांडलिक राजाकडून खंडणी वसूल करणे. बादशहाच्या परवानगीने शत्रूवर हल्ला करणे. प्रांतातील बंडखोर सरंजामदार व जमीनदार यांचा बंदेबस्त करणे, प्रांतातील अधिकारी व निवडीबाबत बादशहाकडे शिफारस करणे, धार्मिक तीर्थक्षेत्रांची जपणूक करणे, जमाखर्चाचा ताळमेळ घालणे, शेतकऱ्यांसाठी अनेक विकासाच्या उपाय योजना करणे, इत्यादी कामे सुभेदार यास करावी लागत असत.

**(२) प्रांतीय दिवाण (प्रांतीय अर्थमंत्री):** सुभेदारानंतरचा प्रांतीय प्रशासनात सर्वात महत्त्वाचा अधिकारी 'प्रांतीय दिवाण' हा होता. प्रांतीय दिवाण याची नियुक्ती केंद्रीय दिवाण करीत असे. त्यामुळे प्रांतीय दिवाण हा केंद्रीय दिवाणास जबाबदार/उत्तरदायी असे. प्रांतीय दिवाण हा प्रांताचा अर्थमंत्री होय. सुभेदार व दिवाण हे दोन अधिकारी एकमेकांवर नियंत्रण ठेवण्याचे काम करत असत. ते परस्परांचा गुप्त अहवाल बादशहाकडे पाठवत असत. प्रांतीय दिवाणास आर्थिक बाबींशी निगडीत अनेक कामे करावी लागत होती. आपल्या खात्याचा अहवाल केंद्राकडे पाठविणे. प्रांतीय खजिन्यावर नियंत्रण ठेवणे. प्रांतातील जमीन महसुल वसूलीसाठी अमीन व आमील या अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे. प्रांतातील दिवाणी खटले चालविणे. शेतकऱ्यांना तगाई देणे. अडी-अडचणीच्यावेळी शेतकऱ्यांना मदत करणे, देवस्थानांना इनाम दिलेल्या जमिनीवर देखरेख करणे इत्यादी.

**(३) प्रांतीय सदर किंवा काजी (न्यायप्रमुख):** प्रांतीय प्रशासन व्यवस्थेत प्रांतीय दिवाणानंतर हा 'प्रांतीय सदर' किंवा 'काजी' हा महत्त्वाचा अधिकारी होता. याची निवड केंद्रीय प्रशासनातील 'सद्र-इ-सुदूर' करीत असे. प्रांतीय सदर यास धार्मिक ज्ञान असणे आवश्यक होते. प्रांतातील धार्मिक खटले चालवून न्यायनिवाडा करणे, शहरे व जिल्ह्याच्या न्यायायातील न्यायाधीशांच्या नेमणूका करण्यासंबंधीच्या शिफारसी करणे, जिल्हा पातळीवरील काझींच्या कामकाजावर लक्ष ठेवणे, केंद्र सरकारकडे जमीन दान देण्याबाबत व आर्थिक मदतीबद्दल शिफारस करणे इत्यादी कामे प्रांतीय सदर किंवा प्रांतीय काजी यास करावी लागत होती.

**(४) प्रांतीय बक्षी (प्रांतीय सैन्यप्रमुख):** प्रांतातील सैन्याची जबादारी ही सुभा स्तरावरील 'बक्षी' याची असे. प्रांतीय बक्षीची नियुक्ती ही क्रेंद्रीय मीरबक्षी करीत असे. प्रांतीय बक्षी हा प्रांताचा अथवा सुभ्याचा सैन्यप्रमुख असून त्यास सैन्यासंबंधीची विविध कामे पार पाडावी लागत होती. सुभ्याच्या लष्करात सैनिकांची भरती करणे, सैन्याचे संघटन करणे, सैनिकांचे वेतन बढती व बडतर्फी करणे, सैन्यात शिस्त व कार्यक्षमता ठेवणे, सुभ्यातील बंडखोरांवर नियंत्रण ठेवणे, सुभ्याच्या लष्करासंबंधीची माहिती केंद्रीय मीरबक्षी याला कळविणे. सुभ्याच्या लष्करी बाबींची सर्वांगीण जबाबदारी सुभ्यातील बक्षी पार पाडत असे.

**(५) कोतवाल (प्रांत पोलीसप्रमुख किंवा नगरप्रमुख):** व्यापारी बंदरे किंवा शहरे येथील राज्यकारभार पाहण्यासाठी प्रशासनाकडून 'कोतवाल' या अधिकाऱ्याची निवड केली जात होती. नगरात अथवा शहरात शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे, शहराच्या संरक्षणासाठी सैन्याची सज्जता ठेवणे, गस्त किंवा पहारा देऊन शहर भितीमुक्त करणे, परकीय लोकांवर लक्ष ठेवणे, शहरातील बाजारपेठा व उद्योगधंदे यांना संरक्षण देणे, बाजारपेठेतील वस्तूंच्या भावावर नियंत्रण ठेवणे, शहरातील अवैध धंद्यावर निर्बंध घालणे, शहरामधील

जनतेला सामाजिक सुविधा पुरविणे, स्मशाने व कत्तलखाने याकडे लक्ष पुरवणे, बेवारस असणारी मालमत्ता सरकारकडे जमा करणे इत्यादी प्रकारची कामे कोतवालास करावी लागत होती.

मुघल काळात दळणवळणाची प्रगत व जलद साधने उपलब्ध नसून देखील मुघल बादशहांनी प्रांतिक सुभेदारांच्या बंड करण्याच्या प्रवृत्तीला आळा घालण्याचे काम सुभ्यातील प्रांतिक सत्ताविभागणीद्वारे केले होते. सुभ्याच्या प्रशासनात भ्रष्टाचार होवू नये व सुभेदारांना स्वत:शी निष्ठावंत गट उभा करता येऊ नये म्हणून सुभेदारांच्या वारंवार बदल्या केल्या जात असत.

- **'सरकार' किंवा जिल्हा प्रशासन**

जिल्हा प्रशासन ही प्रांतिक प्रशासनाची लहान प्रतिकृतीच होती. प्रत्येक प्रांताची विभागणी ही 'सरकार' मध्ये केलेली असे. साधारणपणे जिल्ह्याच्या आकाराच्या या सरकार मध्ये फौजदार, अमलगुजार, बितिकची, पोतदार हे अधिकारी नियुक्त केले होते.

**(१) फौजदार (जिल्हाप्रमुख):** जिल्ह्याचा सर्व कारभार 'फौजदार' हा अधिकारी पाहत असे. फौजदाराकडे लष्करी जबाबदारी असल्याने तो आपल्याकडे आवश्यक तेवढी फौज ठेवत असे. फौजदाराचे प्रमुख काम हे जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था राखणे हे होते. याकरिता लहानसे सैन्य बाळगणे आवश्यक असायचे. इतकेच नव्हे तर सरकार किंवा जिल्ह्यातील स्थानिक बंडखोर, डाकू, चोर व लुटारुंचा बंदोबस्त करण्यासाठी सैन्य बाळगून वचक वाढविणारा फौजदार आवश्यक होता. परगण्यातील अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे, महसुल अधिकाऱ्यांना महसुल वसुलीसंबंधी मदत करणे, सुभेदारांनी केलेल्या आज्ञा पाळणे, जिल्ह्यातील जमीनदारांवर नियंत्रण ठेवणे इत्यादी कामे फौजदारास करावी लागत होती.

**(२) अमलगुजार (जिल्हा दिवाण):** सरकार किंवा जिल्हा स्तरावरील अर्थविभागाची जबाबदारी 'अमलगुजार' या अधिकाऱ्याची असे. सरकारमधील जमीन महसुलाची वसुली करणे, शेतीस उपद्रव करणाऱ्या चोर, लुटारू व बंडखोरांचा बंदोबस्त करणे. शेतीतून उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न करणे. शेतकऱ्यांना नैसर्गिक संकटकाळात सारामाफी करणे. शेतकऱ्यांना कमी काळासाठी बियाणे व पीक लागवडीसाठी 'तकावी' नावाच्या कर्जाचे वाटप करणे. जमिनीचे स्वरूप व घेण्यात येणारी पिके यानुसार महसुल ठरविणे, सरकारातील महसुल वाढीसाठी प्रयत्न करणे, पोतदारांच्या (जिल्हा खजिनदारांच्या) कामकाजावर लक्ष ठेवणे व तालुका स्तरावरील महसुल अधिकाऱ्यांना योग्य मार्गदर्शन करणे इत्यादी कामे अमलगुजार (जिल्हा दिवाण) यास करावी लागत असत.

**(३) बितिकची (जिल्हा हिशेबप्रमुख):** अमलगुजार यास मदत करणारा 'बितिकची' हा महत्त्वाचा महसुल अधिकारी होती. जमिनीची प्रत व पीक यांच्या आधारे शेतसारा निश्चिती करण्यासाठी अमलगुजारास माहिती पुरविणे, जिल्ह्यातील कानूनगो, पटवारी, मुकादम वगैरेंवर देखरेख ठेवणे, जिल्ह्यात समावेश असणाऱ्या परगण्यांतील महसुल वसूलीबाबतची हिशोबपत्रके तयार करणे, जिल्ह्यातून जमा झालेल्या महसुलाचा हिशेब ठेवणे इत्यादी कामे बितिकची यास करावी लागत होती.

**(४) पोतदार (जिल्हा खजिनदार):** जिल्हा प्रशासनातील शेवटचा अधिकारी 'पोतदार' होय. पोतदार याचे महत्त्वाचे काम शेतकऱ्याकडून शेतसाऱ्याची रक्कम स्वीकारणे हे होते. स्वीकारलेल्या शेतसाऱ्याची पावती देणे, जमा झालेल्या शेतसाऱ्याची रक्कम ही खजिन्यात सुरक्षित ठेवून ती केंद्रीय खजिन्यात पाठवायची व्यवस्था करणे, सरकारातील किंवा जिल्ह्यातील शेतसारा व इतर करांबाबतची कागदपत्रे एकत्र करणे व याबाबतचा संपूर्ण तपशील फौजदारास (जिल्हाप्रमुखास) देणे अशी महत्त्वाची कामे पोतदार करत असे.

- **परगणा किंवा तालुका प्रशासन**

मुघल प्रशासनात सरकारचे (जिल्ह्याचे) विभाजन हे 'परगणा' किंवा तालुका' मध्ये केले जात असे. परगण्याच्या प्रशासनात 'शिकदार' (तहसीलदार), 'अमीन' (मुन्सीफ), 'खजिनदार' (पोतदार) इत्यादि प्रमुख अधिकारी होते. 'बितिकची', 'कानूनगो', 'चौधरी' हे ही तालुका प्रशसानात काम करणारे इतर अधिकारी होते.

**(१) शिकदार (तहसीलदार):** परगण्याचा प्रमुख हा 'शिकदार' म्हणून ओळखला जाई. परगणा पातळीवरील अनेक महत्त्वाची कामे ही 'शिकदार' यास पार पाडावी लागत होती. परगण्यात शांतता व सुव्यवस्था ठेवणे. परगण्याची सुरक्षितता राखणे, त्यासाठी सैन्य बाळगणे. न्यायव्यवस्था सुरळीतपणे चालविणे. दिवाणी व धार्मिक खटले चालवून गुन्हेगारांना शिक्षा करणे इत्यादी कामे शिकदारास करावी लागत होती.

**(२) अमीन (मुन्सीफ):** परगण्यातील शेतीच्या महसूलासंबंधीची कामे पाहणारा अधिकारी हा 'अमीन' किंवा 'मुन्सीफ' म्हणून ओळखला जात असे. परगण्यातील शेतसारा निश्चित करून सारा वसूल करणे. शेतकऱ्यांकडून शेतसारा गोळा करणे, जिल्हा महसुल अधिकाऱ्यांच्या कामकाजात मदतनीस म्हणून काम पाहणे अशी परगणा पातळीवरील महसुलाशी निगडीत कामे अमीन करत असे.

**(३) पोतदार (खजिनदार):** परगण्यातील आर्थिक कारभार हा परगणापातळीवरील पोतदार पहात असे. परगण्याचा जमाखर्च पाहणे, खजिना सांभाळणे इत्यादी कामे पोतदाराकडे असत.

**(४) बितिकची (हिशोबनीस):** परगण्यातील हिशेब लिहून ठेवणारा व लेखन कार्य करण्याचे काम हे परगणा पातळीवरील बितिकची या अधिकारी करत असे.

परगण्यात वरउल्लेख केलेल्या अधिकाऱ्यांशिवाय 'कानूनगो' व 'चौधरी' हे अधिकारी देखील कामकाज पाहत असत. त्यामुळे परगण्यातील कामकाज सुरळीत चालण्यास मदत होत असे.

- **ग्रामीण प्रशासन**

'ग्राम', 'गाव' किंवा 'खेडे' हा मुघल प्रशासनातील सर्वात छोटा घटक होता. प्राचीनकाळापासून गाव हे स्वयंपूर्ण होते. त्यामुळे प्रत्येक गावातील कारभार हा स्वतंत्रपणे पाहिला जात होता. हीच पद्धत मुघलकाळातही टिकून होती. खेड्यातील कारभार पाहण्यासाठी पुढील अधिकारी नियुक्त केले जात होते.

**(१) मुकादम (पाटील):** गावचा प्रमुख अधिकारी हा 'मुकादम' म्हणून ओळखला जात होता. मुकादमकडे गावचे संरक्षण करणे, गावातील तंटे मिटविणे, लोकांना सोयीसुविधा उपलब्ध करून देणे इत्यादी कामांची जबाबदारी असे.

**(२) पटवारी:** 'पटवारी' हा अधिकारी मुकादम याचा मदतनीस म्हणून काम पाहत असे. त्याचे मुख्य काम हे शेतसारा वसूल करणे होते.

**(३) चौकीदार:** 'चौकीदार' हा अधिकरी पाटलाचा मदतनीस म्हणून खेड्यात काम पाहत असे. याचे प्रमुख काम जमिनीबाबतची माहिती ठेवणे हे होते.

अशाप्रकारे ग्रामीण प्रशासनात वरील अधिकारी कार्यरत होते. त्यांना 'जातपंचायत' कामात मदत करत असे. जातपंचायत ही जातीबाबतचे वाद किंवा तंटे मिटविण्याचे काम करत असे. तसेच गावातील धार्मिक सण व उत्सव साजरे करण्यास मदत करत असे.

- **स्वयं अध्ययन प्रश्न १**

अ) रिकाम्या जागा भरण्यासाठी योग्य पर्याय निवडा.

(१) मुघल सत्तेची स्थापना .............. याने केली.

(अ) बाबर (ब) हुमायून (क) अकबर (ड) औरंगजेब

(२) .............. हे पद मुघल प्रशासनातील सर्वोच्च पद मानले जात होते.

(अ) सम्राट (ब) वजीर (क) दिवाण (ड) मीरबक्षी

(३) बादशहा व मंत्री यांच्यामधील दुवा म्हणून .............. हा काम पाहत होता.

(अ) खान-ए-सामा (ब) दिवाण (क) मीरबक्षी (ड) वजीर

(४) मुघल कालीन केंद्रीय प्रशासनात .............. हा जनतेचा सदाचार व निरीक्षक म्हणून काम पाहत होता.

(अ) मुहतसिब (ब) मीर-ए-तोजक (क) मीर-ए-बहर (ड) मीर-ए-मुश्रीफ

(५) अकबर काळात प्रांतप्रमुख हा .............. असे.

(अ) सुभेदार (ब) फौजदार (क) मीरबक्षी (ड) कोतवाल

(६) अकबरने प्रशासनाच्या सोईसाठी आपल्या साम्राज्याचे .............. मध्ये विभाजन केले होते.

(अ) परगणा (ब) इक्ता (क) सुभा (ड) महाल

(७) मुघल प्रशासनात अर्थखात्याची जबाबदारी सांभाळणारा .............. हा मंत्री असे.

(अ) खान-ए-सामा (ब) दिवाण (क) मीरबक्षी (ड) सदर-उस-सुदूर

(८) अकबराच्या प्रशासनात सैन्यमंत्र्यास ............. म्हणत असत.

(अ) खान-ए-सामा (ब) मीर आतीश (क) मीरबक्षी (ड) दिवाण

(९) अकबरकाळात जिल्ह्यातील अर्थविभागाचा प्रमुख ............. हा असे.

(अ) अमलगुजार किंवा दिवाण (ब) बितिकची किंवा जिल्हा हिशेबप्रमुख

(क) पोतदार किंवा जिल्हा खजिनदार (ड) फौजदार

(१०)अकबराच्या ग्रामीण प्रशासनात गावचा प्रमुख अधिकारी ............. हा होता.

(अ) पटवारी (ब) मुकादम (क) चौकीदार (ड) कोतवाल

### ३.३.२ जमीन महसूल: अकबर आणि मलिक अंबर

जमीन महसूल हा कोणत्याही राज्यास अथवा साम्राज्याला कार्यान्वित राहण्यासाठी अत्यावश्यक घटक असतो. राज्याचा प्रशासकीय व लष्करी खर्च हा राज्याला मिळणाऱ्या महसुलाच्या माध्यमातूनच चालत असतो. राज्याचे महसुली उत्पन्न जितके जास्त तितके ते राज्य स्थिर आणि शक्तिशाली राहते. त्यामुळे राज्यच्या महसुली उत्पन्नाच्या वाढीकरिता सत्ताधीश हे सातत्याने प्रयत्न करतात. मध्ययुगीन काळात जमीन महसूल किंवा शेतसारा हा राज्याच्या उत्पन्नातील सर्वात मोठा घटक होता. भारत हा एक मोठा खंडप्राय भूभाग असल्याने येथे विविध राज्ये होती. जमिनीचे आणि पिकांचे प्रकार आणि उत्पादकता देखील भिन्न भिन्न होती. त्यामुळे अनेक प्रकारचे जमीन महसूलाच्या स्थानिक व प्रादेशिक पद्धती अस्तित्वात होत्या. परिणामी, मोठ्या राज्यांना जमीन महसूल उत्पन्नामध्ये सातत्य ठेवण्यात व उत्पन्न वाढविण्यास अडचणी येत. जमीन महसूल व्यवस्थेत सुधारणा करणे हाच जमीन महसूल उत्पन्नात वाढ करण्याचा मार्ग होता. मध्ययुगीन काळात मुघल सम्राट अकबर आणि अहमदनगरच्या निजामशाहीतील वजीर मलिक अंबर यांनी आपल्या राज्यात जमीन महसूल व्यवस्था उभ्या केल्या ज्या अत्यंत दीर्घकाळ परिणामकारक ठरल्या. त्यामुळे मध्ययुगीन भारताचा अभ्यास करताना अकबर आणि मलिक अंबर यांच्या जमीन महसूल व्यवस्थांची माहिती घेणे आवश्यक आहे.

#### (अ) अकबरची जमीन महसूल व्यवस्था:

अफगाण शासक शेरशहा सुरी याने मुघल सम्राट अकबर हा सत्तेवर येण्यापूर्वी प्रजेच्या व राज्याच्या हिताच्या दृष्टीने उत्तम जमीन महसुल व्यवस्था प्रस्थापित केली होती. शेरशहाचे जमीन महसुल प्रणालीतील अपूर्ण राहिलेले कार्य अकबराने आपल्या काळात पूर्ण केले. साम्राज्यातील जमीनीचे 'खालसा' व 'जागीर' हे दोन प्रकार होते. 'खालसा' म्हणजे बादशहाच्या प्रत्यक्ष मालकीची जमीन, 'जागीर' म्हणजे जहागीरदार, जमीनदार, सरदार व कुलीनवर्ग यांच्या मालकीची जमीन होय. जहागिरदार या जमिनीतील काही ठराविक हिस्सा सम्राटास देत असत.

- **सम्राट अकबराचे पाच महसुल प्रयोग (१५६३–८२)**

**(१) पहिला प्रयोग (१५६३):** अकबराने इतमादखानास महसुलाचा पहिला प्रयोग करण्यास नियुक्त केले होते.

**(२) दुसरा प्रयोग (१५६४):** दिवाण मुजफ्फरखान तुर्बती व त्याच्या सहाय्यास तोडरमल यांची अकबराने नियुक्ती केली होती.

**(३) तिसरा प्रयोग (१५६९):** नवीन दिवाण शियाबुद्दीन अहमद याची या प्रयोगासाठी नियुक्ती केली.

**(४) चौथा प्रयोग (१५७०–७१):** प्रत्यक्ष पीक व स्थानिक परिस्थिती यांच्या आधारे सारा आकारणीचा अवलंब राजा तोडरमल याने केला. इ.स. १५७५ मध्ये जहागीरीचे रुपांतर सरकारी जमिनीत करण्यात आले.

**(५) पाचवा प्रयोग (१५८२):** राजा तोडरमल याची अकबराने साम्राज्याच्या दिवाणपदावर नियुक्ती केली. त्याने इ. स. १५७० पासून जमीन महसूलाबाबत ज्या सुधारणा सुचविल्या होत्या त्याची संपूर्ण साम्राज्यात अंलबजावणी करण्यात आली.

- **राजा तोडरमलची 'दहशाला' (दशवार्षिक) जमीन महसुल पद्धती:**

राजा तोडरमल याने गुजरातमध्ये इ.स.१५७३ सुरू केलेली 'दहशाला' म्हणजेच 'दशवार्षिक' अर्थात एकूण दहा वर्षाच्या उत्पादनाच्या आधारे महसूल निश्चित करण्याची जमीन महसुल पद्धती लागू केली. कालांतराने दहशाला महसूल पद्धतीच्या कार्यक्षमतेमुळे अकबरने संपूर्ण राज्यात टप्प्याटप्प्याने ही महसूल पद्धती लागू केली. राजा तोडरमलने केलेल्या कामगिरीमुळे अकबरने इ.स. १५८२ मध्ये 'दिवाण–ए–अशरफ' या पदावर त्याची बढती केली.

जमीन मोजणीसाठी राजा तोडरमल याने विशिष्ट लांबीच्या बांबूच्या काठीचा वापर मोजणी करण्याचे निर्देश दिले. साम्राज्यातील जमीनींची उत्पादका ही वेगवेगळी होतील. त्यामुळे जमिनीच्या उत्पादनाच्या क्षमतेनुसार जमिनीचे चार प्रकारात वर्गीकरण करण्यात आले.

- **मुघल काळातील जमिनीचे वर्गीकरण:**

**(१) पोलाज:** ज्या जमिनीवर प्रत्येक वर्षी लागवड केली जाते अशा उत्तम जमिनीस 'पोलाज' असे म्हणतात.

**(२) परौती:** थोड्या कालावधीसाठी पडून राहिलेल्या जमिनीस ज्या जमिनीतून कमी प्रमाणात उत्पादन निघते त्यास 'परौती' असे म्हणतात.

**(३) चाचर:** पहिल्या वर्षी उत्पन्न घेतल्यानंतर तीन ते चार वर्षे जमिनीवर कोणतेही उत्पन्न घेतले जात नाही. अशा जमिनीस 'चाचर' जमीन म्हणतात.

**(४) बंजर:** या जमिनीमध्ये पाच वर्षे किंवा पाच वर्षापेक्षा जास्त काळ पडीक असणाऱ्या जमिनीस 'बंजर' जमीन असे म्हणतात.

वरील पोलाज, परौती, चाचर व बंजर या जमिनीचे उत्तम, मध्यम, कनिष्ठ असे वर्गीकरण केले जाते. जमिनीची मोजणी करून मागील दहा वर्षाच्या कालखंडातील उत्पन्नाची सरासरी काढली जात असे. दहा वर्षाच्या उत्पन्नाच्या सरासरी नुसार १/३ जमीन महसुल आकारण्यात येत असे. दहा वर्षातील सरासरी धान्याच्या प्रमाणाला पीकदर व सरासरी किंमतीच्या दराला रोख दर असे मानण्यात आले. पीक दरावरून महसुल किंवा सरकारी हिस्सा ठरवून त्याला रोख दराने गुणून महसूलाची रक्कम ठरविण्यात आली. या पद्धतीमुळे महसुल आकारणी सुलभ झाली. एखाद्या जमिनीचा महसुल ठरवायचा असल्यास त्या जमिनीचे क्षेत्र पाहून सरासरी पीक दराने त्याचे उत्पन्न निश्चित करण्यात येत असे. या उत्पन्नाचे सरासरी रोख दराने रकमेत रुपांतर केल्यानंतर सरकारी हिस्सा किंवा महसुल निश्चित केला जात असे.

अकबराच्या काळात सर्व खालसा जमिनीचे चार महसुल मंडळात विभाजन करण्यात येऊन त्यावर एक स्वतंत्र अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जात असे. जमिनीचा महसुल धान्याच्या स्वरूपात व रोखीने भरण्याची सोय होती. त्यामुळे राज्याचे उत्पन्नही वाढले. शेतकरीही समाधानी झाला. या पद्धतीस 'रयतवारी पद्धत' किंवा 'राजा तोडरमलचा बंदोबस्त' असे ही म्हटले जाते.

शेतजमिनीचे उत्पादन वाढावे यासाठी शासनाकडून शेतकऱ्यांना कर्जपुरवठा केला जात होता. काही नैसर्गिक संकट उद्भवल्यास काही प्रमाणात शेतसाऱ्यात सूट दिली जात होती. शेतसारा वसुल करणाऱ्या अधिकाऱ्यांना सर्व वसुलीची दस्ताऐवजात नोंद करावी लागत असे. अकबराच्या काळात खालसा जमिनीतील महसूलातील वसुलीचे काम सरकारी महसुल अधिकारी करत असत. तर जहागिर जमिनीच्या बाबतीत महसुल वसुलीचे काम जहागीरदारांचे अधिकारी पाहत असत.

पोलाज व परौती जमिनीसाठी १/३ सारा निश्चित करण्यात आला होता. चाचर जमीन जास्तीत जास्त लागवडी आणण्यास प्रोत्साहन देण्यासाठी पहिल्या वेळी १/५ सारा व पुढे पुढे त्यात वाढ केली जात असे. त्याचप्रमाणे बंजर जमिनीसाठी पहिल्यावर्षी १/२६ सारा घेतला जात असे. नंतर त्यात वाढ केली जात होती.

- **मुघल साम्राज्यातील इतर जमीन महसुल पद्धती :**

राजा तोरडमल यांची दहशाला पद्धती अकबरने आपल्या साम्राज्यात बहुतांश क्षेत्रात लागू केली असली तरी पुढीलप्रमाणे इतर ही काही जमीन महसूल पद्धती या मुघल साम्राज्यात अस्तित्वात होत्या.

**(१) घल्ला (गल्ला) बक्षी पद्धती:** या पद्धतीत शेतकरी व सरकार यांच्या उत्पादनाची विभागणी केली जात असे. सिंध, काबूल व काश्मरीच्या काही प्रदेशात ही पद्धत चालू होती.

**(२) नास्क पद्धती:** या पद्धतीत शेत जमिनीतून किती प्रमाणात उत्पन्न होईल याचा अंदाज घेऊन सारा घेतला जात. ही पद्धत विदर्भ, ओरिसा, बंगाल व काश्मीरच्या काही भागात सुरू होती.

**(३) कानकुट पद्धती:** या पद्धतीत जमिनीची मोजणी करून जमिनीतील उत्पन्नाचा अंदाज घेवून शेतकऱ्यांचा हिस्सा बाजूला काढून उरलेला हिस्सा महसुल म्हणून घेतला जात असे. अकबराने शेतकऱ्यांवरील अनेक कर रद्द केले. शेतकऱ्यांना अनेक प्रकारच्या सवलती सम्राटाने दिल्या.

- **अकबराच्या महसुल प्रणालीचे मूल्यमापन :**

मुघल साम्राज्यात लागू करण्यात आलेल्या अकबरच्या जमीन महसूल पद्धतीचा प्रभाव मुघल साम्राज्यात व त्याच्या नंतर स्थापित झालेल्या प्रादेशिक राज्यात दीर्घकाळ टिकला. अकबरच्या जमीन महसूल पद्धतीने मुघल साम्राज्यासाठी सातत्यपूर्ण व प्रचंड उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण केला. मुघल साम्राज्याच्या स्थिरतेसाठी अकबरची जमीन महसूल पद्धत अत्यंत उपयुक्त ठरली. अकबरच्या जमीन महसूल व्यवस्थेतील गुण-दोष पुढील प्रमाणे:

**(अ) अकबरच्या जमीन महसूल पद्धतीतील गुण:**

**(१) जमिनीची अचूक मोजणी:** शेरशहाच्या काळात दोर वापरून मोजणी केली जात होती. त्याऐवजी अकबराने बांबूच्या सहाय्याने जमिनीची माजेणी केली. याचे कारण दोर हा कालांतराने कमी जास्त होण्याची शक्यता असते.

**(२) शेत जमिनीची वर्गवारी:** शेतीची वर्गवारी पोलाज, परौती, चाचर व बंजर अशी केल्यामुळे साऱ्याचे प्रमाण निश्चित झाले. उत्पन्नावर शेतसारा आकारला गेला. त्यामुळे शेतकऱ्यांवर बसणारा अतिरिक्त कर कमी झाला.

**(३) शेतसारा आकारणी व तिचे दीर्घकालीन स्वरूप:** अकबराने एकूण उत्पन्नाच्या १/३ टक्के सारा आकारला होता. अबूल फजलच्या मते, दरवर्षी सारा निश्चित करण्याची शेरशहाची पद्धती बंद करून ठरावीक काळानंतर उत्पन्नाच्या कमी अधिक प्रमाणावरून महसुल निश्चित केला जात होता.

**(४) रयतवारी पद्धती:** इतिहासकार विन्सेंट स्मिथ यांच्या मते, अकबरची महसुल पद्धती ही रयतवारी असून शेतसारा देण्याची जबाबदारी प्रत्यक्ष शेतकऱ्यांवर होती. ब्रिटीशांनी केलेल्या व्यवस्थेप्रमाणे ग्रामप्रमुखास महसुलास जबाबदार धरण्यात येत नव्हते.

**(५) लागवडीला उत्तेजन:** साम्राज्यातील जास्तीजास्त शेत जमीन लागवडी खाली यावी यासाठी शेतकऱ्यांना जमिनीच्या बी-बियाणे, अवजारे इत्यादीसाठी तकावी नावाचे अल्पकालीन कर्ज दिले जात असे.

**(ब) अकबरच्या जमीन महसूल पद्धतीतील दोष:**

**(१) भ्रष्टाचारी व अकार्यक्षम अधिकारी:** कोणतीही योजना सुरू केल्यानंतर त्यासाठी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांनी ती पूर्णत्वास आणणे आवश्यक आहे. इतिहासकार विन्सेंट स्मिथ यांच्या मते, 'महसुल खात्याची माहिती असलेली माझ्यासारखी कोणतीही व्यक्ती याबाबतीत अकबराचे आदेश अगदी जसेच्या तसे

पाळल्या जात असतील याबद्दल संशय व्यक्त करील. याबाबतीत भारतात सर्व सोयी उपलब्ध असून सुद्धा ब्रिटीशांनी हात टेकले तेथे अकबरासारख्या शिथिल प्रशासनाची काय चालणार?' जेथे जेथे प्रशासनात अधिकारी भ्रष्ट आणि अकार्यक्षम असतील तेथे जमीन महसूल पद्धतीचे योग्य पद्धतीने अंमलबजावणीस अडथळा निर्माण होत असे.

**(२) शेतकऱ्यांचे शोषण:** प्राचीन काळापासून भारतीय शेतकऱ्यांचे येथील शासकांनी मोठ्याप्रमाणात शोषण करून घेतले. जास्तप्रमाणात शेतसारा वसूल केला जात होता. शेतकरी अफाट कष्ट करत होता. पण त्यांच्या प्रगतीसाठी कोणत्याही शासकाने पुढाकार घेतलेला नाही. याचे कारण राज्यव्यवस्था ही शेतकऱ्यांकडून वसूल केल्या जाणाऱ्या शेतसाऱ्यावर अवलंबून होती.

- **अकबराच्या महसुल प्रणालीचे परिणाम:**

**(१) शेतकऱ्यांचा फायदा:** रयतवारी पद्धतीमुळे म्हणजेच शेतकऱ्यांनी थेट शेतसारा भरण्याच्या पद्धतीमुळे शेतकऱ्यांवर मुकादम, जहागीरदार यांच्याकडून होणारा जाच कमी झाला. विशिष्ट कालावधीसाठी जमीन आपल्याकडे राहिल्यामुळे कुळांकडून जमिनीचे उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीकोनातून सुधारणा झाल्या. परिणामी, शेतकऱ्यांच्या एकूण उत्पन्नात वाढ झाली.

**(२) राज्याचा फायदा:** शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाल्याने सरकारी खजिन्यातही वाढ झाली. राज्याचे उत्पन्न वाढल्याने सैनिकांची संख्याही वाढवता आली. परिणामी साम्राज्य विस्तारास बळ मिळाले. मुबलक प्रमाणात धनसंपत्ती उपलब्ध झाल्याने मुघल सम्राटांना साम्राज्य विस्तारासाठी सातत्याने मोहिमा काढता आल्या. मुघल साम्राज्य हे खूपच विस्तृत प्रदेशावर फैलावले. जमीन महसुल व्यवस्थेत भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या द्वारे अन्याय आणि अकार्यक्षमता वाढताच अनेक ठिकाणी शेतकऱ्यांची बंडे उद्भवली. परिणामी, मुघल साम्राज्य हे खिळखिळे होऊन त्याचे पतन झाले.

**(ब) मलिक अंबरची जमीन महसुल व्यवस्था**

मलिक अंबर हा मूळचा 'हबसाणा' म्हणजेच पूर्वीचा 'ॲबेसिनिया' व सध्या 'इथोपिया' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देशातील होता. भारतात गुलाम म्हणून आलेला मलिक अंबर हा आपल्या कर्तुत्वाच्या व कौशल्याच्या जोरावर विविध महत्त्वाच्या राजकीय व लष्करी पदांवर नियुक्त झाला. मलिक अंबर याने अहमदनगरच्या निजामशाहीमध्ये राजकीय, लष्करी आणि प्रशासकीयदृष्ट्या मोठे योगदान दिले. मलिक अंबर हा अहमदनगरच्या निजामशाहीमध्ये वजीर होता. वजीर म्हणून निजामशाहीमध्ये काम करत असताना मलिक अंबर याने निजामशाही राज्यात जमीन महसूल पद्धत स्थापित केली. मुघल साम्राज्यात तोरडमल याने स्थापित केलेल्या जमीन महसूल पद्धतीत निजामशाही राज्याच्या स्थानिक परिस्थिती व गरजा यांचा विचार करून मलिक अंबरने सुधारित स्वरुपात जमीन महसूल पद्धती विकसित केली. मलिक अंबरने सुधारित करून लागू केलेल्या जमीन महसूल पद्धतीमुळे निजामशाही राज्याच्या महसुली उत्पन्नात प्रचंड वाढ झाली.

दख्खनमधील जमीन महसूल व्यवस्था ही बहुतांशपणे मलिक अंबर यांनी स्थापित केलेल्या जमीन महसूल व्यवस्थेवर बेतलेली आहे. जमीन महसुलाची निश्चिती आणि वसुलीसाठी शास्त्रशुद्ध पद्धत वापरणारा मलिक अंबर हा दख्खन मधील पहिला प्रशासक होता. मलिक अंबरची जमीन महसूल व्यवस्था ही राजा तोरडमल याच्या व्यवस्थेचा प्रभाव असणारी होती. मलिक अंबरच्या महसूल व्यवस्थेचा प्रभाव हा दख्खन मधील विजापूरची आदिलशाही, गोवळकोंडाची कुतुबशाही या राज्यांवर देखील पडलेला होता. याशिवाय मराठा सत्तेच्या जमीन महसूल व्यवस्थेवर देखील मलिक अंबरच्या जमीन महसूल पद्धतीचा प्रभाव असल्याचे दिसून येते.

- **मलिक अंबरची जमीन मोजणीची पद्धत:**

मलिक अंबरच्या जमीन महसूल व्यवस्थेमध्ये जमीन महसुलाची निश्चिती ही लागवडीखालील जमीन आणि त्यातून उत्पन्न होणाऱ्या पिकांच्या रोख किमतीवर आधारित होती. मात्र, मलिक अंबर याने प्रत्यक्षात जमिनीची मोजणी आणि महसूल निश्चिती करण्याचे आदेश दिले नाहीत. प्रत्यक्षात जमिनीची पाहणी करून वंशपरंपरागत अधिकाऱ्यांच्या किंवा वतनदारांच्या म्हणजेच 'देशमुख' आणि 'पाटील' यांच्या मदतीने महसूल निश्चिती केली जात होती. विशिष्ट लांबीची जाड दोरी ही मोजणी करण्यासाठी वापरली जात असे. 'बिघा' मध्ये जमीन मोजली जात असे. एका बिघामध्ये जी साधारणपणे २० गुंठे इतकी जमीन असायची. मात्र, वेगवेगळ्या भागात बिघाचा आकार वेगवेगळा असायचा.

मलिक अंबरने जमिनीचे ढोबळ मानाने दोन प्रकार केले होते एक 'बागायत' आणि दुसरा 'जिरायत' होय. 'बागायत' म्हणजे सातत्याने पाणीपुरवठा उपलब्ध असलेली शेत जमीन होय. 'जिरायत' म्हणजे पावसाच्या पाण्यावर आधारित शेती करण्यात येणारी जमीन होती. जिरायत जमिनीचे आणखी चार उपप्रकार करण्यात आले होते. 'पडीक जमीन' म्हणजे 'लागवडीखाली नसलेली जमीन' ही मोजणीतून वगळलेली असे. जास्तीजास्त पडीक जमीन ही लागवडीखाली यावी यादृष्टीने राज्याद्वारे प्रयत्न केले जात असत. मलिक अंबर याने जमीन महसूलाची आकारणी करताना पडीक जमिनीवर नव्याने लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांस शेतसाऱ्यातून सूट दिलेली होती. नव्याने लागवडीखाली आलेल्या जमिनीसाठी मलिक अंबर याने हळूहळू वाढत जाणाऱ्या (विकसित होणाऱ्या) जमीन महसुलाची पद्धत लागू केली. मलिक अंबर याच्या व्यवस्थेप्रमाणे निजामशाही राज्यात नव्याने लागवडीखाली आलेल्या जमिनीवर पहिली दोन वर्षे कोणताही कर आकारला जात नव्हता. तिसऱ्या वर्षापासून पुढे लागवडीखालील जमिनीच्या उत्पन्नाचा अत्यंत थोडा भाग हा कर म्हणून आकारला जात असे. आठव्या वर्षी मात्र लागवडीखालील जमिनीच्या उत्पन्नावर पूर्ण कर लागू होत असे.

जमीन महसूल हा जमिनीच्या उत्पादक्तेनुसार वेगवेगळा असायचा. तसेच जमिनीतून घेतल्या जाणाऱ्या पिकानुसार देखील दर भिन्न-भिन्न असायचे. एकाच वर्षातील दोन पीके घेतली गेल्यास पहिल्या पिकाला नेहमीचा महसूली दर आणि दुसऱ्या पिकाला कमी दर लावला जात असे. जमिनीची सुपीकता, त्यातून होणारे

उत्पादन यांच्या आधारे शेतसाऱ्याचा दर सर्वांसाठी ठरवला जात असे. प्रत्येक शेतकऱ्यासाठी महसूल ठरवला जात असला तरी महसूल गोळा करण्यासाठी 'गाव' हे मुलभूत एकक मानले जात असे.

- **शेतसारा ठरविण्याची पद्धत :**

मलिक अंबरने महसूलाच्या स्वरूपातील शेतसाऱ्याची आकारणीचा दर हा शेत जमिनीतील एकूण उत्पन्नाच्या २/५ एवढा ठरवला होता. पिकाच्या एकूण उत्पादनावर आधारित महसुल आकारला जात होता. शेतसारा हा धान्याच्या स्वरूपात वसुल केला जात असे. कालांतराने मलिक अंबरने शेतसारा हा रोख रकमेच्या स्वरूपात वसुल करण्यास आरंभ केला आणि महसूलचा दर हा उत्पन्नाच्या १/३ इतका ठरविण्यात आला.

- **महसूल गोळा करण्याची पद्धत:**

साधारणपणे किती जमीन महसूल येईल याच्या अंदाजावरून किती जमीन महसूल घ्यायचा हे ठरवले जात असे. यालाच 'जमाबंदी' असे म्हणत. अंदाजित जमीन महसूलातून शेतसारामुक्त असलेल्या इनाम जमिनीचे उत्पन्न वगळले जात. तसेच प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांचा मोबदला देखील गोळा करावयाच्या महसूलातून वगळला जात असे. जमीन महसूल हा वर्षातून दोनवेळा पीक कापणीनंतर (सुगीनंतर) गोळा केला जात असे. साधारणपणे एप्रिल-मे मधील पीक कापणीला 'रब्बी' हंगाम व ऑक्टोबर-नोव्हेंबर मधील पीक कापणीला 'खरीप' हंगाम म्हणत असत.

जमीन महसूल गोळा करण्यासाठी अनेक स्तरावर विविध अधिकाऱ्यांच्या नेमणुका केलेल्या असत. गावपातळीवर गावप्रमुख असलेल्या 'मुकादम' अथवा 'पाटील' यांच्याकडे जमीन महसूल गोळा करण्याची जबाबदारी असे. त्याला याकामात मदत करण्यासाठी व जमीन महसूलाचा हिशोब व नोंद ठेवण्यासाठी 'कुलकर्णी' हा अधिकारी गावपातळीवर नेमलेला असे. परगणा पातळीवर 'देशमुख' किंवा 'देसाई' या अधिकाऱ्याकडे जमीन महसूल गोळा करण्याची जबाबदारी होती. देशमुख-देसाई यांना जमीन महसूलाच्या कामात मदत करण्यासाठी व जमीन महसूलाचा हिशोब व नोंद ठेवण्यासाठी 'देशपांडे' किंवा 'देशकुलकर्णी' हा अधिकारी परगणा पातळीवर नेमलेला होता.

मलिक अंबर याने जमीन महसूल प्रत्यक्षात गोळा करण्यासाठी 'मक्ता' किंवा 'ठेका' देण्याची पद्धत अवलंबली नव्हती. गाव व परगणा पातळीवरील परंपरागत वतनदार असलेल्या देशमुख, पाटील इत्यादी अधिकाऱ्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांशी थेट संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. जमीन महसूलाच्या वसुलीचा 'मक्ता' किंवा 'ठेका' देण्याच्या पद्धतीमुळे रयतेशी राज्यसत्तेचा थेट संबंध प्रस्थापित होत नसे. 'मक्तेदार' किंवा 'ठेकेदार' हे जास्तीजास्त जमीन महसूल गोळा करण्यासाठी शेतकऱ्यांवर दबाव आणत किंवा त्यांची छळवणूक करत.

- **गाव पातळीवरील अधिकारी :**

**पाटील:** पाटील हा खेड्यातील महसुल वसूल करण्याचे काम करीत असत. पाटील हा गावचा प्रमुख या नात्याने जमीन महसुल गोळा करीत असे. पाटील याने केलेल्या कामाच्या मोबदल्यात त्याने जमा

केलेल्या महसुलातील ठराविक हिस्सा घेण्याचा अधिकार होता. त्यास सरकारकडून जमीन तोडून मिळत असे. या जमिनीवर त्याचा वंशपरंपरेने अधिकार असे. त्याने जमा केलेला महसुल परगण्याच्या ठिकाणी पोहचवावा लागत असे. पाटील हे पद वंशपरंपरेने दिलेले असे.

**कुलकर्णी:** गावच्या पाटील याने गोळा केलेल्या महसुलाचा हिशेब ठेवण्याचे काम कुलकर्णी हा अधिकारी करत असे. मात्र पाटील या अधिकाऱ्याप्रमाणे त्यालादेखील जमा झालेल्या महसुलातील काही हिस्सा मिळत असे. कुलकर्णी पद हे वंशपरंपरेने दिले जात होते.

- **परगण्यातील अधिकारी :**

**देशमुख :** परगणापातळीवर 'देशमुख' हा अधिकारी / वतनदार जमीन महसुल वसूल करण्याचे काम करत असत. त्यांच्या मदतीस कारकून असत. जमीन महसुल वसूलीसाठी एक सशस्त्र दलही या अधिकाऱ्यांच्या मदतीस असे. देशमुखाने केलेल्या कामाच्या मोबदल्यात त्यांना एकूण जमा झालेल्या महसुलाच्या ठराविक हिस्सा घेण्याचा अधिकार होता. देशमुखास त्याच्या सेवेच्या बदल्यात वंशपरंपराग त मालकीची शेतसारा मुक्त जमीन दिलेली असे.

**देशपांडे :** देशमुखाच्या मदतीस जमा झालेल्या महसुलाची नोंद ठेवण्यासाठी देशपांडे किंवा देशकुलकर्णी असे. देशपांडे विविध कर, पिकाऊ जमीन, पेरणी केलेली जमीन याची नोंद ठेवण्याचे काम करत असत. त्याने केलेल्या या कामाच्या मोबदल्यात महसुलातील ठराविक हिस्सा त्याला मिळत असे. देशपांडे याच्या सेवेच्या बदल्यात त्यास महसुल मुक्त असणारी जमीन मिळत असे. देशपांडे पद हे वंशपरंपरागत होते.

एकूणच अहमदनगरच्या निजामशाहीचा वजीर मलिक अंबर याने जमीन महसुल पद्धतीत जो प्रयोग केला होता त्यातून शेतकऱ्यांचे हित होवून त्यांना संरक्षण प्राप्त झाले होते. जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली आणून शेतीतून उत्पन्न काढण्यासाठी मलिक अंबरच्या व्यवस्थेने प्रोत्साहन दिले. मलिक अंबर याने महसुल गोळा करण्यासाठी मध्यस्थ वर्ग निर्माण करण्याचे टाळले. मलिक अंबरच्या जमीन महसूल व्यवस्थेत शेतीतून मिळणाऱ्या महसूलाचा अंदाज व्यक्त करण्याची पद्धत ही मात्र एक मर्यादा होती. जमिनीतून प्रत्यक्ष मिळणाऱ्या उत्पन्नावर कर आवलंबून नसल्याने अनेकदा महसूल चुकीचा ठरवला जाण्याची शक्यता होती. तरीदेखील, मलिक अंबरची जमीन महसूल व्यवस्था ही दखखनच्या प्रदेशातील इतर राज्यांच्या जमीन महसूल व्यवस्थेवर दीर्घकाळ प्रभाव टाकण्या इतकी प्रभावशाली होती.

- **स्वयं अध्ययन प्रश्न २**

**रिकाम्या जागा भरण्यासाठी योग्य पर्याय निवडा.**

(१) मध्ययुगीन काळात .............. हा राज्याच्या उत्पन्नातील सर्वात मोठा घटक होता.

(अ) आयकर (ब) संपत्ती कर (क) सेवाकर (ड) शेतसारा

(२) ............ ही प्रत्यक्ष बादशाहच्या मालकीची जमीन होती.

(अ) जागीर (ब) इनाम (क) खालसा (ड) वतन

(३) अकबरच्या जमीन महसूल उभारणीत ............ याचे महत्त्वाचे योगदान होते.

(अ) राजा मानसिंग (ब) राजा तोडरमल (क) राजा जयसिंग (ड) राजा जसवंतसिंह

(४) राजा तोडरमलची महसूल व्यवस्था ही ............ या नावाने ओळखली जाते.

(अ) दहशाला (ब) दु अस्पा (क) कायमधारा (ड) रयतवारी

(५) शेतकऱ्यांना जमिनीच्या बी-बियाणे, अवजारे इत्यादीसाठी ............ नावाचे अल्पकालीन कर्ज दिले जात असे.

(अ) ताजिया (ब) तराई (क) तनखा (ड) तकावी

(६) मुघल काळात पडीक जमिनीला ............ असे म्हणत.

(अ) बंजर (ब) पोलाज (क) परौती (ड) चाचर

७) मलिक अंबर हा ............ मध्ये 'वजीर' होता..

(अ) आदिलशाही (ब) कुतुबशाही (क) निजामशाही (ड) इमादशाही

(८) सातत्याने पाणीपुरवठा उपलब्ध असलेली शेतजमीन म्हणजे .......... जमीन होय.

(अ) जिरायत (ब) कोरडवाहू (क) बागायत (ड) पाणथळ

(९) नव्याने लागवडीखाली आलेल्या जमिनीसाठी ............ याने हळूहळू वाढत जाणाऱ्या (विकसित होणाऱ्या) जमीन महसुलाची पद्धत लागू केली.

(अ) राजा तोडरमल (ब) शेरशह सुरी (क) मलिक अंबर (ड) अकबर

(१०) मलिक अंबरच्या महसूल व्यवस्थेत परगणा पातळीवर ............ हा महसूलाची नोंद ठेवत असे.

(अ) सरदेसाई (ब) देसाई (क) देशमुख (ड) देशपांडे

### ३.३.३ उद्योग आणि व्यापार

भारत हा अगदी प्राचीन काळापासून विविध वस्तूंच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध होता. भारतातील खेडी ही स्वयंपूर्ण मानली जात असत. गावामध्ये आवश्यक असलेल्या वस्तू या बहुतांशपणे गावातच निर्मिल्या जात असत. अपवादात्मकरित्या गावाबाहेरून वस्तू आणाव्या लागत असत. मध्ययुगीन भारतात नागरीकरण मोठ्याप्रमाणात वाढले. परगणा, सुभा यांच्या दृष्टीने मुख्य प्रशासकीय केंद्रे, वाढत्या व्यापारामुळे स्थापित झालेली व्यापारी केंद्रे, बंदरालगतची व्यापारी केंद्रे इत्यादींची वाढ झाल्यामुळे नागरीकरण देखील मोठ्याप्रमाणात वाढले. स्थिर राज्यसत्ता व सुव्यवस्थित महसुली उत्पन्न यांच्यामुळे उच्चभ्रू वर्गाची संख्या

देखील वाढली. त्यामुळे वाढलेल्या शहरी लोकसंख्येसाठी आवश्यक वस्तूंचे व उच्चभ्रू वर्गासाठी चैनीच्या वस्तूंचे उत्पादन वाढले. याकाळात भारताचा अंतर्गत व परराष्ट्र व्यापार वाढल्यामुळे व्यापाराच्या दृष्टीने भारतातील विविध शहरात व परदेशात मागणी असलेल्या वस्तूंचे उत्पादन देखील वाढले. एकूणच उद्योग आणि व्यापाराची वैविध्यपूर्ण वाढ हे मध्ययुगीन भारताचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. म्हणून मध्ययुगीन भारतातील उद्योग आणि व्यापार यांची माहिती घेणे आवश्यक आहे.

- **उद्योगधंदे :**

**(१) कापड निर्मिती:**

प्राचीन काळापासून भारत हा वस्त्रोद्योगासाठी अर्थात कापड निर्मितीसाठी जगभर प्रसिद्ध होता. शेतीतून उत्पादित होणाऱ्या कच्च्या मालापासून तयार करण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या कापडांचे / वस्त्रांचे भारतात मोठ्या प्रमाणात उत्पादन होत असे. मध्ययुगीन भारतात कापड उद्योगाची मोठ्याप्रमाणात भरभराट झाली. भारतातील विविध ठिकाणी प्रादेशिक भिन्नतेनुसार कापड उद्योग हा सुती कापड, रेशमी कापड, लोकरी कापड व तागापासून तयार केले कापड या प्रमुख चार प्रकारात मोडत होता. यापासूनच जाडेभरडे, मलमल वगैरे प्रकारचे कापड तयार केले जात होते.

**(अ) कापड बनविण्याची प्रक्रिया:** भारतात प्राचीन काळापासून ज्या पद्धतीने कापड बनविले जात होते तीच पद्धती मध्ययुगीन काळात टिकून होती. कापड तयार करण्यासाठी मानवी श्रम मोठ्या प्रमाणात लागत होते. कापड तयार करताना प्रथम कापसातील बिया बाजूला काढल्या जात होत्या. त्यानंतर तो कापूस चरख्यावर विणला जात होता. विणलेले कापड मागावर तयार केले जात होते. मागावर तयार झालेले कापड चुना, लिंबू व साबणाच्या मिश्रणात बुडविले जात होते. मग त्या कापडाला हवा असलेला रंग दिला जात असे. अशाप्रकारे रंगीत कापड तयार केले जात असे.

**(ब) कापडाचे प्रकार :** मुघलकाळात ज्या ठिकाणी कापड तयार होत असे त्या ठिकाणच्या नावावरून त्या कापडास नाव दिले जात होते. यात रेशमी कापड, पांढऱ्या रंगाचे सुती, मलमली, जरीचे, चिटाचे, भरतकाम केलेले सुती, गालीचे, शाली, कॅलिको, मेंढ्या, तूस व अंगोरे यापासून तयार केलेले लोकरीचे कापडापासून ब्लँकेटस्, पागोटी, शाल, कमरपट्टे तयार केले जात असत. ताग, अंबाडीपासून तयार केलेले जाडे भरडे कापड, अंबाडी व घायपात भिजत घालून तयार केलेले कापड इत्यादी प्रकारचे कापड मुघल काळात तयार केले जात होते.

**(क) कापड उद्योगाची केंद्रे:** मुघल काळात अनेक कापड उत्पादनाची केंद्रे उदयास आली होती. सुती कापडासाठी लाहोर हे शहर प्रसिद्ध होते. लाहोर मध्ये साधारणपणे सात प्रकारचे सुती कापड तयार केले जात होते. भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर दाभोळ व खंबायत, पूर्वेकडे विशाखापट्टणम, बंगालमध्ये हुगळी व वायव्येस सिंधू नदीकाठी असणारे लहरी बंदर इ. ठिकाणी कापड तयार केले जात होते. याशिवाय उत्तर भारतात दिल्ली, आग्रा, अवध, जैनापूर, लखनौ, सुरत, ढाक्का, बनारस, पाटणा, अलाहाबाद इ. ठिकाणी

कापड उद्योगाची भरभराट झाली होती. लोकरी कापडासाठी पंजाब, राजस्थान, काश्मीर, लाहोर, गुजरात प्रसिद्ध होते. तसेच खेडेगावात अंबाडी, घायपात भिजत घालून त्यापासून धागे तयार केले जात असत.

**(ड) मुघलकाळातील कापडाचे दरपत्रक:** झेना प्रकारचे कापडाचा दर हा १ मोहोर इतका होता. खासा कापडाचा एक तुकडा १५ मोहरास मिळत असे. चिकाटी कापड एक यार्डचा दर १ रुपया होता. मंदीलाची किंमत २ मोहोरा होती. सहान कापडाचा दर ३ मोहरा, बापत्ता कापड ५ मोहरास मिळत होते. चौतार प्रकारचे कापड ९ मोहरास मिळत होते. मध्ययुगीन काळात कापड हे त्याचा निर्मिती खर्च आणि त्याचा दर्जा याच्या आधारे ठरत होता.

**(२) रंग उद्योग:**

मुघल काळात 'रंग उद्योग' हा स्वतंत्र उद्योग होता. कापड उद्योगाबरोबरच याचा विस्तार झाला होता. कापडास विविध प्रकारचे रंग दिले जात असत. त्यामुळे या उद्योगाचीही भरभराट झाली होती. रंग तयार करण्याची कला परंपरेने चालत आली हेती. रंग तयार करण्यासाठी पुढील घटक वापरले जात होते. वनस्पतीमध्ये नीळ, बेहडा, डाळींब, बेलफळ, मेंदी, हिरडा, आले, हळद, कुसुंबा, लिंब, बाभूळ, कात, लोध इत्यादी. याशिवाय इतर घटकात तुरटी, चुना, फेरस, सल्फेट, लाख इ. चा वापर केला जात होता. याशिवाय विविध झाडांची पाने, फुले, साल, मुळे यापासूनही रंग तयार केला जात होता. मुघल काळात लाख उत्पादनासाठी लखनौ, बिहार, पंजाब व अवध, हळदीसाठी – अलाहाबाद, आल्यासाठी अवध, लाहोर निळीच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध होते. हा तयार झालेला रंग विशिष्ट पद्धतीने कापडास दिला जात होता. त्यावर लाकडी ठसे उमटविले जात होते.

**(३) धातू उद्योग :**

मुघल काळात धातू उद्योग भरभराटीस आला होता. यामध्ये लोखंड, तांबे, पितळ, सोने–चांदी व हिरेरत्ने इत्यादीच्या विपुल प्रमाणात खाणी भारतात होत्या. या खाणीतून अशुद्ध धातूपासून शुद्ध धातू तयार केला जात होता. धातूंपासून विविध वस्तू बनविण्याचा उद्योगही मोठ्या प्रमाणावर चालू होता.

**(अ) लोखंड:** लोखंड हे अशुद्ध स्वरूपात(खनिज) खाणीत सापडत होते. त्यापासून शस्त्रास्त्रे, लोखंडी तोफा, शेतीची औजारे, कुलुपे, लोखंडी भांडी तयार केली जात होती. भारतात लाहोर, अजमेर, ग्वाल्हेर, कालिंजर इत्यादी ठिकाणी खाणी होत्या. खेडेगावात लोहार लोखंडापासून शेतीची औजारे तयार करत होता. मेवाड व बिकानेर येथे शस्त्रास्त्रे तयार केली जात होती. पंजाबात कुलपे तयार करत असत. भारतात काही ठिकाणी लोखंडी तोफा देखील तयार केल्या जात होत्या.

**(ब) तांबे:** तांबे या धातूच्याही खाणी भारतात मुबलक प्रमाणात होत्या. तांब्यापासून नाणी, वास्तूंचे घुट, मूर्ती, दागदागिने, भांडी, बंदुका, तोफा, मंदिराचे कळस बनविले जात होते. तांब्यापासून बनविलेली भांड्यांचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असे. खेडेगाव व शहरात अशा प्रकारच्या वस्तू बनविणारे कारागीर होते. तांब्याची भांडी बनविण्यासाठी बनारस प्रसिद्ध होते.

**(क) पितळ:** भांडी बनविण्यासाठी पितळ या धातूचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात होता. या धातूपासून तयार केलेली भांडी देखील भारतीय लोक मोठ्या प्रमाणात वापरत असत. पितळी भांडी बनविण्याचा उद्योग बनारस येथे चालत असे.

**(ड) सोने–चांदी:** सोन्याच्या खाणी दक्षिण भारतात मोठ्या प्रमाणावर होत्या. खाणीतून अशुद्ध स्वरूपातील सोने व चांदी शुद्ध स्वरूपात करण्याचे अनेक उद्योग दक्षिण भारतात अस्तित्वात होते. भारतात म्हैसूर प्रांतातील कोलार हे सोन्याच्या खाणीसाठी प्रसिद्ध होते. सोने व चांदी यापासून नाणी, मूर्ती, दागदागिने बनविले जात होते. सुवर्णतुला करण्यासाठी या धातूंचा वापर केला जात होता. विजयनगर साम्राज्यात सोने या धातूचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जात होता.

**(इ) हिरे–रत्ने:** सोन्याच्या खाणीप्रमाणेच हिऱ्याच्या खाणी दक्षिण भारतात मोठ्या प्रमाणावर होत्या. विशेषत: आंध्र प्रदेशात याच्या खाणी विपूल प्रमाणात सापडत होत्या. याशिवाय बुंदेलखंड व चंदेरी येथेही हिऱ्यांच्या खाणी सापडत होत्या. गोवळकोंडा हे हिऱ्यांसाठी प्रसिद्ध होते. ट्रॅव्हनियर या परदेशी प्रवाशाने दक्षिण भारतातील हिऱ्यांच्या खाणीविषयी माहिती लिहून ठेवलेली आहे. तो स्वत: हिऱ्यांचा व्यापारी होता.

**(४) साखर उद्योग:**

मुघल काळात साखर उद्योगाची केंद्रे मुबलक प्रमाणात होती. भारतात ऊसाचे उत्पादन घेतले जात असल्याने हा उद्योग भरभराटीस आला होता. ऊसापासून साखर तयार केली जात होती. त्यामुळे खांडसरी उद्योगही मोठ्या प्रमाणावर सुरू होता. साखरेचे उत्पादन हे मोठ्या प्रमाणावर होत असल्याने भारतातील लोकांची गरज भागवून उर्वरीत साखर निर्यात केली जात होती. साखर उत्पादनाची केंद्रे ही प्रामुख्याने दिल्ली, आग्रा, बनारस, गाझीपूर, लाहोर, साष्टी इत्यादी होती तर ऊसाचे पीक मोठ्या प्रमाणावर लाहोर व अलाहाबाद प्रदेशात घेतले जात होते.

**(५) मीठ उद्योग:**

भारताच्या समुद्र किनारपट्टीवर मोठ्या प्रमाणात मीठाचे उत्पादन घेतले जात होते. विशेषत: महाराष्ट्रात कोकण किनारपट्टीवर मीठ उत्पादन उद्योग भरभराटीस आला होता. बंगाल, लाहोर व अजमेर येथेही मीठ उत्पादन केले जात होते. मुघल काळात अजमेर येथील सांभर सरोवरात मीठाचे उत्पादन केले जात होते. भारतात पहिले येणारे परकीय व्यापारी पोर्तुगीज हे आपल्या देशातून मीठ विक्रीसाठी भारतात आणत असत. त्या मीठाशी भारतीयांना स्पर्धा करावी लागत होती. मीठाचे दर हे वेगवेगळ्या भागात वेगवेगळे होते. त्यामध्ये सांभर भागात मीठाचा दर हा ५ मणास २० रुपये एवढा दर होता, तर आग्रा येथे एक रुपयास १७ मण मीठ मिळत होते.

**(६) जहाज बांधणी उद्योग:**

मुघल काळात अंतर्गत आणि परदेशी व्यापार मोठ्या प्रमाणात वाढला. अंतर्गत आणि परदेशी व्यापारात सागरी मार्गे होणाऱ्या व्यापाराचे प्रमाण देखील वाढले. त्यामुळे व्यापारी जहाजांची गरज देखील

खूप वाढली होती. त्यामुळे मुघल काळात जहाज बांधणी उद्योग भरभराटीस आला होता. समुद्र किनारपट्टीवर बंदराच्या ठिकाणी हा उद्योग मोठ्या प्रमाणावर चालत होता. याशिवाय जंगलातून मोठ्या प्रमाणावर लाकूड उपलब्ध होत असे. त्याच्या सहाय्याने जहाज बांधणी केली जात असे. ताड या वृक्षाचे बुंधे एकत्र करून मोठी जहाजे बनविली जात असत. याशिवाय जंगलातून सागाचे लाकूड वापरून अधिक मजबूत जहाज तयार केले जात असे. अशाप्रकारची जहाजे तयार करण्याचे उद्योग कोचीन, कलिकत व मालदिव बेटावर चालत असे. याशिवाय महाराष्ट्रात कल्याण, भिवंडी, अलिबाग, वसई, ठाणे इ. ठिकाणी भरभराटीस आला होता.

**(७) कागद उद्योग:**

जगात कागद तयार करण्याची कला प्रथमत: चीनमध्ये विकसित झाली व ती १३ व्या शतकात भारतात आली. मध्ययुगीन काळात प्रशासनाचा आवाका, व्यापार व पेढीव्यवहार, धार्मिक व इतर साहित्य निर्मिती यांची प्रचंड प्रमाणात वाढ झाल्याने कागदाची मागणी वाढली. त्यामुळे मुघल कालखंडात भारतात विविध ठिकाणी कागद उद्योग विकसित झाला. हा कागद बनविण्यासाठी बांबू, चिंध्या, तुतीच्या झाडाची साल यांचा वापर केला जात होता. कागद उत्पादनाची केंद्रे ही बिहार व सियालकोट ही होती. कागदाचे उत्पादन हे त्याच्या मागणीनुसार केले जात होते.

**(८) काच उद्योग:**

प्राचीन काळापासून काच बनविण्याची कला भारतात अस्तित्वात होती. काचेचे विविध उपयोग केले जात असत. काचेच्या उपयोगानुसार काचेचे उत्पादन केले जात असे. मध्ययुगीन काळात काच बनविण्याचे उद्योग हे अहमदनगर, आग्रा, बिहार व गुजरात येथे होते. मागणीनुसार काच ही परदेशातूनही आयात केली जात होती. त्यामुळे युरोपियन व्यापारी काचेच्या व्यापारात मोठ्या प्रमाणावर भाग घेत असत.

**(९) नारळाशी संबंधीत उद्योग:**

नारळाचे झाड हे 'कल्पवृक्ष' मानले गेले आहे. नारळापासून अनेकविध वस्तू तयार केल्या जात होत्या. नारळ हे किनारपट्टीवर मोठ्या प्रमाणावर उत्पादित केले जात असत. त्यामुळे किनारपट्टीच्या प्रदेशात नारळावर आधारित अनेक उद्योग विकसित झाले होते. नारळाच्या झाडापासून झाडू, काथ्या, दोर, तेल, नारळ, मद्यार्क, चटया, बांधकामासाठी लाकूड बनविले जात होते. अशा प्रकारचे उद्योग महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीवर प्रत्येक खेड्यापाड्यात विकसित झाले होते.

**(१०) इतर उद्योग:**

आपण आतापर्यंत चर्चा केलेल्या उद्योगांशिवाय अनेक लहानमोठे उद्योग मध्ययुगीन काळात विकसित झाले हेते. ते भारतातील खेडोपाड्यातही मोठ्या प्रमाणावर चालत होते. त्यामध्ये खाणकाम, मातीपासून भांडी तयार करणे, चर्मोद्योग, लाकडापासून खेळणी व फर्निचर तयार करणे, मासोरी उद्योग, हस्तीदंती कलाकुसरीच्या वस्तू बनविणे, खेळणी बनविणे, खाद्य तेल तयार करणे इ. विविध उद्योग अस्तित्वात आले होते.

- **व्यापार :**

मध्ययुगीन काळात मुघल साम्राज्यासारख्या सामर्थ्यवान साम्राज्याची निर्मितीमुळे देशांतर्गत राजकीय स्थैर्य निर्माण झाले होते. नवनवीन शहरांचा उदय झालेला होता. व्यापार व उद्योगास राज्यसत्तेकडून संरक्षण आणि प्रोत्साहन मिळत होते. त्यामुळे मध्ययुगीन काळात भारताच्या अंतर्गत व परदेशी व्यापारात मोठ्या प्रमाणात प्रगती झाली होती. या काळात परदेशी व्यापारास मोठ्या प्रमाणावर चालना मिळाली होती. हा परदेशी व्यापार भारतातील पूर्व व पश्चिम किनाऱ्यावरील बंदरातून चालत होता. भारतातून परदेशी व्यापारात प्रामुख्याने मलमल, सुती व रेशमी कापड, मसाल्याचे पदार्थ, मौल्यवान रस्ते, अत्तरे, सुगंधी तेले, साखर विविध प्राण्यांची कातडी इत्यादी वस्तू निर्यात केल्या जात होत्या, तर सोने, चांदी, केशर, घोडे व श्रीमंतांच्या चैनीच्या वस्तू आयात केल्या जात होत्या.

**(अ) मध्ययुगीन अंतर्गत व्यापार:**

मुघल काळात अंतर्गत व्यापारास स्थैर्य प्राप्त होऊन मोठ्या प्रमाणावर प्रगती झाली होती. अंतर्गत व्यापारासाठी मुघल सत्तेने संरक्षणाबरोबरच आवश्यक त्या सोयी सुविधा पुरविल्या होत्या. मुघलकाळातील अंतर्गत व्यापार हा समुद्र किनारपट्टीच्या मार्गाने, नद्यामार्गे व खुष्कीच्या मार्गाने चालत असे.

**(१) अंतर्गत व्यापारी मार्ग :**

**(अ) समुद्र किनारपट्टीवरून चालणारा व्यापार :** मुघलकाळात पश्चिम किनारपट्टीवरील खंबायतपासून ते कोचीनपर्यंत व्यापार चालत असे. तसेच पूर्वकिनारपट्टीवर बंगालपासून मद्रासपर्यंत व्यापार चालत होता. याकाळात व्यापारी जहाजाना संरक्षण देणारे गलबतांचे तीन गट होते. पहिला गट पश्चिम किनारपट्टीवरील खंबायत ते गोवा असा होता. येथून दरवर्षी ३ हजार टन वस्तू आयात निर्यात केल्या जात होत्या. दुसरा गट हा देखील पश्चिम किनारपट्टीवरील गोवा ते कोचीन असा होता. येथून सुरे १ हजार टन वस्तूंचा व्यापार चालत असे. तिसरा गट हा पूर्व किनारपट्टीवरील नागपट्टणमपासून ओरिसा बंदरापर्यंतकार्यरत होता. अशा प्रकारे संरक्षण गट असल्याने व्यापार सुरळीतपणे चालत असे. त्यास चोर, लुटारू, दरोडेखोर व चाचे लोक यांच्यापासून धोका पोहचण्याचे प्रमाण कमी होत असे.

**(ब) नदीमार्गे चालणारा व्यापार:** मुघलकाळात नदीमार्गे चालणाऱ्या जलवाहतूकीचे हे सिंधु नदीमार्ग, गंगा नदीमार्ग, तापी नदीमार्ग व बंगालच्या त्रिभुज प्रदेशातील मार्ग असे चार प्रमुख मार्ग होते. सिंधु नदीवरील मार्ग हा सिंध, मुलतान, लाहोर व काश्मीर इ. प्रदेशातील जात असे. दुसरा गंगा नदीचा मार्ग हा दिल्ली, आग्रा, अलाहाबाद, जोनपूर, ढाक्का, सोनारगाव यांना जोडणारा होता. तिसरा तापी नदीचा जलमार्ग हा सुरत खंबायत येथे चालणाऱ्या व्यापारी वस्तूंच्या खरेदी व विक्रीसाठी प्रसिद्ध होता. चौथा जलमार्ग हा बंगाल, बिहार, आसाम यांना जोडणारा बंगालच्या त्रिभुज प्रदेशातील होता.

**(क) खुष्कीच्या मार्गाने चालणारा व्यापार:** मुघल काळात आग्रा हे ठिकाण प्रमुख व्यापारी केंद्र होते. आग्रा शहरामधून प्रमुख पाच महामार्ग जात होते. त्यामध्ये पहिला मार्ग हा काबूलकडे, दुसरा कंदाहारकडे,

तिसरा खंबायतकडे, चौथा बुऱ्हाणपूर व पाचवा सोनारगावकडे जात होता. येथून जाणाऱ्या मार्गावर पूल बांधले होते. या रस्त्यावर व्यापाऱ्यांच्या निवासाची सोय व्हावी यासाठी 'धर्मशाळा' किंवा 'सराया' बांधलेल्या होत्या. शेरशहाने आपल्या काळात एकूण १७०० सराया बांधल्याचा उल्लेख आहे. सम्राट अकबराच्याही काळात अशा प्रकारच्या अनेक सराया बांधल्याचा उल्लेख सापडतो. याशिवाय रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावली होती. रस्त्याच्या कडेला ठिकठिकाणी विहिरींची सोयही केली होती. व्यापाऱ्यांच्या संरक्षणासाठी स्वतंत्र अधिकाऱ्यांची नियुक्ती केलेली होती. त्यामुळे मुघल काळात व्यापार हा भरभराटीस आला होता.

**(२) व्यापार व दळणवळणाची साधने :**

मुघलकालीन अंतर्गत व्यापारात मालाची वाहतूक ही बैल, बैलगाड्या, घोडे, खेचर, उंट, पालखी व डोली इत्यादी साधनांद्वारे केली जात होती. काही ठिकाणी थोड्याफार प्रमाणावर हत्तींचाही वापर मालाची वाहतूक करण्यासाठी केला जात होता. डोली व पालखी यांचा वापर अत्यल्प प्रमाणात केलेला दिसून येतो. मात्र, बैल व बैलगाडी यांचा वापर मोठ्याप्रमाणावर केलेला दिसून येतो.

**(३) व्यापारी जमाती:**

मुघल काळात बंजारा, बनीया, बोहरी, पारसी व सौदागर इत्यादी व्यापारी जमाती व्यापार करीत असत. बंजारा व्यापारी हे राजपुताना येथून दूरवरच्या प्रदेशांशी बैल व बैलगाड्या या साधनांच्या द्वारे मालाची वाहतूक करून व्यापार करीत असत. गुजरातमधील बनिया या व्यापारी जमातीचेच गुजरातच्या समुद्रावरून चालणाऱ्या व्यापारावर वर्चस्व होते. बोहरी ही जमात अरबस्तान, इराण, इराक इत्यादी प्रदेशातून विविध वस्तू आणून त्यांचा भारतात व्यापार करीत असत. या व्यापाऱ्यांना दलाल सहकार्य करत असत. राज्यसत्तेकडूनही या वर्गास फार मोठे सहकार्य मिळत असे.

**(४) अंतर्गत व्यापारातील वस्तू:**

मुघलकालीन व्यापारी वस्तूंमध्ये विविध प्रकारचे कापड, मीठ, मिरे हे मसाल्याचे पदार्थ, गुळ, धान्ये, साखर, कापूस, सोने, चांदी, इतर धातू इत्यादींचा समावेश होत असे.

**(५) अंतर्गत व्यापारी केंद्रे:**

मुघलकालीन अंतर्गत व्यापारी केंद्रे म्हणून व्यापारी मार्गावरील शहरे, राजधानीची ठिकाणे, तीर्थयात्रेची ठिकाणे, पूर्व व पश्चिम किनाऱ्यावरील प्रमुख बंदरे यांचा उदय झाला होता. यामध्ये प्रामुख्याने काबूल, कंदहार, मुलतान, लाहोर, दिल्ली, आग्रा, अलाहाबाद, जोनपूर, लखनौ, सिंधमधील ठठ्ठा, मक्कर, दक्षिण भारतातील बऱ्हाणपूर, एलीचपूर, ओरीसातील कटक, बंगालमधील सोनारगाव, ढाक्का इत्यादी ठिकाणांना व्यापारी केंद्र म्हणून प्रसिद्धी मिळाली होती. याशिवाय गुजरातमधील अहमदाबाद, बडोदा, चंपानेर, सुरत व खंबायत इत्यादी ठिकाणांनाही महत्त्व मिळाले होते.

**(ब) मध्ययुगीन परदेशी व्यापार:**

भारतात प्राचीन काळापासून परदेशी व्यापार मोठ्याप्रमाणात सुरू होता. मध्ययुगीन काळात देखील परदेशी व्यापार टिकून होता. मुघलकाळात परदेशी व्यापारास मोठ्या प्रमाणावर चालना व प्रोत्साहन मिळाले.

**(१) परदेशी व्यापारी मार्ग:**

**(अ) परदेशी व्यापाराचा सागरी मार्ग:** मुघलकालखंडात युरोपीय पोर्तुगीज, डच, इंग्रज व फ्रेंच हे युरोपियन लोक व्यापारासाठी भारतात मोठ्याप्रमाणात येऊ लागले. भारताशी सागरी मार्गाने होणाऱ्या परदेशी व्यापारावर पूर्वी अरबांचे वर्चस्व होते. अरबांशी युद्ध करून पोर्तुगीजांनी आपले वर्चस्व निर्माण केले. पुढे डच व इंग्रज यांचे वर्चस्व सागरी व्यापारावर निर्माण झाले. परराष्ट्रीय व्यापारात समुद्रामार्गे होणाऱ्या व्यापाराचा मोठा वाटा होता. युरोपीय देश भारतातून मसाल्याचे पदार्थ मोठ्या प्रमाणावर आयात करत असत. मुघल काळात आयातीपेक्षा निर्यात मोठ्या प्रमाणावर होत असल्याने आर्थिक भरभराट झालेली होती. मुघल काळात परराष्ट्रीय व्यापारासाठी सिंध, गुजरात व बंगाल प्रांतातील बंदरे प्रसिद्ध होती. सिंधु नदीतून अखाती प्रदेश व पाश्चिमात्य देशाबरोबर व्यापार चालत असे. येथून संत्री, हस्तीदंत, उंट व पादत्राणे इत्यादी वस्तूंची निर्यात होत असे. गुजरातमधील सुरत, भडोच व खंबायत या बंदरातून अरबस्तान, अफ्रीका व युरोप व पूर्वेकडील मलाक्काची सामुद्रधुनी येथे निर्यात केली जात होती. खंबायत येथून निर्यात होणाऱ्या वस्तूंमध्ये रेशमी कापड, रजया, गालिचे, नीळ, कागद, चमड्याच्या वस्तू, साखर, लोखंड, विविध प्राण्यांची कातडी, हिरडे, हिंग व रत्ने यांचा समावेश होत असे. तर आयात मालामध्ये मलमल, चंदनाचे लाकूड, चिनी रेशीम, हबशी गुलाम, सोने, चांदी व घोडे इत्यादी वस्तूंचा समावेश होत असे. चीन, अरबस्तान, आर्मेनिया, इराण या देशांशी सातगाव, हुगळी व श्रीपुर या बंगालमधील बंदरातून व्यापार होत असे. येथून सुती व रेशमी कापड, आले, मिरे, हिरडे, लिंबू इत्यादी वस्तूंची निर्यात होत असे. तर हुगळी बंदरातून रेशीम, जोनपुरी, गालिचे, रजया, तंबूचे सामान, साखर, तांदुळ, नीळ मसल्याचे पदार्थ इ. ची निर्यात इराण, अरबस्तान, पश्चिमेकडील देश, पूर्वेकडील मलाक्का व चीन या देशात होत असे. आयात वस्तूध्ये सुती कापड, मलमल, सॅटिन, तांबे व कथिल, जहाजवाहिर, मोती, मसाल्याचे पदार्थ, चंदन, विविध लाकडी वस्तू या वस्तूंचा समावेश होत असे. मुघल काळात परदेशी व्यापार हा खुष्की व सागरी मार्गाने होत असे. मलबार येथून इराण व सुएझच्या आखातात व्यापार केला जात होता. खुष्कीच्या मार्गाने कॉन्स्टॅटिनोपल किंवा भूमध्य समुद्रातून युरोपीय राष्ट्राकडे भारतीय मालाची ने-आण केली जात होती. तांबडा समुद्र, पूर्व आफ्रिकेचा किनारा, मलाक्का बेटे, चीन व प्रशांत महासागरावरील काही देश यांच्याबरोबर परराष्ट्रीय व्यापार केला जात होता.

**(ब) परदेशी व्यापाराचा खुष्कीचा मार्ग:** खुष्कीच्या मार्गाने म्हणजेच भूमार्गाने होणाऱ्या परदेशी व्यापाराचे प्रमाण मोठे होते. मुलतान, खैबर खिंड व काश्मीर हे तीन भूमार्ग प्रामुख्याने परदेशी व्यापारासाठी महत्त्वाचे होते. मुख्यत्वे अफगाणिस्तान, तुर्कस्थान, पश्चिम आशियातील देश, बाल्कन देश व चीन इ. देशाबरोबर खुष्कीच्या मार्गाने व्यापार केला जात होता. वायव्य सरहद्द प्रदेशातून 'लाहोर ते काबूल मार्ग व मुलतान ते कंदहार मार्ग असे दोन भूमार्ग होते. अशाप्रकारे मुघलकाळात परदेशी व्यापारी मार्गात सागरी

मार्गासोबतच खुष्कीच्या मार्गाचा वापर व्यापार व दळणवळण यांच्यासाठी केला जात होता. राज्यसत्तेने या व्यापारी मार्गात व्यापाऱ्यांना संरक्षण देण्याची यंत्रणा व सोयी उपलब्ध करून दिल्या होत्या.

**(३) व्यापारी जमाती :**

मुघल काळात बंजारा, बनिया, बोहरी, पार्शी, सौदागर, इ. जमातीनी व्यापारात सहभाग घेतला होता. या जमातीकडे चिकाटी, धाडस व धीटपणा अंगी असल्याने त्यांनी व्यापारात यश मिळविलेले दिसून येते. यामध्ये राजपूतान्यातील बंजारा, गुजरातचे बनिया व्यापारासाठी प्रसिद्ध जमाती होत्या. अहमदाबादमध्ये बनियांच्या चौऱ्याऐंशी उपजाती होत्या.

**(४) व्यापारी केंद्रे:**

मुघलकाळातील परदेशी व्यापारी केंद्रे ही वायव्येकडील काबूल, कंदहार, मुलतान, लाहोर, मध्य भारतातील दिल्ली, आग्रा, आलाहाबाद, जोनपूर व लखनौ, सिंधमधील ठठ्ठा व भक्कर, दक्षिणेकडील बुऱ्हाणपूर, एलीचपूर, उज्जैनी, ओरिसातील कटक व बालासोर, बंगालमधील सोनारगाव व ढाक्का ही प्रमुख व प्रसिद्ध व्यापारी शहरे म्हणून उदयास आलेली होती. गुजरातमधील खंबायत व सुरत हेही व्यापाराचे केंद्र म्हणून उदयास आले होते. याशिवाय बनारस, लखनौ, जोनपूर, पाटणा, ढाक्का इत्यादी व्यापारी केंद्रे होती. बंदराच्या ठिकाणी, राजधानीच्या ठिकाणी व महामार्गावर, यात्रेच्या ठिकाणी व तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी मध्ययुगीन काळात अनेक व्यापारी केंद्रे ही उदयास आली होती. ही सर्व व्यापारी केंद्रे ही परस्परांशी, प्रमुख बंदरांशी किंवा राजधानीच्या ठिकाणांशी जोडली गेल्याने व्यापार करणे सुलभ झाले होते.

**(५) व्यापारी वस्तू:**

भारतातून निर्यात होणाऱ्या वस्तूमध्ये सुती व रेशमी कापड, कार्नेलियन दगड इत्यादी वस्तूंना पोर्तुगाल व इतर युरोपियन देशात पाठविले जात होते. मलाक्का व सुमात्रा येथे मसाल्याचे पदार्थ व रेशीम या वस्तूंना मागणी होती. भारताचा व्यापार हा अरबस्तान, इराण, सुमात्रा या देशांशी चालत असे. व्यापारी वस्तूंमध्ये गहू, बाजरी, तांदूळ, इतर धान्ये, साखर, कापूस, मसाल्याचे पदार्थ इ. वस्तूंना परदेशात मोठ्या प्रमाणावर मागणी होती. भारतातील आयात वस्तूमध्ये चांदी, घोडे, केशर व निरनिराळे धातू, जरीचे सामान, रेशीम, सोने, चांदी, तांबे, पारा, हिंग, केशर, गुलाबपाणी इ. वस्तूंची आयात केली जात होती. मक्का व एडन येथून सोने, चांदी, तांबे, शिसे, तुरटी इ. वस्तू आयात केल्या जात होत्या. जातिवंत घोडे हे इराक, तुर्कस्थान, बल्ख, येमेन, इराण अरबस्तान इ. देशातून आयात केले जात होते. अशाप्रकारे मुघलकाळात आयातीपेक्षा निर्यात मोठ्या प्रमाणावर केली जात असल्याने भारताची आर्थिक भरभराट झाली होती.

- **स्वयं अध्ययन प्रश्न ३**

**रिकाम्या जागा भरण्यासाठी योग्य पर्याय निवडा.**

(१) .......... शहरात सात प्रकारचे सुती कापड तयार केले जात होते.

(अ) लाहोर (ब) मुलतान (क) हुगळी (ड) अलाहाबाद

(२) पितळेची भांडी .......... येथे तयार केली जात होती.

(अ) आग्रा (ब) बनारस (क) गाझीपूर (ड) लाहोर

(३) आग्रा शहरामधून प्रमुख .......... महामार्ग जात होते.

(अ) चार (ब) पाच (क) सहा (ड) सात

(४) विजयनगर शहरातून .......... मार्ग जात होते.

(अ) तीन (ब) सात (क) बारा (ड) पंधरा

(५) बनिया हे .......... येथील व्यापारी होते.

(अ) कर्नाटक (ब) केरळ (क) गुजरात (ड) तामिळनाडू

(६) मुघल काळात .......... प्रकारचे कापड तयार केले जात होते.

(अ) २० (ब) ३० (क) ४० (ड) ५०

(७) कोलारमध्ये .......... खाणी मोठ्या प्रमाणात होत्या.

(अ) हिऱ्याच्या (ब) चांदीच्या (क) सोन्याच्या (ड) लोखंडाच्या

(८) जहाज तयार करण्यासाठी .......... झाडाचा वापर केला जात होता.

(अ) साग (ब) बांबू (क) आंबा (ड) फणस

(९) शेरशहाने आपल्या काळात .......... सराया बांधल्या.

(अ) १५०० (ब) १६०० (क) १७०० (ड) १८००

## ३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

- **खालसा :** बादशाहच्या मालकीची जमीन
- **कोतवाल :** पोलीसप्रमुख किंवा नगरप्रमुख
- **तकाबी :** शेतीसाठी दिले जाणारे कर्ज

- **बंजर : पडी**क जमीन
- **खुष्कीचा मार्ग :** भूमार्ग, जमिनीवरील मार्ग

## ३.४ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

- **स्वयं अध्ययन प्रश्न १**

(१) (अ) बाबर (२) (ब) वजीर (३) (ड) वजीर (४) (अ) मुहतसिब

(५) (अ) सुभेदार (६) (क) सुभा (७) (ब) दिवाण (८) (क) मीरबक्षी

(९) (अ) अमलगुजार किंवा दिवाण (१०) (ब) मुकादम

- **स्वयं अध्ययन प्रश्न २**

(१) (ड) शेतसारा (२) (क) खालसा (३) (ब) राजा तोडरमल

(४) (अ) दहशाला (५) (ड) तकावी (६) (अ) बंजर

(७) (क) निजामशाही (८) (क) बागायत (९) (क) मलिक अंबर

(१०) (ड) देशपांडे

- **स्वयं अध्ययन प्रश्न ३**

(१) (अ) लाहोर (२) (ब) बनारस (३) (ब) पाच (४) (ब) सात

(५) (क) गुजरात (६) (ड) ५० (७) (क) सोन्याच्या (८) (अ) साग

(९) (क) १७००

## ३.५ सारांश

मध्ययुगीन भारतातील महत्त्वाचे साम्राज्य असलेल्या मुघल साम्राज्याची स्थापना जरी बाबर याने केली असली तरी त्याचा मजबूत पाया सम्राट अकबर याने घातला. अकबरच्या दूरदृष्टीमुळे प्रशासन व्यवस्थेत त्याने केलेल्या सुधारणांमुळे मुघल साम्राज्याला दीर्घकालीन स्थैर्य प्राप्त झाले. या साम्राज्यास स्थिरता प्राप्त झाली. संपूर्ण भारतभर पसरलेल्या मुघल साम्राज्याचा राज्यकारभार सुव्यवस्थीतपणे चालावा यासाठी सम्राट अकबर याने केंद्रीय प्रशासन, प्रांतीय प्रशासन, जिल्हा प्रशासन व ग्रामीण प्रशासन स्थापन केले. पारंपारिक व्यवस्था, शेरशाहने स्थापन केलेली व्यवस्था यांच्यात बहुमोल भर टाकून अकबरने ही मजबूत प्रशासन व्यवस्था उभी केली.

जमीन महसूल हा राज्याच्या अस्तित्वाचा आणि स्थिरतेचा कणा असतो. मुघल सम्राट अकबर आणि निजामशाहीचा वजीर मलिक अंबर यांनी आपापल्या राज्यात जमीन महसूल व्यवस्था निर्माण केली. अकबरने मुघल साम्राज्याची जमीन महसूल व्यवस्था ही राजा तोडरमल याच्या मदतीने स्थापित केली. मलिक अंबरने मुघल प्रदेशातील जमीन महसूल व्यवस्थेमध्ये स्थानिक परिस्थितीनुसार बदल करून जमीन महसूल व्यवस्था लागू केली.

मध्ययुगीन भारतात मोठ्याप्रमाणात अंतर्गत व परराष्ट्र व्यापार होत होता. अनेक व्यापारी केंद्रे उदयाला आली. अनेक व्यापारी जमाती यांनी व्यापारात मोठी भूमिका बजावली. मुघलकाळात भारताचा परराष्ट्र व्यापार मोठ्याप्रमाणात वाढला. या काळात परराष्ट्रीय व्यापारास मोठ्या प्रमाणावर चालना मिळाली होती. हा परराष्ट्रीय व्यापार भारतातील पूर्व व पश्चिम किनाऱ्यारील बंदरातून चालत होता. भारतातून परराष्ट्रीय व्यापारात प्रामुख्याने मलमल, सुती व रेशमी कापड, मसाल्याचे पदार्थ, मौल्यवान रत्ने, अत्तरे, विविध प्रकारचे सुगंधी तेल, साखर, विविध प्राण्यांची कातडी इत्यादी वस्तू निर्यात केल्या जात होत्या, तर सोने, चांदी, केशव, घोडे व श्रीमंतांच्या चैनीच्या वस्तू आयात केल्या जात होत्या.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

(अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (दीर्घोत्तरी प्रश्न)

१) अकबरकालीन मुघल साम्राज्याच्या केंद्रीय प्रशासन व्यवस्थेचे वर्णन करा.

२) मुघलकालीन प्रांतीय प्रशासन व्यवस्था स्पष्ट करा.

३) मुघल साम्राज्यातील जमीन महसुल व्यवस्थेचे वर्णन करा.

४) मध्ययुगीन कालखंडातील उद्योगधंद्याविषयी सविस्तर माहिती लिहा.

(ब) टिपा लिहा. (लघुत्तरी प्रश्न)

१) सरकार पातळीवरील प्रशासन

२) परगणा प्रशासन

३) ग्राम प्रशासन

४) मलिक अंबरची जमीन महसुल व्यवस्था

५) मध्ययुगीन अंतर्गत व्यापार

६) मध्ययुगीन परराष्ट्रीय व्यापार

### ३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


- कृ. ना. चिटणीस, मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था, खंड १ ते ४, पुणे, १९८२
- एन. ए. सिद्धीकी, मोगलकालीन महसुल पद्धती, डायमंड प्रकाशन, पुणे, २००६.
- Satish Chandra, History of Medieval India (800-1700), Orient Longman, Hyderabad, 2007
- B. G. Tamaskar, The Life and Work of Malik Ambar, Idarah - I, Adabiyat-I, Delhi, 1978.


❑❑❑

## घटक ४
# धर्म, कला आणि स्थापत्य

**अनुक्रमणिका**


४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

 ४.२.१ शीख धर्म

 ४.२.२ लघुचित्रे : मुघल आणि दख्खन

 ४.२.३ स्थापत्य : ताजमहाल, गोलघुमट, गोवळकोंडा किल्ला

४.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

४.४ स्वयं अध्ययन प्रश्न आणि उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


## ४.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास -

- शीख धर्माच्या स्थापनेबद्दल माहिती जाणून घेता येईल.
- शीख धर्माचे स्वरूप, रचना आणि प्रसार याविषयी जाणून घेता येईल.
- मुघल काळातील व दख्खन मधील लघुचित्रांबद्दल अधिक माहिती मिळेल.
- ताजमहाल, गोलघुमट आणि गोवळकोंडा किल्ल्याच्या स्थापत्याबद्दल माहिती मिळेल.

## ४.१ प्रस्तावना

या घटकामध्ये मध्ययुगीन भारताच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाचा आढावा घेण्यात आला आहे. पंजाबमध्ये १५ व्या शतकात शीख धर्माचा उदय झाला. ही घटना वैशिष्ट्यपूर्ण मानली जाते. शिख धर्माविषयी आढावा सदर प्रकरणामध्ये घेण्यात आला आहे. मुघल आणि दख्खन काळातील गुंतागुंतीच्या पर्शियन आणि भारतीय कलात्मक परंपरेच्या संमिश्रणाचे उदाहरण देणाऱ्या लघुचित्रांच्या उत्कृष्ट कला

प्रकारांचा आढावा सदर घटकात घेण्यात आला आहे. शेवटी या घटकात तीन प्रतिष्ठित वास्तुशिल्पांवर प्रकाश टाकला आहे. ताजमहाल हे मुघल स्थापत्यकलेचे एक प्रतिक त्याच्या सौंदर्यासाठी आणि महत्त्वासाठी प्रसिद्ध आहे. गोलघुमट, दख्खन वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना, त्याच्या प्रचंड घुमट आणि ध्वनिक चमत्कारांसाठी प्रसिद्ध आहे. आणि गोवळकोंडा किल्ला, जो मध्ययुगीन भारतीय तटबंदीच्या भव्यतेचा आणि सामरिक पराक्रमाचा दाखला देतो. या सर्व बाबींचा आढावा सदर प्रकरणात घेण्यात आला आहे.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ शीख धर्म

#### ४.२.१.१ स्वरूप आणि रचना

**गुरु नानक व शीख धर्माची स्थापना :**

गुरु नानकांनी शीख धर्माची स्थापना केली. 'शीख' या शब्दाचा अर्थ शिष्य असा घेण्यात येतो. गुरु नानकांच्या अनुयायांना शिष्य म्हणजेच 'शीख' असे संबोधले जाते. गुरु नानक भारतभर फिरले. अनेक तीर्थस्थळांना भेटी दिल्या. ते मक्केलाही जाऊन आले. गुरु नानकांनी आपल्या भ्रमंतीनंतर गुरुदासपूर जिल्ह्यातील करतारपूर येथे आपले जीवन घालविले. साध्या, सरळ व त्यागमय जीवनावर त्यांचा भर होता. गुरु नानकांनी आपल्या शिष्यांना जो उपदेश केला. तो ग्रंथरुपाच्या माध्यमातून संग्रहित करण्यात आला. या पवित्र ग्रंथास 'ग्रंथसाहेब' (आदिग्रंथ) असे संबोधले जाते. शिखांचा हा धर्मग्रंथ असून गुरुद्वारामध्ये त्याचे पठन केले जाते. शिखांचे दहावे गुरु, गुरु गोविंदसिंग यांच्या आदेशानुसार त्यांच्या पश्चात शीख धर्मीय 'ग्रंथसाहेबास' गुरु मानून या पवित्र धर्मग्रंथाचे पठण करतात.

**अमृतसरची उभारणी :**

अमृतसर हा शिखांचा प्रमुख गुरुद्वारा होय. शिखांचे चौथे गुरु रामदास यांनी तलाव खोदण्याचे व शहर उभारणीचे काम हाती घेतले, व्यापारपेठ वसविली. खोदण्यात येणाऱ्या सरोवराला गुरु रामदासांनी 'अमृतसर' हे नाव दिले. या नावावरुनच या शहराला अमृतसर हे नाव मिळाले. सरोवराचे खोदकाम पाचवे गुरु, गुरु अर्जुनसिंगांच्या काळात पूर्णत्वास गेले. या सरोवराच्या मध्यभागी सुवर्णमंदिर उभारण्यात आले. शिखांचा धर्मग्रंथ 'ग्रंथसाहेव' सुवर्णमंदिरात ठेवण्यात आला आहे.

**शीख धर्माचा प्रसार :**

गुरु नानकांनी स्थापन केलेल्या शीख धर्माच्या प्रसाराचे कार्य शीख धर्मगुरुंनी केले. त्यांनी पंजाब व भारताच्या पश्चिम भागात धर्मप्रसाराचे काम केले. गुरु अंगद यांनी गुरु नानकांचे जीवन व कार्य लोकांना समजण्यासाठी आपला शिष्य बाला यांस गुरु नानकांचे चरित्र लिहण्याची आज्ञा केली. गुरु अंगदांनी 'गुरुमुखी' सर्वसामान्यापर्यंत पोहचविली. गुरु अमरदासांनी शीख संप्रदाय संघटीत होण्यासाठी २२ विभागाची रचना केली. विवाहप्रसंगी गुरुवाणीतील वचने वाचली पाहिजेत असा आदेश काढला. त्यांच्या कालखंडात

कनिष्ठ वर्गातील लोक मोठ्या प्रमाणात शीख धर्मात समाविष्ठ झाले. शीख धर्माचे सातवे गुरु गुरु हरिराय यांनी धर्मप्रसाराच्या कार्याला प्राधान्य दिले. देशभर शीख धर्मप्रसारासाठी ३६० गाद्या म्हणजे धर्मकेंद्रे सुरू केली. शीख धर्मप्रसारासाठी त्यांनी देशभर धर्मप्रसारक पाठविले. गुरु तेजबहादूर यांनी धर्मप्रसारासाठी तीर्थयात्रा सुरु केली.

शीख आणि क्षात्रधर्म गुरु अर्जुन यांनी शीख समाज संघटीत केला. त्यांनी शिखांना क्षात्र धर्माची दीक्षा देऊन त्यांच्यामध्ये राष्ट्रप्रेम वृद्धींगत केले. गुरु हरगोविंद यांनी राजकीय सत्ता आपल्या हाती घेण्यासाठी सैन्य उभारले, स्वतःचे घोडदळ निर्माण केले. ते म्हणतात, ''ज्याचे शस्त्र त्याचे राज्य, ज्याचे शस्त्र त्याचा धर्म.''

मुघल व शीख यांच्यातील संघर्षात गुरु तेजबहादूर पकडले गेले. औरंगजेबाने त्यांना ठार केले. वडिलांच्या हत्येचा सूड घेण्याचे गुरु गोविंदसिंगानी ठरविले. त्यांनी शिखांचे संघटन करून त्यांच्यातील क्षात्रधर्म जागा केला. त्यांनी शीख पंथीयांची खालसा संघटना स्थापन केली. खालसा पंथ म्हणजे पवित्र, स्वतंत्र, तत्त्वनिष्ठ व लढाऊ असा पंथ होय. या पंथाने ५'क' वापरण्यास सुरवात केली. यामध्ये The Five 'Ks' - Kes - Longhair, Kanga - a - comp, Kripan - a - sword, Kacch - Shorts, Kara - Steel bracelet यांचा समावेश होतो.

गुरु गोविंदसिंगांच्या लष्करी धोरणामुळे औरंगजेब संतापला. कारण पहाडी मुलखातून मुघलांना मिळणारा महसूल बंद झाला होता. औरंगजेबाने लाहोरच्या सुभेदारावर गुरु गोविंदसिंगांच्या बंदोबस्ताची जबाबदारी सोपविली. मुघलांनी आनंदपूरवर आक्रमण केले पण गुरु गोविंदसिंगांनी त्यांचा पराभव केला यानंतर गुरु गोविंदसिंगांनी लोहगड, फत्तेगड, फुलगड व आनंदगड असे मजबूत किल्ले बांधून आपला प्रदेश सुरक्षित केला.

**खालसा पंथातील पंचप्यारे :**

गुरु गोविंदसिंगांनी खालसा ही लढाऊ संघटना स्थापन केली. शिखांच्यामधील क्षात्रतेजाला चेतावणी दिली. शिखांच्यातील क्षात्रतेजाची व धर्मप्रेमाची परीक्षा घेण्याचे त्यांनी ठरविले. त्यांनी आनंदपूर येथे सन १६६६ मध्ये ८० हजार लोकांच्या उपस्थितीत नाट्यपूर्ण रीतीने म्यानातून तलवार काढली व आपल्या शीख बांधवांना प्रश्न केला.''धर्मासाठी प्राण देण्यास कोण तयार आहे?'' सर्वप्रथम लाहोरच्या दयारामने तयारी दर्शविली. तो स्टेजवर येताच गुरु गोविंदसिंगांनी त्यास स्टेजमागील तंबूत नेले. बकऱ्यावर तलवार मारली व स्टेजवर येऊन रक्ताने माखलेली तलवार लोकांना दाखविली. याचप्रमाणे जगन्नाथ, धरमचंद, सोहवचंद व हिंमतराय यांचीही परीक्षा घेतली. शीख धर्मासाठी बलिदान देण्यास तयार झालेल्या या पाच शूर वीरांना शीख धर्मामध्ये पंचप्यारे म्हणून ओळखले जाते. हे पाच शुर वीर अनुक्रमे खत्री, जाट, परीट, न्हावी व कहार अशा पाच जातीचे होत. गुरु गोविंदसिंगांनी या पाच शूर वीरांना अमृतदीक्षा दिली.

**शिखांची धार्मिक केंद्रे :**

**अमृतसर :** शिखांचा प्रमुख गुरुद्वारा अमृतसर येथे आहे. गुरु रामदासांनी शहर उभारणीचे, बाजारपेठ वसविण्याचे काम सुरू केले. त्याचबरोबर एक प्रचंड तलाव खोदण्याचे काम सुरु केले. या तलावाला अमृतसर असे नाव दिले. यावरुनच शहराला अमृतसर असे नाव मिळाले. या सरोवराचे काम गुरु अर्जुनसिंगाच्या काळात पूर्णत्वास गेले. तलावाच्या मध्यभागी सुवर्णमंदिराची उभारणी करण्यात आली. सुवर्णमंदिरात शिखांचा पवित्र धर्मग्रंथ 'ग्रंथसाहेब' ठेवण्यात आला आहे.

**पाटणा :** शिखांचे दहावे गुरु गुरु गोविंदसिंग यांचे पाटणा हे जन्मस्थळ होय. शीख धर्मासाठीच्या गुरु गोविंदसिंगांच्या योगदानामुळे त्यांचे जन्मस्थळ असणारा येथील गुरुद्वारा महत्त्वाचा समजला जातो.

**आनंदपूर :** गुरु गोविंदसिंगांचे वडिल गुरु तेजबहादूर मुघल-शीख संघर्षात ठार झाले. याचा त्यांनी बदला घ्यायचे ठरविले. त्यांनी शिखांचे संघटन केले. आनंदपूर येथे लढाऊ खालसा पंथाची स्थापना केली. आनंदपूर येथेच त्यांनी वास्तव्य केले. इ. स. १६६६ मध्ये आनंदपूर येथेच खालसा पंथातील पंचप्यारे यांची परीक्षा घेतली. त्यामुळे येथील गुरुद्वारा महत्त्वपूर्ण आहे.

**नांदेड :** महाराष्ट्रातील नांदेड येथे गुरु गोविंदसिंगांची समाधी आहे. त्यामुळे शीख पंथीयांचे दक्षिणेकडील प्रमुख केंद्र म्हणून नांदेड प्रसिद्धीस आले आहे.

**इतर धार्मिक केंद्रे :**

**लाहोर :** गुरु गोविंदसिंग यांच्या कसोटीत उतरलेला पंचप्यारे मधील पहिला शिष्य 'दयाराम' याचे लाहोर हे जन्मस्थळ होय.

**दिल्ली :** शिखांचे नववे गुरू तेजबहादूर यांची औरंगजेबाने दिल्ली येथे हत्या केली. त्यामुळे येथील गुरुद्वारा महत्त्वपूर्ण आहे.

**द्वारका :** द्वारका येथे मोहनचंद याने गुरू गोविंदसिंगांच्या आज्ञेनुसार आत्मबलिदान दिले. त्यांच्या स्मरणार्थ याठिकाणी भव्य गुरुद्वारा बांधण्यात आला आहे.

**जगन्नाथपुरी :** गुरू गोविंदसिंगांच्या कसोटीस उतरलेला पंचप्यारे मधील हिंमतराय हा जगन्नाथपुरीचा असल्याने येथील गुरुद्वारा महत्त्वाचा मानला जातो.

**बिदर :** गुरू गोविंदसिंगांच्या कसोटीस उतरलेला पंचप्यारे पैकी जगन्नाथ हा विदरचा असल्याने येथील गुरुद्वारा महत्त्वाचा मानला जातो.

**शिखांचा गुरुद्वारा :**

शिखांचा गुरुद्वारा म्हणजे त्यांचे प्रार्थना मंदिर होय. शीख गुरुद्वारामध्ये देवमूर्ती असत नाही. तर येथे गुरू नानकांचे विचार, शीख गुरूंचे विचार संग्रहित केलेला शिखांचा पवित्र धर्मग्रंथ 'ग्रंथसाहेब' कमी उंचीच्या

चौरंगावर स्थानापन्न केला जातो. 'ग्रंथसाहेब' भरतकाम केलेल्या रेशमी रुमालात ठेवण्यात येतो. रोज सकाळी आदरपूर्वक 'ग्रंथसाहेब' रेशमी रुमालामधून उघडण्यात येतो. स्त्री-पुरुष 'ग्रंथसाहेबाचे' वाचन करतात. संध्याकाळी पुन्हा गुरूग्रंथ रेशमी रुमालात ठेवण्यात येतो.

गुरूद्वारामध्ये पहाटे पाचपासून प्रातःकालीन पाठ सुरू होतात. शीख धर्मिय जपुजी, सुखमनी, आसादीवार, जाप व आनंद हे नित्याचे पाठ म्हणतात. या पाठानंतर उपासनेसाठी आलेले लोक उभे राहून गुरू अर्जुनसिंग यांच्या सुखमनीतील प्रार्थना म्हणतात. आणि शेवटी दहा गुरू, चार राजपुत्र, पंचप्यारे व चाळीस हुतात्मे यांचे स्मरण केले जाते. येथे प्रार्थना समाप्त होते. प्रार्थनेनंतर प्रसाद म्हणून सर्वांना गोड शिऱ्याचा प्रसाद वाटण्यात येतो. संध्याकाळी व रात्रीही पाठ, प्रार्थना होतात. शीख धर्मीय गुरू गोविंदसिंगानी सांगितलेल्या ५ 'क्ष' चा काटाक्षाने वापर करतात. गुरुद्वारामध्ये जाताना हात-पाय धुवून जावे लागते. पुरुष उघड्या डोक्याने न जाता पगडी, फेटा वा हातरुमालाचा वापर करतात तर स्त्रिया डोक्यावर पदर घेऊन गुरुद्वारामध्ये प्रवेश करतात.

**४.२.१.२ शीख धर्म पंथातील गुरू :**

गुरू नानकांपासून ते गुरू गोविंदसिंगापर्यंत शीख धर्म पंथामध्ये दहा गुरू झाले. शीख धर्मगुरूंनी पंजाब व भारताच्या पश्चिम व उत्तर भागात शीख धर्मप्रसाराचे कार्य केले. शीख समाज संघटीत केला. त्यांच्यातील क्षात्र धर्म जागा केला. ईश्वराचे खरे स्वरूप समजावून सांगितले. शीख पंथातील दहा गुरू व त्यांचा कालखंड पुढीलप्रमाणे -

१. गुरू नानक (इ. स.१४६९ ते १५३९)

२. गुरू अंगद (इ. स. १५३९ ते १५५२)

३. गुरू अमरदास (इ. स. १५५२ ते १५७४)

४. गुरू रामदास (इ. स. १५७४ ते १५८१)

५. गुरू अर्जुनसिंग (इ. स. १५८१ ते १६०६)

६. गुरू हरगोविंद (इ. स. १६०६ ते १६४५)

७. गुरू हरिराय (इ. स. १६४५ ते १६६१)

८. गुरू हरिकिशन (इ. स. १६६१ ते १६६४)

९. गुरू तेजबहादूर (इ. स. १६६४ ते १६७५)

१०. गुरू गोविंदसिंग (इ. स. १६७५ ते १७०८)

**१. गुरु नानाक :**

गुरू नानक यांचा जन्म दिनांक २६ नोव्हेंबर, १४६९ रोजी पंजाबमधील गुजरानवाला जिल्ह्यातील तलवंडी येथे खत्री परिवारात झाला. गुरू नानक संसारी जीवनात रमले नाहीत. ते देशभर फिरले. अनेक

धर्मियांच्या तीर्थस्थळांना त्यांनी भेटी दिल्या. लोकांच्या भक्तीमधील एक-सारखेपणा गुरू नानकांच्या ध्यानी आला. गुरू नानकांनी आपल्या भ्रमंतीनंतर पंजाबमधील गुरुदासपूर जिल्ह्यातील करतारपुर येथे आपले जीवन व्यतीत केले. करतारपूर येथेच इ. स. १५३९ मध्ये गुरू नानकाचे निधन झाले.

गुरू नानकांनी शीख संप्रदायाची स्थापना केली. साध्या, सरळ व त्यागमय जीवनावर त्यांचा भर होता. संसारी सुखात राहूनही मोक्ष मिळविता येतो असे त्यांनी प्रतिपादन केले. 'स्त्री हा मानवसृष्टीचा मूलाधार आहे' हा महान संदेश त्यांनीच दिला. ते म्हणतात, सर्व मानव समान आहेत. समतेवर त्यांचा भर होता. जातीयता व अस्पृश्यता म्हणजे समाजव्यवस्थेला लागलेली किड आहे. ती नष्ट करण्यावर त्यांनी भर दिला. हिंदू व मुस्लीम धर्मियांना एकत्र आणून त्यातून नवा समाज उभा करणे हे गुरू नानकांचे ध्येय होते. गुरू नानकांनी आपल्या शिष्यांना जो उपदेश केला तो ग्रंथरूपात संग्रहित करण्यात आला. या ग्रंथास आदिग्रंथ तथा 'ग्रंथसाहेब' असे संबोधले जाते. शिखांचा हा पवित्र धर्मग्रंथ होय. गुरूद्वारामध्ये 'ग्रंथसाहेबाचे' पठण केले जाते. शिखांचे दहावे गुरू गुरू गोविंदसिंग यांच्या आदेशानुसार त्यांच्या पश्चात गुरू होणार नाही. यापुढे 'ग्रंथसाहेब' या धर्मग्रंथास गुरू माणण्यात यावे शीख धर्मीय 'ग्रंथसाहेवास' गुरू मानून त्याचे पठण करतात.

### २. गुरू अंगद :

गुरू अंगद हे गुरू नानकांचे शिष्य होत. त्यांनी गुरू नानकांचा विश्वास संपादन केला. गुरू नानकांनी आपल्या पश्चात अंगदाची गुरूपदी निवड केली. गुरू अंगद गुरू नानकांच्या सहवासात येण्यापूर्वी माता दुर्गेचे भक्त व उपासक होते. गुरू नानकांनी शीख धर्माची सर्व धुरा त्यांच्यावर सोपविली. गुरू अंगद यांनी परिश्रमपूर्वक 'गुरुमुखी' सर्वसामान्यांपर्यंत पोहचविली. गुरू अंगदांनी आपला शिष्य बाला यांस गुरू नानकांचे चरित्र लिहण्याची आज्ञा केली. शीख पंथीयांनी वेदविद्यज्ञा व ब्राह्मण वर्गाचे वर्चस्व अमान्य केले होते. गुरू अंगदांनी यांवर भर दिलाच, त्याचबरोबर त्यांनी उदासी पंथाच्या लोकांनाही शीख पंथातून बाहेर काढले. गुरू नानकांच्या थोरल्या मुलाचाही यामध्ये समावेश होता. थोडक्यात अत्यंत परिश्रमपूर्वक गुरू अंगदांनी शीख धर्मप्रसार केला. गुरू अंगद यांच्याबाबत असे म्हटले जाते की, गुरू नानकांनी अंगद यांची गुरुपदी नियुक्ती केली नसती तर शीख धर्मपंथ गुरु नानकांच्या पश्चात संपुष्टात आला असता.

### ३. गुरू अमरदास :

गुरू अंगदानंतर गुरुपदी गुरू अमरदास आले. सुरवातीस ते वैष्णवपंथी होते. पुढे त्यांनी शीख संप्रदायाचा प्रचार व प्रसारास वाहून घेतले. गुरुपदी आल्यानंतर अमरदासांनी शीख संप्रदाय संघटीत करण्यासाठी २२ विभागाची निर्मिती केली. या विभागांना 'मंजी' असे संबोधले जाते. गुरू अमरदासांच्या कालखंडातच कनिष्ठ वर्गातील लोक शीख संप्रदायामध्ये समाविष्ठ झाले. तर वरिष्ठ वर्गाचा शीख संप्रदायास असणारा विरोध मावळला. समाजातील श्रेष्ठ-कनिष्ठ अशी भेदभावाची दरी कमी करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना यश आले. विवाहप्रसंगी गुरुवाणीतील शब्द वाचले पाहिजेत, असा आदेश त्यांनी काढला. गुरू

अमरदासांचे धार्मिक व सामाजिक कार्य पाहून सम्राट अकबराने त्यांना मोठी जमीन देऊ केली होती पण गुरू अमरदासांनी ती नम्रपणे नाकारली. मात्र यामुळे शीख धर्म व गुरू अमरदास यांची प्रतिष्ठा वाढली.

### ४. गुरू रामदास :

गुरू अमरदासांनी आपल्या मुलाऐवजी जावयाची गुरुपदी निवड केली. शीख धर्मियांचे प्रमुख धार्मिक केंद्र असणाऱ्या अमृतसरच्या उभारणीस गुरू रामदासांनी सुरवात केली. त्यांनी व्यापारपेठ बसविली. व्यापाराच्या भरभराटीसाठी जवळजवळ ५२ व्यवसायांच्या लोकांना त्यांनी अमृतसरला आणले. त्यांनी शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी मोठे सरोवर खोदण्याच्या कामास सुरवात केली. या सरोवराला त्यांनी 'अमृतसर' असे नामाभिदान दिले. यावरूनच या शहराला अमृतसर असे नाव प्राप्त झाले. पुढे या सरोवराच्या मध्यभागी सुवर्णमंदिराची उभारणी करण्यात आली.

### ५. गुरू अर्जुनसिंग :

सन १५८१ मध्ये गुरू अर्जुनसिंग गुरुपदी आले. त्यांच्याच कालखंडामध्ये 'ग्रंथसाहेब' या शिखांच्या धर्मग्रंथाची रचना पूर्णत्वास गेली. शीख समाज संघटीत करण्यावर त्यांनी भर दिला. त्यात त्यांना यश आले. प्रत्येक शिखाने एक विशिष्ठ अशी रक्कम गुरुदक्षिणा म्हणून गुरुंना दिली पाहिजे असा त्यांनी दंडक घातला. अवतार कल्पना, तीर्थयात्रा, कर्मकांड यांस त्यांनी फाटा दिला. गुरू अर्जुनसिंगांच्या काळातच शिखांनी वेदांचे वर्चस्व नाकारले. गुरू अर्जुनसिंगांचा राष्ट्रीयत्वावर भर असल्याने त्यांनी शिखांना क्षात्र धर्माची दीक्षा दिली. शिखांच्यामध्ये अस्मिता जागी झाल्याने त्यांनी मुघलांच्या जुलूमशाहीविरुद्ध आवाज उठविला. शहजादा खुस्त्रो याने आपले वडिल जहांगिरच्या विरोधात बंड पुकारले, शहाजादा खुस्त्रो वाचे बंड यशस्वी करण्यासाठी गुरू अर्जुनसिंगांनी त्यास सर्वतोपरी मदत केली. परिणामता संतापलेल्या जहांगिरने गुरू अर्जुनसिंगांना ठार केले.

### ६. गुरू हरगोविंद :

इ. स. १६०६ मध्ये गुरू हरगोविंद गुरूपदी आले. गुरू अर्जुनसिंगांनी शिखांना क्षात्र धर्माची दिक्षा दिली होती. गुरु हरगोविंदांनी शिखांच्यात संघटन करण्याचे काम, सैन्य उभारणीचे काम, घोडदळ निर्माण करण्याचे कार्य सुरू केले. राजकीय सत्ता आपल्या हाती घेण्यासाठी प्रयत्न सुरू केले. 'ज्याचे शस्त्र त्याचे राज्य, ज्याचे शस्त्र त्याचा धर्म' असा महत्त्वपूर्ण सिद्धांत गुरू हरगोविंदांनी मांडला. शिखांना संघटीतपणाचे महत्त्व पटवून सांगताना ते म्हणतात, 'आपण जर एक असू तर मुघल सत्तेचा पाडाव करणे आपणास अशक्य नाही. गुरू हरगोविंदांनी समाजातील जातीभेद नष्ट करत सर्वांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. मूर्तिपूजा अमान्य केली. कर्मकांडाविरुद्ध धोरण आखले. संसार व परमार्थ या दोहोंचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. गुरू हरगोविंदांच्या धोरणात्मक निर्णयामुळे शीख समाज लष्करी व राजकीय दृष्ट्या जागृत झाला.

### ७. गुरू हरिराय :

गुरू हरगोविंद यांनी आपल्या अवघ्या १४ वर्षे वयाच्या नातवाची गुरुपदी नियुक्ती केली. गुरू हरगोविंद म्हणजे आपल्या आजोबांच्या सल्ल्यानुसार गुरू हरिराय यांनी प्रचंड घोडदळाची निर्मिती केली. मात्र

गुरू हरिराय वृत्तीने शांत असल्याने लष्करी युद्ध मोहिमामध्ये त्यांना रस नव्हता. त्यांनी लष्करी कामगिरीपेक्षा धर्मप्रसाराच्या कार्यावर भर दिला. त्यांनी मीर, वैरागी, भगत इत्यादींना शीख धर्मामध्ये समाविष्ठ केले. गुरू हरिराय यांनी कीरतपूरहून धर्मप्रसाराचे कार्य चालविले. भारतभर शीख धर्माच्या प्रसारासाठी ३६० गाद्या म्हणजे धर्मकेंद्रे निर्माण केली. या धर्मकेंद्राच्या, अडी-अडचणी सोडविण्यासाठी, धर्मकेंद्राला मदत करण्यासाठी त्यांनी बक्षिसी नावाची एक संस्था निर्माण केली. शीख धर्माचा देशभर प्रसार व्हावा वासाठी त्यांनी धर्मप्रसारक पाठविले. शीख धर्म प्रसारासाठी भाई सेंगतीचा यांस दुआबात तर भाई गौंडा यांस काबूलला पाठविले. त्यांच्या धर्मप्रसाराच्या कार्यामुळे शीख धर्म सर्वदूर पोहचण्यास मदत झाली.

**८. गुरू हरिकिशन :**

इ. स. १६६१ मध्ये गुरू हरिकिशन गुरुपदी आले. त्यांना अवघा तीन वर्षाचा कालावधी मिळाला. त्यांनी आपल्या अल्प कालखंडातही धर्मप्रसाराचे मोठे काम केले. शीख धर्म संघटना महत्त्वाची असल्याचे लोकांना पटवून दिले. आपल्या शांत सौजन्यशील वृत्तीने लोकांना आपलेसे केले. गुरू हरिकिशन यांनी असे भाकीत केले की, बंकाला नावाच्या खेड्यातील कोणी एक माणूस शीख धर्म प्रज्वलीत करील त्यांचे भाकीत पुढे खरेही ठरले. असे म्हटले जाते की ते आपल्या शिष्यांसह औरंगजेबाच्या भेटीसाठी गेले होते मात्र इतिहासात याबाबत मतभेद आहेत.

**९. गुरू तेजबहादूर :**

गुरू हरगोविंदांचे पुत्र गुरू तेजबहादूर इ. स. १६६४ मध्ये गुरुपदी आले. यावेळी शीख समाज अस्थिरतेने ग्रासला होता. अधिकारी भ्रष्ट झाले होते. गुरू अर्जुनसिंगांच्या कालखंडापासून प्रत्येक शिखाकडून गुरू दक्षिणा जमा करण्यासाठी ठिकठिकाणी 'मसंद' नावाचे अधिकारी नेमले होते. मात्र असे जबाबदार अधिकारीही अत्यंत स्वार्थी झाले होते. शीख समाजाला फुटीरतेची लागण झाली होती. गुरू तेजबहादूरांच्या नातेवाईकांनीही त्यांच्याविरुद्ध बंड पुकारले होते. एवढेच काय त्यांचा भाऊही मुघलांना सामील झाला होता.

वरील सर्व अडचणींवर मात करण्यासाठी त्यांनी लष्कराची उभारणी केली. स्वतःची नाणी तयार केली. शीख धर्मास आलेली मरगळ झटकण्यासाठी तीर्थयात्रा सुरू केली. धर्मप्रसारावर भर दिला. मुघल सत्ताधिशांकडून होणारे सक्तीचे धर्मांतर, शिखांवर होणारे अन्याय या विरोधात ते उभे ठाकले. मुघलांच्या विरोधात शस्त्रसज्ज लष्कराची जमावाजमव केली. गुरू तेजबहादूर म्हणतात, ''चारही वर्णियांच्या माणसांना आपण सिंह बनवून मुघलांना नष्ट करू'' मुघल-शीख यांच्यात झालेल्या संघर्षात ते बादशहा औरंगजेबाकडून पकडले गेले. औरंगजेबाने गुरू तेजबहादूर यांना ठार मारले. यामुळे शीख व मुस्लीम यांच्यात शत्रुत्वाची भावना वाढीस लागली.

**१०. गुरू गोविंदसिंग :**

गुरू गोविंदसिंग हे गुरू तेजबहादूरांचे पुत्र होत. शीख पंथातील ते दहावे व शेवटचे गुरू होत. गुरू गोविंदसिंगांचे वडिल औरंगजेबाकडून मारले गेले. याचा सुड घेण्याचे त्यांनी ठरविले. शिख धर्मियांचे संघटन

केले. प्रचंड लष्करवाढ केली. शीख धर्मियांना त्यांच्या क्षात्रधर्माची आठवण करून दिली. राजस्थानमधील भेटावयास आलेल्या एका शिष्टमंडळाला परखडपणे सुनावताना गुरू गोविंदसिंग म्हणतात की, ''तुम्ही आपल्या मुली मुघलांना देऊन त्यांची सेवा करता, त्यामुळे तुमचे धन व तुमच्या कन्या यावर आपला अधिकारच आहे. असे तुर्क समजतात व ते तुम्ही मान्य करता? तुमच्यात काही क्षात्रतेज उरले नाही काय? तुर्कांनी चालविलेल्या या घोर अन्यायाचा प्रतिकार करण्याऐवजी तुम्ही कसल्या धर्मा-अधर्माच्या क्षुत्र गोष्टी घेऊन बसला आहात. आम्ही मात्र तुर्कांनी चालविलेल्या अन्यायाचा प्रतिकार करण्याचे ठरविले आहे. त्यास तुम्ही मदत करावी.''

गुरू गोविंदसिंगांनी शीख पंथीयांमधील क्षात्रधर्म जागता राहावा यासाठी शीख पंथीयांची खालसा संघटना स्थापन केली. खालसा पंथ म्हणजे पवित्र, स्वतंत्र, तत्त्वनिष्ठ व अत्यंत लढाऊ असा पंथ होय.

गुरू गोविंदसिंगांच्या लढाऊ बाण्यामुळे व आक्रमक लष्करी धोरणामुळे बिथरलेले रजपूत राजेच त्यांच्यावर चाल करून आले. परंतु त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. गुरू गोविंदसिंगांनी अनेक पहाडी सत्ताधिशांना आपल्या बाजूस वळविले. गुरू गोविंदसिंगांनी आपली आघाडी मजबूत केली. पहाडी मुलखातून मिळणारा महसूल बंद झाल्यामुळे बादशहा औरंगजेब संतापला. त्याने गुरू गोविंदसिंगांचा बंदोबस्त करण्याचे ठरविले. मात्र यावेळी बादशहा औरंगजेब मराठ्यांचे राज्य नष्ट करण्यासाठी धडपडत होता. परंतु मराठे त्यास दाद देत नव्हेत,यामुळे औरंगजेबास दक्षिणेतच थांबणे आवश्यक वाटत होते. म्हणून औरंगजेबाने गुरू गोविंदसिंगांच्या बंदोबस्ताची जबाबदारी लाहोरच्या सुभेदारावर सोपविली. यानुसार मुघलांनी आनंदपूरवर स्वारी केली पण शिखांकडून त्यांना पराभव पत्करावा लागला. मुघलांचा पराभव केल्यानंतर गुरू गोविंदसिंगांनी आनंदपूर भोवतालच्या प्रदेशात लोहगड, फत्तेगड, फुलगड, आनंदगड अशा भक्कम किल्ल्यांची बांधणी केली व आपला प्रदेश लष्करीदृष्ट्या सुरक्षित केला.

लाहोरच्या मुघल सुभेदाराचा झालेला दारुण पराभव व गुरू गोविंदसिंगांची लष्करी घौडदौड यामुळे बादशहा औरंगजेब संतापला. त्याने शहजादा मुअज्जम व अनेक रजपूत सरदार यांच्याबरोबर प्रचंड सैन्य देऊन गुरू गोविंदसिंगांच्या बंदोबस्तास पाठविले. मुघल सैन्याने आनंदपूरला वेढा दिला. परिस्थितीचा विचार करून गुरू गोविंदसिंगांनी बचावात्मक धोरणाचा अवलंब करून चमकौरचा किल्ल्याकडे प्रयाण केले. शिखांनी कडवी झुंज दिली. मात्र यामध्ये गुरू गोविंदसिंगांचे दोन पुत्र मारले गेले. परंतु गुरू गोविंदसिंगांना पराभूत करण्यात मुघलांना यश मिळाले नाही. दरम्यान दि. २० फेब्रुवारी १७०७ रोजी मराठ्यांची लढत देणारा बादशहा औरंगजेब अहमदनगर येथील भुईकोट किल्ल्यात मृत्यू पावला.

बादशहा औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शहजादा बहादूरशहा व शहजादा मुअज्जम यांच्यामध्ये यादवी युद्ध झाले. गुरू गोविंदसिंगांनी बहादूशहाला मदत देऊ केली. चादवी युद्धात बहादूरशहा यशस्वी झाला. त्याने गुरू गोविंदसिंगांना १ लाख मोहरा दिल्या. दोघांमध्ये मैत्रीचे संबंध वाढीस लागले. बहादूशरहाच्या विनंतीवरून गुरू गोविंदसिंग दक्षिणेत आले. मराठ्यांच्या प्रमाणेच व मराठ्यांच्या मदतीने पंजाबमध्ये स्वराज्य निर्मितीचा त्यांचा मानस होता. परंतु तो सिद्धीस जावू शकला नाही. गोविंदसिंग नादेड मुक्कामी असतानाच दोन पठाणांनी

ते झोपेत असतानाच त्यांची हत्या केली. नांदेड येथे गुरू गोविंदसिंगांची समाधी आहे. शिखांचे हे दक्षिणेकडील पवित्र धर्मस्थळ होय.

शीख धर्मपंथामध्ये गुरू नानक ते गुरू गोविंदसिंग असे दहा गुरू झाले. यानंतर गुरू झाले नाहीत कारण दहावे गुरू गोविंदसिंग यांनी असा निर्णय घेतला की, ''यापुढे कोणी गुरू होणार नाही. शिखांनी येथून पुढे 'ग्रंथसाहेबास' शरण जावे व त्यातील उपदेशाप्रमाणे वागावे. गुरूग्रंथामध्ये आजवरच्या सर्व गुरूंची आत्मज्योत प्रकाशत आहे हे लक्षात ठेवावे.''

**बंदा बैरागी (इ.स. १७०७ ते १७१६) :**

बंदा वैरागी हा लढवैय्ये शीख धर्मियांचा मानदंड होय. तो मूळचा पंजाबचा होय. संसाराचा त्याग करून तो दक्षिणेत आला. गुरू गोविंदसिंग दक्षिणेत असताना बंदा वैरागी त्यांच्या सहवासात आला. गुरू गोविंदसिंगांनी त्यास शीख पंथाची दीक्षा देऊन एका महान कामगिरीसाठी त्याची निवड केली. त्याच्याबरोबर २५ शिष्य देण्यात आले. पंजाबमधील प्रमुख सरदारांना खलिते पाठवून बंदा वैरागी याचे नेतृत्त्व स्विकारण्याची आशा करण्यात आली. गुरू गोविंदसिंगांच्या पाठिंब्यामुळे व बैरागीने ४० हजारांची फौज उभी केली. बंदास गुरू तेजबहादूर यांच्या खुनाचा तसेच गुरू गोविंदसिंगांच्या दोन मुलांच्या खुनाचा बदला घ्यावयाचा होता. बंदा वैरागीने मुलकी व लष्करी प्रशासन यंत्रणा अद्ययावत करण्याचा प्रयत्न केला. त्याने शिखांचे एक नाणे काढले. त्याच्या एका बाजूस 'गुरु गोविंदसिंग जय' असे कोरले तर दुसऱ्या बाजूस गुरू नानक व गुरू गोविंदसिंग यांचे ऋण व्यक्त करण्यात आले. बंदाने ३/४ पंजाब आपल्या वर्चस्वाखाली आणला व या प्रांतातील जमीनदार पद्धत नष्ट केली. मुघल बादशहा औरंगजेब याचा सरहिंदचा सुभेदार वजीरखान याने गुरू गोविंदसिंगांच्या दोन मुलांना ठार केले होते. त्यास बंदा बैरागीने पकडले व त्यास ठार केले. सरहिंद उद्ध्वस्त केले. यावेळी मुस्लिमांची जी कत्तल करण्यात आली त्यामुळे पंजाबमधील मुस्लिमांनी शिखांची मोठी धास्ती घेतली.

बंदाने मुघलांना दिलेल्या आव्हानांचा सामना करण्यासाठी बादशहा बहादूरशहाने त्याच्यावर मोठी फौज पाठविली. बंदाने मुवांना जेरीस आणले होते. तो हार जात नव्हता. मुघलांनी प्रसंगावधान साधून बंदा गुरुदासपूरच्या किल्ल्यात असतानाच त्या किल्ल्यास वेढा दिला. शीखांच्या पुढे रसदेचा प्रश्न निर्माण झाला. अन्नपाण्यावाचून मरण्यापेक्षा वीरमरण पत्करण्याचा निर्णय बंदा बैरागीने घेतला. तो ससैन्य बाहेर पडला. बलाढ्य मुघली सेनेसमोर त्याचा निभाव लागला नाही. मुघल सेनेशी लढता लढता बंदा बैरागी मारला गेला. (१९ जून, १७१६) यावेळी ५०० शीख सैनिकांना कैद करण्यात आले. या सैनिकांचे आतोनात हाल करण्यात आले. यावेळी प्रत्येक सैनिकास विचारण्यात आले की, 'तू मुसलमान होणार असशील तर तुझी सुटका होईल अन्यथा मारले जाईल.' अशा जीवन मरणाच्या प्रसंगात एकाही शीख सैनिकांने जीवाला घावरून मुसलमान धर्म स्वीकारला नाही. यावरून शिख धर्मियांमधील जाज्वल्य क्षत्रियत्व दिसून येते.''

लढवय्या शिखांचा धोका ओळखून बादशहा फार्रुखशिर यांनी एक आदेश काढला त्यात ते म्हणतात, ''ज्या मुघल अधिकाऱ्यांच्या हातात शीख सापडेल त्याला त्याने मुसलमान तरी करावे नाही तर ठार तरी

मारावे.'' यामुळे शीख धर्मियांची मोठी कोंडी झाली. गुरू अर्जुनसिंग, गुरू गोविंदसिंग यांनी जागृत केलेला क्षत्रिय धर्म शिखांना स्वस्थ बसू देत नव्हता. त्यांनी शिख खालसा पंथांच्या माध्यमातून शीख धर्मियांचे संघटन केले. शिखांनी इ. स. १७६९ मध्ये सर्व पंजाब आपल्या वर्चस्वाखाली आणला, मुघल विरोधाला न जुमानता शीख धर्मियांनी आपल्या स्वतंत्र राज्याची निर्मिती केली.

**४.२.१.३ तत्त्वज्ञान आणि वारसा :**

**गुरू नानक व ग्रंथसाहेब :**

गुरू नानकांनी शीख धर्माची स्थापना केली. गुरू नानकांच्या अनुयायांना शिष्य म्हणजेच शीख' असे संबोधले जाते. गुरू नानकांनी देश विदेशात भ्रमंती केली. अनेक तिर्थस्थळांना भेटी दिल्या. अखेरीस त्यांनी आपले जीवन गुरुदासपूर जिल्ह्यातील करतारपूर येथे व्यथीत केले. गुरु नानकांचे विचार शिखांचा 'आदिग्रंथ' म्हणजेच 'ग्रंथसाहेब' या पवित्र धर्मग्रंथात संकलीत करण्यात आले आहेत. गुरू नानक म्हणतात, संसारी सुखात राहूनही मोक्ष मिळविता येतो. त्यांनी समतेवर भर देत जातीयता व अस्पृश्यतेवर कठोर टिका केली. सर्व मानव समान आहेत यावरती त्यांचा भर होता. रवी ही मानवसृष्टीचा मूलाधार असल्याने कुटूंब व समाजात स्त्रियांना सन्मानाची वागणूक मिळावयास हवी यावर त्यांनी भर दिला. हिंदू व मुस्लीम यांना एकत्र आणून नविन समाज उभा करणे हे गुरू नानकांचे ध्येय होते, पण ते पूर्णत्वास जावू शकले नाहीत.

**शीख धर्माचे तत्त्वज्ञान :**

गुरू नानकांपासून ते गुरू गोविंदसिंगापर्यंत शीख धर्मात दहा गुरू झाले. त्यांनी आपल्या आचार-विचारातून शीख धर्माला तत्त्वज्ञानाची बैठक प्राप्त करून दिली. शीख धर्म तत्त्वज्ञान 'ग्रंथसाहेब' (आदिग्रंथ) यामध्ये संग्रहित करण्यात आले आहे. शीख धर्म तत्त्वज्ञान पुढीलप्रमाणे -

१. सृष्टीचा निर्माता हा ईश्वर आहे.

२. ईश्वर अनादी, अनंत, स्वयंभू व अद्वितीय असा आहे.

३. अवतार म्हणजे ईश्वर नाही.

४. ईश्वराचे नामस्मरण नित्य-नियमाने करावे.

५. ईश्वराचे नामस्मरण निःस्वार्थ भावनेने करावे.

६. सततच्या नामस्मरणाने आत्मोन्नती होते. हा मोक्षप्राप्तीचा मार्ग होय.

७. ईश्वर साधनेसाठी व मोक्षाप्रत जाण्यासाठी संन्यास घेण्याची आवश्यकता नाही.

८. शीख धर्मीयांनी गुरुद्वारामध्ये नित्यनेमाने जावे व सत्संगाचा लाभ घ्यावा.

९. संसार, प्रपंच करणे ही एकप्रकारे ईश्वरसेवाच होय.

१०. स्त्री हा मानवसृष्टीचा मूलाधार आहे.

११. प्रत्येक शिखाने गुरूनिष्ठा अंगी बाणवावी.

१२. सद्गुरू हा ज्ञानमय असून त्याचे स्मरण हे परमार्थाचे साधन होय.

१३. जीवनातील सर्व संकटांचा निर्भयपणे सामना करावा.

१४. मृत्यूला निर्भयपणे सामोरे जावे ते नव्या जीवनाचे प्रवेशद्वार आहे.

१५. मानवता धर्म हा ईश्वरी शिकवणुकीचा पाया आहे.

शीख धर्माचे तत्त्वज्ञान मानवतावादावर भर देणारे असून ते सर्वांना आचरण्यास साधे व सोपे आहे.

**शीख धर्माची आचारसंहिता :**

शीख धर्मामध्ये गुरू नानक ते गुरू गोविंदसिंग असे दहा गुरू झाले. त्यांच्या आचार-विचारांच्या माध्यमातून शीख धर्मीयांनी आचारसंहिता बनविली आहे. सर्वसामान्यांना पेलवेल असा आचारधर्म यामध्ये सांगितला आहे. शीख धर्मीय व्यक्तिगत नियमावली म्हणून तिचा अवलंब करतात.

१. नित्यनेमाने ईश्वरी नामस्मरण करावे.

२. गुरुद्वारामध्ये नियमित जावे, कारण तो ईश्वर प्राप्तीकडे जाणारा मार्ग होय.

३. मन शुद्ध व पवित्र ठेवावे.

४. राग, द्वेष, मद, मोह, मत्सर या विकारांचा त्याग करावा.

५. जीवन संयमित व संतुलित असावे.

६. स्त्रियांचा आदर करावा.

७. विश्वव्यापकता अंगी बाणवावी.

८. साधुसंतांच्या सहवासात राहावे, सत्संगात वाढ करावी.

९. मनावर संयम ठेवावा.

१०. वाणीवर संयम ठेवावा.

११. जनसेवा हीच ईश्वरसेवा समजून काम करावे.

१२. समाजकल्याणाचा विचार सतत मनी धरावा.

१३. श्रेष्ठ, कनिष्ठ असा भेदभाव मानू नये.

१४. अंधश्रद्धा, कर्मकांड, त्याज्य रुढी यांचा त्याग करावा.

१५. दोन शीख एकमेकांना भेटताना 'सत्श्रीअकाल' असे म्हणावे.

**चार धर्मपीठे :**

अमृतसर, पाटणा, आनंदपूर व नांदेड ही शिखांची चार धर्मपीठे होत. शिखांचा प्रमुख गुरूद्वारा अमृतसर येथे आहे. गुरू रामदास यांच्या कालखंडात अमृतसर सरोवराचे खोदकाम सुरू झाले. गुरू अर्जुनसिंगांच्या काळात ते पूर्णत्वास गेले. या सरोवराच्या मध्यभागी सुवर्णमंदिराची उभारणी करण्यात आली. सुवर्णमंदिरात

शिखांचा पवित्र धर्मग्रंथ 'ग्रंथसाहेब' ठेवण्यात आला आहे. पाटणा हे गुरू गोविंदसिंगांचे जन्मस्थळ होय, आनंदपूर येथे गुरू गोविंदसिगानी खालसा पंथाची स्थापना केली तसेच येथे पंचप्यारेंची परीक्षा घेतली. तर नांदेड येथे गुरू गोविंदसिंगांची समाधी आहे. त्यामुळे ही ठिकाणे शिखांची चार धर्मपीठे होत.

चार धर्मपीठाप्रमाणेच लाहोर-दयारामचे जन्मस्थळ, दिल्ली-गुरू तेजबहादूरांची समाधी, द्वारका-मोहनचंदाचे आत्मबलिदान, तर जगन्नाथपुरी-हिंमतराय व विदर जगन्नाथाची कर्मभूमी असल्याने शीख धर्मियांची ही धार्मिक स्थळे महत्वाची आहेत. शीख धर्मियांचा वारसा या धर्मस्थळांच्या माध्यमातून पहावयास मिळतो.

**शीख आणि क्षात्रधर्म :**

गुरू नानकांनी स्थापन केलेल्या शीख धर्माच्या प्रसाराचे कार्य शीख धर्मगुरूंनी पार पाडले. गुरू अंगद यांनी गुरुमुखी सर्वसामान्यापर्यंत पोहचविली. गुरू अमरदासांनी शीख समाज संघटीत करण्यासाठी २२ विभाग निर्माण केले. तर गुरू हरिराय यांनी धर्मप्रसारासाठी ३६० गाद्या/धर्मकेंद्रांची निर्मिती केली. शीख धर्मगुरूंच्या कार्यामुळे शीख धर्म पंजाब, पश्चिम व उत्तर भारतात प्रसार पावला.

शिख समाज लढवय्या म्हणून ओळखला जातो. त्यांच्यात क्षात्रधर्म जागृत करण्याचे कार्य शिख धर्मगुरूंनी केले. गुरू अर्जुनसिंग यांनी शिख समाजाचे संघटन करून त्यांना क्षात्रधर्माची दिक्षा दिली. गुरू गोविंदसिंगांनी 'ज्याचे शस्त्र त्याचे राज्या, ज्याचे शस्त्र त्याचा धर्म' या धोरणानुसार सैन्याची उभारणी केली. गुरू गोविंदसिंगांनी वडिलांच्या हत्येचा सूड घेण्यासाठी शिखांचे संघटन केले, शिख पंथियांची लढाऊ खालसा संघटना निर्माण केली. गुरू गोविंदसिंगांच्या धोरणानुसारच शिख पंथियांनी ५'क्ष' वापरण्यास सुरवात केली. पुढे बंदा वैरागीने तर गुरू गोविंदसिंगांच्या पाठिंब्यावर ४० हजाराची फौज उभी केली. बंदाने मुलकी व लष्करी व्यवस्था निर्माण करून ३/४ पंजाब आपल्या वर्चस्वाखाली आणला. शिखांचा कट्टर विरोधक सरहिंदचा मुघल सुभेदार वजीरखान यास ठार केले. सरहिंद उद्ध्वस्त केले. पुढे मुघल-शीख संघर्षात बंदा ठार झाला. शीखांची हालाखीची परिस्थिती निर्माण झाली. परंतु गुरू अर्जुनसिंग, गुरू गोविंदसिंग यांनी शिखांच्यामध्ये जागृत केलेला क्षात्र धर्म त्यांना स्वस्थ राहू देत नव्हता. त्यांनी खालसा पंथांच्या माध्यमातून शीखांना पुन्हा संघटीत केले. मुघलांच्या विरोधाला न जुमानता इ. स. १७६९ मध्ये सर्व पंजाब आपल्या वर्चस्वाखाली आणून स्वतंत्र पंजाब राज्याची निर्मिती केली. शीखांच्यामधील क्षात्रधर्म भारतवर्षाला अभिमान वाटावा असाच आहे.

**शिखांचे उत्सव दिन :**

शिखांच्या उत्सव दिनामध्ये प्रामुख्याने खालील उत्सव दिनांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.

१. गुरू नानक जयंती

२. गुरू गोविंदसिंग यांची जयंती

३. अमृतदीक्षा दिन

४. गुरू अर्जुनसिंगांचा वलिदान दिन

वरील घटनांचा आढावा घेतल्यानंतर आपणास असे म्हणता येईल की शीख धर्माचे तत्त्वज्ञान सर्वांना आचरता येईल असे आहे. तर वारसा उज्वल, क्षात्रधर्म व राष्ट्रप्रेम वृद्धींगत करणारा आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–१ :**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१) संसारी सुखात राहूनही मोक्ष मिळवता येतो असे ........... नी म्हटले आहे.

२) दयारामचे जन्मस्थळ ............. होय.

३) गुरुमुखी सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम ................ नी केले.

४) शीख धर्मप्रसारासाठी ............ यांनी ३६० गाद्या तयार केल्या.

५) गुरु गोविंदसिंग यांची समाधी ............. येथे आहे.

**ब) योग्य पर्याय निवडा.**

विधान १ : गुरूनानकांच्या पाठिंब्यामुळे यंदा वैरागीने ४० हजारांची फौज उभी केली

विधान २ : गुरू गोविंदसिंग यांनी शीख समाजाचे संघटन करून त्यांना क्षात्रधर्माची दिक्षा दिली.

१) पहिले विधान बरोबर, दुसरे विधान चुकीचे.

२) दुसरे विधान बरोबर, पहिले विधान चुकीचे.

३) दोन्ही विधाने बरोबर.

४) दोन्ही विधाने चुकीची.

### ४.२.२ लघुचित्रे : मुघल आणि दख्खन

### ४.२.२.१ लघुचित्रे : मुघल

लघु चित्रकला पर्शियन, भारतीय आणि इस्लामिक कलात्मक परंपरांचे एक उल्लेखनीय संमिश्रण दर्शवते. हा कला प्रकार मुघल सम्राटांच्या, विशेषत: अकबर, जहांगीर आणि शाहजहान यांच्या आश्रयाखाली विकसित झाला हा कलाप्रकार त्याच्या उत्कृष्ट सौंदर्य आणि ऐतिहासिक महत्त्वासाठी कलाप्रेमी आणि इतिहासकारांना मोहित करत आहे.

**उत्पत्ती आणि विकास**

सम्राट अकबर (१५५६-१६०५) च्या कारकिर्दीत मुघल लघुचित्रकला उदयास आली. कलात्मक अभिव्यक्ती असलेल्या मुघल लघुकलेने पर्शियन शैली व स्वदेशी भारतीय परंपरा यांची उत्तम सांगड घातलेली आपल्याला दिसून येते.

अकबराच्या कारकिर्दीत, फतेहपूर सिक्री येथील इम्पीरियल एटेलियर (कार्यशाळा) कलात्मक नवनिर्मितीचे केंद्र बनले. पर्शियातील मीर सय्यद अली आणि अब्द अल-समद या कलाकारांनी आणि नंतर बसवान आणि केसू दास सारख्या भारतीय कलाकारांनी विशिष्ट मुघल शैलीच्या विकासात योगदान दिले. या शैलीचे तपशीलवार ब्रशवर्क, नैसर्गिक खनिजांपासून बनवलेले दोलायमान रंग आणि सजावटीसाठी सोने आणि चांदीचा वापर याद्वारे वैशिष्ट्यीकृत केले गेले.

**विषय :**

मुघल लघुचित्रांमध्ये सम्राटांच्या विविध आवडी आणि त्या काळातील सांस्कृतिक वातावरण प्रतिबिंबित करणाऱ्या विषयांची विस्तृत श्रेणी समाविष्ट आहे:

**ऐतिहासिक घडामोडी आणि लढाया :**

महत्त्वाच्या ऐतिहासिक घटना, लढाया आणि समारंभ लहान स्वरूपात चित्रित करण्यात आले होते, ज्यामध्ये मुघल साम्राज्याच्या यशांचे आणि विजयांचे सचित्र वर्णन होते.

**शिकार आणि प्राणी अभ्यास :**

अकबराच्या शिकारीबद्दलच्या प्रेमामुळे सम्राटाच्या पराक्रमाचे आणि शिकार दृश्यांचे चित्रण करण्यात आले.

**साहित्यिक आणि पौराणिक कथा :**

रामायण आणि महाभारत यासारख्या हिंदू महाकाव्यांतील कथा, पर्शियन साहित्य आणि इस्लामिक ग्रंथ हे देखील लोकप्रिय विषय होते. ही कथा अनेकदा सांस्कृतिक बारकावे आणि प्रतिकात्मक अर्थांच्या संवेदनशीलतेने चित्रित केली गेली.

**तंत्र आणि शैली :**

मुघल लघुचित्रकला त्याच्या तांत्रिक अत्याधुनिकतेसाठी आणि सौंदर्याच्या आकर्षणासाठी प्रसिद्ध आहे.

**पर्शियन प्रभाव :**

पर्शियन लघु चित्रकलेचा प्रभाव सपाट दृष्टीकोन, गुंतागुंतीचे नमुने आणि नाजूक ब्रशवर्कच्या वापरामध्ये दिसून येतो. तथापि, मुघल कलाकारांनी त्यांच्या स्वत: च्या कलात्मक संवेदना आणि सांस्कृतिक संदर्भानुसार या तंत्रांचे रुपांतर केले.

**तपशील आणि वास्तववाद :**

लहान आकार असूनही (सामान्यत: काही इंच ते एक फूट उंचीपर्यंत), मुघल लघुचित्रे तपशीलांकडे बारकाईने लक्ष देऊन वैशिष्ट्यीकृत आहेत. फॅब्रिक्स आणि दागिन्यांच्या चित्रणापासून ते लँडस्केप आणि स्थापत्यशास्त्रीय चित्रणापर्यंत रचनेचा प्रत्येक पैलू अचूक आणि काळजीपूर्वक अंमलात आणला गेला आहे.

**रंग आणि रंगद्रव्ये :**

कलाकारांनी खनिजे, भाजीपाला आणि कीटकांसह नैसर्गिक स्त्रोतांपासून मिळवलेल्या ज्वलंत रंग छटा वापरल्या आहेत.

**कलाकार :**

मुघल दरबाराने भारतातील आणि पर्शिया आणि मध्य आशियातील प्रतिभावान कलाकारांची विविध श्रेणी आकर्षित केली. या कलाकारांनी मन्सूर, बिशनदास आणि अबूल हसन यांसारख्या प्रख्यात चित्रकारांच्या देखरेखीखाली विशेष एटेलियर्समध्ये काम केले, ज्यांनी त्या काळातील कलात्मक दिशा तयार करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

**ऱ्हास आणि वारसा :**

१७ व्या शतकाच्या उत्तरार्धात मुघल लघुचित्रकलेचा ऱ्हास सुरू झाला. शाही संरक्षणात घट झाल्यामुळे कलाकार दरबारी थीम सोडून अधिक प्रादेशिक शैली आणि विषयांकडे वळले.

**४.२.२.२ लघुचित्रे : दख्खन**

दख्खनची सूक्ष्म चित्रे १५ व्या ते १७ व्या शतकाच्या उत्तरार्धात दक्षिण भारतातील डेक्कन सल्तनतमध्ये विकसित झालेल्या चित्राच्या एका विशिष्ट प्रादेशिक शैलीचा संदर्भ देतात. त्यांच्या अद्वितीय कलात्मक वैशिष्ट्यांसाठी आणि सांस्कृतिक संश्लेषणासाठी ओळखले जाणारे, डेक्कन लघुचित्रे या प्रदेशाच्या कलात्मक आणि ऐतिहासिक समृद्धीची आकर्षक झलक देतात.

**ऐतिहासिक संदर्भ :**

बहमनी सल्तनत (१३४७-१५२७) आणि गोलकोंडा सल्तनत (१५१२-१६८७) आणि विजापूर सल्तनत (१४९०-१६८६) यांसारखी दख्खन सल्तनत ही इस्लामी संस्कृती आणि संरक्षणाची प्रसिद्ध केंद्रे होती. या सल्तनतांमध्ये हिंदू, मुस्लिम आणि पर्शियन लोकांचा समावेश असलेल्या विविध लोकसंख्येचा समावेश होता, ज्यामुळे डेक्कनी लघु चित्रकलेच्या विकासावर प्रभाव पाडणारे एक दोलायमान सांस्कृतिक वातावरण निर्माण झाले.

**वैशिष्ट्ये**

दख्खन लघुचित्रे अनेक विशिष्ट वैशिष्ट्ये प्रदर्शित करतात :

**सिंक्रेटिक शैली :** दख्खनी कलाकारांनी पर्शियन आणि इस्लामिक प्रभावांसह देशी भारतीय कलात्मक परंपरांचे मिश्रण केले, परिणामी एक अनोखी सिंक्रेटिक शैली बनली जी त्याच्या समृद्ध रंग पॅलेट, गीतात्मक रचना आणि गुंतागुंतीच्या तपशीलाने वैशिष्ट्यीकृत आहे

**पोर्ट्रेट :** मुघल लघुचित्रांप्रमाणे, दख्खनी पेंटिंगमध्ये अनेकदा शासक, दरबारी आणि उच्चभ्रूंचे चित्रण केले जाते, ज्यात सल्तनतच्या ऐश्वर्य आणि अधिकारावर जोर दिला जातो.

**शिकारीची दृश्ये :** मुघल कलेप्रमाणेच, शिकारीचे दृश्य लोकप्रिय होते, जे सुलतानचे पराक्रम आणि बाह्य क्रियाकलापांबद्दलचे प्रेम दर्शवितात.

**रोमँटिक आणि साहित्यिक थीम :** दख्खनी लघुचित्रांमध्ये पर्शियन आणि भारतीय साहित्यातील प्रणय कथा, पौराणिक कथा आणि दरबारी षडयंत्र यांचा समावेश होतो.

**रंग आणि तंत्र :** दख्खनी चित्रकारांनी सजीव रंगांचा वापर केला, ज्यात डीप ब्लूज, हिरवे आणि लाल रंगांचा समावेश होता. ठळक रंगांचा वापर आणि क्लिष्ट ब्रशवर्कमुळे दख्खनी लघुचित्रांना त्यांच्या मुघल समकक्षांपेक्षा वेगळे केले.

**प्रादेशिक भिन्नता :**

प्रत्येक दख्खन सल्तनतने सूक्ष्म चित्रकलेची स्वतःची वेगळी शैली विकसित केली:

**बहमनी सल्तनत :** बहमनी सल्तनत अंतर्गत दख्खनी चित्रकलेचा प्रारंभिक टप्पा पर्शियन आणि देशी भारतीय शैलींच्या प्रभावाने चिन्हांकित होता. कलाकारांनी अनेकदा ऐतिहासिक घटना आणि दरबारी दृश्ये वर्णनात्मक स्वभावाने चित्रित केली.

**गोवळकोंडा सल्तनत :** त्याच्या परिष्करण आणि नाजूकपणासाठी ओळखले जाणारे, गोवळकोंडा लघुचित्रांमध्ये काव्यात्मक आणि रोमँटिक थीमवर जोर देण्यात आला. नाजूक ब्रशवर्क आणि गीतात्मक रचना सांस्कृतिक सुसंस्कृतपणाचे प्रतिबिंबित करतात.

**विजापूर सल्तनत :** विजापूर लघुचित्रे त्यांच्या ठळक रंगांनी आणि गतिमान रचनांनी वैशिष्ट्यीकृत होती. येथील कलाकारांनी लढाया, न्यायालयीन समारंभ आणि वास्तुशिल्पीय निसर्गचित्रे नाट्यमयतेने चित्रित करण्यात उत्कृष्ट कामगिरी केली.

**कलाकार :**

डेक्कन सल्तनतांनी विविध क्षेत्रांतील कुशल कलाकारांना आकर्षित केले, परिणामी विविध कलात्मक समुदाय निर्माण झाला. फारुख बेग आणि मुहम्मद कासिम यांसारख्या प्रख्यात कलाकारांनी दख्खनी शैलीला आकार देण्यात, पर्शियन तंत्रांसह स्थानिक प्रभावांचे मिश्रण करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

**ऱ्हास आणि वारसा :**

१७ व्या शतकाच्या उत्तरार्धात दखखनमधील मुघल साम्राज्याचा ऱ्हास आणि त्यानंतरच्या उदयामुळे दख्खनी लघुचित्रकलेचा ऱ्हास सुरू झाला. तथापि, डेक्कनी लघुचित्रांचा वारसा प्रादेशिक कलात्मक परंपरेवर प्रभाव टाकत आहे आणि डेक्कन समाजाचे क्रमित स्वरूप प्रतिबिंबित करणारी एक महत्त्वाची सांस्कृतिक कलाकृती आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–२**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१. ................. च्या कारकिर्दीत मुघल लघुचित्रकला उदयास आली

२. १७ व्या शतकाच्या उत्तरार्धात ............... लघुचित्रकलेचा ऱ्हास सुरू झाला

३. ............. लघुचित्रे त्यांच्या ठळक रंगांनी आणि गतिमान रचनांनी वैशिष्ट्यीकृत होती.

४. अकबराच्या कारकिर्दीत, फतेहपूर सिक्री येथील ............. कलात्मक नवनिर्मितीचे केंद्र बनले.

५. पर्शियातील मीर सय्यद अली आणि अब्द अल–समद या कलाकारांनी आणि नंतर बसवान आणि केसू दास सारख्या भारतीय कलाकारांनी विशिष्ट ............. शैलीच्या विकासात योगदान दिले.

**ब) योग्य पर्याय निवडा.**

विधान १ : दख्खनी लघुचित्रांमध्ये पर्शियन आणि भारतीय साहित्यातील प्रणय कथा, पौराणिक कथा आणि दरबारी षडयंत्र यांचा समावेश होतो.

विधान २ : ठळक रंगांचा वापर आणि क्लिष्ट ब्रशवर्कमुळे दख्खनी लघुचित्रांना त्यांच्या मुघल समकक्षांपेक्षा वेगळे केले.

१) पहिले विधान बरोबर, दुसरे विधान चुकीचे.

२) दुसरे विधान बरोबर, पहिले विधान चुकीचे.

३) दोन्ही विधाने बरोबर.

४) दोन्ही विधाने चुकीची

## ४.२.३ स्थापत्य : ताजमहाल, गोलघुमट, गोवळकोंडा किल्ला

### ४.२.३.१ ताजमहाल :

भारतातील आग्रा येथे स्थित ताजमहाल ही जगातील सर्वात प्रतिष्ठित इमारतींपैकी एक आहे जी तिच्या वास्तू सौंदर्य आणि ऐतिहासिक महत्त्वासाठी प्रसिद्ध आहे. मुघल सम्राट शाहजहानने त्याच्या प्रिय पत्नी

मुमताज महलच्या स्मरणार्थ बांधलेला, ताजमहाल हा मुघल वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. ज्यामध्ये इस्लामिक, पर्शियन, ओटोमन तुर्की आणि भारतीय वास्तुशैलीतील घटकांचे मिश्रण आहे.

**स्थापत्यशास्त्रीय वैशिष्ट्ये :**

**लेआउट आणि डिझाइन :**

ताजमहाल सममितीयरित्या नियोजित आहे, एका उंच संगमरवरी प्लॅटफॉर्मच्या प्रत्येक कोपऱ्यात चार मिनारांची मध्यवर्ती रचना आहे. हे इस्लामिक परंपरेतील नंदनवनातील चार नद्यांचे प्रतीक असलेल्या जलवाहिन्यांनी चारबाग (मुघल बाग) मध्ये विभाजित केले आहे.

**साहित्य :**

मुख्य बांधकाम साहित्य पांढरा संगमरवर आहे, जो राजस्थान आणि भारतातील इतर प्रदेशातून आणला गेला. संगमरवर त्याच्या शुद्धता आणि प्रकाशमानतेसाठी प्रसिद्ध आहे. अर्ध-मौल्यवान दगड जसे की नीलमणी, लॅपिस लाझुली आणि नीलम यांचा वापर संगमरवरी पृष्ठभागांवर जटिल फुलांचे नमुने आणि सुलेखन तयार करण्यासाठी केला जात असे, हे तंत्र पिएट्रा ड्युरा म्हणून ओळखले जाते.

**घुमट :**

ताजमहालला एका मोठ्या मध्यवर्ती घुमटाचा मुकुट घातलेला आहे, ज्याचे वर्णन बल्बस घुमट म्हणून केले जाते. मुख्य संरचनेचे प्रत्येक कोपरे चार लहान छत्र्यांनी (मंडप) वेढलेले आहेत.

**सुलेखन आणि अलंकार :**

ताजमहालचा बाह्य आणि आतील भाग कुराणातील गुंतागुंतीच्या कॅलिग्राफीने सुशोभित केलेला आहे. सुंदर पर्शियन आणि अरबी लिपीचा येथे वापर झालेला आपल्याला दिसून येतो. येथील शिलालेखांमध्ये नंदनवन, अनंतकाळ आणि दैवी दया या विषयांवर भर देणारी वचने समाविष्ट आहेत. फुलांचे आणि भौमितिक नमुने, तसेच सममितीय आकृत्या, भिंती, छत आणि दर्शनी भाग कव्हर करतात, जे सजावटीच्या कलांमध्ये मुघल प्रभुत्व दर्शवतात.

**सममिती आणि संतुलन :**

ताजमहाल त्याच्या स्थापत्य रचनेत परिपूर्ण सममिती आणि समतोलपणाचे उदाहरण देतो. सभोवतालच्या जलवाहिन्यांमधील मुख्य संरचनेचे प्रतिबिंब त्याचा दृश्यमान सुसंवाद आणि भव्यता वाढवते.

**बागा :**

ताजमहालच्या सभोवतालच्या बागांचा चारबाग लेआउट हे मुघल उद्यान डिझाइनचे वैशिष्ट्य आहे. यात मार्ग, कारंजे, परावर्तित तलाव आणि हिरवीगार हिरवळ आहे, ज्यामुळे एक शांत आणि नयनरम्य वातावरण तयार होते.

**बांधकाम आणि वारसा :**

ताजमहालचे बांधकाम १६३२ मध्ये सुरू झाले आणि पूर्ण होण्यासाठी सुमारे २० वर्षे लागली, मुघल साम्राज्यातून आणि इतर हजारो कारागीर आणि मजूर कामाला लागले. ताजमहालच्या स्थापत्य आणि सौंदर्यविषयक उत्कृष्टतेमुळे त्याला युनेस्को जागतिक वारसा स्थळ आणि भारताच्या सांस्कृतिक वारशाचे प्रतीक म्हणून मान्यता मिळाली आहे. ताजमहाल दरवर्षी लाखो अभ्यागतांना आकर्षित करत आहे, जे केवळ त्याच्या वास्तुशास्त्रीय वैभवानेच नव्हे तर त्याच्या निर्मितीला प्रेरणा देणाऱ्या मार्मिक प्रेमकथेने देखील आकर्षित करते.

**सांस्कृतिक आणि प्रतीकात्मक महत्त्व**

त्याच्या स्थापत्य सौंदर्याच्या पलीकडे, ताजमहाल सम्राट शाहजहानच्या पत्नी मुमताज महलसाठीच्या अखंड प्रेमाचे प्रतीक आहे, ज्यामुळे ते जागतिक संस्कृतीत प्रेम आणि भक्तीचे एक मार्मिक प्रतीक बनले आहे. ताजमहाल हे विविध सांस्कृतिक प्रभाव आणि कलात्मक परंपरेचे संश्लेषण प्रतिबिंबित करते, मुघल साम्राज्याच्या शिखरावर असलेल्या सांस्कृतिक आणि वास्तुशिल्पीय कामगिरीचे प्रदर्शन करते. ताजमहाल हा मानवी सर्जनशीलता आणि कारागिरीचा पुरावा आहे, जो मुघल वास्तुकलेच्या शिखराचे उदाहरण देतो आणि चिरंतन प्रेम आणि सौंदर्याला शाश्वत श्रद्धांजली म्हणून काम करतो.

**४.२.३.२ गोलघुमट**

भारताच्या कर्नाटक राज्यातील विजापूर (आता विजयपुरा) येथे स्थित गोलघुमट हे स्थापत्यशास्त्रातील अद्भुत आणि इंडो-इस्लामिक वास्तुकलेचे महत्त्वपूर्ण स्मारक आहे. १७ व्या शतकात आदिल शाही राजघराण्यातील सुलतान मुहम्मद आदिलशाहच्या कारकिर्दीत बांधलेला गोलघुमट त्याच्या भव्य घुमट आणि श्रवणीय चमत्कारांसाठी प्रसिद्ध आहे.

**स्थापत्यशास्त्रीय वैशिष्ट्ये**

**घुमट :**

गोलघुमटचे सर्वात उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे त्याचा प्रचंड घुमट, जो रोममधील सेंट पीटर बॅसिलिकाच्या घुमटानंतर जगातील दुसरा सर्वात मोठा घुमट आहे. घुमट ४४ मीटर (१४४ फूट) व्यासाचा आहे आणि जमिनीपासून ५१ मीटर (१६७ फूट) उंचीवर आहे. घुमट कोणत्याही अंतर्गत खांबांशिवाय बांधला गेला आहे, जो त्याच्या स्थापत्यशास्त्रातील महत्त्व वाढवणारा एक अभियांत्रिकी पराक्रम आहे.

**रचना :**

गोलघुमट ही एक घन-आकाराची रचना आहे ज्याची प्रत्येक बाजू अंदाजे ४७.५ मीटर (१५६ फूट) आहे. हे उंच प्लॅटफॉर्मवर उभे आहे आणि प्लॅटफॉर्मच्या प्रत्येक कोपऱ्यात मिनारसारखा बुरुज आहे, ज्यामुळे त्याची भव्यता वाढली आहे.

**व्हिस्परिंग गॅलरी :**

गोलघुमटचे सर्वात मनोरंजक वैशिष्ट्य म्हणजे घुमटाच्या आत असलेली ''व्हिस्परिंग गॅलरी'' होय. गॅलरी गोलाकार आहे. व्हिस्परिंग गॅलरीचे ध्वनीशास्त्र असे आहे की एका टोकाला तयार होणारा सर्वात मंद आवाजही जवळपास ३७ मीटर (१२१ फूट) दूर दुसऱ्या टोकाला स्पष्टपणे ऐकू येतो. या घटनेचे श्रेय आर्किटेक्चरल डिझाइनला दिले जाते, ज्यामध्ये क्लिष्ट कोरीव प्लास्टरवर्क आणि वक्र भिंती असतात ज्यात ध्वनी लहरींवर लक्ष केंद्रित केले जाते.

**अंतर्गत :**

गोलघुमटचे आतील भाग त्याच्या आकर्षक बाह्याच्या तुलनेत तुलनेने सोपे आहे. त्यात सुलतान मुहम्मद आदिल शाह, त्याच्या बायका आणि मुलींच्या थडग्या आहेत.घुमटाच्या खाली मध्यवर्ती एक मोठा कक्ष आहे, जो स्तंभ किंवा खांबांनी विनाअडथळा आहे, जो त्याच्या काळातील स्थापत्य नवकल्पना आणि अभियांत्रिकी पराक्रम दर्शवितो.

**बाह्य :**

गोलघुमटच्या बाहेरील भिंती कमानदार प्रवेशद्वार, गुंतागुंतीचे कोरीवकाम आणि इस्लामिक वास्तुकलेच्या वैशिष्ट्यपूर्ण सजावटीच्या बाल्कनींनी सुशोभित आहेत. संरचनेच्या प्रत्येक कोपऱ्यातील मिनार घन-आकाराच्या पायावर उभ्या जोर देतात, ज्यामुळे त्याची वास्तुशिल्पीय सममिती आणि संतुलन वाढते.

**बांधकाम आणि वारसा**

सुलतान मुहम्मद आदिल शाह II च्या कारकिर्दीत गोलघुमट हे १६२६ ते १६५६ दरम्यान बांधले गेले. हे आदिलशाही राजघराण्याच्या वास्तुशिल्पीय कामगिरीचा पुरावा म्हणून उभे आहे, अभियांत्रिकी, ध्वनीशास्त्र आणि कलात्मक अलंकरणातील एक उत्तम नमुना म्हणुन गोलघुमट ओळखले जाते.

गोलघुमट हे युनेस्कोचे जागतिक वारसा स्थळ आहे आणि हे एक लोकप्रिय पर्यटन आकर्षण आहे, जे जगभरातील अभ्यागतांना स्थापत्यशास्त्राचे वैभव आणि चमत्कार पाहून आश्चर्यचकित करण्यासाठी आकर्षित करते.

**सांस्कृतिक महत्त्व**

गोलघुमट हे केवळ विजापूरच्या ऐतिहासिक आणि स्थापत्य वारशाचे प्रतीक नाही तर दख्खन सल्तनत काळात प्रचलित इंडो-इस्लामिक स्थापत्य शैलीचे संश्लेषण देखील आहे. भारतातील मध्ययुगीन काळात विविध समुदाय आणि प्रदेशांमध्ये झालेल्या सांस्कृतिक आणि कलात्मक देवाणघेवाणीचे स्मरण म्हणुन हि वास्तू उभी आहे.

### ४.२.३.३ गोवळकोंडा किल्ला

भारताच्या तेलंगणा राज्यातील हैदराबादजवळ असलेला गोवळकोंडा किल्ला, एक आकर्षक किल्ला संकुल आहे जो त्याच्या मोक्याचे स्थान, वास्तुशास्त्रीय भव्यता आणि ऐतिहासिक महत्त्व यासाठी ओळखला जातो. १२व्या शतकात काकतिया राजवटीदरम्यान मातीचा किल्ला म्हणून सुरुवातीला बांधलेला, गोवळकोंडा किल्ला नंतर कुतुबशाही राजांनी मजबूत केला आणि त्याचा विस्तार केला, ज्यामुळे तो त्याच्या काळातील सर्वात मजबूत किल्ल्यांपैकी एक बनला.

**स्थापत्यशास्त्रीय वैशिष्ट्ये**

**मांडणी आणि रचना :**

गोवळकोंडा किल्ला एका ग्रॅनाईट टेकडीवर बांधला गेला आहे, जो सुमारे १२० मीटर (४०० फूट) उंच आहे. तटबंदी सुमारे ११ किलोमीटर (७ मैल) परिघामध्ये पसरलेली आहे, ज्यामध्ये अनेक दरवाजे, बुरुज आणि संरक्षणात्मक भिंती आहेत. किल्ला चार वेगळ्या किल्ल्यांमध्ये विभागलेला आहे, प्रत्येकाचे स्वतःचे प्रवेशद्वार आहे, ज्याला फतेह दरवाजा, बाला हिस्सार दरवाजा आणि इतर दोन प्रवेशद्वार म्हणतात.

**प्रवेशद्वार :**

**फतेह दरवाजा :** विजय दरवाजा म्हणूनही ओळखला जातो, तो त्याच्या ध्वनिक गुणधर्मांसाठी प्रसिद्ध आहे. या दरवाज्याजवळचा एक मंद आवाजही गडाच्या सर्वोच्च बिंदूवर, सुमारे १ किलोमीटर अंतरावर स्पष्टपणे ऐकू येतो.

**बाला हिस्सार दरवाजा :** हे किल्ल्याचे मुख्य प्रवेशद्वार आहे, ज्यामध्ये अनेक दरवाजे आणि खिंड आहेत जे शेवटी आतल्या तटबंदीपर्यंत पोहोचतात.

**तटबंदी :**

गोवळकोंडा किल्ला भिंती आणि बुरुज मोठे ग्रॅनाइट ब्लॉक वापरून बांधले गेले. डिझाइन सामर्थ्यशाली व बचावात्मक हेतूने बांधीले आहे. तटबंदीमध्ये अनेक बुरुज सामील आहेत जे जवळ येत असलेल्या शत्रूंचे स्पष्ट दृश्य देण्यासाठी आणि किल्ल्याचे प्रभावीपणे रक्षण करण्यासाठी रणनीतिकदृष्ट्या स्थित आहेत.

**राजवाडे आणि वास्तू :**

किल्ल्याच्या संकुलात अनेक राजवाडे, दालन, मशिदी आणि कुतुबशाही काळात बांधलेल्या इतर वास्तू आहेत. यामध्ये तारामती मशीद, इब्राहिम मशीद आणि इब्राहिम बाग या मोठ्या उद्यान संकुलाचा समावेश आहे.

**पाणी व्यवस्थापन :**

गोवळकोंडा किल्ला त्याच्या नाविन्यपूर्ण पाणीपुरवठा आणि साठवण व्यवस्थेसाठी प्रसिद्ध आहे. किल्ल्यावर पावसाचे पाणी गोळा करण्यासाठी आणि साठवण्यासाठी टाक्या आणि जलाशयांचे अत्याधुनिक जाळे होते, ज्यामुळे वेढा घालण्याच्या काळात विश्वसनीय पाणीपुरवठा सुनिश्चित केला जात असे.

**ध्वनिक चमत्कार :**

गोलघुमट प्रमाणेच, गोवळकोंडा किल्ला देखील प्रभावी ध्वनिक गुणधर्मांसाठी प्रसिद्ध आहे. फतेह दरवाज्याजवळील एका विशिष्ट बिंदूवर टाळ्या वाजवण्याचा आवाज किल्ल्याच्या शिखरावर स्पष्टपणे ऐकू येतो, जो त्याच्या बांधकाम करणाऱ्यांचे प्रगत स्थापत्यशास्त्राचे ज्ञान स्पष्ट करतो.

**ऐतिहासिक महत्त्व :**

गोवळकोंडा किल्ल्याने कुतुबशाही राजवंशाची राजधानी म्हणून काम केले. दख्खन प्रदेशाच्या इतिहासात याने महत्त्वाची भूमिका बजावली, त्याच्या उत्कर्ष काळात अनेक लढाया आणि वेढे पडलले. १६८७ मध्ये मुघल सम्राट औरंगजेबाने हा किल्ला काबीज केला, कुतुबशाही राजवटीचा अंत आणि मुघल साम्राज्यात गोवळकोंडा एकीकरण झाल्याचे पहावयास मिळते.

**वारसा आणि पर्यटन :**

गोवळकोंडा किल्ला हे लोकप्रिय पर्यटन स्थळ आणि युनेस्कोचे जागतिक वारसा स्थळ आहे, जगभरातील अभ्यागतांना त्याचे वास्तू वैभव, ऐतिहासिक महत्त्व आणि हैदराबाद शहराच्या विहंगम दृश्यांचे कौतुक करण्यासाठी आकर्षित करतो. मध्ययुगीन दखखनच्या समृद्ध इतिहासाची झलक देत, किल्ल्याचे लष्करी वास्तुकला, नाविन्यपूर्ण जल व्यवस्थापन प्रणाली आणि सांस्कृतिक वारसा यांचे मिश्रण इतिहासकार, वास्तुविशारद आणि पर्यटकांना सारखेच मोहित करत आहे. गोवळकोंडा किल्ला हा कुतुबशाही राजघराण्याच्या अभियांत्रिकी पराक्रमाचा आणि सांस्कृतिक कामगिरीचा पुरावा आहे, भारतातील सर्वात शक्तिशाली किल्ल्यांपैकी एक असणारा हा किल्ला त्याचे बांधकाम करणाऱ्या कारागिरांची धोरणात्मक दूरदृष्टी दर्शविते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–३**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१. मुघल सम्राट शाहजहानने त्याच्या प्रिय पत्नी मुमताज महलच्या स्मरणार्थ बांधलेला ............ हा मुघल वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना आहे.

२. गोवळकोंडा किल्ल्याने ................ राजवंशाची राजधानी म्हणून काम केले.

३. ............ ही वास्तू त्याच्या नाविन्यपूर्ण पाणीपुरवठा आणि साठवण व्यवस्थेसाठी प्रसिद्ध आहे.

४. ............... हे आदिलशाही राजघराण्याच्या वास्तुशिल्पीय कामगिरीचा पुरावा म्हणून उभे आहे.

५. ताजमहालचे बांधकाम ............. मध्ये सुरू झाले.

**ब) योग्य पर्याय निवडा.**

विधान १ : गोलघुमट हे अहमदनगरच्या ऐतिहासिक आणि स्थापत्य वारशाचे प्रतीक आहे.

विधान २ : गोवळकोंडा किल्ला हे आता एक लोकप्रिय पर्यटन स्थळ आणि युनेस्कोचे जागतिक वारसा स्थळ आहे

१) पहिले विधान बरोबर, दुसरे विधान चुकीचे.

२) दुसरे विधान बरोबर, पहिले विधान चुकीचे.

३) दोन्ही विधाने बरोबर.

४) दोन्ही विधाने चुकीची.

## ४.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

१) गुरु : शीख धर्मातील आध्यात्मिक नेता.

२) गुरुद्वारा : शीख प्रार्थनास्थळ.

३) लंगर : गुरुद्वारांमध्ये मोफत जेवण देणारे सामुदायिक स्वयंपाकघर.

४) गुरु ग्रंथ साहिब : शीख धर्माचा पवित्र ग्रंथ.

५) खालसा : बाप्तिस्मा घेतलेल्या शिखांचा समुदाय.

६) पाच Ks : केश (कापलेले केस), कारा (स्टीलचे ब्रेसलेट), कांगा (लाकडी कंगवा), कचेरा (सुती अंतर्वस्त्र), किरपण (तलवार).

७) पोर्ट्रेट : एखाद्या व्यक्तीचे कलात्मक प्रतिनिधित्व.

८) पर्शियन प्रभाव : पर्शियन कलेचा शैलीगत आणि सांस्कृतिक प्रभाव.

९) फोलिओ : हस्तलिखित किंवा पुस्तकाचे वैयक्तिक पान.

१०) गौचे : एक अपारदर्शक वॉटर कलर पेंट लघुचित्रांमध्ये वापरला जातो.

११) मिनार : मशीद किंवा समाधीशी संबंधित एक उंच मनोरा.

१२) घुमट : एक गोलाकार तिजोरी जी इमारत किंवा संरचनेचे छप्पर बनवते.

१३) छत्री : भारतीय वास्तुकलेतील उंच, घुमटाच्या आकाराचे मंडप.

१४) ध्वनीशास्त्र : इमारतीचे गुणधर्म हे ठरवतात की त्यामध्ये ध्वनी कसा प्रसारित केला जातो.

१५) तटबंदी : हल्ल्याविरूद्ध संरक्षण इमारत किंवा ठिकाण

## ४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–१ ची उत्तरे

अ) रिकाम्या जागा भरा.

१) गुरुनानक २) लाहोर ३) गुरु अंगद ४) गुरु हरीराय

५) नांदेड

ब) दोन्ही विधाने चुकीची

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–२ ची उत्तरे

अ) रिकाम्या जागा भरा.

१. सम्राट अकबर २. मुघल ३. विजापूरची ४. इम्पिरियल एटेलीयर

५. मुघल

ब) दोन्ही विधाने बरोबर.

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–३ ची उत्तरे

अ) रिकाम्या जागा भरा.

१. ताजमहाल २. कुतुबशाही ३. गोवळकोंडा किल्ला

४. गोलघुमट ५. १६३२

ब) दुसरे विधान बरोबर, पहिले विधान चुकीचे

## ४.५ सारांश

१५ व्या शतकात गुरु नानक यांनी स्थापित केलेला शीख धर्म एकेश्वरवाद, समानता आणि सामुदायिक सेवेवर जोर देतो, गुरु ग्रंथ साहिब हा त्याचा पवित्र ग्रंथ आणि मुख्य चिन्हे म्हणून पाच 'क्ष' आहेत. शीख धर्माच्या प्रसारात गुरुनानकांसोबतच इतर गुरुंचेही योगदान महत्वपूर्ण आहे. मुघल लघुचित्रे, त्यांच्या गुंतागुंतीच्या तपशीलासाठी आणि दोलायमान रंगांसाठी ओळखली जातात, त्यामध्ये दरबारातील दृश्ये आणि पोट्रेटचे चित्रण केले गेलेले आहे. पर्शियन आणि स्थानिक शैलींचा प्रभाव असलेल्या डेक्कन लघुचित्रांमध्ये समृद्ध रंग आणि फुलांचे नमुने आढळतात.शाहजहानने तयार केलेला ताजमहाल, विजापूरमधील गोलघुमट, त्याच्या भव्य घुमट आणि गॅलरीसाठी प्रसिद्ध आहे तसेच हैदराबादमधील गोवळकोंडा किल्ला, त्याच्या मजबूत तटबंदीसाठी प्रसिद्ध आहे. या तीन वास्तू म्हणजे मध्ययुगीन भारतातील स्थापत्यशास्त्राचा एक चमत्कारिक नमुना आहेत.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) दीर्घोत्तरी प्रश्न.

१. शीख धर्माचे स्वरूप आणि रचना स्पष्ट करा.

२. शीख धर्मातील गुरूंच्या कार्याचा आढावा घ्या.

३. मुघल व दख्खन लघुचित्रशैली बद्दल सविस्तर माहिती लिहा.

४. ताजमहालच्या स्थापत्यशैलीचा सविस्तर आढावा घ्या.

ब) टिपा लिहा.

१. शीख धर्माची धार्मिक केंद्रे.

२. शीख धर्माचे तत्वज्ञान.

३. गोलघुमटची स्थापत्यशैली.

४. गोवळकोंडा किल्ल्याचे स्थापत्य.

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

१) न.वी.गाडगीळ : शीखांचा इतिहास

२) सोमनाथ रोडे : शीखांचा इतिहास

३) इरफान हबीब(संपा.) : 'मध्यकालीन भारत'

४) "Taj Mahal: The Illumined Tomb" : W. E. Begley and Z. A. Desai

❑❑❑